।। श्री गणेशाय नमः ।।

ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरुपा ।।

# ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार

डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे

सा विद्या या विमुक्तये

वीहा पब्लिकेशन

**ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार**
**Dnyneshwritil Sahityavichar**

**लेखक**
**डॉ. अनिल सहस्रबुद्धे**
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष– ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे
मो. ९८५०७३१६४०

**प्रकाशक** : वीहा पब्लिकेशन्स,
प्लॉट नं. २१, अजिंक्यनगर, बोरुडे मळा,
भुतकरवाडी, सावेडी रोड, अहिल्यानगर ४१४००३

**प्रकाशक क्रमांक** : ४

**प्रथम आवृत्ती** : १९९१, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे.
**द्वितीय आवृत्ती** : २००५, १९९१, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे.
**तृतीय आवृत्ती** : २०२४, वीहा पब्लिकेशन्स, अहिल्यानगर

**टाईपसेटींग** :
श्रीपाद कुलकर्णी, अहिल्यानगर
मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक** : वीहा पब्लिकेशन्स, अहिल्यानगर

**सेवा मूल्य** ३००/–



**प.पूजनीय गुरुवर्य कै. हरिभाऊ वि. फडके (सर) यांच्या**
**अनन्य स्मरणपूर्वक,**
**सश्रद्धभक्त रसिकांच्या चरणी**
**भावपूर्णतेने ग्रंथ समर्पित.**

## सासिन्नले प्रसन्नतेचे मळे


| | | | |
|---|---|---|---|
| | | तृतीय आवृत्तीच्या निमित्ताने हृदयसंवाद | ०५ |
| | | हृदयसंवाद | ०७ |
| एक | – | शब्दब्रह्म कवळले | ११ |
| दोन | – | परतत्त्व स्पर्शवाद | २० |
| तीन | – | साहित्याचे स्वरूप | ३४ |
| चार | – | साहित्याचे प्रयोजन | ४४ |
| पाच | – | साहित्यिक व औचित्यविचार | ५७ |
| सहा | – | साहित्यनिर्मिती प्रक्रिया विचार | ६७ |
| सात | – | साहित्याची भाषा व शैली | ७७ |
| आठ | – | साहित्यास्वाद | ८८ |
| नऊ | – | आस्वादक व अभिरुची विचार | ९८ |
| दहा | – | परिशिष्ट : ओवी-संग्रह | ११२ |


**तैसा मी अनुग्रहीतु । साधूंचा निरुपितु ।**
**ते आपुला अलंकारितु । भलतयापरी ।** (अ.१, ८२)



# तृतीय आवृत्तीच्या निमित्ताने हृदयसंवाद

'ज्ञानेश्वरी' लेखन सप्तशताब्दी निमित्ताने प.पू. गुरुवर्य कै.श्री. ह. वि. फडके सर यांनी अनुग्रहित केल्याने, 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' ग्रंथाचे लेखन, १९९१ मध्ये घडले. 'दास्ताने रामचंद्र आणि कंपनी' या ख्यातकीर्त प्रकाशनाने ग्रंथ मोठ्या गांभीर्याने प्रसिद्ध केला. कांची काम कोटी पीठाच्या जगद्गुरु शंकराचार्य प.पू. श्री जयेन्द्र सरस्वतींच्या शुभहस्ते, महाराष्ट्रातील, श्री ज्ञानेश्वरीवर स्वतंत्रपणे लेखन करणाऱ्या, रा. चिं. ढेरे, राम शेवाळकर, व. दि. कुलकर्णी, हे. वि. इनामदार, वि. रा. करंदीकर आदि निवडक नऊ विद्वानांच्या मालिकेत माझ्यासारख्या अल्पअभ्यासकाने लिहिलेल्या ग्रंथाला विद्वत् पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. जणू माउलींचा माझ्याशी काही ऋणानुबंध गुरुवर्यांच्या माध्यमातून जोडला गेला असावा. त्यानंतर 'अमृत गुटिका', 'स्वरूपाशी संवाद', 'हरिपाठ' या ग्रंथांच्या लेखनसेवेने हा ऋणानुबंध शतगुणित झाला. 'मनोस्वरूप विचार' ग्रंथाच्या निमित्ताने तो ऋणानुबंध अनंतजन्मींचा असावा हे मनी ठसावले.

'श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्ग' आयोजित झाला. आचार्यपदावरून श्री ज्ञानेश्वरीचे सर्वांगीण चिंतन गेली दोन वर्षे घडत असतांनाच, वीहा पब्लिकेशनच्या माध्यमातून 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीचा योग जुळून आला. पांडुरंगस्वरूप माउली ज्ञानेश्वरांच्या सप्तशतकोत्तर स्वर्णमहोत्सवी जन्मजयंती महाकुंभ पर्वात हे घडावे; हे केवळ माउलींच्या कृपाप्रसादानेच शक्य आहे. महर्षी अगस्ति मुनींची अद्वैताची अमृतधारा, अमृतवाहिनीच्या तटी निधीनिवास-नेवासे येथे श्री ज्ञानेश्वरीच्या रूपाने कलियुगे खळाळपणे प्रवाहित झाली. त्या प्रवाहात माझ्यावरील माउलींच्या कृपावर्षावातून 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' स्वरूपातील वाग्विलास धारा त्रिवार पुष्ट होत प्रवाहित व्हावी हा योगायोग नव्हे; तर कलियुगाच्या संभ्रमावस्थेच्या कातळांना भेदून; अमृतधारा नित्य प्रवाहित

राहण्यासाठीचा अभिक्रम आहे. ‘अद्वैताचा मार्ग कलि चालियेला । अगस्त्यांची दिंडी पंढरीला ।।’ असा हा समसमासंयोग आहे.

विद्यापीठीय अभ्यासकांना, मर्मज्ञांना, सर्वस्तरातील वाग्विलास अभ्यासकांना, वाणीविलासाचा आनंद सुलभतेने घेता यावा यासाठीच हा माउलींचा प्रसाद! एकाक्षर ब्रह्म ॐ स्वरूपाचा हा सर्वांसाठी आनंदविलास! म्हणूनच तृतीय आवृत्ती प.पूजनीय गुरुवर्य कै. हरिभाऊ वि. फडके (सर) यांच्या अनन्य स्मरणपूर्वक सश्रद्धभक्त रसिकांच्या चरणी भावपूर्णतेने समर्पित.

**प्रा. डॉ. अनिल सहस्रबुद्धे**



## प्रथम व द्वितीय आवृत्तीच्या निमित्ताने

# हृदयसंवाद

‘ज्ञानेश्वरी’ लेखन सप्तशताब्दीच्या निमित्ताने ‘ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार’ हा ग्रंथ घडण्यास मी निमित्त झालो आणि आपणांसारख्या सहृदय वाचकांसमोर हा ग्रंथ मांडला जातो आहे, हे परमभाग्य केवळ ज्ञानेश्वरमाऊलींच्या कृपाप्रसादानेच लाभले. अन्यथा –

**वांचूनि माझिये बोलतिये योग्यते । सर्वज्ञ भवादृश श्रोते ।**
**काय धड्यावरी सारस्वतें । पढों सिकिजे ।।** (अ.९, ८)

आपणांसारख्या ‘सर्वज्ञ’ आणि ‘जाणकार’ यांच्यासमोर माझी योग्यता कोणती?

‘ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार’ हा ग्रंथ लिहिण्याचा संकल्प सोडून तीन वर्षे उलटली. पू. गुरुवर्य कै. हरिभाऊ फडके यांना मुरगुड येथे भेटावयास गेलो. अनेक वर्षांनंतरची ही भेट. गुरुदेव रानडे यांचे पुस्तक मला त्यांनी भेट म्हणून दिले. पू.कै. फडके सर ज्या ज्या वेळी भेटत त्या त्या वेळी त्यांच्या वाग्यज्ञात आम्ही त्यांचे विद्यार्थी पावन होऊन जात असू. त्या दिवशी श्री ज्ञानेश्वरांविषयी चर्चा घडली. डॉ. मा. गो. देशमुखांचा ‘मराठीचे साहित्यशास्त्र’ हा प्रबंध आहे खरा; पण ज्ञानेश्वरांचे विचार अधिक प्रगत आणि विश्वव्यापक वाटतात. आधुनिक दृष्टिकोनातून ते पाहिले पाहिजेत. तू असं काही लिही. सत्त्याऐंशी वर्षे वयाचा हा वृद्ध, घारे डोळे किलकिले करून, शून्याचा वेध घेत माझ्याशी बोलत होता. आज्ञा झाली त्या क्षणी मी संकल्प सोडला, अर्थात मनातल्या मनात. कारण त्यांच्या बोलण्याने मन चेतले होते; तरी जाण झाली नव्हती. आज ग्रंथ मांडला जातोय; मोठ्या आत्मविश्वासानं मी तो मांडण्याचा प्रयत्न केलाय; पण संपूर्ण ‘जाण’ झाली का, असे मला कोणी विचारले तर मी मौन पाळणेच पसंत करीन आणि पू. फडके सरांचा आठव करीन. फडके सरांचे अनंत उपकार! त्यांनी मला उकिरड्यातून

उचलून उद्यानात उभे करण्याचा केवढा खटाटोप केलेला! त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न मी कधी करणार नाही; पण आपणांस मात्र माझी 'विनवणी सलगीची' - जे मांडले गेले आहे ते गुरुमाउलीच्या दृष्टीने जाणून घ्यावे -

**नातरी बालक बोबडां बोली । कां वांकुडां विचुकां पाउलीं ।**
**तें चोज करूनि माउली । रिझे जेवीं ।।** (अ.९, ६)

'परी आतां आमुतें गोड करावें ।' एवढेच पुन्हा विनवितो.

'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' हा ग्रंथ लिहिताना विद्वानांच्या मनात सातत्याने थैमान घालणाऱ्या सर्व प्रश्नांची जाणीव आहे - ज्ञानेश्वरांनीच ज्ञानेश्वरी लिहिली का? ज्ञानेश्वर साहित्यशास्त्री होते काय? निरनिराळ्या संदर्भात आलेले विचार साहित्यशास्त्र मांडण्यासाठी 'वडाची साल पिंपळाला' असे घेऊन साहित्यशास्त्र मांडणे योग्य होईल का? ज्ञानेश्वरांनी साहित्यसिद्धांत मांडण्यासाठी 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाचा प्रपंच केला होता काय? ज्ञानेश्वरांनी संस्कृत साहित्यशास्त्राचे अनुसरण केले, की स्वतंत्र विचार मांडले आहेत? तत्त्वज्ञान आणि गीतार्थ स्पष्ट करण्यासाठी आलेल्या ओव्या दूरान्वयाने, साहित्य विचार मांडण्यासाठी उपयुक्त वाटतात म्हणून, ती त्यांचा साहित्यविचार समजावून घेण्यासाठी सामग्री होऊ शकेल का? एक ना अनेक प्रश्न --

हे सर्व प्रश्न मनात नक्कीच विकल्प निर्माण करणारे आहेत. ते समजावून घेण्याचा प्रयत्न करूनही असे स्पष्टपणे म्हणावेसे वाटते, की तत्त्वज्ञान नेहमी मूलगामी विचार मांडते. ही मूलतत्त्वे जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करतात आणि ज्ञानेश्वर तत्त्वज्ञ होते. त्यांचे असे ठाम तत्त्वज्ञान होते. ते अनुभूतीच्या कसावर त्यांनी उतरविले होते. ते त्या तत्त्वज्ञानाचा अनुसर करताना दिसतात. आता ते तत्त्वज्ञ होते तसेच ते प्रतिभावंत श्रेष्ठ कवी म्हणजेच साहित्यिकही आहेत. त्यांनी आपले विचार अनुभूतीतून तत्त्वज्ञानाचा अनुसर करीत मांडले आहेत. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे साहित्यिक म्हणून (वक्ता म्हणून) ज्ञानदेवांची स्वतंत्र आणि स्पष्ट भूमिका असल्याचे उल्लेखांवरून जाणवते. ती भूमिका क्रांतिकारी होती हे तर सर्वमान्यच! मराठी भाषेतून आणि ओवी या खास मराठी छंदाचा वापर करून त्यांनी व्याख्यान दिले (ग्रंथरचना केली). 'ज्ञानेश्वरी' हे ज्ञानेश्वरांच्या साहित्यविषयक क्रांतिकार्याचे दृश्यस्वरूप होय! हे लक्षात घेऊन त्यांनी भिन्न भिन्न ठिकाणी भिन्न भिन्न संदर्भात मांडलेले विचार आणि 'वाङ्मय'विषयक आलेले विचार एकत्रितपणे (आणि मुक्तपणाने) त्यांचा 'साहित्यविचार' समजावून घेण्यास विचारात घेणे हे 'वडाची साल पिंपळाला' किंवा 'बादरायणी संबंधा'सारखे ठरण्याचे कारण नाही, असे म्हणावेसे वाटते.



म्हणूनच अतिशय मनस्वीपणाने, सबंध 'ज्ञानेश्वरी'त विखुरलेले ज्ञानेश्वरांचे स्फुट विचार (ओव्यांतून ग्रथित असलेले); त्यांचा 'साहित्यविचार' समजावून घेण्यास उपयुक्त वाटलेले उद्गार, ही ज्ञानेश्वरांचा 'साहित्यविचार' सिद्ध करण्यासाठी निश्चित सामुग्री आहे असे गृहीत धरून, 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' सिद्ध करण्याचा हा प्रयत्न आहे. म्हणूनच 'विकल्पाचिया झुळुका चुकवूनी' 'हृदयसंवाद' साधला जावा -

**येऱ्हवीं तरी मी मुर्खु । जरी जाहला अविवेकु ।**
**तरी संतकृपादीपकु । सोज्वळु असे ।।** (अ.१, ७६)

या ग्रंथासंबंधी एकूणच उदार दृष्टीने विचार करावा व 'तैसें घडतें प्रमेय घेइजे । उणें ते मज देइजे ।' आणि

**तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें ।**
**करूनि घेयावें हे तुमतें । विनवितुअसें ।।** (अ.१, ८०)

अशी संपूर्ण जबाबदारी आपणावर टाकण्याचा अधिकार मला दैवयोगानेच प्राप्त झाला आहे असे मी मानतो. म्हणूनच अतिशय धिटाईने लिहितो आहे. अर्थात आपण शिकविलेलेच मी पुन्हा आपणासमोर मांडतो आहे. म्हणून आपण माझे हे कोड पुरवाल अशी खात्री आहे; कारण -

**कां जे लळेयांचे लळे सरती । मनोरथांचे मनौरे पुरती ।**
**जरी माहेरें श्रीमंते होती । तुम्हां ऐसी ।।** (अ.९, ३)

'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' हा ग्रंथ सिद्ध करताना डॉ. माधव गोपाळ देशमुख यांचा 'मराठीचे साहित्यशास्त्र : ज्ञानेश्वर ते रामदास' हा ग्रंथ प्रेरणादायक जाणवला. डॉ. मधुसूदन परशुराम पेठे यांचा 'श्रीज्ञानदेव वाग्यज्ञ दर्शन' हा प्रबंध खूपच सहाय्यभूत वाटला. वाटाड्याच्या भूमिकेने डॉ. पेठे यांनी अभ्यासकांशी या ग्रंथातून हृदयसंवाद साधला असल्याचे जाणवले. याशिवाय अनेक मान्यवरांचे सुप्रसिद्ध ग्रंथ मला अनेक अर्थांनी उपयुक्त ठरले आहेत. या पूर्वसूरींच्या ऋणात सदैव राहण्याचे भाग्य मला लाभो.

ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा मनस्वीपणे उपयोग करीत, विशेषतः चिंतनाच्या योगाने, आधुनिक दृष्टिकोन स्वीकारून घडलेल्या या ग्रंथास प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे; माझे गुरुवर्य, ज्येष्ठमित्र, मित्र, हितचिंतक, अभ्यासक, साधक, ग्रंथपाल आणि माझे कुटुंबीय यांच्याकडून प्रोत्साहन व परोपरीचे सहाय्य मिळाले आहे सर्वांचा मी ऋणी आहे. त्या ऋणात राहणेच मला आवडेल. 'हिंद सेवा मंडळ' या माझ्या संस्थेने मला स्वीकारले, सांभाळले, वाढवले; मी जो काही आहे तो

या संस्थेमुळेच होय. ही संस्था म्हणजे एकप्रकारे माझी माउलीच होय. तिच्या अपार मायेच्या पंखाखाली माझे जीवन सतत विकसते आहे. माउलीचे पांग का कोठे कशाने फिटत असतात? तिचा 'पंढियंता' असणे हेच भाग्य! ज्या अमृतवाहिनीच्या तीरावर ज्ञानेश्वरांचा हा 'ज्ञानेश्वरीस्वरूप' वाग्यज्ञ घडला त्या अमृतवाहिनीच्या म्हणजे प्रवरेच्या पाण्यावर माझा पिंड पोसला; म्हणूनच मला ज्ञानेश्वरांची चार उच्छिष्ट शिते चाखण्याचे परमभाग्य मिळाले. त्या प्रवरामातेला आणि काठच्या मातीला मी वंदन करतो.

'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' या ग्रंथासाठी शं. वा. दांडेकर यांनी संपादित केलेली व प्रसाद प्रकाशन, पुणे यांनी प्रसिद्ध केलेली (सन १९५३) 'सार्थ ज्ञानेश्वरी'ची प्रत ही आधारभूत प्रमाणप्रत म्हणून मानली आहे. संदर्भाचे ओवी क्रमांक हे त्यातूनच दिलेले आहेत. 'ज्ञानेश्वरी'ची कोणतीही प्रत असली तरी; त्या रूपाने श्रीज्ञानेश्वर या माउलीशीच हृदयसंवाद साधला जातो; ह्या श्रद्धेने 'सार्थ ज्ञानेश्वरी' या ग्रंथास मी नम्रतापूर्वक वंदन करतो, ते माउलींच्या चरणी रुजू होईल असा विश्वास वाटतो.

अखेर विनवणी एवढीच की हळुवारपणाने या ग्रंथाचा अनुभव घ्यावा –

**जैसें शारदीयेचें चंद्रकळे । माजीं अमृतकण कोंवळे ।**
**ते वेंचिती मनें मवाळे । चकोर नलगे ।।** (अ.१, ५६)

गुढीपाडवा
चैत्र शु १, शके १९२७

**प्रा. डॉ. अनिल सहस्रबुद्धे**



## एक

# शब्दब्रह्म कवळले

'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' समजावून घेण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. या निमित्ताने कोणकोणत्या गोष्टींची चर्चा करावयाची, पूर्वसूरींनी या संदर्भात कोणते व कोणत्या दिशेने प्रयत्न केले आहेत, हे थोडक्यात समजावून घेणे उपयुक्त होईल.

प्रथमत: या ग्रंथास 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' हे नाव देण्यामागील भूमिका स्पष्ट करणे योग्य होईल.

ज्ञानेश्वरांनी 'साहित्य' ही संज्ञा अलंकारादी काव्यशोभेची साधने या अर्थाने वापरली आहे. 'वाङ्मय' ही संज्ञा वाणीने बोलले जाणारे सर्व शब्दजात या अर्थाने आलेली दिसते. 'वाङ्मय' या संज्ञेला पर्यायी संज्ञा 'शब्दब्रह्म' अशी आलेली दिसते. 'नागरबोल' ही संज्ञा शिष्ट किंवा ग्रंथनिविष्ट, सुसंस्कृत व चातुर्ययुक्त शब्दसमूह या अर्थाने वापरलेली आहे; आणि 'नागरबोल' या संज्ञेला पर्यायी संज्ञा 'विदग्ध वाङ्मय' ही वापरलेली दिसते. 'सारस्वत' या संज्ञेने सरस्वतीच्या कृपाप्रसादाने प्राप्त होणारे स्फूर्तिसिद्ध, प्रज्ञासुलभ असे रसश्रेष्ठ वाङ्मय, असे सूचित केलेले आढळते; तर 'काव्य' या संज्ञेने चातुर्ययुक्त पदबंध असा अर्थ अभिप्रेत आहे. ज्ञानेश्वरांनी वापरलेली प्रत्येक संज्ञा, डॉ. मा. गो. देशमुख यांनी 'मराठीचे साहित्यशास्त्र' मांडताना चिकित्सापूर्वक अभ्यासली आहे असे म्हणता येईल. त्यांच्या ग्रंथाचे संक्षेपदर्शन घडविताना आयुर्वेदाचार्य श्री. पु. हिर्लेकर यांनी संज्ञांची सूची व स्पष्ट अर्थ दिला आहे. (मराठीचे साहित्यशास्त्र : ज्ञानेश्वर ते रामदास, डॉ. मा. गो. देशमुख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, दु.आ. १९५९ परिशिष्ट १, लेखक श्री. पु. हिर्लेकर, पृष्ठ ३०९).

ज्ञानेश्वरांनी वापरलेल्या या संज्ञांचा विचार करता, ज्ञानेश्वरांची 'साहित्य' ही संज्ञा खूपच मर्यादित अर्थदर्शक आहे असे म्हणता येईल. 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' या ग्रंथाच्या नावातील 'साहित्यविचार' ही संज्ञा 'साहित्य' ह्या ज्ञानेश्वर उल्लेखित संज्ञेच्या मर्यादित अर्थाशी संबंधित अशी आलेली नाही हे प्रथम समजावून घेतले पाहिजे.

'वाङ्मय' किंवा 'शब्दब्रह्म' या संज्ञा वाणीने बोलले जाणारे सर्व शब्दजात या अर्थाने वापरल्या गेल्या असल्याने, प्राचीनतम मौखिक परंपरा स्पष्ट करतात. लिखित स्वरूपातील ग्रंथनिष्पत्ती होण्यापूर्वीपासूनच्या, वाचेने घडणाऱ्या मानवी प्रकटीकरणाला 'वाङ्मय' ही संज्ञा समर्थपणे व्यापते असे म्हणता येईल. ज्ञानेश्वरांनी प्रथमाध्यायात केलेले वाङ्मयमूर्ती श्रीगणेशाच्या किंवा शब्दब्रह्मस्वरूप श्रीगणेशाच्या स्तवनात (अ.१, २ ते २० ओव्या) मौखिकपरंपरेपासून लिखितपरंपरेतील शास्त्रे, काव्य, नाटकांपर्यंत सर्व शब्दजात 'वाङ्मय' या संज्ञेने व्यापलेले आहे असे दिसते. हीच गोष्ट ज्ञानेश्वरांनी गीतेतून स्वीकारलेला वाङ्मय उत्पत्ती सिद्धान्त (अ.९, २७५ ते २७७) यावरूनही स्पष्ट होऊ शकते. ज्ञानेश्वरांनी 'वाग्यज्ञ' मांडला होता, (अ.१८, १७९३) आणि त्याचे फलितस्वरूप म्हणून 'ज्ञानेश्वरी' ग्रंथ (अ.१८, १८००) आज आपणास दिसतो आहे. यावरूनही 'वाङ्मय' या संज्ञेची ताकद (व्याप्ती) ध्यानी येते. 'वाङ्मय' या संज्ञेमध्ये मौखिक व लिखित अशा दोन्ही परंपरांना तसेच ज्ञानेश्वरीत उल्लेखिल्याप्रमाणे (अ.१, १ ते २०) तसेच शास्त्रीय आणि ललित अशा सर्व शब्दजातास कवटाळण्याचे सामर्थ्य आहे, हेही लक्षात येऊ शकेल. या दृष्टीने विचार करता 'वाङ्मय - निर्मिती', 'वाङ्मय-स्वरूप' 'वाङ्मय-प्रयोजन', 'वाङ्मय-निर्माता', 'वाङ्मय- आस्वादक', 'वाङ्मयातील वाणी (भाषा)' आणि 'वाङ्मय-शैली (रेखा)' या संबंधीचा तात्त्विक विचार म्हणजे 'वाङ्मयविचार' अशी संज्ञा मांडणे, हे 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' समजावून घेतांना ठीक झाले असते असे म्हणता येईल. ज्ञानेश्वरांनी लोकवाणीतून ग्रंथलेखन केले हे ध्यानी घेता मौखिक परंपरेकडे अधिक लक्ष जाते. त्यानुसार लोकसाहित्य अर्थात लोकवाङ्मयाच्या दृष्टिकोनातूनही 'वाङ्मयविचार' हा शब्द अधिक सयुक्तिक वाटेल असे म्हणता येईल.

विद्यापीठीय कलाशाखांमध्ये महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या स्तरावर साहित्याचा जो अभ्यास केला जातो, तो मुख्यत: ललितसाहित्याचा होय. ललित साहित्य या शब्दाने जो बोध होतो त्याशी बऱ्याच अंशी जवळ जाणारी संज्ञा म्हणजे 'सारस्वत' ही होय. 'सारस्वत' ही संज्ञा 'अभिनव वाग्विलासिनी'चा नावीन्यपूर्ण



किंवा चैतन्यपूर्ण वाग्विलास सूचित करते. येथे विलास याचा अर्थ रम्यता, लालित्य, रसपूर्णता असा घेतला तर 'ललितवाङ्मय' अशी संज्ञा ज्ञानेश्वरांना अभिप्रेत आहे असे म्हणता येईल. परंतु सरस्वतीचा प्रसाद हा 'गुरुप्रसाद' आणि श्रीगणेश कृपाप्रसाद यांच्याप्रमाणेच संपूर्ण वाङ्मयाच्या संदर्भातच आवश्यक असतो असे म्हणता येईल. म्हणजेच सैद्धान्तिक पातळीवर जाताना 'वाङ्मय' ही व्यापक संज्ञाच ज्ञानदेवांना अभिप्रेत आहे असे म्हणता येईल. 'नागरबोल', 'विदग्ध वाङ्मय' या संज्ञांतून सूचित होणारे वाङ्मय हेही 'वाङ्मय' या व्यापक अर्थाच्या संज्ञेतच सामावलेले आहे, असे ज्ञानदेवांना अभिप्रेत आहे असे म्हणता येईल.

वरील सर्व चर्चेवरून 'वाङ्मय' आणि वाङ्मयविषयक तात्त्विक चर्चा किंवा शास्त्रीय विचार किंवा सैद्धान्तिक विचार मांडणारे असे शास्त्र म्हणजे 'वाङ्मयविचार' होय, असे शब्द योजता येतील. ज्ञानेश्वरांच्या संदर्भात विचार मांडताना 'वाङ्मय' आणि 'वाङ्मयविचार' अशा दोन्ही संज्ञा वापरणे अधिक योग्य वाटेल. असे असूनही येथे मात्र चर्चा करताना 'साहित्यविचार' अशीच संज्ञा योजिली आहे.

वरील 'वाङ्मय' या संज्ञेच्या संबंधाने केलेली चर्चा सयुक्तिक वाटली तरी आधुनिक काळात मात्र 'वाङ्मय' या संज्ञेला 'साहित्य' ही पर्यायी संज्ञा रूढ झाली आहे. 'साहित्य' या संज्ञेत मौखिक परंपरांचा समावेश कितपत होऊ शकेल हा कदाचित चर्चेचा विषय होऊ शकेल. 'साहित्य' या संज्ञेसंदर्भात चर्चा करून निष्कर्षाप्रत येताना --'साहित्य' म्हणजे शब्द आणि अर्थ यांचा सहभाव असून तो शब्द काव्य या अर्थाने वापरलेला दिसतो. तथापि पुढे त्याला साहित्यविद्या किंवा काव्यमीमांसेचे शास्त्र हा अर्थ मिळाला व तशा अर्थाने त्याचा उपयोग अनेक शास्त्रज्ञांनी व कवींनी केला आहे-- असे प्रतिपादन डॉ. मा. गो. देशमुख यांनी केलेले आहे. (मराठीचे साहित्यशास्त्र; लेखक - डॉ. मा. गो. देशमुख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, दु.आ. १९५९ पृष्ठ ४७) यावरून सहजच असे लक्षात येऊ शकेल की 'साहित्य' या संज्ञेविषयी विचार मंथन होता होता, 'वाङ्मय' या संज्ञेइतक्या व्यापक अर्थाने 'साहित्य' या संज्ञेचा विचार केला जाऊ लागला, असे म्हणता येईल. या विकासक्रमानेच आधुनिक काळामध्ये 'वाङ्मय' या व्यापक अर्थानेच 'साहित्य' ही संज्ञा सरसहा वापरली जाते आहे. एवढेच नव्हे तर आता 'साहित्य' संज्ञेस पारिभाषिक संज्ञा म्हणून स्थान मिळाले आहे असे दिसते. ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरीतील उल्लेख या दृष्टीने विचार करावयाचा असल्यानेच या

चर्चेची आवश्यकता होय. ‘वाङ्‌मय’ की ‘साहित्य’ या संज्ञा-वादात न शिरता, ‘साहित्य’ ही संज्ञा परिभाषा म्हणून वापरली जाते आहे. विद्यापीठीय स्तरांवरील अभ्यासक्रमात पारिभाषिक संज्ञा म्हणून ही संज्ञा रूढ झाली आहे. म्हणून ग्रंथातील चर्चेसाठी ‘साहित्य’ ही संज्ञा स्वीकारणे अधिक उपयुक्त व सयुक्तिक ठरेल असे वाटते. या ग्रंथास ‘ज्ञानेश्वरातील साहित्यविचार’ हे नाव देताना वरील धोरण स्वीकारले आहे हे स्पष्टपणे लक्षात घेतले पाहिजे. अर्थात अनेक लेखक, विद्वान, प्राध्यापक आणि समीक्षक कधी ‘साहित्य’ तर कधी ‘वाङ्‌मय’ अशी संज्ञा आपल्या विवेचनात एकमेकींस पर्यायी संज्ञा म्हणून वापरताना दिसतात आणि त्यातून समान अर्थबोध लक्षात घेतला जाताना दिसतो असे म्हणता येईल. एवढेच काय परंतु मौखिक परंपरा हाच ज्या ‘वाङ्‌मय’ परंपरेचा आत्मा आहे असे म्हणता येईल, अशा ‘लोकवाङ्‌मयास’ ‘लोकसाहित्य’ अशी संज्ञा रूढ झाली आहे. त्याही संदर्भात ‘लोकसाहित्य’ ही संज्ञा योग्य आहे, असे अनेक विद्वानांनी स्पष्ट केले आहे. येथे एक गोष्ट जरूर नमूद करावयास हवी की शास्त्रीय परिभाषा म्हणून संज्ञा निश्चित होणे अगत्याचे वाटते; म्हणूनच ग्रंथनामाविषयी विवेचन करणे सयुक्तिक वाटेल.

‘साहित्यविचार’ या संज्ञेने साहित्यविषयक शास्त्रीय किंवा सैद्धान्तिक विचार मांडले जाणे अभिप्रेत आहे. यात साहित्यनिर्मिती व साहित्यसौंदर्य विषयक तात्त्विक चर्चा; तसेच साहित्य व जीवनदृष्टी यांचे संबंध अर्थात जीवनदृष्टीचा म्हणजेच जीवनविषयक तात्त्विक भूमिकेचा, कलात्मक अनुभवांच्या व त्यांच्या अभिव्यक्तिविशेषांसंबंधीचा विचार मांडला जातो. म्हणजेच साहित्यविषयक सिद्धान्त, वाद, संकल्पना यांचा चिकित्सक विचार व मांडणी केली जाते. उदा. भारतीय साहित्यविचारात अलंकारविचार, वक्रोक्तिविचार, रीतिविचार, ध्वनिविचार, रसविचार, औचित्यविचार; तसेच ज्ञानेश्वर आणि रामदास यांचे साहित्यविषयक सैद्धान्तिक स्वरूपाचे विचार; टागोर, योगी अरविंद यांचे साहित्यविषयक विचार, यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न होतो. तसे पाश्चात्त्य साहित्यविचार म्हणून अनुकृती सिद्धान्त, भव्योदात्ततेचा सिद्धान्त, आविष्कारवादी इत्यादींची चर्चा करण्यात येते. त्याचबरोबर साहित्याचे स्वरूप, साहित्याचे प्रयोजन, साहित्यनिर्मिती प्रक्रिया, साहित्याची भाषा, शैली, साहित्यास्वाद प्रक्रिया, अभिरुची इ. संबंधाने सैद्धान्तिक चर्चा करण्यात येते.

शास्त्र म्हटले की ते सदासर्वकाळ सत्य, नियमबद्ध व सर्वदूर एकच असावे. पूर्वीचे सिद्धान्त संशोधित होऊन नवीन मांडले जाण्याची प्रक्रिया सतत सुरू असते,



परंतु नवे सिद्धान्त पुन्हा वरील प्रकारेच सिद्ध असावेत असा संकेत आहे. भौतिक, रसायन, गणितादी शास्त्रांमध्ये हा संकेत तंतोतंत पाळला गेल्याचे लक्षात येते. तसेच सर्वच शास्त्रांच्या संदर्भात घडले तर अधिकाधिक सुव्यवस्थितपणा, एकूणच ज्ञानसाधनेला वा जीवनाला येणे शक्य असते असे म्हणता येईल. परंतु मानवी शास्त्रांच्या संदर्भात हा संकेत तंतोतंत पाळता येईल असे दिसत नाही असा अनुभव येतो. तरीसुद्धा काही मूलभूत गोष्टींमध्ये ही नियमबद्धता मांडता आली तर विश्वात्मक भूमिकेतून मानवी शास्त्रांचा अधिक उपयोग होईल. समाजशास्त्र, राज्यशास्त्र अशा शास्त्रांच्या संदर्भात अशी तात्त्विकता शोधण्याचा प्रयत्न झाला आहे असे म्हणता येईल. माणूस, त्याचे मूलभूत विकार, भावना, सहजप्रवृत्ती या सर्व गोष्टी लक्षात घेता अशा वर्णनात्मक शास्त्रांसंबंधात विश्वात्मक भूमिकेतून तात्त्विक विचार केलेला दिसतो. साहित्यकला, संगीत, शिल्प इ. कलांच्या संदर्भातही असा मूल्यविचार केला जात आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासाने या मूल्यविचारासंबंधी अधिक व्यापक विचार होण्यास मदत होते आहे असे दिसते.

‘साहित्यविचारा’चा विचार करतानासुद्धा विश्वात्मक भूमिकेतून प्रयत्न होत आहे. विश्वातील साहित्यात, साहित्यतत्त्वासंबंधीच्या विचारात, तौलनिक अभ्यास करताना समान मूल्यांवर लक्ष केंद्रित होऊन; ‘साहित्यविचार’ शास्त्र पदवीस पोहोचले आहे. अर्थात ठोकळेबाज गणिती सूत्रे यात नाहीत. दृष्टिकोन, अभिव्यक्ती, आस्वाद, अभिरुची, साहित्यिक, आस्वादक, समीक्षक या संबंधात तसेच साहित्य-निर्मिति प्रक्रिया व आनंद प्रक्रिया या संदर्भात सैद्धान्तिक पातळीवर समानता आढळते असे दिसेल. भारतीय साहित्यविचार असे म्हणताना भारतातील तत्त्वज्ञ, कवी, रसिक, समीक्षक यांनी साहित्य, सौंदर्य आणि आनंद यांच्याविषयी मांडलेले विचार व त्या तात्त्विक विचारांतून अनुभवास येणारे साहित्यरूप यांचा विचार करणे अभिप्रेत असते. अर्थात असे करीत असताना स्वाभाविकपणे पाश्चात्त्य साहित्यविचाराशी किंवा विश्वातील अन्य विभागातील साहित्य सिद्धान्तांशी तुलना होऊन साम्यभेद समजावून घेऊन सिद्धान्तांचे विश्वव्यापकत्व लक्षात येणे शक्य असते. भारतात पाश्चात्त्य साहित्यशास्त्रातील सिद्धान्तांचा अभ्यास केला गेला आहे; त्याचबरोबर तुलनात्मकतेने संस्कृत साहित्यशास्त्राचाही विचार केला गेलेला दिसतो. असा विचार करीत असताना असे सहज अनुभवाला येते, की भारतीय साहित्यशास्त्र्यांनी (आलंकारिकांनी), तत्त्वज्ञांनी, कवींनी आणि रसिकांनी अतिशय मौलिक असा साहित्यविचार प्रकट केला आहे. भाषाभेद वगळता सामाजिकता, काळ, संस्कृती यांचा विचार केला तर तपशिलात काही भेद दिसले तरी साहित्य

निर्मिती, साहित्य-रसिक संबंध, साहित्यस्वरूप, साहित्यास्वाद, साहित्यविषयक दृष्टिकोन या विषयी विश्वातील अनेक विचारवंतांनी मांडलेल्या उपपत्तींना आपल्यात कवटाळून; त्यापेक्षा व्यापक विचार प्रसृत केलेले आहेत असे म्हणता येईल.

महाराष्ट्रात ज्ञानदेवांनी मराठी भाषेचा साहित्यनिर्मितीसाठी माध्यम म्हणून उपयोग करीत असताना मराठी साहित्य परंपरेच्या सुरुवातीच्या काळात साहित्यविषयक विचार सहज ओघात मराठी भाषेच्या माध्यमातून मांडलेले आहेत असे म्हणता येईल. परंतु केवळ एवढ्या एकाच कारणाने ते विचार समजावून घेणे आवश्यक आहे असे नाही, तर ते विचार आजही अतिशय प्रगत व व्यापक आहेत असे जाणवते. साहित्यस्वरूप साहित्यिक- रसिक-समीक्षक यांच्यातील अभिरुची, आस्वाद यांच्या दृष्टीने ते अनेक सिद्धान्तांना ओलांडून, अनेक सिद्धान्तांना आपल्यात सामावून टाकून सौंदर्य, आनंदनिर्मिती याविषयी मूलगामी, मानसिक दृष्टिकोनातून तात्त्विक विचार मांडतात असे दिसते. त्यांची विश्वात्मक भूमिका हे त्याचे उत्तम उदाहरण होय.

ज्ञानेश्वरीतील साहित्यशास्त्र समजावून घेण्याचा अनेकांनी प्रयत्न केला आहे. या प्रयत्नांचा चिकित्सक आढावा; 'ज्ञानेश्वरीतील साहित्यशास्त्र' या मथळ्याखाली डॉ. मधुसूदन परशुराम पेठे यांनी आपल्या 'श्रीज्ञानदेव-वाग्यज्ञ- दर्शन' या प्रबंधात घेतला आहे. **(श्री ज्ञानदेव-वाग्यज्ञ-दर्शन' - ज्ञानदेव व ज्ञानेश्वरीविषयक अभ्यासाचे ऐतिहासिक समालोचन,** श्री ज्ञानेश्वर विद्यापीठ, आळंदी (देवाची), प्र.आ., १९७३ पृष्ठ २९७ ते ३००) तसेच इतरही अंगांनी केलेली ऐतिहासिक पाहणी महत्त्वाची आहे. त्या आधारेच आढावा घेण्याचा प्रयत्न करणे सोयीचे व उपयुक्त होईल.

(१) डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी मराठी साहित्यशास्त्राची कल्पना जरी प्रथम मांडली, तरी ज्ञानेश्वरीतील साहित्यविषयक कल्पनांचा त्यांनी विचार केलेला नाही असे जाणवते.

(२) डॉ. मा. गो. देशमुख यांनी 'मराठीचे साहित्यशास्त्र' या ग्रंथात संत- कवींची मनोभूमिका व्यक्त करणारे साहित्यशास्त्रविषयक उद्‌गार ही मराठी साहित्यशास्त्राची साधनसामग्री होय असे ठरवून; ज्ञानेश्वरीतील साहित्यविषयक अठरा संज्ञांचा विचार केलेला असून काव्य-स्वरूप, प्रयोजन, काव्यकारण, सात्त्विकभाव, रससंख्या, शांतरस, भक्तिरस इत्यादी विविध विषयांची ज्ञानेश्वरीतील उदाहरणे दिली आहेत; त्यातूनच ज्ञानेश्वरांची साहित्यविषयक दृष्टी त्यांनी मांडली. त्यातील महत्त्वाचा भाग असा (अ) परमेश्वरी तत्त्वज्ञानाचे प्रतिपादन करणारे



काव्य श्रेष्ठ होय असे ज्ञानेश्वरांचे मत आहे. (आ) साहित्य म्हणजे पद्यबंधाची वाङ्मयशोभा वाढविणारी अलंकारादिकांची सामग्री होय. (इ) ज्ञानेश्वरांनी आठ रस सांगून शांत हा नववा रस असल्याचे सांगितले आहे. (ई) रसांचा आविष्कार करणारी शैली या अर्थाने ज्ञानेश्वरीत 'रेखा' ही अभिनव संज्ञा वापरली आहे व वामनाच्या 'विशिष्ट पदरचना' या गुणदर्शक 'रीती' काव्यतत्त्वाहून (diction) रेखा ही अर्थशोभा वाढविणारी संज्ञा रसशैली (style) या दृष्टीने अभिनव आहे. (३) 'ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ती' या पुस्तकातील 'शब्दसौंदर्यातून परतत्त्वाकडे' या प्रकरणात डॉ. वाळिंबे यांनी ज्ञानेश्वरीत विविध ठिकाणी आलेल्या साहित्याच्या मूल्यांविषयीचे त्रुटित उद्‌गार एकत्र करून, त्यांचा साकल्याने विचार करून ज्ञानदेवांच्या साहित्यविषयक प्रणालीचा आराखडा मांडला आहे. साहित्याचे साहित्यत्व सिद्ध होण्यासाठी शब्दसौंदर्य, रचनेचे कलात्मक सौंदर्य, व रसप्रकर्ष ही सौंदर्यतत्त्वे चढत्या क्रमाने आवश्यक असली तरी परतत्त्वस्पर्श हेच साहित्याचे अंतिम साध्य व श्रेष्ठ मूल्य आहे असे म्हटले आहे.

(४) साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी कवींनी व्यक्त केलेले विचार, साहित्यशास्त्राची चिकित्सा म्हणून मांडलेले नसल्याने त्यांच्या विचारांना साहित्यशास्त्राची पदवी देता येत नाही, एवढेच नव्हे तर ज्ञानेश्वरांना साहित्यशास्त्र अवगत होते, असे म्हणता येणार नाही असे मत मांडले आहे.

(५) प्रा. द. के. केळकर यांना संतकवींनी साहित्यशास्त्राचे अध्ययन केले नसावे असे वाटते. 'रेखा' या शब्दाविषयीचा ज्ञानेश्वरांचा केलेला गौरवही अकारण आहे. काव्यमीमांसा करणे हे त्यांचे ध्येयच नव्हते असे विचार 'प्राचीन मराठी वाङ्मयातील तुटपुंजे साहित्यशास्त्र विचार' या पुस्तकात मांडले आहेत.

(६) 'रसविमर्श' मध्ये ज्ञानदेवांनी शांत व भक्तिरस यांचे केलेले विवेचन संस्कृत साहित्यशास्त्रास धरून असल्याचे म्हटले; परंतु विचारांचा उगम अध्यात्माच्या तळमळीतून आहे असे म्हटले.

(७) हुपरीकर यांच्या मते ज्ञानदेवांना संस्कृत साहित्यशास्त्र उत्तम अवगत होते, इतकेच नव्हे तर त्यातील रुळलेल्या विचारांत क्रांती घडविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते असे म्हटले आहे.

(८) रा. श्री. जोग यांनी श्रीज्ञानेश्वर दर्शन साहित्यखंड भाग १ 'ज्ञानेश्वर' मध्ये हे श्लेष शब्दाच्या बाबतीत साहित्यशास्त्रीय परिभाषेत घोटाळा करीत आहेत असे मत मांडले. रूपक, श्लेष हे दोन्ही शब्द एकाच अर्थी वापरण्याचा सैलपणा ज्ञानदेवांनी स्वीकारला होता; असे म्हणून आधुनिक अर्थाने मराठी साहित्यशास्त्र

मानणे अशक्य असल्याचे मत पुन्हा एकदा मांडले आहे.

(९) 'श्लेषाच्या निमित्ताने' या लेखात (म. सा. प. ऑक्टोबर–डिसेंबर १९४८ पृ. १७–२१), यासंबंधी पुढीलप्रमाणे मत मांडले आहे. 'ज्ञानेश्वरीतील साहित्यशास्त्रविषयक उल्लेखांवरून त्यांच्या मनात साहित्याच्या स्वरूपाविषयी व कार्याविषयी काही निश्चित स्वरूपाचे विचार होते, हे मान्य होण्यासारखे आहे; परंतु त्यांची भूमिका साहित्यशास्त्रकाराची नसून जातिवंत रसिक कवीची आहे ही गोष्ट ज्ञानेश्वरीतील साहित्यशास्त्राचे मूल्यमापन करताना विसरता कामा नये. शास्त्राच्या दृष्टीने विचार करून त्यावरून ज्ञानदेवांना साहित्यशास्त्रज्ञ मानणे किंवा न मानणे अन्यायाचे ठरेल असे वाटते.'

डॉ. पेठे यांनी घेतलेल्या आढाव्यानुसार मतभेद दूर ठेवले तर ज्ञानेश्वरांनी 'साहित्यविचार' संदर्भात आपला दृष्टिकोन आणि समग्रकल्पना वाग्यज्ञाच्या ओघात स्फुट स्वरूपात व्यक्त केल्या आहेत व त्यावरून ज्ञानेश्वरांनी मांडलेला समग्र 'साहित्यविचार' सिद्ध होऊ शकतो, असे म्हणता येईल.

कवी, तत्त्वज्ञ, योगी व संत असे ज्ञानेश्वरांचे चतुर्विध व्यक्तिमत्त्व लक्षातच घ्यावे लागते असे वाटते. त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या काव्यलेखनस्वभाव व पद्धतीवरून लक्षात येईल. अध्यायाच्या प्रारंभी व अखेरीस तसेच गीतेतील अनेक श्लोक स्पष्ट करताना, त्यांच्या वक्तृत्वाला आलेले उधाण आणि घडलेला प्रतिभाविलास केवळ विस्मयकारक आहे आणि तीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची साक्ष आहे. त्यांनी वेळोवेळी केलेले आत्मकथन हे विशेषत: कवी म्हणून त्याचबरोबर तत्त्वज्ञाच्या भूमिकेतून केलेले आहे असे म्हणता येईल.

ज्ञानेश्वरांना साहित्यशास्त्र सिद्ध करावयाचे नव्हते हे कोणी नाकारणार नाही हे खरे. साहित्यशास्त्रज्ञाची त्यांची भूमिकाही नव्हती. चांगला कवी साहित्यशास्त्रज्ञ असलाच पाहिजे असे नाही हे जेवढे खरे, तसेच तो असणे अधिक श्रेयस्कर असे म्हणता येईल. तत्त्वज्ञाचे तत्त्वज्ञान हे नेहमी जीवनाच्या मुळाशी जाऊन विचार करते किंबहुना तसा तत्त्वज्ञानी व्यक्तीचा प्रयत्न असतो; म्हणूनच ते जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे असते. 'तेथे शब्दब्रह्म कवळले' असे अनुभवणाऱ्या ज्ञानेश्वरांना साहित्याचे व्यापकपण ज्ञात होते. साहित्यविषयक अशी त्यांची मते यामुळेच व्यक्त झाली, असे म्हणता येईल. या व्यक्त झालेल्या विचारातून साहित्यविषयक दृष्टी, साहित्याची व्याप्ती व स्वरूप, प्रयोजने, आस्वाद घटना, सर्व गोष्टींविषयी सयुक्तिक व सांगोपांग आणि मुख्य म्हणजे जाणीवपूर्वक विचारसरणी प्रकटलेली जाणवते. मग ज्ञानेश्वरांचे साहित्यशास्त्रज्ञ म्हणूनही व्यक्तिमत्त्वाचे दर्शन



घेण्यास अनुकूलता आहे असे म्हणता येते. याचसाठी 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' उलगडून पाहण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' हा उल्लेख सिद्ध करण्यासाठी स्वाभाविकपणे ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा आधार घेतला आहे. साहित्यविचार सिद्ध होण्यास ज्या ओव्या उपयुक्त वाटल्या त्या मुक्तपणाने निवडल्या आहेत. हीच या 'साहित्यविचाराची' सिद्धीकरणासाठीची सामग्री आहे असे म्हणता येईल. पुन्हा या ओव्या 'साहित्यविचार' सिद्ध करण्यासाठी उद्‌गारल्या आहेत का? या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक आहे हे स्पष्ट आहे. शिवाय या ग्रंथास आधारभूत म्हणून निवडलेल्या ओव्या, तेवढ्याच ओव्यांचा विचार करावा काय? याही प्रश्नाचे उत्तर नकारात्मक आहे. या संदर्भातील ओव्यांची संख्या आणखी वाढविता वा कमी करता येईल हे खरे. ओव्यांची संख्या किती, यास विषयाच्या दृष्टीने महत्त्व नाही असे वाटते. तसेच कवित्व आणि तत्त्वज्ञत्त्व व अनुभूती एकत्र आल्यामुळे ज्ञानदेवांचे 'साहित्यविचार विषयक' विचार व्यक्त झाले आहेत असे म्हणता येईल.

ज्ञानदेव ही सर्वार्थाने सर्वांची माउली आहे. महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांना केवळ ललामभूत! या माउलीच्या स्नेहाळ अशा ज्ञानेश्वरीमधून जो साहित्यविचारात्मक प्रसाद, तो अनुभवावयास मिळण्याचे भाग्य लाभले, तो प्रसाद ग्रंथरूपात वाटण्याचा हा प्रयत्न आहे.

## दोन

# परतत्त्वस्पर्श वाद

साहित्यविचाराच्या दृष्टिकोनातून ज्ञानेश्वरांच्या परतत्त्वस्पर्श, तत्त्वज्ञानाचा विचार करावयाचा आहे. त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा गाभा म्हणजे 'आत्मसाक्षात्कार' होय. तेच त्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचे सार होय. शं. वा. दांडेकर यांनी 'सार्थ ज्ञानेश्वरी'च्या (सार्थ ज्ञाने. १९५३ प्रसाद प्रकाशन, पुणे) 'ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान' व 'आत्मसाक्षात्कार' या दोन प्रकरणांमध्ये ज्ञानदेवांच्या एकूण तत्त्वज्ञानाचा विचार केला आहे. ज्ञानदेवांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानामधून त्यांचा साहित्यविषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो. त्या आधारे ज्ञानदेवांचे साहित्यविषयक तत्त्वज्ञान मांडता येते.

समग्र जीवनाला मूल्ये पुरविण्याचे काम तत्त्वज्ञान करते. जीवनविषयक दृष्टिकोन तत्त्वज्ञानातून लाभल्यामुळे त्या विशिष्ट दृष्टीने साहित्याचा आणि साहित्यशास्त्राचा विचार घडणे ओघानेच येते. ज्ञानदेव कवी, तत्त्वज्ञ, संत आणि आत्मानुभवी योगी होते हे सर्वमान्य आहे. ते कवी होते हे लक्षात घेता त्यांचे तत्त्वज्ञान हे साहित्यविषयक तत्त्वज्ञानाच्या अंगाने विचारात घेणे सयुक्तिकच ठरते. कवी हा साहित्यशास्त्री असलाच पाहिजे असे नाही हे मान्य. त्याचबरोबर तत्त्वज्ञ आणि साहित्यशास्त्राची जाण असलेला कवी असू नये असे कोणी म्हणणार नाही. ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्त्व लक्षात घेतले तर ते साहित्यविषयक स्वतंत्र विचार मांडणारे तत्त्वज्ञ कवी होते असे म्हणता येईल. त्यांचे साहित्यविषयक विचार वेळोवेळी व्यक्त झालेले दिसतात. निरनिराळ्या संदर्भाने त्यांनी व्यक्त केलेली तत्त्वे, साहित्यशास्त्र या दृष्टीने विचारात घेता येण्यासारखी आहेत. ज्ञानदेवांचे विचार हे आस्वादक, समीक्षक, कवी या सर्व बाजूंनी अनुभवांतून उद्भवलेले आहेत असे त्यांच्या



व्यक्तिमत्त्वातून लक्षात येईल म्हणूनच त्यांचे विचार साहित्यविचाराच्या दृष्टिकोनातून समजावून घेणे भारतीय साहित्यशास्त्राच्या आणि एकूणच साहित्यशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे होय असे म्हणता येईल.

त्यांची संपूर्ण ग्रंथरचना परतत्त्वांच्या साक्षात्कारासाठी घडली असे दिसते.

**'दिसो परतत्त्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा**
**रिघो महाबोधसुकाळा । – माजी विश्व ।'** (अ.१३, ११६१)

ही त्यांची ग्रंथरचनेमागील दृष्टी आणि त्याचबरोबर साहित्याविषयीचा दृष्टिकोन –

**'वाचे बरवें कवित्त्व । कवित्वीं बरवें रसिकत्त्व ।**
**रसिकत्त्वीं परतत्त्व । स्पर्शु जैसा ।।'** (अ.१८, ३४७)

पाहिला की ज्ञानदेवांचे साहित्यविषयक तत्त्वज्ञान स्पष्टपणाने सूचित झालेले दिसून येते. आपला साहित्यविषयक सिद्धान्त मांडण्यासाठी ज्ञानेश्वरीचा प्रपंच नाही, हे मान्य करूनही त्यांच्या साहित्यविषयक उद्गारातून त्यांची साहित्यविषयक दृष्टी त्यांनी किती मार्मिकपणे प्रकट केली आहे हे जाणवते. परतत्त्व स्पर्श घडणे, अनुभवणे व घडविणे म्हणजे खरा साहित्यानंद होय अशी त्यांची ठाम भूमिका आहे असे म्हणता येईल.

ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान समजावून घेण्याचा प्रयत्न अनेक पंडितांनी केलेला आहे. त्यांच्या प्रयत्नांचा यथोचित आढावा प्रा. पेठे यांनी आपल्या 'श्रीज्ञानदेव वाङ्मय दर्शन' या प्रबंधात घेतला आहे. त्यावरून असे लक्षात येते की ज्ञानेश्वरांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करताना काही मतांतरे वगळली तर ज्ञानेश्वरांच्या साक्षात्कारानुभवाविषयी विद्वानांत एकमत आहे. ज्ञानेश्वर आत्मसाक्षात्कारी होते हे सर्वांना मान्य आहे.

रा. द. रानडे यांनी 'मिस्टिसिझम इन महाराष्ट्र' या ग्रंथात पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांच्या तत्त्वज्ञानाशी तुलना करून आत्मसाक्षात्कारी पुरुषांच्या अनुभवांची सार्वत्रिकता, सातत्य, दिक्कालातीतता, स्वप्रचिती, अनिर्वचनीयता, अबाधितत्व व आनंदमयता हे निकष सांगून आत्मसाक्षात्कारवाद हा येथून तेथून एकरूप आहे व आत्मप्रत्यय हीच पारमार्थिक अनुभवाची सर्वांत मोठी कसोटी होय, अशी मीमांसा केली आहे. रा. द. रानडे यांनी भारतीय ऋषी, संत, तत्त्वज्ञ यांच्या साक्षात्कार अनुभवांचीही तुलनात्मक चर्चा केली आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ज्ञानेश्वरांच्या चिद्विलासवादावर भाष्य केले आहे. (महाराष्ट्र जीवन, भाग २, १९६०, तत्त्वमीमांसा – आंग्लपूर्व) हा चिद्विलासवाद म्हणजे मायावादासहित अद्वैत सिद्धान्त मान्य करणे होय. ज्ञानदेव

अविद्या खंडन करतात हे स्पष्ट करून चिद्विलासवादामुळे कर्मयोग, भक्तियोग अद्वैत दृष्टीने चैतन्यलीलेत अंतर्भूत होतात असे त्यांनी म्हटले आहे.

ज्ञानेश्वरांचा हा आत्मसाक्षात्कारवाद किंवा चिद्विलासवाद म्हणजेच परतत्त्वस्पर्शवाद होय. ज्ञानदेवांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाची मध्यवर्ती कल्पना आत्मा किंवा आत्म्याचे स्फुरण हीच होती. आत्मा आणि परमात्मा यांचे अद्वैत पाहणे, आत्म्याच्या सत्तेने देह स्फुरत असतात हे समजणे, आत्मा शून्य नाही हे कळणे, आत्मा हा सत्य, शुद्ध निरुपाधिक, गुणातीत, भेदशून्य व देशकाल वस्तुपरिच्छेदशून्य असा अनंत, ज्ञान आणि आनंदस्वरूप आहे. हाच आत्मा सर्व रूपांनी नटलेला आहे. शिवापासून चरअचर वस्तुमात्रात आत्मा स्फुरत आहे. विश्वात आत्मा भरलेला असून विश्व व आत्मा यांचे द्वैत संभवत नाही. म्हणजेच अवघा एक आत्माच आहे, याचा साक्षात्कार होणे हेच पूर्णद्वैताचे थोडक्यात स्वरूप हाच परतत्त्वस्पर्श होय. यातूनच ज्ञानदेव हे आत्मसत्तावादी ठरतात. ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाची ही चर्चा परोपरीने झालेली आहे. अधिक विस्तार न करता साहित्यविचार या दृष्टीने परतत्त्वस्पर्श वाद समजावून घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात आपण करू.

विश्वातील चैतन्यमयतेशी एकरूपता साधणे हे अलौकिक आत्मानुभूतीचे तत्त्व होय असे म्हणता येईल. अशा एकरूपतेतून अनुभवास येणारे चैतन्यतत्त्वाचे म्हणजेच आत्म्याचे स्फुरण म्हणजेच आत्मसाक्षात्कार म्हणजेच निखळ सौंदर्याचा साक्षात्कार म्हणजे अलौकिक निरपेक्ष आनंद किंवा सुखसोहळा होय. ही आनंदमय अवस्था प्राप्त होते व त्या आत्मसाक्षात्काराचा किंवा परतत्त्वस्पर्शानुभूतीचा विचार साहित्यात होतो, हेच खरे सारस्वत होय असे म्हणता येईल किंवा या चैतन्यस्फुरणाला किंवा परतत्त्वस्पर्शाला शब्दब्रह्माने कवळणे किंवा त्या अलौकिक सौंदर्यानुभूतीचा विकास शब्दांत प्रकट होत जाणे म्हणजे साहित्यविचाराच्या दृष्टीने परतत्त्वस्पर्श वाद असे म्हणता येईल.

ज्ञानेश्वरीचा वाङ्मयीन अभ्यास करण्याचा प्रयत्न अनेक मान्यवरांनी केला आहे. त्यात डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्या 'ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ती' या ग्रंथाला अभ्यासाच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्ञानेश्वरीतील अलौकिक काव्याचा, विविध सौंदर्यस्थळांचा आस्वाद घेण्याचा व घडविण्याचा प्रयत्न यात आहे. त्याचबरोबर ज्ञानदेवांकडे एक प्रतिभावंत कवी म्हणूनच पहावे व तीच त्यांची भूमिका होती असे मांडले आहे. यांत कवी म्हणून ज्ञानदेवांचा गौरव नक्कीच आहे, परंतु स्वाभाविकपणे ज्ञानदेवांच्या समग्र व्यक्तिमत्त्वाकडे दुर्लक्ष झाले आहे हेही लक्षात घेतले पाहिजे. डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी आपल्या 'साहित्यातील संप्रदाय' (कॉन्टिनेन्टल प्रकाशन, तृ.आ. १९७४) या पुस्तकात चौथ्या प्रकरणात 'महाराष्ट्रातील रोमँटिसिझम' या विषय चर्चेत 'ज्ञानेश्वर हे मराठीतील पहिले रोमँटिक कवी' असा मुद्दा मांडला आहे. त्यांच्या मते काव्य आणि तत्त्वज्ञान यांचा परस्पर संबंध सिद्ध होणे ही गोष्ट प्रत्येक महत्त्वाच्या रोमँटिक प्रणालीमध्ये दिसून येते. ग्रियरसनचे म्हणणेही असेच आहे. त्या दृष्टीने ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रातील पहिले रोमँटिक कवी मानले पाहिजेत. 'रोमँटिसिझम' या कल्पनेत अंतर्भूत असलेले काही विशेष (सर्व नव्हे) ज्ञानेश्वरीत स्पष्टपणाने दिसतात. त्यामुळे ज्ञानेश्वरांना रोमँटिक हे विशेषण लावण्यास हरकत नाही. त्यांच्या मते –

(१) रोमँटिक कवींचा भर प्रतिभा (imagination) तत्त्वावर जास्त असतो. ती ईश्वराची देणगी आहे असे ते मानतात. हे स्वरूप ज्ञानदेवांनी मांडलेले आहे.

**जरी प्रकटे सिद्धसरस्वती । तरी मुक्या आथी भारती ।**
**एथ वस्तुसामर्थ्य शक्ती । नवल कायी ।।** (अ.१, ७८)

हे वचन याचा दाखला आहे.

(२) ज्ञानेश्वरांचा अलौकिक कल्पनाविलास 'रोमँटिक' सदरामध्ये मोडणारा आहे.

(३) ऐंद्रिय संवेदनांवर (sensations) अधिष्ठित, रूप संवेदनेवर आधारलेली कल्पनाचित्रे (auditory images) यांचे वर्चस्व असले तरी स्पर्श, रस, आणि गंध या संवेदनांवर आधारलेली कल्पनाचित्रे ज्ञानेश्वरीत आढळतात.

(४) रंगांची विलक्षण आसक्ती या बाबतीत तर स्पेन्सर आणि कीट्स यांच्याशी त्यांची तुलना करावी लागेल.

(५) एका ऐन्द्रिय संवेदनेतून इतर संवेदनांची प्राप्ती एकाच वेळी करून घेण्याची आसक्ती (synaesthesia) रोमँटिक कवीमध्ये असते तशी अनुभूती ज्ञानेश्वरांनी घडवून चमत्कार घडविला आहे. अध्याय ६ मधील क्रम १७ ते २३ या ओव्यांमध्ये याचा उत्तम नमुना पाहावयास मिळतो. शब्द हा वास्तविक श्रोत्रेंद्रियांचा विषय आहे; तथापि ज्ञानेश्वरांनी शब्दसंवेदनेची रससंवेदना, घ्राणसंवेदना, रूपसंवेदना आणि स्पर्शसंवेदना या सर्व संवेदनांशी सांगड घातली आहे.

**ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींची होति जिभा ।**
**बोले इंद्रिया लागे कळंभा । एकमेकां ।।** (अ.६, १६)

असे म्हटले आहे.

(६) निसर्गातील गूढरम्यतेचे (strange beauty) रोमँटिक कवींप्रमाणे ज्ञानेश्वरांनाही आकर्षण आहे. अध्याय सहामध्ये याचा प्रत्यय येतो.

(७) संवेदनशील कविमन, रसरसलेली रसिकता, ओसंडून वाहणारा हळुवारपणा, संवेदनांची अनिवार आसक्ती, कल्पनाविलासाचा प्रकर्ष, हे रोमँटिक कवीचे विशेष ज्ञानेश्वरांमध्ये आढळतात.

(८) व्यक्तिवाद अथवा व्यक्तिमाहात्म्याचा गौरव या तत्त्वाचा 'रोमँटिसिझम' मध्ये प्रभाव दिसून येतो. ज्ञानेश्वरांच्या ठायी मात्र याचा संपूर्ण अभाव आहे.

डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी 'रोमँटिसिझम'च्या दृष्टीने रोमँटिक कवींशी ज्ञानेश्वरांची केलेली तुलना व 'रोमँटिक कवी' म्हणून केलेली चर्चा येऊन थांबते ती व्यक्तित्ववादाच्या निरासापाशी. ज्ञानेश्वरांजवळ स्वत:ला विसरून चैतन्य तत्त्वाशी एकरूप होणे किंबहुना चैतन्यमय होऊन जाणे ही किमया आहे. वस्तुमात्रात ते आत्मत्त्वाचे, परतत्त्वाचे स्फुरण पाहतात. अर्थात त्यांना आत्मसाक्षात्कार घडतो. परतत्त्व स्पर्श घडतो. डॉ. रा. शं. वाळिंब्यांच्याच शब्दांत सांगायचे तर 'दिव्य तेजामध्ये लीन होऊन स्वतःच तेजोमय होऊन जाण्यात त्यांनी स्वत:च्या भाग्याची समृद्धी मानली आहे.' 'दीपांचिया दीप्ती । ठेवीन तेज ।' अशी त्यांची आत्मविस्मृतीची व आत्मसमर्पणाची भावना आहे. (ज्ञानेश्वरी, अ.१३, ४३२) येथे आत्मसमर्पण, आत्मविस्मृती असे प्रतिपादन करतानाच नेमके डॉ. वाळिंबे ज्ञानेश्वरांना रोमँटिक कवी म्हणून म्हणताना ज्ञानेश्वरांच्या परतत्त्ववादाकडे दुर्लक्ष करतात असे वाटते. वस्तुत: 'दीपांचिया दीप्ती । ठेवीन तेज ।' यात आत्मविस्मृती नसून आत्मसाक्षात्कार सिद्धान्ताप्रमाणे आत्म्याचे विश्वात होणारे स्फुरण प्रकट झाले आहे. यावरून आपणास असे म्हणता येईल की ज्ञानेश्वरांच्या ठायी 'रोमँटिसिझम' मधील जे गुण प्रकटलेले भासमान होतात तो त्यांच्या परतत्त्वस्पर्शाचा प्रभाव असतो. एवढेच नव्हे तर परतत्त्वस्पर्शाचा तो परिणाम असतो. ज्ञानदेवांचा साहित्यातील परतत्त्वस्पर्शाचा आग्रह त्यांच्या भूमिकेतून स्पष्ट होतो. रोमँटिक कवींना अद्भुत, अलौकिक, तरल, सौंदर्याची आलेली अनुभूती ही एकप्रकारे त्या आत्मतत्त्वाच्या स्फुरणाचा साक्षात्कारच असतो असे म्हणता येईल. परतत्त्वस्पर्शवाद अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने रोमँटिसिझम आणि परतत्त्वस्पर्शवाद यांच्यात तौलनिक विचार व्हावा या हेतूने विस्तृत चर्चा करण्याचा प्रयत्न केला.

श्री. के. क्षीरसागर यांनी 'टीकाविवेक' (पॉप्युलर प्रकाशन, सुधारून वाढविलेली दु. आ. १९८०) या ग्रंथात 'तिसरा नेत्र – गूढवाद' या प्रकरणामध्ये हेगेल, प्लेटो, प्लॉटिनस, विल्यम ब्लेक, येट्स, मेटरलिंक, कबीर, मीरा, रवीन्द्र इत्यादींच्या साहित्यसौंदर्यविषयक तत्त्वज्ञानाचा म्हणजेच गूढवादाचा चिकित्सक परामर्श घेतला आहे. त्यातून त्यांनी आत्मिकतावादाचे स्वरूप स्पष्ट केले आहे.



त्यालाच साक्षात्कारवाद असे म्हणता येईल. अतींद्रिय अशा तत्त्वाचा साक्षात्कार आत्म्याला होतो. या साक्षात्काराने मन भरून जाते. त्या आदितत्त्वाची, शक्तीची, प्रकाशमयतेची अनुभूती येते, जाणीव होते. यालाच 'आत्मिक साक्षात्कार' असे म्हणता येईल. दृश्य सौंदर्याच्याद्वारे कलावंताला, साधकाला, अतींद्रिय तत्त्वाचे ज्ञान होते, म्हणजेच चराचरात स्फुरणाऱ्या आत्मतत्त्वाचे ज्ञान होते. ते अतींद्रियतत्त्व त्याच्या आत्म्याच्या ठिकाणी प्रकाशमान होते. त्याला दिव्यानुभूती घडते. म्हणूनच त्यांच्या साहित्यातून ते आत्मतत्त्व किंवा चैतन्यतत्त्व किंवा सौंदर्यतत्त्व सौंदर्यात्मकतेने प्रकटते. हा साक्षात्कार व्यावहारिक सुखदुःखाच्या पलीकडील चैतन्यतत्त्वाचा, म्हणजेच आत्म्याच्या स्फुरणाचा, म्हणजेच परतत्त्वस्पर्शाचा, म्हणजेच केवलानंदाचा किंवा अलौकिक सौंदर्याचा असतो. अतींद्रिय स्वरूपातील हा साक्षात्कार सौंदर्यरूपात आत्म्याच्या सत्तेने पंचेंद्रियांना आभासात्मकतेने जाणवतो आणि हे सौंदर्यरूप आत्म्याला, मनाला आत्मस्वरूपात जाणवते. या चर्चेवरून हे लक्षात येईल की 'गूढवाद--तिसरा नेत्र' यांतील साक्षात्कार आत्मसाक्षात्काराच्या स्वरूपाचाच आहे.

'टागोर – साहित्य : कलाविचार' या ग्रंथातील 'तत्त्वज्ञान' या प्रकरणात (लेखात) गं. वि. कुलकर्णी यांनी टागोरांच्या साक्षात्कारवादाला सौंदर्यनिष्ठ साक्षात्कारवाद (aesthetic mysticism) किंवा काव्यनिष्ठ साक्षात्कारवाद (poetic mysticism) किंवा चिद्विलासवाद अशी नावे मान्य करून चर्चा केली आहे. ''सळसळणारे, रसरसणारे जीवन चैतन्य हेच सत्य आहे, तेच सौंदर्य आहे, तेच आनंदतत्त्व आहे, तो प्रभू आहे. हे सारे विश्व हा अवघा संसार ही त्याचीच लीला आहे, हा त्याचा विलास आहे. सत्य हे केवळ स्थिर नाही, ते गतिमान (dynamic) आहे, त्याला विलासावाचून चैन पडत नाही,'' ''मानवी जीवनाहून – अखिल जीवनाहून निसर्ग भिन्न नाही याचा विसर रवीन्द्रांना कधीच पडत नाही. त्यांच्या साक्षात्कारवादाचे हे एक वैशिष्ट्य आहे. शास्त्रीय सत्याहून साक्षात्कारवाद विशाल व व्यापक आहे. शास्त्रीय सत्य हा आनंदाचाच एक आविष्कार आहे. साक्षात्कारवादात व्यक्तित्वाचा (personality) समावेश होतो, तसा शास्त्रीय सत्यात होत नाही, म्हणून साक्षात्कारवाद थोर'' अशा स्वरूपात असलेला रवीन्द्रांचा साक्षात्कारवाद हा ज्ञानेश्वरांच्या परतत्त्वस्पर्श कल्पनेला अगदीच जवळचा आहे हे उल्लेखावरूनही ध्यानात येऊ शकेल. (टागोर–साहित्य: कला : विचार, संपा. भागवत अ. के., कोल्हापूर १९६१)

रोमँटिसिझम, गूढवाद, आत्मिकतावाद, साक्षात्कारवाद या कल्पनांचा

उपयोग ज्ञानेश्वरांची परतत्त्वस्पर्श कल्पना स्पष्ट करण्यासाठी होऊ शकेल असे वाटते. किंबहुना तेराव्या शतकात अध्यात्मपीठावरून ज्ञानेश्वरांनी मांडलेला परतत्त्वस्पर्श विचार किती प्रगत आणि सर्वव्यापी आहे हे पाहता येईल. 'रसिकत्वी परतत्त्वे । स्पर्श जैसा' या उक्तीचा अर्थ देताना 'सुरसतेत ज्याप्रमाणे परमात्म वर्णनाचा संबंध यावा' असा दिलेला आहे. (सार्थ ज्ञानेश्वरी : शं. वा. दांडेकर, पृ.७१३) याप्रमाणे विवेचन करताना ईश्वराचे वर्णन ज्यात आहे असे साहित्य श्रेष्ठ होय असे अनेक लोक करतात. या उक्तीचा व्यापक अर्थाने विचार केला पाहिजे. 'परमात्म स्वरूपाचा ज्ञानदेवांचा अद्वैतानुभव केवळ आनंदमय होता म्हणूनच आनंद देणारे काव्य त्यांच्या अध्यात्मात समाविष्ट झाले', असा अभिप्राय डॉ. पेठे यांनी व्यक्त केला आहे. डॉ. पेठे यांनी या संदर्भात 'काव्य की अध्यात्म' या वादात अभ्यासक अडकल्याने एकांगी विवेचन कसे घडत गेले ते स्पष्ट केले आहे. डॉ. मा. गो. देशमुख यांनी आपल्या 'मराठीचे साहित्यशास्त्र' या ग्रंथात (दु.आ.१९५९, पृ. २६७) 'शांतरसाचा स्थायी – परतत्त्व' या मुद्द्याच्या चर्चेत 'परतत्त्वस्पर्श' हा शांतरसाचा स्थायिभाव म्हणून प्रतिपादन केले आहे. ज्ञानेश्वरांच्या उक्तीतील 'परतत्त्वस्पर्श' याचा अर्थ काव्यात आत्मतत्त्वाचे, चैतन्यतत्त्वाचे किंवा परतत्त्वाचे स्फुरण असा ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असावा असे एकूण ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाचा विचार करता म्हणता येऊ शकेल. म्हणजेच आत्मसाक्षात्काराने किंवा परतत्त्वस्पर्शाने मिळालेली निखळ सौंदर्याची अनुभूती चैतन्यमयतेने साहित्यात प्रकट व्हावी ही ज्ञानदेवांची साहित्यविषयक व्यापक अशी अपेक्षा आहे. त्यांचा अध्यात्मविचार व्यक्त झाला आहे. तो 'दिसो परतत्त्वे डोळा' या उक्तीत होय. परंतु ज्ञानेश्वरांच्या दृष्टीने परतत्त्व, परमात्मा, आत्मा हे पर्यायी शब्द आहेत. यांत चैतन्य आणि सौंदर्य यांचा समावेश होईल. परतत्त्वाच्या स्पर्शाने म्हणजेच आत्मसाक्षात्काराने निरामय आनंद मनाला होतो. अर्थात परतत्त्वस्पर्श आणि निखळ आनंद या एकाच नाण्याच्या दोन बाजू किंवा एकमेकांस पर्याय आहेत असे म्हणता येईल. आत्मसाक्षात्कार म्हणजेच ज्ञानमय अवस्था असेही उल्लेख ज्ञानेश्वरीत येतात. यावरून 'परतत्त्वस्पर्श' याचा किती व्यापक अर्थ ज्ञानेश्वरांना अभिप्रेत आहे याची कल्पना येईल. ही परतत्त्वस्पर्श कल्पना, ज्या कल्पनेला 'परतत्त्वस्पर्शवाद' असे म्हणता येईल, ती अधिक स्पष्ट करता येऊ शकेल.

**परतत्त्व :** आत्मा, परमात्मा, आद्यतत्त्व, चैतन्यतत्त्व, आनंदतत्त्व, आत्मतत्त्व, विश्वातील सनातन, चिरंतन व अनंत शक्ती, विश्वचेतना, विश्वातील सर्व वस्तुमात्रांत व प्राणिमात्रांत सतत स्फुरणारे चैतन्य अशा अनेकविध शब्दांनी परतत्त्व या शब्दाला



किंवा कल्पनेला पर्याय देता येतील. या विविध शब्दांतून अतींद्रियत्वाच्या ज्या विविध छटा जाणवतात त्या त्या सर्वार्थाने परतत्त्व हा शब्द ज्ञानदेवांना अभिप्रेत आहे. या तत्त्वालाच साहित्यविचाराच्या दृष्टीने निखळ सौंदर्यतत्त्व असे म्हणता येईल, हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. या दृष्टीने अध्यात्म आणि साहित्य यांच्यात अनुबंध असल्याचे जाणवेल. विश्वाच्या आदी, मध्य व अंती हेच तत्त्व व्यापकतेने भरलेले असल्याची जाणीव होते. आत्म्याच्या व्यापकतेची सौंदर्यपूर्ण आनंदमय अशी ही जाणीव असते. या परतत्त्वामुळेच विश्वाचे अस्तित्व भासमान होते, आणि विश्वातील अनिर्वचनीय अशा या तत्त्वाची अनुभूतीदेखील घडते.

**स्पर्श :** साक्षात्कार, जाणीव, अनुभूती, प्रकाश, ज्ञान, दर्शन या शब्दांनी स्पर्श या शब्दाचे स्पष्टीकरण करता येऊ शकेल.

**परतत्त्वस्पर्श :** म्हणजेच अनादी चैतन्यतत्त्वाची किंवा परमात्म्याची किंवा परतत्त्वाची किंवा आत्मतत्त्वाची किंवा आनंदतत्त्वाची आत्म्याला (अर्थात अंत:करणाचे इंद्रिय जे मन,) (गीता अ. १५) जाणीव होणे. आत्म्याची प्रसन्नता, आत्म्याचा विकास, आत्म्याचे विश्वव्यापक स्फुरण जाणवणे, म्हणजेच साहित्यकलांच्या दृष्टीने, सौंदर्यतत्त्वाच्या विश्वातील चराचर वस्तुमात्रांत घडणाऱ्या स्फुरणाची जाणीव मनाला होणे. मन आत्मसाक्षात्काराने भरून जाणे, सात्त्विक भाव दाटून येणे. वस्तुमात्र, जडचेतन, विश्व यांच्यातील चैतन्यतत्त्वाशी आत्म्याचे अद्वैत पाहणे. आत्मबोध होणे. अशा आत्मसाक्षात्काराने याचि देही याची डोळा तल्लीन झालेल्या आत्म्याला आनंद सोहळ्याची अनुभूती घडत असताना ज्ञानमय अवस्था अधिकाधिक प्रस्फुरित होत जाणे होय.

**परतत्त्वस्पर्श वाद :** ज्ञानेश्वर साहित्यशास्त्री नव्हते हे खरे. तथापि ते श्रेष्ठ कवी आणि तत्त्वज्ञ जरूर होते. ज्ञानदेवांना साहित्यविषयक सिद्धान्त मांडावयाचा होता म्हणून त्यांनी ज्ञानेश्वरी लिहिली असे म्हणणे सयुक्तिक होणार नाही हेही खरे. परंतु प्रवचनाच्या ओघात त्यांच्याकडून 'परतत्त्वस्पर्श' या कल्पनेतून एक निश्चित आणि व्यापक व अतिशय प्रगत असा साहित्यसिद्धान्त मांडला गेलेला आहे हे जाणवते.

परतत्त्वस्पर्श वाद म्हणजे परतत्त्वस्पर्श हे साहित्याचे मूळ कारण होय. परतत्त्वाचे स्फुरण हे परतत्त्वस्पर्श कलावंताच्या, साहित्यिकाच्या अंत:करणाला झाल्याने, म्हणजेच परतत्त्व साक्षात्काराने किंवा आत्मसाक्षात्काराने साहित्यात होते. परतत्त्वस्पर्श हा साहित्याचा आत्मा होय. परतत्त्वस्पर्शाने सारस्वत सिद्ध असेल तरच ते श्रेष्ठ साहित्य होय. साहित्यातून निखळ आनंद रसिकाला मिळणे

म्हणजेच रसिकाला साहित्यातून परतत्त्वस्पर्शानुभूती घडणे होय.

साधकाच्या (साहित्यिकाच्या / कलावंताच्या) सूक्ष्म संवेदनाशील मनाने चालविलेल्या सूक्ष्मनिरीक्षण व अनुभूती ग्रथनाच्या दीर्घोद्योगात त्याला विश्वात व विश्वातील वस्तुमात्र व जीवमात्र यांत सतत स्फुरण पावणारे आत्मतत्त्व किंवा परतत्त्व साक्षात्कारित होते.

**या उपाधिमाजीं गुप्त । चैतन्य असे सर्वगत ।**
**तें तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती ।।** (अ.२, १२६)

या परतत्त्वस्पर्शानुभूतीने मोहरून गेलेल्या, सोलीव सुखाने भारलेल्या, तल्लीन झालेल्या साधकाच्या (साहित्यिक/कलावंत) मनातून शब्दरूप होऊन बाहेर पडलेली ती सौंदर्यानुभूती 'सर्व सुख' प्राप्त करून देणारी असते. या परतत्त्वस्पर्शानेच 'बोली अरूपाचे रूप दावीन' (अ.६, ३६) अशी क्षमता साहित्यिकामध्ये प्राप्त होते. अशा परतत्त्वस्पर्श प्राप्त झालेल्या साहित्यिकाकडून प्रकटलेली कलाकृती किंवा साहित्य हे परतत्त्वस्पर्शाने चैतन्यमय झालेले असते. साहित्यिकाला परतत्त्वस्पर्शाने घडलेली आनंदानुभूती रसिकाला साहित्याच्या माध्यमातून, कलेच्या माध्यमातून, ऐंद्रिय संवेदनेने घेता येते व अंततः रसिकालाही परतत्त्वस्पर्श घडतो. कारण असे साहित्य अतिशय रसाळ, आनंदमय व सेंद्रियत्व प्राप्त झालेले असते. ज्ञानेश्वरांनी परतत्त्वस्पर्श समयीच्या अवस्थेचे वर्णन करून परतत्त्वस्पर्शाचे किंवा आत्मसाक्षात्कार घडण्याचे श्रेय आपल्या गुरूला दिलेले असले तरीसुद्धा त्यातून विचार स्पष्ट झाला आहे. ज्ञानदेवांनी आत्मसाक्षात्काराचे किंवा परतत्त्वस्पर्शाचे (अर्थात साहित्यातील) श्रेय कधी 'आत्मरूप गणेशु' ला दिले तर कधी ते सिद्ध सरस्वतीला दिलेले दिसते, याचे कारणही तसेच आहे. ज्ञानदेव परतत्त्वालाच आद्य ब्रह्मबीज व स्वसंवेद्य असा ओंकार मानतात व त्याच्या पोटातून साहित्यनिर्मिती झाल्याचे प्रतिपादन करतात. अर्थात ज्ञानदेवांनी ओंकारस्वरूप व गणेशरूप श्रीगुरूंमध्येच मानले आहे. ते लिहितात –

**आत्मरूप गणेशु स्मरण । सकळ विद्यांचे अधिकरण ।**
**तेचि वंदूं श्रीचरण । श्रीगुरुचे ।।**
**जयांचेनि आठवें । शब्दसृष्टी आंगवे ।**
**सारस्वत आघवें । जिव्हेसि ये ।।**
**वक्तृत्व गोडपणें । अमृतातें पारु म्हणे ।**
**रस होती वोळगणें । अक्षरांसी ।।**
**भावाचें अवतरण । अवतरविती खूण ।**
**हाता चढे संपूर्ण । तत्त्वभेदें ।।**
**श्रीगुरूचे पाय । जैं हृदय गिवसूनी ठाय ।**
**तैं येवढें भाग्य होय । उन्मेषासी ।।** (अ.१३, १ ते ५)

त्याचबरोबर ते सिद्धसरस्वती अर्थात प्रतिभेविषयी लिहितात –

**जरी प्रकटे सिद्धसरस्वती । तरी मुकया आथी भारती ।**
**एथ वस्तुसामर्थ्यशक्ती । नवल कायी ।।** (अ.१, ७८)

असे परतत्त्वस्पर्शाने ओथंबलेले साहित्य हे 'अतींद्रिय परि भोगवीन । इंद्रियांकरवीं ।।' (अ.६, ३६) अशी अनुभूती घडविणारे असते, आणि शब्द, पद, अर्थ, भाव, रूप, रंग, गंध, स्पर्श घडविण्याचे सामर्थ्य त्यात असते. त्या योगाने रसिकांना असे साहित्य वाचताना

**ऐका रसाळपणाचिया लोभा । की श्रवणींचि होती जिभा ।**
**बोले इंद्रिया लागे कळंभा। एकमेकां ।।** (अ.६, १६)

असा अनुभव येतो. या साहित्यात सर्व इंद्रियांचे समाधान करण्याचे सामर्थ्य असते.

परंतु अशा प्रकारे साहित्यातून घडणारा परतत्त्वस्पर्श, त्या साहित्याचा निरपेक्ष भावनेने रस घेऊ पाहणाऱ्या रसिकासच अनुभवास येईल, हेही ज्ञानदेवांनी स्पष्ट केले आहे.

**जिहीं आत्मबोधाचिया आवडी । केली स्वर्गसंसाराची कुरोंडी ।**
**तेवांचूनि एथींची गोडी । नेणती आणिक ।।** (अ.६, २८)

ज्ञानेश्वरांच्या परतत्त्वस्पर्शवादाचे स्वरूप असे साहित्यिक, साहित्य, आणि आस्वादक या तीनही पातळ्यांवर प्रकट झाले आहे. (१) परतत्त्वस्पर्श अवस्थेतून निपजलेले साहित्य परतत्त्वस्पर्श झालेला साहित्यिक, (२) परतत्त्वस्पर्श प्रकटविणारे साहित्य, (३) परतत्त्वस्पर्शाचा अनुभव घेण्याची क्षमता प्राप्त झालेला म्हणजे अवधान देणारा जाणकार रसिक.

श्री. के. क्षीरसागरांनी साक्षात्कारास दिलेला शब्द 'तिसरा नेत्र' हा ज्ञानदेवांच्या परतत्त्वस्पर्शवादास, किंवा प्रतीतिवादास, किंवा आत्मसत्तावादास, किंवा आत्मसाक्षात्कारवादास, चपखलतेने लावता येईल.

परतत्त्वस्पर्श म्हणजे सौंदर्यतत्त्वस्पर्श असा अर्थ जेव्हा आपण घेतो तेव्हा परतत्त्वस्पर्श ही कल्पना सर्व कलांना कशी व्यापून टाकते हे लक्षात येईल. सौंदर्य हे सर्व कलांचे अंतिम मूल्य होय. 'सत्य, शिव, सुंदर' ह्या संकल्पनेतील तीनही आविष्कार परतत्त्वाचेच होत हे वरील सर्व विवेचनावरून ध्यानात येईल.

परतत्त्वस्पर्शवाद हा अशा प्रकारे व्यापक आणि प्रगत असा आहे.

**रसकल्पना आणि परतत्त्वस्पर्श :** ''शांतरसाची स्थायी : परतत्त्वस्पर्श'' ज्ञानेश्वरांनी शांतरसाच्या स्थायिभावाचा निश्चित असा कोठे उल्लेख केलेला दिसत नाही. तथापि 'जेयाचां बरवेपणीं । कीजे आठां रसांची ओलावणी' या पूर्वोक्त वेच्यांत त्यांनी बरवेपणाच्या बाबतीत शांतरस हा इतर रसांहून वरचढ आहे, हे स्पष्ट केले आहे. तसेच –

**वाचें बरवें कवित्व । कवित्वीं बरवे रसिकत्व**
**रसिकत्वींहि परतत्त्व । स्पर्शू जेसा ।।** (अ.१८, ३४७)

या प्रसिद्ध ओवीत बरवेपणाच्या बाबतीत रसिकत्वातही 'परतत्त्वस्पर्श' हा अधिक श्रेष्ठ असे म्हटले आहे. या दोन ओव्यांच्या तात्पर्यावरून त्यांच्या मते शांतरसाचे मूलतत्त्व किंवा स्थायीभाव, परतत्त्वस्पर्श किंवा 'परमेश्वरी तत्त्वाचें प्रतिपादन' होय असा ध्वनी निघतो. अर्थात शांतरसाच्या सर्वश्रेष्ठत्वाबद्दल ज्ञानेश्वरांचे मत अभिनव गुप्ताच्या प्रतिपादनाशी जुळते आहे असे दिसून येईल. येथे पर्यायाने शांतरसाचा स्थायी अभिनवगुप्ताने मानला तसा आत्मा अर्थात 'परतत्त्व' हाच आहे हेही सूचित झाले आहे. या अवतरणाबरोबरच आणखी एक अवतरण घेणे योग्य होईल.

**जेथ शांताद्‌भुत रोकडे । आणि येरां रसां पडप जोडे ।**
**हें अल्पचि परि उघडें । कैवल्य जेथ ।।**

''शांत व अद्‌भुत मूर्तिमंत अवतरून त्यामुळे इतर रसांना मोठेपणा मिळाला, एवढेच नव्हे, तर येथे ईश्वराचे केवळ स्वरूप प्रकट झाले असे म्हटले आहे.'' ही दोनही अवतरणे डॉ. मा. गो. देशमुख यांच्या 'मराठीचे साहित्यशास्त्र' (कॉन्टिनेन्टल् प्रकाशन, दु. आ. १९५९) या ग्रंथातून घेतलेली आहेत.

ज्ञानदेवांनी प्रवचनाच्या ओघात रसांचा उल्लेख केलेला आहे. अर्थात त्यांची ही चर्चा संस्कृत रसचर्चेनुसार आलेली आहे. कदाचित हा युगशैलीचा परिणाम किंवा प्रभाव आहे (?) असे म्हणता येईल. यात ज्ञानेश्वरांनी शांतरसाला सर्वाधिक महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते. डॉ. मा. गो. देशमुखांनी देखील रसचर्चेची संगती संस्कृत साहित्यशास्त्राच्या तुलनेने लावण्याचा प्रयत्न करीत रसचर्चा केली आहे. वास्तविक ज्ञानेश्वरांची रसकल्पना थोडी वेगळ्या पद्धतीने विचारात घ्यायला हवी.

**म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे । तरी हृदयाकाश सारस्वतें वोळे**
**आणि श्रोता दुश्चिता तरी वितुळे । मांडला रसु ।।** (अ.९, २८)

या ओवीतून 'हृदयसंवाद' त्यातून सुगंधाने भरलेले हृदय आणि अंत:करणाची द्रवावस्था या कल्पना ज्ञानदेवांनी प्रकट केल्या आहेत. येथे साहित्यास्वाद प्रसंगाचे वर्णन स्पष्ट आहे. परंतु यातील 'वितुळे' या शब्दावर जे भाष्य केले गेले आहे ते पुन्हा संस्कृत साहित्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून. अर्थात 'रस' कल्पना संस्कृत साहित्यशास्त्रातील असल्याने असे विवेचन गैर नाही हे खरेच; तथापि ज्ञानेश्वर हे पूर्णत: स्वतंत्र प्रतिभेचे कवी होते, हे त्यांच्या साहित्यातून प्रकट झाले आहे. व्यास, शंकराचार्य यांच्याकडून त्यांनी तत्त्वज्ञानाचा वारसा घेतला असला तरी ते आत्मानुभवाच्या कसोटीवर घासूनपुसून घेतले आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. 'वितुळे' म्हणजे परतत्त्वस्पर्शाने अलौकिक आनंदाचा अनुभव घडणे असा अर्थ घेता येईल. परतत्त्वस्पर्शवादाच्या दृष्टिकोनातून विचार करू लागले की असे लक्षात येते की साहित्यिकाला घडलेला सौंदर्यतत्त्वाचा म्हणजेच परतत्त्वाचा स्पर्श साहित्यगत होतो आणि हा साहित्यगत परतत्त्वस्पर्श हृदयसंवादाने रसिकगत होतो व 'मांडला रसु' म्हणजेच निखळ आनंदाचा सोहळा अनुभवला जातो.

आता वरील अवतरणांमध्ये शांतरसाचा स्थायीभाव म्हणून 'परतत्त्वा'चा विचार केला आहे. भाव हा मनाचा विकार आहे हे लक्षात घेतले पाहिजे. परतत्त्व म्हणजे आत्मा किंवा त्यास उल्लेखिलेले पर्यायी शब्द होत. आत्मसाक्षात्काराने किंवा परतत्त्वस्पर्शानुभूतीने ज्ञानमय अवस्था प्राप्त होते. ही ज्ञानमय अवस्था; निरपेक्ष, निर्विकार, अनिर्वचनीय आत्मतत्त्वाच्या साक्षात्काराने वस्तुमात्रांत, प्राणिमात्रांत, एकूणच विश्वात त्याच आत्मतत्त्वाचे निरंतर स्फुरण अनुभवास येते, म्हणून प्राप्त झालेली असते. निखळ सौंदर्याच्या साक्षात्काराने दंग अवस्था निर्माण होते. अलौकिक सुखाचा अनुभव येतो. ज्ञानदेवांनी शांतरसाला रसराज असे म्हटले आहे याचे कारण शांतरसाच्या अनुभूतीने श्रोते आनंदाच्या राज्यावर बसतील असे त्यांना म्हणावयाचे असते. केवल आनंद, केवल सौंदर्याच्या अनुभूतीने म्हणजेच परतत्त्वस्पर्शाने शक्य होय आणि निरपेक्ष सौंदर्याची अनुभूती हे सर्वच कलांचे अंतिम मूल्य होय हे सर्वमान्य झालेले आहे. ज्ञानेश्वरांचा परतत्त्वस्पर्श कोणत्या प्रकाराने साहित्य चर्चेच्या संदर्भात घ्यावा हे लक्षात येईल. ज्ञानेश्वरांनी मांडलेला रसविचार हा युगशैलीचा परिणाम मानला तर केवल आनंद, निरपेक्ष सौंदर्य, चैतन्यतत्त्व यांचा साक्षात्कार किंवा ज्ञानमय अवस्था हा शांतरसाचा विषय असल्याने ज्ञानेश्वरांनी सर्वश्रेष्ठ रस असे प्रतिपादन केले असावे. अर्थात पारंपरिक पद्धतीने गीता हा श्रीकृष्णाने वेदांचे सारभूत तत्त्वज्ञान सांगण्यासाठी केलेला प्रपंच म्हणजे शांतरसाचा विषय. त्यामुळे ज्ञानेश्वरीमध्ये शांतरसाचा परिपोष झालेला आहे हे म्हणणेही सयुक्तिकच होय. परंतु साहित्यशास्त्रीय विचार करताना 'परतत्त्व'

हे साहित्याचे मूल कारण होय, असाच विचार ज्ञानदेवांना अभिप्रेत असावा. या दृष्टीने डॉ. मा. गो. देशमुख यांनीच 'मराठीचे साहित्यशास्त्र' या ग्रंथातील 'रससंख्या आणि शांतरस' या प्रकरणातील ठळक वैशिष्ट्ये सांगताना 'दामोदराने श्रीकृष्णलीलांचे नवरसात्मक वर्णन केले आहे ते साहित्यशास्त्राला धरून आहे. शृंगारादि अष्टरस ह्या विकृती व शांतरस ही सर्व रसांची प्रकृती किंवा मूलभूत तत्त्व आहे असे तो सुचवितो.' हे दिलेले वैशिष्ट्य संस्कृत साहित्यशास्त्राच्या दृष्टीने दिलेले असले तरी ज्ञानेश्वरांच्या परतत्त्वस्पर्श संकल्पनेला बरेच जवळ जाणारे आहे, असे म्हणता येईल. याच दिशेने ज्ञानेश्वरांची रसकल्पना समजावून घेणे ज्ञानेश्वरांच्या साहित्यविचारांच्या दृष्टीने अधिक न्याय्य होय असे म्हणता येईल.

यावरून ज्ञानेश्वरांची परतत्त्वस्पर्श कल्पना कशी स्वतंत्र व साहित्यविचाराच्या दृष्टीने मूलगामी आहे हे स्पष्ट होते.

वस्तुमात्रांत, प्राणिमात्रांत असलेल्या चैतन्याशी आत्मसाक्षात्कारपूर्वक अद्वैत साधण्याची किमया संवेदनशील सहृदयास असते. अशा प्रतिभावंतांच्या साहित्यातील परतत्त्वस्पर्श गूढ, अनाकलनीय वाटत नाही. उलट सूर्य उगवल्यावर सर्व अंधार आपोआपच नाहीसा होतो, त्याप्रमाणे सौंदर्यतत्त्वाच्या अनुभूतीतील सर्व अडथळे दूर होऊन साहित्यातील परतत्त्वस्पर्श सहज अनुभवास येतो.

**जैशी पूर्वदिशेच्या राउळी । उदयाची सूर्ये दिवाळी ।**
**कीं येरींही दिशां तियेचि काळीं । कालिमा नाहीं** (अ. ५, ८६)

केशवसुतांच्या साध्याही विषयातला मोठा आशय असो किंवा अनिलांच्या तळ्याकाठीची अनुभूती असो, तांब्यांच्या 'घट भरे प्रवाही' किंवा 'नववधू'तील अनुभूती असो, बालकवींच्या 'आनंदी आनंद' मधील असो किंवा रवीन्द्रनाथांचे एखादे 'पाणी भरताना मग्न झालेल्या स्त्रीचे चित्र' असो, मर्ढेकरांनी उल्लेखिलेला लयतत्त्व विषय असो किंवा विशिष्ट दृष्टिकोनानुसार प्रेरित होऊन अंतिम सत्याच्या शोधात निघालेला कथा, कादंबरी, नाटक यामधील नायक असो या सर्वांच्या मुळाशी असतो परतत्त्वस्पर्श असे म्हणता येईल. परतत्त्वस्पर्शाने ते साहित्य जिवंत होते, त्याला सेंद्रियत्व प्राप्त होते आणि अशा साहित्यातून जाणकार रसिकाचा साहित्यिकाच्या हृदयाशी हृदयसंवाद घडतो.

जीवनातील सुखद किंवा आत्यंतिक दुःखद अनुभूतीक्षणी परतत्त्वस्पर्श होताच विकारांचा निरास होऊन निखळ सौंदर्याचा साक्षात्कार होऊन सोलीव सुखाची अनुभूती येते. कारण परतत्त्वस्पर्श आणि सौंदर्यानुभूती या गोष्टी मुळात दोन नाहीत. विश्वातील अंतिम सत्य आणि चैतन्य यांच्या अनुभूतीत सुख आणि दुःख



ही भावनाच राहिलेली नसते. परतत्त्वस्पर्श म्हणजे खरे ज्ञान होय. खरा ज्ञानी हा दैवी गुणांनी युक्त असतो. कारण दैवी गुणांच्या सहाय्यानेच तो परतत्त्वस्पर्शापर्यंत पोहोचतो. परतत्त्वस्पर्श म्हणजे अनाकलनीय, गूढ किंवा स्वप्नरंजक अशी अनुभूती नव्हे, तर ज्ञानमय अवस्था होय, म्हणजेच विश्वातील सौंदर्यमूल्याचे दर्शन किंवा साक्षात्कार होय आणि हेच साहित्याचे, कलांचे अंतिम मूल्य होय.

ज्ञानदेवांनी मांडलेली परतत्त्वस्पर्श कल्पना ही सर्वश्रेष्ठ जीवनानुभूती किंवा जाणीव होय. सर्वव्यापक अशी जीवनदृष्टी होय असे म्हणता येईल. म्हणून परतत्त्वस्पर्श हा सिद्धान्त ज्ञानेश्वरीतील साहित्य-विचारातीलच नव्हे तर एकूण साहित्यविचारातील मूलभूत सिद्धान्त होय. परतत्त्वस्पर्शवाद हा असा व्यापक व प्रगत साहित्यसिद्धान्त आहे असे म्हणता येईल.

येथे एक गैरसमज होण्याची शक्यता असते त्याचे निरसन करू या. 'परतत्त्वस्पर्श' म्हणजे चैतन्यतत्त्वाशी आत्मतत्त्वाचे अद्वैत पाहणे असे जे म्हटले आहे त्याचा साहित्याच्या आणि एकूणच जीवनाच्या दृष्टीने ज्ञानेश्वरांना नेमका कोणता अर्थ अभिप्रेत दिसतो हे स्पष्टपणे लक्षात घेतले पाहिजे. जीवन जगत असताना, म्हणजे जीवनाच्या संदर्भात आणि साहित्याच्या संदर्भात ज्ञानेश्वरांना अद्वैत कोणत्या मर्यादेपर्यंत मान्य होते, याविषयी निश्चित कल्पना असणे योग्य होय. 'याचि देही याची डोळा' परतत्त्वस्पर्शाचा आनंद मिळवायचा आहे. म्हणजे स्वतःचे वेगळे (परंतु तटस्थ) असे अस्तित्व न विसरता केवळ ज्ञान आणि मन यांच्या सहायाने हे अद्वैत पाहावयाचे आहे म्हणजे नेमके कसे -

**कां आपुला ठावो न सांडिता । आलिंगिजे चंदु प्रगटतां ।**
**हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणे ।।** (अ.१, ६०)

म्हणजेच ज्ञानदेवांना साहित्यात आणि जीवनात योग्याचे अद्वैत अपेक्षित नाही, तर सावधपणे आत्मतत्त्वाच्या किंवा परतत्त्वाच्या सर्व जडचेतनात स्फुरण पावण्याची जाणीव असणे अभिप्रेत आहे. या सर्व गोष्टींचे स्पष्ट शब्दांत स्पष्टीकरण ज्ञानेश्वरीत का येते याचे कारण ज्ञानदेव हे आत्मानुभवी योगी होते, तत्त्वज्ञ होते, कवी होते आणि संतही होते; असे त्यांचे चतुर्विध व्यक्तिमत्त्व ध्यानात घेऊनच विचार केला पाहिजे. 'साहित्यास्वाद' प्रकरणात या गोष्टीचा अधिक विचार केला आहे.

तीन

# साहित्याचे स्वरूप

साहित्यविचारामध्ये साहित्याचे स्वरूप स्थूलमानाने समजावून घेण्याचा प्रयत्न करण्याची प्रथा आहे. तसे केल्याने साहित्याचा अभ्यास म्हणजे कोणकोणत्या साहित्य अंगांचा अभ्यास हे समजण्यास मदत होते. साहित्याचे स्वरूप समजावून घेताना निरनिराळ्या पंडितांनी साहित्याच्या व्याख्या केलेल्या आहेत, त्या एकत्रितपणे समजावून घेण्याचा प्रयत्नही आढळतो. तसे केल्याने साहित्याचे समग्र स्वरूप लक्षात येण्यास मदत होते. 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' असा आपला ग्रंथविषय असल्याने येथे तेवढ्या मर्यादेत साहित्यस्वरूपाचा विचार करावयाचा आहे. म्हणजे ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत प्रवचनाच्या ओघात साहित्यस्वरूपाविषयीच्या कल्पना स्फुट केल्या आहेत; त्यांच्या साहित्याविषयीच्या अशा उद्‌गारांच्या आधारे प्रकट झालेले साहित्य स्वरूप येथे अभ्यासण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. ज्ञानेश्वर साहित्य कशास म्हणतात, साहित्याच्या विविध अंगांचे स्वरूप कसे असावे या विषयीची त्यांची कल्पना, साहित्य उत्पत्तीविषयक कल्पना आदी गोष्टींविषयीची चर्चा घडलेली आहे. अर्थात साहित्यशास्त्राची चर्चा करण्याचा ज्ञानदेवांचा उद्देश नव्हता हे खरेच. निरनिराळ्या संदर्भाने परंतु साहित्यस्वरूप व साहित्यविषयक कल्पनांची उकल करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ग्रथन व त्या आधारे विवेचन करण्याचा प्रयत्न आहे.

**साहित्य म्हणजे काय? :** ज्ञानेश्वरांनी निरनिराळ्या संज्ञा साहित्य वा तत्संबंधी गोष्टींसाठी वापरलेल्या आहेत. **वाङ्मय :** वाणीने बोलले जाणारे सर्व शब्दजात, **शब्दब्रह्म :** वाणीने बोलले जाणारे सर्व शब्दजात, **नागरबोल :** शिष्ट किंवा ग्रंथनिविष्ट सुसंस्कृत व चातुर्ययुक्त शब्दसमूह, **विदग्ध वाङ्मय :** शिष्ट



किंवा ग्रंथनिविष्ट सुसंस्कृत व चातुर्ययुक्त शब्दसमूह, **सारस्वत :** सरस्वतीच्या कृपा– प्रसादाने प्राप्त होणारे स्फूर्तिसिद्ध, प्रज्ञासुलभ असे रसश्रेष्ठ वाङ्मय, काव्य चातुर्ययुक्त पद्यबंध, **साहित्य :** अलंकारादी काव्यशोभेची साधने. या सर्व संज्ञा 'साहित्य' या संज्ञेने अलीकडील काळात जो अर्थबोध होतो त्याशी निगडित अशा काही गोष्टी उल्लेखित करतात असे म्हणता येईल. डॉ. मा. गो. देशमुख यांच्या 'मराठीचे साहित्यशास्त्र' या ग्रंथात परिशिष्ट क्र. १ मध्ये वरीलप्रकारे संज्ञांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. या संज्ञा कधी कधी पर्यायी संज्ञा म्हणूनही आलेल्या आहेत असे दिसते.

आपण साहित्यविचाराचा अभ्यास करताना आपणास 'ललित साहित्य' या संज्ञेने ज्या गोष्टी बोधित होतात त्यांचा विचार अभिप्रेत असतो. त्या दृष्टीने ज्ञानेश्वरांनी कोणत्या प्रकारे साहित्यविषयक चर्चा केली आहे ते पाहू या.

वरील संज्ञांचा विचार करता असे म्हणता येईल की ज्ञानेश्वरांना शास्त्रीय, वैचारिक व ललित असे सर्व प्रकारचे साहित्य 'वाङ्मय' या शब्दाने अभिप्रेत आहे आणि सारस्वत या शब्दाने परतत्त्वस्पर्शयुक्त ललित साहित्य अभिप्रेत आहे. परंतु असे सरळ विभाजनही योग्य होईल असे नाही, कारण ज्ञानेश्वरांना सर्वच शब्दजातात सौंदर्ययुक्तता अभिप्रेत दिसते.

ज्ञानेश्वर प्रवचन करीत होते व ते लिखित अशा साहित्यात समाविष्ट होत होते याची जाणीव ज्ञानदेवांना आहे हे लक्षात घेतले, तर मात्र असे म्हणता येईल, की त्यांना ललित परंतु परतत्त्वस्पर्शयुक्त साहित्याविषयीच विचार व्यक्त करावयाचे होते.

**प्राचीन संस्कृत साहित्याचा गौरव :** श्रीगणेश ही साहित्यमूर्ती आहे असे कल्पून ज्ञानेश्वरांनी सांगरूपकातून समग्र वाङ्मयाचा परिचय करून दिला आहे. सर्व वाङ्मय म्हणजे शब्दब्रह्म होय, म्हणजेच साहित्य होय असे म्हणून त्या साहित्याच्या अभ्यासाने, व्यासंगाने, किंवा त्या वाङ्मयाच्या कृपेनेच पुढील साहित्य निर्माण झालेले असते. ज्ञानदेवांनी साहित्याचे जणू आदिबंधात्मक स्वरूप या निमित्ताने विशद केले आहे असे म्हणता येईल. वेद, श्रुती, स्मृती, पुराणे, सहा शास्त्रे, अनुमान, न्यायादी प्रमाणे, काव्य, नाटके, वेदान्त सूत्रे, बौद्धमत, सांख्यमत, जैमिनीची धर्मसूत्रे, पूर्वोत्तर मीमांसा शास्त्रे, द्वैताद्वैत मते, भाष्ये, ईशावास्यादी दशोपनिषदे, या सर्वांना गणेशरूपात एकत्र पाहिले आहे.

**वैशिष्ट्यांतून साहित्यस्वरूपाचे प्रकटीकरण :** साहित्यस्वरूपाचे यथार्थ विवेचन ज्ञानदेवांनी श्रीगणेश स्वरूपाचे वर्णन करताना केले आहे असे म्हणता

येईल.

**(१) निर्दोष सुंदर वर्ण :** श्रीगणेशाचा एकूण रंग असा अर्थ वर्ण या शब्दाचा घेत असतानाच शब्दब्रह्म निर्दोष वर्णानी सुशोभित होत असते असा विचार व्यक्त होत आहे. वर्णऔचित्य साधलेले असावे असाही अर्थ घेता येईल. वर्णांचे शब्द व शब्दांतून अर्थ. अर्थातच वर्ण व शब्द यांच्या निर्दोषपणाची म्हणजे औचित्याची चर्चा येथे घडली आहे असे म्हणता येईल.

**(२) नवनवीन अर्थलहरी प्रकट करणारे शब्द :** लावण्य ज्याप्रमाणे नित्य नावीन्याचा अनिर्वचनीय आनंद देते, त्याप्रमाणे शब्द अर्थवाही असावेत. अर्थसौंदर्याने मनात नवनवीन अर्थलहरी उमटत जाऊन किंवा नवनवीन अर्थ जाणवत जाऊन तो शब्द व्यापक बनत जावा.

**(३) अतींद्रिय अनुभूतींचे शब्दांतून प्रकटीकरण :** साहित्यातून विश्वातील म्हणजे संसारातील मूलतत्त्वांना, अतींद्रिय तत्त्वांना, किंवा सत्य, शिव, व चैतन्य तत्त्वांना प्रकट करणारा आशय शब्दालंकार व अर्थालंकार यांच्या स्वरूपात म्हणजेच वक्रोक्तीपूर्णतेने, लालित्याने प्रकट व्हावा असे ज्ञानदेवांचे मत दिसते. मात्र हे अलंकार छंदोबद्धतेने म्हणजे पदबंधातून प्रकट व्हावेत असे त्यांना अभिप्रेत आहे. लयबद्धतेला आणि संयमपूर्ण पदबंधाला ज्ञानेश्वरांनी किती महत्त्व दिले होते हे सहज लक्षात येईल.

**(४) लय– माधुर्य– सुकुमारतेविषयी साक्षेप :** शब्दांच्या औचित्याबद्दल व अलंकारयुक्ततेबद्दल तसेच लयबद्धतेबद्दल बोलत असताना ज्ञानदेव शब्दमाधुर्य व सुकुमारता आणि क्रमशीलतेला विसरत नाहीत. शब्दांच्या रंग, रूप, नाद, लय, आणि स्पर्श या सर्वांचा अत्यंत साक्षेपाने विचार ज्ञानेश्वर करतात असे म्हणता येईल.

**(५) लालित्याला व ललित साहित्याला महत्त्व :** काव्य-नाटके या वेदातील तत्त्वे प्रकट करणाऱ्या नादमधुर 'क्षुद्रघंटिका' आहेत असे म्हणत असताना साहित्यातील लालित्याला ज्ञानेश्वर किती महत्त्व देतात हे ध्यानात येईल. आध्यात्मिक विचार हे रूक्षपणाने प्रकट होता कामा नयेत. ब्रह्मविद्येचा सुकाळ करावयाचा असेल, त्याचबरोबर सामान्यातील सामान्य माणसापर्यंत परतत्त्वाचा स्पर्श घडवावयाचा असेल, तर काव्य नाटकादी ललित साहित्य माध्यमे म्हणून वापरले पाहिजे. म्हणजेच लालित्य, रंजनात्मकता आणि क्रीडात्मकता साहित्यात असावी असे ज्ञानदेवांना वाटत होते हे उघड आहे. येथेच या गोष्टीचा विचार केला पाहिजे, की ज्ञानदेवांसमोर नृत्य करीत मिरविणारी श्रीगणेशाची मूर्ती आहे,



आणि वाङ्मयविलास हा जणू गणेशाचा आनंदसोहळा सुरू आहे. ही गणेशमूर्ती म्हणजेच साहित्य होय असे त्यांना वाटते. या सर्व गोष्टींचा अर्थ असा की साहित्यातील सौंदर्यतत्त्व म्हणजेच परतत्त्वस्पर्श होय. म्हणजेच परतत्त्वस्पर्शाने साहित्यात लालित्य प्राप्त होते; कारण परतत्त्व साक्षात्कार म्हणजे आत्म्याच्या सतत स्फुरणाविषयीची जाणीव. आत्मत्वाचे विश्वातील चिरंतन आणि सौंदर्यमय, चैतन्यमय स्फुरण असे परतत्त्वस्पर्श संकल्पनेच्या आधारे म्हणता येऊ शकेल. साहित्यातील हे चैतन्य म्हणजेच खरे लालित्य, म्हणजेच रंजकता, म्हणजेच साहित्यातील मोहून टाकणारी गोष्ट. ज्ञानदेवांनी शांतरस शृंगाराच्या माथ्यावर पाय ठेवील असे म्हटले आहे. (अ.१३, ११५५) साहित्यातील लालित्यामुळेच केवळ रसिकांना परतत्त्वस्पर्शानुभूती शक्य आहे. ललित साहित्यात परतत्त्वस्पर्श अनुभूती प्रकट झालेली असते अशी ज्ञानदेवांची मनोभूमिका असावी असे म्हणता येईल.

**(६) विषय निवड :** विषयाची निवड ही साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे असे ज्ञानदेवांचे मत असावे. ज्ञानदेवांना केवळ अध्यात्म विषयावर किंवा तत्त्वज्ञानावर साहित्यविलास घडवावा; किंवा अध्यात्म अगर तत्त्वज्ञान हाच केवळ साहित्याचा विषय होऊ शकतो; असे म्हणावयाचे असेल, असे वाटण्याचा संभव आहे. परंतु काव्य नाटकांसंबंधीची वरील चर्चा पाहताना संस्कृत काव्यनाटकांना त्यांनी सौंदयाचे सौंदर्य वाढविणाऱ्या वस्तू – गणेशाच्या पायातील रुणझुणत्या घागऱ्या आहेत असे म्हटले आहे हे विसरून चालणार नाही. साहित्याचा प्रवास हा लालित्यपूर्ण असला पाहिजे, अर्थातच वेचांची किंवा विषयाची निवड ही परतत्त्व स्पर्शानुभूती घडविणारी असावी, असे त्यांना म्हणावयाचे होते हे स्पष्ट आहे. येथे आपण पुन्हा अद्वैत तत्त्वज्ञानाशी आत्मतत्त्वाच्या साक्षात्काराशी म्हणजेच परतत्त्वस्पर्शवादाशी येतो. यावरून परतत्त्वस्पर्श घडवू शकणाऱ्या श्रेष्ठ, निवडक साहित्याकडेच या निमित्ताने आपले लक्ष खेचून घेतलेले दिसते (अ.१३, ३३३)

**(७) साक्षेप आणि विवेकाला महत्त्व :** ज्ञानेश्वरांनी श्रेष्ठ कवींच्या बुद्धीतील निर्दोषपणाचा विचार केला आहे. शुद्धाशुद्धविवेक, अचूकतत्त्व प्रतिपादन करणारी बुद्धी, त्यासाठी अचूक शब्द, पदबंध, अलंकारयोजना या सर्वांचा विचार या ठिकाणी येतो. याचाच अर्थ ज्ञानेश्वरांनी कवींच्या ठायी असलेल्या औचित्यविचारास सर्वाधिक महत्त्व दिलेले आहे असे म्हणता येईल. हा औचित्यविचार वर्ण, शब्द, अर्थ, क्रम, अलंकार, पदबंध, विषय, मांडणी, लय, नाद या सर्व बाबतींत असला पाहिजे, असेच त्यांचे स्पष्ट मत आहे. अर्थातच औचित्यविचाराला परतत्त्वस्पर्शाचे निश्चित परिमाण ज्ञानदेवांनी दिले आहे, हेही ध्यानात घ्यावयास

हवे. त्यामुळे स्वाभाविकपणे त्यांनी प्रकट केलेल्या साहित्यस्वरूपाला एक निश्चित परिमाण लाभले आहे असे दिसते. ज्ञानेश्वरीतील एकंदर प्रवचन पाहिले आणि त्यातील व्यवहार, निसर्ग आणि अध्यात्म यांवरील कल्पनाविलासात्मक पद्धतीने स्पर्श घडविणारे विवेचन पाहिले, की ज्ञानेश्वरांना साहित्याच्या बाबतीत विषयाचे बंधन आवश्यक वाटत नाही; परंतु निश्चित दृष्टीची आवश्यकता मात्र नक्कीच वाटत असली पाहिजे. अंतिम चैतन्यतत्त्व, निखळ सौंदर्य, परतत्त्व यांचा ध्यास साहित्यिकास-कलावंतास (साधकास) असला पाहिजे. आत्मसाक्षात्कारासाठी म्हणजेच परतत्त्वस्पर्श अनुभूतीसाठी त्याची सतत विवेकपूर्ण साधना सुरू असली पाहिजे आणि आत्मसाक्षात्काराचा, परतत्त्वस्पर्शानुभूतीचा, सोलीव सौंदर्याचा आपल्या साहित्यातून साक्षेपपूर्वक विलास त्याच्याकडून घडला पाहिजे असे ज्ञानदेवांनी सूचित केले आहे. साहित्यिकाच्या भूमिकेविषयी ज्ञानदेव किती जागरूक आहेत आणि साहित्यिकाच्या भूमिकेला ते कशी निश्चित दिशा देतात हे यावरून लक्षात येऊ शकेल.

**(८) विविध मतप्रदर्शनास हरकत नाही :** विविध मते प्रदर्शन करणारे साहित्य अखेर परतत्त्वस्पर्शानुभूतीपर्यंत जाणारे साधनरूप असते, असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे असावे. म्हणूनच त्यांनी गणेशाच्या हातातील विविध आयुधांना विविध मते असे संबोधिले आहे. साहित्यातून अशी विविध मते मांडली जाणे आवश्यक आहे असे ज्ञानदेवांना वाटत असावे. विविध मतांच्या मंडनाने जीवनातील विविध जाणिवांचे प्रकटीकरण होत जाते व त्यातून ब्रह्मविद्येचा सुकाळ होतो असे त्यांचे मत असावे. अर्थातच असे विविध मतांचे प्रकटीकरण हे खंडनमंडनात्मक असते, आणि जाणकार रसिकांच्या दृष्टीने हे सृजन उपयुक्तच ठरते. त्यातूनच अखेर ब्रह्मरसाने भरलेला ब्रह्मज्ञानरूपी मोदक फलस्वरूप प्राप्त होतो. म्हणजेच साहित्यात विविध तात्त्विक भूमिका घेऊन लिहू लागले तर परतत्त्वस्पर्श अर्थात ज्ञानमय अवस्थाच किंवा आत्मसाक्षात्काराची अवस्थाच अंततः प्राप्त होते. तेच अंतिम सत्य होय. किंबहुना ते निखळ सोलीव सौंदर्य प्राप्त करवून देणे हेच साहित्याचे कार्य आहे किंवा तेथपर्यंत घेऊन जाणारे तेच खरे साहित्य होय. अर्थात श्रेष्ठ साहित्याचे व माध्यमरूप साहित्याचे परिमाणच एक प्रकारे ज्ञानदेव देत आहेत असे वाटते.

निरनिराळ्या जीवनदृष्टींमधील अपूर्णता, एकांगीपणा आणि अध्यात्म-वादातील किंवा परतत्त्वस्पर्शवादातील पूर्णता ज्ञानेश्वरांना प्रकट करावयाची आहे असे म्हणता येईल.



**(९) अलौकिक आनंददायी साहित्य असावे :** सौंदर्यलालसा, सौंदर्यशोध आणि सौंदर्याच्या साक्षात्काराने किंवा जाणिवेने झालेला अलौकिक आनंद या क्रमाने साहित्यातून सौंदर्याचे प्रकटीकरण झालेले असावे. अलौकिक आनंद देणारे साहित्य असावे असेच ज्ञानदेवांना सांगावयाचे असावे. येथे ज्ञानदेवांनी साहित्यिकाची साहित्यविषयक भूमिका कोणती असावी हेच जणू प्रकट केले आहे. स्वतःच्या साहित्य लेखनविषयक भूमिकेविषयी त्यांनी 'आनंदाचे आवार' रचू अशी इच्छा प्रकट केली आहे. रसिकांना सुखाच्या राज्यावर बसविण्याची घोषणा ज्ञानदेव करताना दिसतात. (अ.१३, ११५९).

**(१०) निर्भयता प्रकटविणारे :** साहित्यातून अलौकिक, निरपेक्ष आनंद प्रकट झाला म्हणजेच परतत्त्वस्पर्श घडला की ज्ञानमय अवस्था प्राप्त होते. अशी ज्ञानमय अवस्था प्राप्त करवून देणे हे साहित्याचे प्रयोजन असावे, अशी ज्ञानमय अवस्था प्राप्त झाली तरच जीवनविषयक अज्ञानातून निर्माण झालेले भय लोप पावेल म्हणजे निर्भयता प्रकट होईल. निर्भयता प्रकट होणे म्हणजे सुखदुःखाच्या पार जाणे होय. ही अवस्था ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असावी. या ज्ञानमय अवस्थेमुळेच स्वाभाविकपणे बऱ्यावाईटाची जाण निर्माण होईल, वाईट लोप पावेल आणि तिमिरात म्हणजेच उथळ, मायावी, आभासात्मक आनंदात माणूस गुंतून पडणार नाही. औचित्ययुक्त विचाराने म्हणजे विवेकाने तो सोलीव, निर्मळ, निरामय ब्रह्मसुखाचा म्हणजेच आत्मबोधाच्या, अद्वैताच्या निर्भेळ आनंदापर्यंत येऊन पोहोचेल. असे पोहोचविणे हे साहित्याचे कार्य होय असे ज्ञानदेवांचे मत असावे.

**(११) सूक्ष्म निरीक्षणातून, चिकित्सापूर्वक अवतरलेले :** सूक्ष्म निरीक्षण, चिकित्सा आणि सत्य, शिव यांची जाण, आणि सुंदरतेचा म्हणजे आत्म्याचा साक्षात्कार म्हणजेच परतत्त्वस्पर्श साहित्यसृजनांसाठी आवश्यक आहे. साहित्यिकाचे साहित्य आत्मनिष्ठेच्या मर्यादेत राहता कामा नये, तर त्यात सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यातून साहित्यिकाला गवसलेले ज्ञान सामान्य माणसांपर्यंत न्यावयाचे असेल, तर सूक्ष्म निरीक्षणाने चिकित्सापूर्वक जीवनानुभूती घडली पाहिजे, त्यातील सत्याचा शोध घेतला पाहिजे, त्यातील चैतन्यतत्त्वापर्यंत पोहोचले पाहिजे आणि अनुभूतीची कलात्मक मांडणीदेखील चिकित्सापूर्वक व सखोलपणाने झाली पाहिजे असे ज्ञानदेव सूचित करतात.

**(१२) परस्पर विरोधी वाटणाऱ्या गोष्टींना तुल्यबळतेने समजावून घेणे** : द्वैत-अद्वैत, लौकिक-पारलौकिक, वास्तव आणि कलात्मक, या परस्पर विरोधी गोष्टी नसून त्या तुल्यबळतेने परस्परांना बळ देणाऱ्या व ज्ञानमय अवस्थेपर्यंत घेऊन

जाणाऱ्या आहेत, असे प्रतिपादन ज्ञानदेवांना करावयाचे दिसते. म्हणून अशा विरोधी भासणाऱ्या तुल्यबळ विचारांना ज्ञानदेवांनी श्रीगणेशाच्या गंडस्थळाची उपमा देऊन पुन्हा आत्मसाक्षात्काराचा विचारच म्हणजे परतत्त्वस्पर्शवादच प्रतिपादला आहे, असे म्हणता येऊ शकेल. त्यांच्या मते हे द्वंद्व केवळ आभासात्मक आहे. येथे एक प्रकारे विचारमंथनच सुरू असते. त्यामुळे मंथनातून आत्मज्ञान प्रकटते किंवा आत्मबोध घडतो. या साक्षात्काराने किंवा प्रचितीमुळे द्वंद्वाचा लोप होऊन अद्वैत प्रकटते व एक प्रकारे साहित्य सुगंध दरवळतो म्हणूनच परस्पर विरोधी गोष्टींची तुल्यबळतेने चर्चा व्हावी. ज्ञानदेवांना साहित्यामधील मतस्वातंत्र्य आणि वादविवाद अभिप्रेत आहे हे यावरून लक्षात येते. म्हणूनच त्यांनी विविध प्रकारचे आणि परस्पर विरोधी विचारांचे ऐक्य श्रीगणेशात पाहिले. ज्ञानदेवांचा हा विचार केवढा प्रगत आहे हे स्पष्ट होते. लेखन, भाषण, मत स्वातंत्र्याचा साहित्यविषयक उद्‌गार क्वचितच कोणी एवढ्या साक्षेपाने, ठामपणे केलेला असेल. अर्थात विविध मार्गांतील एकता दाखविणारा श्रीकृष्ण अर्थात वेदोव्यास हे प्रथम तत्त्ववेत्ते असे म्हणता येईल. हे लक्षात घेऊनच ज्ञानदेवांनी आपले अद्वैत तत्त्वज्ञान, आत्मसाक्षात्कार किंवा परतत्त्वस्पर्शवाद प्रकट करून सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्यासाठी ‘गीता’ हा ग्रंथ निवडला असे दिसते.

आधुनिक दृष्टिकोनातून विचार करताना ज्ञानेश्वरांनी श्रीगणेश रूपकातून मांडलेले साहित्याचे स्वरूप सर्वंकष वाटते असे लक्षात येऊ शकेल. साहित्यनिर्मिती आणि साहित्यविषयक जीवनदृष्टीचे अनेकविध ओघ पाहिले तर ते आपापल्यापरीने अखेर सौंदर्यमूल्यापर्यंत जाऊन पोहोचताना दिसतात, किंवा असे सिद्धान्त हे अंतिम सौंदर्यमूल्याच्या वाटेवरील एखादा टप्पा तरी असतात, जीवनदृष्टी किंवा जीवनविषयक सिद्धान्त समजावून घेताना आणि त्यांचा साहित्यातील संदर्भाविषयी विचार करताना बहुधा एकांगीपणा जाणवू लागतो. आधुनिक काळातील वास्तववाद, अतिवास्तववाद, मार्क्सवाद, आणि जीवनविषयक आणि पर्यायाने साहित्यविषयक दृष्टिकोन हे साहित्याकडे एक प्रकारे साधन म्हणून पाहताना दिसतात. साहित्य ही कला आहे हे लक्षात घेतले आणि त्याचे अंतिम मूल्य केवळ सौंदर्य आहे हे लक्षात घेतले, की जीवनविषयक अन्य दृष्टिकोनांचा एकांगीपणा सहज लक्षात येतो. साहित्याच्या दृष्टीने सैद्धान्तिक विचार करू लागले की साहित्यात सोलीव सौंदर्यस्पर्शालाच सर्वाधिक महत्त्व असले पाहिजे व ते प्रकट करण्यासाठी साहित्याचे आवश्यक असे स्वरूप प्रकटले पाहिजे. सौंदर्यमूल्याचा विचार करणारे पाश्चात्त्य तत्त्वज्ञ उदा. कांट देखील निरपेक्षता, अनिर्वचनीयता,



हेतुपूर्णता आदी परिमाणे वापरताना दिसतात. ज्ञानदेवांनी परतत्त्वस्पर्श संकल्पनेचा उद्‌गार करून साहित्यातील सौंदर्यमूल्यांची एक प्रकारे सैद्धान्तिक स्वरूपात प्रतिस्थापना केलेली आहे, असे म्हणता येईल. ज्ञानमय अवस्थेत घडणारा परतत्त्वस्पर्श निरपेक्ष, अनिर्वचनीय, हेतुपूर्ण आत्मतत्त्वाचा आविष्कार होय. विश्वात सर्वगत असलेले चैतन्य हे आपल्याच आत्मतत्त्वाचे स्फुरण आहे, म्हणजेच परतत्त्वाचे स्फुरण आहे, याचा साक्षात्कार होताच जीवनविषयक सर्व दृष्टिकोन हे या साक्षात्कारापर्यंत जाणारे टप्पे आहेत हे जाणवते. हे सौंदर्यमूल्य प्रकटविणारे साहित्य एक लावण्यपूर्ण, लयबद्ध, स्पर्शकारक स्वरूप धारण करून प्रकटते. याचे अधिक स्पष्टीकरण ज्ञानेश्वरांनी अधिक स्पष्टपणे करण्याचा प्रयत्न केला आहे, असे म्हणता येईल. ‘बोली अरूपाचे रूप दावीन’ ही ज्ञानदेवांची उक्ती म्हणजे साहित्य स्वरूपाचे सर्वश्रेष्ठ परिमाण आहे असे म्हणता येईल.

असे साहित्यस्वरूप म्हणजे नेमके काय, याबद्दल आजही विद्वानांत मतभेद आहेत असे दिसते. असे असताना ज्ञानेश्वरीच्या स्वरूपात ज्ञानदेवांनी साहित्याच्या स्वरूपाविषयीचा एक वस्तुपाठ दिला आहे असे म्हणावे लागेल. आत्मतत्त्वाचा साक्षात्कार ओवीच्या अनुभूतींतून घडविणारे, निर्मळ, सोलीव, निरामय, चिरंतन परतत्त्वाचा स्पर्श घडविणारे साहित्य ज्ञानदेवांनी साध्या, सोप्या लोकभाषेच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविले आहे. हे ज्ञानदेवांचे लोकोत्तर कार्य म्हणावे लागेल. साहित्यशास्त्री म्हणूनही या दृष्टिकोनातून ज्ञानदेवांचा नक्कीच गौरव केला पाहिजे. त्यांचे साहित्य ‘साहित्य’ आणि ‘समीक्षा’ या दोन्ही संकल्पनांना व्यापून आहे हे त्यांच्या साहित्याचे आणखी वैशिष्ट्य होय.

ज्ञानेश्वरांनी रसपरिपोष, अलंकार, पदबंध यांना महत्त्व दिलेले होते व आपणास अवगत झालेले तत्त्वज्ञान आणि घडलेली परतत्त्वस्पर्शानुभूती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी, त्यांनाही साक्षात्कार किंवा प्रचिती घडविण्यासाठी, त्यांनी प्रचलित परंपरेप्रमाणे काव्याचा आश्रय घेतलेला होता हे समजावून घेतले पाहिजे. त्यांच्या साहित्याच्या स्वरूपाविषयीचे विचार आधुनिक दृष्टिकोनातून समजावून घेताना त्यांचे विचार अधिक व्यापक व प्रगत वाटतात. ज्ञानदेवांनी आपले विचार प्रकट करताना देखील सांगरूपकाची योजना करून अतिशय हळुवारपणाने आणि नम्रपणाने, साहित्याचे स्वरूप ‘मार्ग’ स्वीकारणाऱ्या साधकांसाठी, कलावंतांसाठी, साहित्यिकांसाठी स्पष्ट करून सांगितले आहे असे म्हणता येईल.

**सहजें मलयानिलु मंदु सुगंधु । तया अमृताचा होय स्वादु ।**
**आणि तेथेंचि जोडे नादु । जरी दैवगत्या ।**

**तरी स्पर्शें सर्वांग निववी । स्वादें जिव्हेतें नाचवी ।**
**तेवींचि कानाकरवीं । म्हणवी बापु माझा ।।** (अ.४,२२० व २२१)
**जैशी पूर्वदिशेच्या राउळीं । उदयाची सूर्ये दिवाळी ।**
**की येरींही दिशां तियेचि काळीं । काळिमा नाहीं ।।** (अ.५, ८६)

मलयपर्वतावरील वारा स्वभावत:च मंद व सुगंधित असतो. त्यांतच जर त्याला अमृतासारखी गोडी प्राप्त होईल तर तो आपल्या स्पर्शाने सर्व शरीर शांत करील, आपल्या गोडीनें जिभेला नाचवील, त्याचबरोबर कानांकडून वाहवा म्हणवील. साहित्य त्याप्रमाणे असावे असे ज्ञानदेवांचे मत होते. परंतु एवढ्याने साहित्याचे स्वरूप पूर्ण होत नाही. साहित्यामधून वाचकांना किंवा आस्वादकांनाही ज्ञानमय अवस्था प्राप्त होणे अभिप्रेत दिसते.

**जैशी पूर्वदिशेच्या राउळीं । उदयाची सूर्ये दिवाळी ।**
**की येरींही दिशां तियेचि काळीं । काळिमा नाहीं ।** (अ.५,८६)

ज्याप्रमाणे पूर्वदिशारूप राजवाड्यात सूर्योदयरूपी दिवाळी झाली असता त्याच वेळेला दुसऱ्याही दिशांतील काळोख नाहीसा होतो, त्याप्रमाणे परतत्त्वाचा स्पर्श घडताच सर्व प्रकारचे अज्ञान नाहीसे होऊन अलौकिक सौंदर्यप्रतीतीने अलौकिक, निरपेक्ष आनंद होतो. वरील ओव्यांमधून ज्ञानदेवांची साहित्यविषयक कल्पना अधिक स्पष्ट झाली आहे हे लक्षात येईल.

श्रेष्ठ साहित्याविषयीची ज्ञानेश्वरांची ही अपेक्षा त्यांच्या ज्ञानेश्वरी लेखनातून कशी परिपूर्ण झाली आहे किंवा ज्ञानदेवांनी स्वत: जाणीवपूर्वक ती परिपूर्ण करून घेतली आहे हे पाहिले की ज्ञानदेवांचे साहित्यासंबंधीचे उद्‌गार, त्यांचे साहित्यविषयक विचार सर्वांसमोर मांडण्यासाठी ते प्रकटवितात असे वाटते. गीतेचे अभ्यासक, आस्वादक, आणि तत्त्वसाधक; गीतेचे समीक्षक अर्थात रचनात्मक समीक्षक, टीकाकार, आणि भाष्यकार म्हणून व्यक्तिमत्त्व, ज्ञानेश्वरी लेखनामुळे त्यांचे साहित्यिक म्हणून प्रकटणारे व्यक्तिमत्त्व; आणि ज्ञानेश्वरीच्याच निमित्ताने तत्त्वज्ञान मांडणारे तत्त्वज्ञ म्हणून व्यक्तिमत्त्व; याबरोबरच साहित्यविषयक निश्चित संकल्पना मांडून त्या संकल्पनेचे प्रात्यक्षिक स्वत: लिहिलेल्या ज्ञानेश्वरीच्या निमित्ताने घडवून मार्गदर्शन करणारे एक प्रकारे साहित्यशास्त्री हे व्यक्तिमत्त्व; असे ज्ञानेश्वरांचे विविधांगी व्यक्तिमत्त्व प्रत्ययास येते.

साहित्य म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर देतांना पाश्चात्य आणि संस्कृत साहित्यशास्त्रांनी दिलेल्या व्याख्या, व्याख्या म्हणून सांगून साहित्याचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. वस्तुतः त्या व्याख्या नसतात तर साहित्याच्या स्वरूपासंबंधीचे ते स्फुट झालेले उद्‌गार असतात. त्यांच्यामध्ये साहित्याचे समग्र स्वरूप स्पष्ट करण्याची क्षमता नसते; तर एखादे महत्त्वाचे वैशिष्ट्य त्यातून प्रकट झालेले असते. निरनिराळ्या पंडितांनी प्रकट केलेल्या अशा या व्याख्यांचा एकत्रितपणे विचार करून साहित्याचे समग्र स्वरूप समजावून घ्यावे लागते.

ज्ञानेश्वरांनी मात्र आपल्या प्रवचनाच्या ओघात साहित्याचे स्वरूप समग्रतेने स्पष्ट होऊ शकेल असा विचार प्रकट केला. साहित्याच्या सर्व अंगांना त्यांचा विचार स्पर्श करून सांगोपांग चर्चा तर करतोच, परंतु वर दिल्याप्रमाणे दाखले देऊन तो विचार अगदी स्पष्टपणाने सर्वांसमोर मांडला जातो. याचे रहस्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वर उल्लेखिलेल्या अनेकविध भूमिकांमध्ये आहे असे म्हणता येईल.

अन्य पंडितांनी केलेल्या व्याख्या आणि प्रासंगिकरीत्या काढलेले उद्‌गार तुलनेस घेऊन, ज्ञानदेवांनी प्रवचनाच्या ओघात व्यक्त केलेल्या उद्‌गारांशी तौलनिक विचार करीत बसण्याचा उद्योग हा न संपणारा होऊ शकेल. म्हणून केवळ ज्ञानदेवांचा साहित्यस्वरूपाविषयीचा विचार स्पष्ट करण्याचा प्रयत्न आहे. अन्य प्रकरणांमधून तो अधिक तपशिलाने स्पष्ट होईल. येथे केवळ गणेशवर्णनातील उक्तींच्या आधाराने ज्ञानेश्वरांनी व्यक्त केलेले साहित्याच्या स्वरूपाविषयी जाणवलेले उद्‌गार लक्षात घेऊन विवेचन करण्याचा प्रयत्न झाला आहे, हे आवर्जून नमूद करायला हवे.

✦✦

## चार

# साहित्याचे प्रयोजन

साहित्यनिर्मितीस प्रेरक अशा सर्वच गोष्टींचा म्हणजेच साहित्यकारणांचा, आणि साहित्याची फलप्राप्ती, साहित्याचा परिणाम किंवा साहित्याकडूनच्या अपेक्षा या दोन्ही गोष्टींचा अंतर्भाव 'साहित्याचे प्रयोजन' यामध्ये करण्यात येतो. या संदर्भात हेतू, कारण, प्रयोजन असे शब्द वापरले गेलेले आढळतात. साहित्यिकाच्या दृष्टीने साहित्याची प्रयोजने आणि आस्वादकाच्या दृष्टीने साहित्याची प्रयोजने असेही भेद केले जातात. या सर्वांचा एकत्रितपणे असा विचार येथे करावयाचा आहे. अर्थात अन्य साहित्यशास्त्र्यांनी, उदाहरणार्थ 'भारतीय साहित्य शास्त्र'मध्ये मम्मटाने निवेदिलेली प्रयोजने आणि ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत प्रवचनाच्या ओघात निवेदिलेली साहित्यप्रयोजने यांचा तौलनिक असा अभ्यास करण्याचा मनोदय येथे नाही. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत प्रवचनाच्या ओघात निवेदिलेली साहित्यप्रयोजने अभ्यासण्याचा प्रयत्न येथे आहे. साहित्याची कारणे आणि साहित्याचे फल, परिणाम, अपेक्षा अशा दोन विभागांत ही प्रयोजने मांडण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

**साहित्याची कारणे (प्रयोजने)**

साहित्यनिर्मितीस कारणीभूत ठरलेल्या गोष्टींचा विचार येथे ज्ञानदेवांनी केलेल्या उल्लेखानुसार करावयाचा आहे. त्यासाठी प्रथमत: साहित्याच्या उत्पत्तीविषयीची ज्ञानदेवांची कल्पना पाहणे योग्य होईल.

**साहित्य उत्पत्ती कल्पना :** ज्ञानदेवांची साहित्य उत्पत्ती कल्पना आदिबंधात्मक पद्धतीने आलेली आहे असे म्हणता येईल. नवव्या अध्यायातील दोनशे पंचाहत्तर ते सत्त्याहत्तर या ओव्यांमध्ये ही कल्पना स्पष्टपणे आली आहे असे जाणवते.



**पैं ब्रह्मबीजा जाहला अंकुरू । घोषध्वनी नादाकारू ।**
**तयांचें गां भुवन जो ॐ कारू । तोही मी गा ।।७५।।**
**जया ॐ काराचिये कुशी । अक्षरें होती अउमकारेंसीं ।**
**जियें उपजत वेदेंसीं । उठलीं तिन्हीं ।।७६।।**
**म्हणोनि ऋग्यजुः सामु । हे तीन्ही म्हणे मी आत्मारामु ।**
**एवं मीचि कुलक्रमु । शब्दब्रह्माचा ।।७७।।** (अध्याय)

ब्रह्मरूप बीजाला फुटलेला जो अंकुर, घोष (परा), ध्वनी (पश्यन्ती), नाद (मध्यमा), आकार (वैखरी) यांचे मंदिर म्हणजेच ओंकार होय. त्या ओंकाराच्या उदरातून अ,उ,म अशी अक्षरे उपजली. त्या अक्षरांपासूनच वेदांचा उदय झाला आहे. अर्थात परमात्मतत्त्वाच्याच या तीनही अवस्था. विश्वाच्या सर्वच अवस्थांचे मूळ कारण आत्मतत्त्व किंवा परतत्त्व आहे. म्हणूनच परतत्त्व किंवा परमात्मतत्त्व हेच साहित्याचे मूळ कारण आहे असे ज्ञानदेवांना वाटते आणि म्हणूनच त्यांनी गीतेतील श्रीकृष्णाचे उद्‌गार तसेच स्वीकारले आहेत असे म्हणता येईल. येथेही साहित्याची उत्पत्ती ब्रह्माण्ड बीजापासून म्हणजेच त्या मूलाकाराचे प्रतीकरूप जो ॐ याचेपासून झाली आहे असे ज्ञानदेव स्पष्ट करतात. म्हणूनच त्या परमात्मतत्त्वाचा साक्षात्कार किंवा आत्मतत्त्वबोध किंवा परतत्त्वस्पर्श हेच साहित्याचे मुख्य आणि मूलभूत कारण होय असे त्यांना वाटते असे दिसते. पहिल्या अध्यायातील गणेशस्तवनातही याचा उल्लेख आहे (अ.१, १९ व २०).

दिव्य, अलौकिक, अनिर्वचनीय सौंदर्यतत्त्वाचा साक्षात्कार हे साहित्याचे मूलभूत कारण होय असा याचा अर्थ होईल. या मूलकारणापासून साहित्यगंगा अप्रतिहतपणे वाहत आहे असे म्हणता येईल.

**गाढा व्यासंग :** ज्ञानेश्वरांनी आत्मरूपस्वरूपी गणेशाचे वर्णन करताना ओंकारापासून ते वेद, श्रुती, स्मृती, पुराणे, काव्य, नाटके, सहा शास्त्रे, अनुमानन्यायादी प्रमाणे, वेदान्त सूत्रे, बौद्धमत, सांख्यमत, साक्षात्कारवाद, जैमिनीची धर्मसूत्रे, पूर्वोत्तर मीमांसा शास्त्रे, गौतमीय न्यायदर्शन, प्रमाण प्रमेयादी षोडश पदार्थांचे तत्त्वभेद, द्वैताद्वैत मत, ईश्यावास्यादी दशोपनिषदे आदी सर्व साहित्याचा जाणीवपूर्वक उल्लेख केला आहे. पूर्वसूरींनी साहित्यविश्वात केलेले कार्य अवगत असणे आवश्यक व श्रेयस्कर आहे, असे सुचवून एक प्रकारे सिद्धहस्त साहित्यिकाच्या व्यासंगाची असलेली आवश्यकता प्रकट केली आहे. अवलोकन, निरीक्षण, अभ्यास यांचे महत्त्व ज्ञानदेवांनी या प्रकारे व्यक्त केले आहे. व्यासंगाने साहित्यसृजनास परिपक्व भूमी तयार होते असे त्यांचे मत यावरून लक्षात येते.

ज्ञानेश्वरांनी स्वतः पूर्वसूरींच्या ग्रंथांच्या अवलोकन अभ्यासाविषयी उल्लेख केलेले आहेत. उदा. 'व्यासांचा मागोवा घेतु । भाष्याकाराते वाट पुसतु ।' (अ.१८, १७२२) या शब्दांत त्यांनी पूर्वसूरींचे ऋण मान्य केले आहे. ते आपल्या मतास जणु स्वतःचेच उदाहरण देत आहेत असे म्हणता येईल.

**पूर्वसंचित :** सहाव्या अध्यायामध्ये ज्ञानदेवांनी पूर्वजन्मातील बुद्धिसाधनेचा उपयोग सिद्धप्रज्ञेचे प्रकटीकरण होऊन साहित्य निर्मितीसाठी कसा होतो हे सांगितले आहे (अ.६, ४५२ ते ४५४). आधुनिक दृष्टिकोनातून विचार करताना पूर्वजन्मावर विश्वास असणे किंवा नसणे हे जरी गृहीत धरले, तरी आनुवंशिकता आणि पर्यावरण यांचा विचार केला जात आहे. या गोष्टींनाही साहित्यिकाचे पूर्वसंचित असे म्हणता येईल. साहित्य सृजनास हे महत्त्वाचे कारण आहे, याची उदाहरणे देण्याची गरज नाही. ज्ञानेश्वरांनी एकंदर जीवनाचा आध्यात्मिक दृष्टिकोनातून आणि आदिबंधात्मक विचार केला आहे. असे म्हणता येईल. त्यांनी मांडलेले काही विचार. उदा. 'बाळपणीच सर्वज्ञता । वरी तयाते ।।' (अ.६, ४५३) किंवा 'सिद्ध प्रज्ञा' (अ.६, ४५४), वरील संदर्भात महत्त्वाचे वाटतात. पूर्वसंचितामुळे योग्य अवस्थेची वाट न पाहता, प्रौढ होण्यापूर्वीच म्हणजे लहानपणीच साधकाला सर्वज्ञता माळ घालते आणि पूर्वजन्मात तयार झालेली बुद्धी त्याला अनुकूल असल्यामुळे त्याचे मनच सर्व विद्यांना प्रसवते आणि मग सर्व शास्त्रे आपोआपच त्याच्या मुखातून निघतात, अशी त्यांची 'सिद्धप्रज्ञा' प्रकटते. येथे सहजच 'कवी जन्मावा लागतो !' ही प्रसिद्ध उक्ती आठवते. ज्ञानदेवांनी स्वतःची दिलेली गुरुपरंपरा हा पूर्वसंचिताची महती पटवून देण्याचाच भाग आहे असे म्हणता येईल. (अ.१८, १७५१ ते १७६१).

**श्रीगणेश, सरस्वती आणि गुरुप्रसाद :** पहिल्या अध्यायात सुरुवातीलाच एक ते वीस ओव्यांमध्ये विचार, विवेक, बुद्धी, आणि प्रज्ञा यांचा दाता श्रीगणेश आहे. कारण सर्व प्रकारचे ज्ञान श्रीगणेशात साहित्यस्वरूपात सामावलेले आहे. एवढेच नव्हे तर स्वसंवेद्य असा ॐ हेही गणेशरूपच आहे असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे आहे. अर्थातच साहित्याची जाण-साहित्यविषयक जाण, ही केवळ त्याच्या कृपाप्रसादानेच होईल. परतत्त्वाचा प्रकर्ष ज्या साहित्यात झाला आहे ते सर्व साहित्यच श्रीगणेशस्वरूपात वास्तव्य करते म्हणून श्रीगणेशाची कृपा म्हणजेच पूर्वसूरींच्या सर्व साहित्यातून मतमतांतरामधून, चराचर सृष्टीच्या सूक्ष्म अवलोकनातून, जर बुद्धीची परिपक्वता होऊ शकेल तरच साहित्यसृजनही शक्य आहे, असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे दिसते. 'सकळमति प्रकाशु' (अ.१,२) असे त्याचे वर्णन ज्ञानदेवांनी केलेले आहे. सर्वच प्रकारच्या ज्ञानार्जनासाठी ज्ञाताकडून अज्ञाताकडे अशी ज्ञानार्जन प्रक्रिया चाललेली असते. ज्ञाताविषयीचेच अज्ञान असेल, ऐंद्रिय अनुभूतीही जर अज्ञानमूलक असेल, तर मग अज्ञाताकडे, नावीन्याकडे, अतींद्रिय तत्त्वाकडे जाणार कसे? नावीन्याचा वेध घेण्यातच साहित्याचा सोहळा असतो. म्हणूनच श्रीगणेशकृपेने ज्ञान आत्मसात करून परतत्त्वापर्यंत पोहोचता येईल कारण ज्ञान आणि अज्ञान, ऐंद्रिय आणि अतींद्रिय यांचे खरे तर अद्वैत असते. हे अद्वैत प्रकट करण्याचे सामर्थ्य श्रीगणेशामध्ये आहे; म्हणूनच साहित्यसृजनामध्ये श्रीगणेश हे महत्त्वाचे साहित्यकारण आहे असे ज्ञानदेव सूचित करतात.

परंतु श्रीगणेशाबरोबर प्रतिभाशक्ती महत्त्वाची होय. या प्रतिभेचा उल्लेख सरस्वती असा ज्ञानदेवांनी केला आहे. ही सरस्वती वाणीची अपूर्व अशी क्रीडा करणारी, चातुर्य, अर्थ व कला याविषयी सर्व प्रकारच्या इच्छा पूर्ण करणारी आणि आपल्या अभिनव विलासाने जगाला संमोहित करणारी अशी शक्ती आहे. ती प्रकटली असता काव्य प्रकटते असे ज्ञानदेवांना वाटते. ही सरस्वती सिद्ध असल्याने ती प्रकटल्याने 'मुकया आथी भारती' (अ.१, ७८) होऊ शकेल असे ज्ञानदेवांना वाटते.

प्रतिभावंताला शास्त्रज्ञान, व्यासंग असलाच पाहिजे असे नाही असे ज्ञानेश्वरांना म्हणावयाचे असावे काय? आपणास लौकिक अर्थाने अशिक्षित असलेल्या, अडाणी असलेल्या व्यक्ती साहित्यसृजन करताना दिसतात. त्यावरून या विधानाला पुष्टी मिळते असे वाटते. परंतु आदिबंधात्मकतेने विचार करता, तसेच पूर्वसंचित कल्पनेच्या दृष्टीने विचार करता, त्या व्यक्तीतील जाणिवा सुप्तावस्थेत असतातच असे म्हणता येईल. व्यवहाराच्या चव्हाट्यावर त्या जाणिवा घासल्या जातात तेव्हा त्या जाणिवा प्रतिभास्पर्शाने विशेष चेतविल्या जातात, असे म्हणणे अधिक सयुक्तिक वाटते. बहिणाबाईंचे उदाहरण सर्वांसमोर आहेच. असा विचार करता प्रतिभेचा स्पर्श महत्त्वाचा ठरतो.

परतत्त्वस्पर्श वादाच्या दृष्टीने विचार करता सरस्वतीचे प्रकटीकरण म्हणजेच परतत्त्वस्पर्शानुभूतीतून साहित्यसृजन असे म्हणता येईल. ज्ञानमय अवस्थेत या अंतिम तत्त्वाची जाणीव झालेली असते किंवा परतत्त्वस्पर्शानुभूती म्हणजेच ज्ञानमय अवस्था होय. या जाणिवेमुळेच आत्मबोध होतो. विश्वव्यापक चैतन्यतत्त्वाशी म्हणजेच सौंदर्यमूल्याशी अद्वैत रूपात नाते जुळते. सरस्वतीच्या प्रकर्षाने अनिर्वचनीय असा साक्षात्कार नावीन्यपूर्ण वाग्विलासाने इंद्रियज्ञात होऊ लागतो तेथेच साहित्य प्रकटते. परतत्त्वस्पर्श प्रक्रियेत सरस्वतीचे म्हणजे प्रतिभेचे आणि त्यायोगे घडणाऱ्या

स्फूर्तीचे असे स्थान सांगता येऊ शकेल.

ज्ञानेश्वरांनी साहित्यकारणांमध्ये सर्वाधिक महत्त्व श्रीगुरुंना दिले आहे. त्यांनी आपल्या साहित्यसेवेचे, ज्ञानमय अवस्थेचे, अद्वैतानुभूतीचे, म्हणजेच परतत्त्वस्पर्शानुभूतीचे सर्व श्रेय श्रीगुरुंना दिले आहे असे दिसते.

**तुमचा अनुग्रहोगणेशु । जैं दे आपुला सौरसु ।**
**तैं सारस्वत प्रवेशु । बाळकाही आथी ।।** (अ.१०, ६)

साहित्यकारणांचा विचार करता करता ब्रह्मबीज, पूर्वसंचित, साहित्यमूर्ती श्रीगणेश आणि साहित्य प्रेरक श्रीसरस्वती या सर्वांशी नाते ठेवून मार्गक्रमण करणाऱ्या साधकाचा किंवा साहित्यिकाच्या दीर्घोद्योगाने प्रतिभास्पर्शापर्यंत जाण्याच्या अवस्थेतील सर्वांत महत्त्वाचा दुवा श्रीगुरू हा आहे, हे वरील ओवीतील आशयावरून सहज ध्यानी येईल. ज्ञानदेव श्रीगुरुला संसार अंधकाराचा नाश करणारा सूर्य, श्रेष्ठ सामर्थ्ययुक्त, जगाचे पालन करणारा, पूजनीय देव, चित्तचकोरास आनंद देणारा चंद्र, ब्रह्मानुभवाचा राजा, इ. गौरवोद्गारांनी संबोधित करतात. त्यांचा वरदहस्त म्हणजे श्रीगणेश व त्यांचे प्रेम म्हणजेच सरस्वती असे वर्णन ज्ञानदेव करतात (अ.१०, १ ते १०) श्रीगुरुंच्या योगाने डोळ्यात अंजन घातल्याने ज्याप्रमाणे दिव्यदृष्टी प्राप्त होते, त्याप्रमाणे दिव्यज्ञान ही प्राप्त होते; म्हणूनच सर्व मनोरथ पूर्ण होण्यासाठी–

**म्हणोनि जाणतेनो गुरु भजिजे । तेणें कृतकार्या होईजे ।**
**जैसे मूळसिंचने सहजे । शाखापल्लव संतोषती ।।** (अ.१, २५)

असे म्हणून साहित्याचे मूलकारण म्हणून श्रीगुरुंना वंदन केलेले आहे असे म्हणता येईल. विवेक, औचित्य आणि ज्ञान जागृत करून अभिलाषित मनोरथ केवळ श्रीगुरू पूर्ण करू शकतो असे त्यांना वाटते. सर्व प्रकारच्या सिद्धी प्राप्त होण्यासाठी ज्ञानदेव श्रीगुरूंना वंदन करतात. त्यांच्या कृपेने अनाकलनीय अशा सर्व गोष्टी स्पष्ट दिसू शकतील. साधकास आत्मप्रकाशबोध घडविण्याचे सामर्थ्य केवळ श्रीगुरुत आहे. सर्व विद्या श्रीगुरुचरणी पिकतात, अशी ज्ञानदेवांची श्रद्धा नव्हे तर जाणीव आहे.

ज्ञानदेवांनी साधारणतः अठराही अध्यायांमध्ये श्रीगुरुंचा गौरवाने उल्लेख करून आपल्या सर्व कर्तृत्वाचे श्रेय श्रीगुरुला दिले आहे. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की श्रीगुरुला ज्ञानदेवांनी आत्मतत्त्व, श्रीगणेश, आणि सरस्वती या स्वरूपात पाहिले आहे. या मूलाकारांमध्ये श्रीगुरुंना पाहणे म्हणजे पुनःपुन्हा पूर्वसूरींनी केलेल्या साहित्याचे परिशीलन करणे, अवलोकन, निरीक्षण आणि अनुभूती



यांच्या सहाय्याने ज्ञान साधना करणे यालाच गुरुप्रसाद असे म्हणता येईल. या दृष्टीने साहित्यसृजनासाठी अखंड ज्ञानसाधनेच्या आणि अनुभूती प्रक्रियेला म्हणजेच दीर्घोद्योगाला किती महत्त्व दिलेले आहे हे सहज ध्यानात येऊ शकेल. आपली गुरुपरंपरा देतानाही आदिगुरू, हे विश्वोत्पत्तिकारण, श्रीशंकरापासून सुरुवात करतात. 'बीज वृक्ष बीज' या न्यायाने (अ.१०, ९८ ते १००) साहित्य हे परतत्त्वापासून पुन्हा परतत्त्वापर्यंत जाण्याची प्रक्रिया आहे. या आत्मबोधाने म्हणजेच परतत्त्वस्पर्शाने साहित्यसृजन घडत राहते, या प्रक्रियेचे ज्ञान घडविणारा श्रीगुरू आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

श्रीगुरू म्हणून प्रत्यक्ष श्रीनिवृत्तीनाथ समोर बसलेले असले तरी ज्ञानदेवांची श्रीगुरुंविषयीची कल्पना आदिबंधात्मक आहे, प्रतिमारूप आहे, तशीच ती अतिशय व्यापक आहे हे लक्षात घेतले तर सर्वाधिक महत्त्वाचे साहित्यकारण म्हणून श्रीगुरुंना का संबोधले आहे हे लक्षात येईल.

**मनाच्या शक्ती, बुद्धी, प्रज्ञा, मती, स्फूर्ती, उन्मेष :** ज्ञानदेवांनी साहित्याच्या कारणासंबंधी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केलेला आहे असे म्हणता येईल. या दृष्टीने अध्याय चौदामधील त्यांचे विवेचन महत्त्वाचे आहे. डॉ. मा. गो. देशमुख यांनी 'मराठीचे साहित्यशास्त्र' (कॉन्टिनेन्टल प्रकाशन, दु.आ.) यातील काव्यकारण चर्चेत या शक्तींचा उल्लेख केला आहेच. ह्या सर्व शक्ती गुरुकृपेने लाभतात असे ज्ञानेश्वरांना वाटते. ज्ञानेश्वरांनी साहित्यसृजनामध्ये प्रज्ञेला सर्वाधिक महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. परंतु मनाने अर्थज्ञान होते, बुद्धीने शब्दज्ञान होते, मतीने (विवेकाने) सिद्धांत प्रतीती घडते, स्फूर्तीने त्या तत्त्वप्रतीतीचा अंतःकरणात विकास होऊन प्रतिभास्पर्शाने नवोन्मेष प्रकटतात. म्हणजेच साहित्यसृजन होऊन मतीस मनाच्या ठिकाणी साक्षात्कारित झालेली तत्त्वे विदग्धरसवृत्तीने प्रकट होत जातात असे म्हणता येईल. ज्ञानेश्वरांचे हे साहित्यसृजनासंबंधीचे विवेचन किती मूलगामी व साहित्यिकाच्या मानसिक प्रक्रियेचे विवेचन करणारे आहे हे ध्यानात येऊ शकेल. आधुनिक दृष्टिकोनातून पाहता सातशे वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरांनी अतिशय प्रगत आणि सर्वांगीण विचार केलेला दिसतो.

**साहित्यकारणांचा सर्वांगीण विचार :** ज्ञानेश्वरांच्या विवेचनात विचारात कोठेही एकांगीपणा आढळत नाही, म्हणूनच साहित्य आणि तत्त्वज्ञानविषयक एक वस्तुपाठ म्हणून ज्ञानेश्वरीकडे पाहता येते. येथेही सर्व प्रकारच्या ज्ञानसाधनांनी मिळविलेले ज्ञान हे अत्यंत आवश्यक मानून बुद्धी, प्रज्ञा, मती, स्फूर्ती, उन्मेष (प्रतिभा) या सर्व मनःशक्तींचा विचार जाणीवपूर्वक केलेला दिसतो. साहित्यनिर्मिती

प्रक्रियेचा जो मानसशास्त्रीय विचार केला जातो त्यात प्रतिभास्पर्शाची गूढता कायमच राहिली आहे असे वाटते. ज्ञानदेवांनी ॐ, श्रीगणेश, सरस्वती या आदिबंधात्मक मूलाकारांची चर्चा करून, परतत्त्वस्पर्श संकल्पना मांडून, 'प्रतिभा' आणि त्याचबरोबर 'परतत्त्वस्पर्श' याविषयीची गूढता नष्ट करून, या कल्पना सतर्कतेने स्पष्ट केलेल्या आहेत असे जाणवते. साहित्यशास्त्री म्हणून ज्ञानदेवांचा विचार करणे यामुळेच प्रस्तुत ठरते, असे म्हणता येईल.

**साहित्य फल, परिणाम, अपेक्षा (प्रयोजन) :** येथवर आपण साहित्यनिर्मितीस प्रेरक अशा कारणांची चर्चा करण्याचा प्रयत्न केला. अर्थातच ही चर्चा साहित्यनिर्मिती कारणांसंबधात घडत असताना साहित्यिकाच्या बाजूने घडली आहे हे लक्षात येईल. या भागामध्ये करावयाची चर्चा साहित्यिक आणि आस्वादक या दोहोंच्या संदर्भाने करावयाची आहे हे लक्षात येऊ शकेल.

**ईश्वरयशोगान व मोक्षसाधना** : परमात्मतत्त्वाशी अद्वैत साधण्याची साधना म्हणून ज्ञानदेव 'गीता' या ग्रंथावर प्रवचन करतात. ईश्वरयशोगान हे मोक्षसाधनासाठी आहे. ज्ञानदेवांच्या दृष्टीने हे मोक्षसाधन म्हणजे आत्म- साक्षात्कार, अद्वैत किंवा परतत्त्वस्पर्शानुभूती होय. या अद्वैताच्या साधनेसाठी हा साहित्याचा संसार आहे, असे ज्ञानदेवांना वाटते. अद्वैत म्हणजेच निर्मळ, निरपेक्ष आनंदमयता होय व ही आनंदमयता प्राप्त होणे म्हणजेच सौंदर्यतत्त्वाचा साक्षात्कार आत्म्याच्या ठिकाणी होणे. आपण त्या सौंदर्यतत्त्वातच समाविष्ट आहोत किंवा आपल्या आत्मतत्त्वाचेच ते स्फुरण आहे अशी प्रतीती येणे हीच तल्लीनता किंवा हीच प्रचिती किंवा हाच परतत्त्वस्पर्श होय, असे म्हणता येईल. हे सौंदर्यतत्त्व गवसणे व त्याशी तद्रूप होऊन आनंदनिर्भर होणे हे सर्वच कलांचे अंतिम लक्ष्य आहे असे म्हणता येऊ शकेल. या दृष्टीने ज्ञानेश्वरांनी केलेल्या उल्लेखांचा (अ.४, २२२ ते २२४ व अ. १६, ३१ ते ३३) विचार केला तर ज्ञानेश्वरांचे ईश्वरयशोगान व मोक्षप्राप्ती ही केवळ तत्त्वज्ञानात्मक संदर्भाने राहत नाही, साहित्य संदर्भातही त्यांच्या विचारांची प्रतीती येते. सौंदर्यमूल्य हे कलेचे अंतिम मूल्य होय; हे सर्व कलावंतांनी, तत्त्वज्ञांनी, व विचारवंतांनी मान्य केले आहे. त्याचा उच्चार ज्ञानदेवांनी मराठी भाषेतून साहित्य निर्मिती करताना केला आहे, हे साहित्यविचाराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**संत-रसिक यांना संतोष व प्रेमसंपादन :** ज्ञानेश्वर साहित्यसृजन करतात किंवा त्यांच्याकडून जे साहित्यसृजन घडते ते केवळ आत्मनिष्ठपणा किंवा स्वकेंद्रिततेने नव्हे किंवा केवळ स्वत:करिता नव्हे. रसिक संतांसाठी म्हणजेच जाणकार श्रोते, वाचक यांच्यासाठी, एवढेच नव्हे तर सामान्यातील सामान्य



माणसासाठी हे साहित्यसृजन आहे, असे ज्ञानदेव स्वतःच प्रतिपादतात व त्याचा अनुभव वरवर पाहताही ज्ञानेश्वरी वाचकांना घडतो. 'स्व' मधून विश्वात्मकतेकडे आत्मसाक्षात्काराने, अद्वैत भावनेने जाण्याचा त्यांचा हव्यास सर्वज्ञात असा आहे. त्यांची विश्वात्मक भूमिका सर्वांना ज्ञात आहे. आपणास झालेला साक्षात्कार सर्वांना अवगत व्हावा, सर्वांना घडावा असे त्यांना मनोमनी वाटते आहे असे जाणवते. म्हणूनच आपल्या प्रवचनाचा प्रसंगी भरपूर विस्तार त्यांनी केलेला आढळतो. तो त्यांचा वाग्विलास तर खराच; परंतु अशा रसिक जाणकारांनी आपल्याला आलेल्या अनुभूतीचा अनुभव घेतल्याशिवाय मुळी परतत्त्वस्पर्शानुभूतीचा आनंद पूर्ण होतच नाही, किंवा परतत्त्वस्पर्श संकल्पना परिपूर्ण होतच नाही असे त्यांना वाटत असावे. विश्वात्मक आत्मतत्त्व सर्वांना साक्षात्कारित व्हावे, तसे करून देण्याचा आपण प्रयत्न करावा हाच विश्वात्मक भूमिकेचा अर्थ होय. येथे सहजच आपणास सामाजिक बांधिलकीचा विचार वेगळ्या पातळीवर मनाला स्पर्श करतो असा अनुभव येतो. या दृष्टिकोनातूनही आपले साहित्य त्यांनी सर्वांसाठी मांडले आहे आणि श्रोत्यांच्या अवधानाने आपणास अधिकाधिक प्रमाणात आत्मसाक्षात्कार अनुभूती उघड करून सांगता येईल व त्यामुळे आस्वादकांना ती अनुभूती घडू शकेल असे त्यांचे मत दिसते. साहित्य हे सर्वांच्या हिताचे रक्षण करणारे, सर्वांना ज्ञानाकडे घेऊन जाणारे असे आहे, म्हणूनच त्यांनी सर्वांना संतोष वाटेल असे साहित्य निर्माण करण्याची प्रतिज्ञा केलेली दिसते. तसेच सर्वांनाच आत्मतत्त्वबोध व्हावा म्हणून आर्जवी आळवणी केली आहे. रसरंग किंवा वाग्विलास ही श्रोता आणि वक्ता उभय बाजूंनी भोगण्याची कला आहे. विदग्धरसवृत्ती केवळ कलावंताजवळ असून भागत नाही ती रसिकाजवळही असावी लागते, हे ज्ञानेश्वरांना ज्ञात असल्याने संतप्रेम संपादण्याचा आणि रसिकांना संतोष होईल असा प्रयत्न त्यांनी वारंवार केलेला दिसतो. प्रत्येक अध्यायात श्रोत्यांना अवधान देण्याची विनवणी व त्या निमित्ताने नम्रपणाने केलेले विवेचन यातून ज्ञानदेवांचे हे विचार व्यक्त झाले आहेत.

**रसिकांना आनंदाचे आवार :** ज्ञानदेवांनी साहित्यिकाच्या दृष्टीने जसा विचार केला आहे, तसाच रसिकांच्या बाजूनेही विशेष विचार केला आहे असे दिसते. साहित्यातून अलौकिक आनंद मुक्तपणाने लुटता आला पाहिजे, हा साहित्याचा आद्यतम हेतू असावा असे ज्ञानदेवांना वाटते. साहित्यकलेचा विचार करताना 'सौंदर्यशोध आणि आनंदबोध' हे तत्त्व साहित्यशास्त्र्यांनी सर्वदूर व्यक्त केले आहे. साहित्याचे अंतिम मूल्य सौंदर्यत्व होय. ज्ञानेश्वरांच्या दृष्टीने परतत्त्वस्पर्श म्हणजे या सौंदर्यतत्त्वाचा बोध होय. या परतत्त्वाचा साक्षात्कार रसिकांना घडून अलौकिक

आनंदाची दिवाळी रसिकांना घडावी अशी ज्ञानदेवांची साहित्याकडून अपेक्षा आहे. आपल्याला ज्या सत्तत्त्वांच्या दर्शनातून आत्मानंद प्राप्त झाला, त्याचा विस्तार साहित्याच्या स्वरूपामध्ये घडवून साहित्याच्या द्वारे सर्व जगाला आनंदाचे आवार रचू हा ज्ञानदेवांचा स्पष्ट हेतू दिसून येतो.

**तैसा वाग्विलास विस्तारूं । गीतार्थे विश्व भरूं ।**
**आनंदाचे आवारूं । मांडू जगा ।।** (अ.१३, ११५९)

रसिकांना आनंदाच्या राशीवर बसवावे ही तर ज्ञानदेवांची प्रतिज्ञा होती.

**अहो अळुमाळ अवधान देयावें ।**
**येतुलेनि आनंदाचे राशीवरी बैसावें**
**बाप श्रवणेंद्रिया दैवें । घातली माळ ।।** (अ.९, ५३४)

याच आशयाचे ज्ञानदेवांचे उद्‌गार ज्ञानेश्वरीभर विखुरलेले दिसतात. ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांना अवधान देण्याची विनंती केलेली आहे, ती याच आनंदसोहळ्याच्या अनुभूतीसाठी. सर्वात्मक ईश्वराचे स्तवन, पूजा, यशोगान हेही ज्ञानदेवांनी याच कारणाने केले आहे. आपणास झालेला सोलीव सुखाचा साक्षात्कार सर्व चराचरसृष्टीला व्हावा एवढी व्यापक भूमिका ज्ञानदेवांची दिसते. त्यासाठी ज्ञानदेवांची केवढी धडपड! आपल्या मुलांना सदैव सर्व सुखे प्राप्त व्हावीत यासाठी माउली जेवढे म्हणून कष्ट घेते तेवढे कष्ट ज्ञानदेवांनी हे आनंदाचे आवार मांडण्यासाठी घेतलेले दिसतात. अध्याय नऊमध्ये ज्ञानदेवांनी श्रोत्यांना परोपरीने केलेली विनवणी याच उद्देशाने केलेली आहे असे म्हणता येईल. (अ.९, १ ते २५) हा आनंद मिळवून देण्यासाठीच ज्ञानदेव आपल्या प्रवचनातून 'सुखाचा परिमळू', 'अमृताचा कल्लोळु' (अ.८, ५७) श्रोत्यांपर्यंत पोहोचवितात. अनेक ओव्यांतून अशा प्रकारे आस्वादकापर्यंत आनंद पोहोचविण्याची अपेक्षा ज्ञानदेवांनी व्यक्त केली आहे. आधुनिक विचारसरणीप्रमाणे 'आनंद' हे साहित्याचे सर्वश्रेष्ठ प्रयोजन समजले जाते. हे प्रयोजन साहित्यिक आणि आस्वादक अशा उभयपक्षी योग्यच आहे असे म्हणावे लागेल. आनंद अनुभूतीच्या संदर्भात ज्ञानदेवांनी अगदी मुळातून विचार केला आहे, याची साक्ष पटते असे म्हणता येईल.

**ब्रह्मविद्येचा सुकाळ :** साहित्यिक आणि आस्वादक या सर्वांच्या दृष्टीने हे प्रयोजन ज्ञानदेवांना महत्त्वाचे वाटते. 'कलेसाठी कला' की 'जीवनासाठी कला' हा वाद घालीत असतानाच 'सामाजिक बांधिलकी'च्या विचाराकडे विचारवंतांचा मोठ्या प्रमाणावर कल दिसून येत आहे. प्रत्येक साहित्यिकाला आपल्या साहित्यातून काही सांगावयाचे असते. या सांगण्याचे उद्दिष्ट मानवी जीवन



सुखी व्हावे हेच असते. मार्ग कोणतेही असोत परंतु उद्देश सर्वांचा एकच असतो. साहित्यातून मिळणाऱ्या आनंदातून सुखप्राप्तीचाच उद्देश असतो. ज्ञानदेवांना सकलजन ज्ञानसंपन्न व्हावेत असे वाटत होते. त्यांच्या मते ब्रह्मज्ञान म्हणजे परमात्मतत्त्वाचे किंवा परतत्त्वाचे ज्ञान होय. हे ज्ञान झाले की द्वैत संपून जाईल आणि दुःखाचा निरास होईल. द्वैत हे अद्वैताकडे नेण्यास प्रवृत्त करणारी अवस्था असते असे ज्ञानदेवांना वाटते असे दिसते. हे आत्मतत्त्व किंवा परतत्त्वज्ञान किंवा विश्वात भरलेल्या या चैतन्यतत्त्वालाच ज्ञानदेवांनी ब्रह्मविद्या असे म्हटले आहे, हे ध्यानात घेतले पाहिजे. ब्रह्मविद्या म्हणजेच ब्रह्मज्ञान म्हणजेच परतत्त्वस्पर्श होय. ते प्राप्त होणे म्हणजेच केवळ सुख किंवा केवलानंद प्राप्त होणे होय, हे लक्षात घेतले की ज्ञानदेवांचे हे प्रयोजन 'आनंद' विचाराशी 'परतत्त्वस्पर्शवादा'शी किती निगडित आहे, हे लक्षात येईल. हे पाहता ब्रह्मविद्येचा सुकाळु म्हणताना ज्ञानदेवांना केवळ बोध करणारे वाङ्मय असा अर्थ अभिप्रेत नव्हता हे लक्षात येऊ शकेल. म्हणजेच तत्त्वज्ञान म्हणून विचार करतानाही ज्ञानेश्वरांमधील कलावंत साहित्यिकच अधिक प्रत्ययास येतो असे लक्षात येईल. 'ब्रह्मविद्येचा सुकाळु' आपल्या साहित्याने घडावा असे त्यांना वाटते.

**मऱ्हाटियेचां नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं ।**
**घेणें देणें सुखचिवरी । हों देईं या जगा ।।** (अ.१२, १६)

अशाच आणखी काही ओव्यांमधूनही ज्ञानदेवांनी ही अपेक्षा ठामपणाने मांडलेली आहे. ज्ञानदेवांनी श्रोत्यांशी संवाद साधताना मांडलेल्या विचारांमधून सारस्वताचा सुकाळ व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. म्हणजे सारस्वतातून ब्रह्मविद्येचा सुकाळ व्हावा अशी त्यांची इच्छा प्रकटली आहे. (उदा. अ. ११, १९ व २०) याचसाठी पसायदानामध्ये त्यांनी 'स्वधर्मसूर्ये पाहो' या शब्दांत आपले म्हणणे मांडले आहे. (अ.१८, १७१५) अज्ञान अंधारातून 'आत्मप्रकाशमंदिरा आंतु' आणले गेले ही गुरुकृपेची थोरवी याच अपेक्षेने वर्णिलेली आहे आणि 'बोली अरूपाचे रूप दावीन' ही प्रतिज्ञाही याचसाठी आहे, असे म्हणता येईल. 'ब्रह्मविद्येची खाण' उघडली जावो असेही त्यांनी पुन्हा म्हटले आहे (अ.१३, ११६० व ६१).

**साहित्य प्रयोजनातूनही परतत्त्वस्पर्शाचे अंतिम ध्येय :** ज्ञानदेवांनी चर्चिलेली साहित्य कारणे आणि साहित्य फल, परिणाम – अपेक्षा यांचा विचार करू लागले की यांमधून साहित्यिकाच्या आणि आस्वादकांच्या दृष्टीने देखील एकच गोष्ट वारंवार लक्षात येईल, की परतत्त्वस्पर्श विचार हा या सर्व चर्चेच्या केंद्रवर्ती

आहे. साहित्य हे परतत्त्वस्पर्शानुभूती सर्वांना घडविण्याचे माध्यम आहे, असे ज्ञानदेवांना वाटते हे यावरून स्पष्ट होते. परतत्त्वस्पर्श म्हणजेच सर्वश्रेष्ठ सौंदर्यमूल्य आणि त्याचा सर्वश्रेष्ठ परिणाम म्हणजे केवलानंद होय. अर्थात 'बीज वृक्ष बीज' न्यायाप्रमाणे साहित्यसृजनामागील मूलकारण परतत्त्वस्पर्श आणि अंतिम परिणामही परतत्त्वस्पर्शच होय असे म्हणता येईल. हाच ज्ञानदेवांचा परतत्त्व- स्पर्शवाद होय. हेच ज्ञानदेवांना स्पष्ट करावयाचे आहे.

**पाहें पां आरंभीं बीज एकलें ।**
**मग तेंचि विरूढलिया बुड जाहलें ।**
**बुडी कोंभ निघाले । खांदियांचें ।।**
**खांदियांपासूनि अनेका । पसरलिया शाखोपशाखा ।**
**शाखांस्तव देखा । पल्लव पानें ।।**
**पल्लवीं फूल फळ । एवं वृक्षत्व जाहालें सकळ ।**
**तें निर्धारितां केवळ । बीजचि तें ।।** (अ.१०, ९८ ते १००)

साहित्यसृजनाचे मूलकारण आत्मसाक्षात्कार, त्यातून विविध प्रकारचे साहित्यसृजन आणि विस्तार आणि त्या साहित्यातून पुन्हा सर्व प्राणिमात्रांना (मनुष्यमात्रांसह) परतत्त्वस्पर्श म्हणजेच निखळ, निरपेक्ष असा केवलानंद हे ज्ञानदेवांचे प्रतिपादन आहे असे म्हणता येईल.

**आत्मोद्धार आणि लोकोद्धार :** आपल्या साहित्यसृजनाने स्वत:बरोबरच दृष्ट आणि अदृष्ट अशा सर्वांचाच उद्धार व्हावा असे ज्ञानदेवांना वाटते. या उद्धारासाठी हा साहित्यप्रपंच होय असे ज्ञानदेवांनी स्पष्ट केले आहे. आपणास घडलेला परतत्त्वस्पर्श सर्व लोकांना घडावा आणि आपणाप्रमाणेच सर्व लोकांचा उद्धार (विजय) व्हावा; म्हणजेच सर्वांना ज्ञानमय अवस्था प्राप्त व्हावी, म्हणजेच सर्वांना आत्मतत्त्वाचा बोध व्हावा ही ज्ञानदेवांची उद्धाराची कल्पना अतिशय व्यापक आणि उदात्त आहे. त्यांनी चर्चिलेली ही अवस्था सर्व प्रकारच्या सर्व दृष्टिकोनांना व्यापून टाकणारी आहे. कारण ती अवस्था पूर्ण ज्ञानमय असते असे ज्ञानदेवांचे मत दिसते. हे ज्ञान म्हणजेच आत्मतत्त्वाचा साक्षात्कार किंवा अद्वैत होय. याचसाठी ज्ञानदेवांची विश्वशांतीची, विश्वसुखाची, विश्वाच्या आनंदमयतेची अपेक्षा व्यक्त करणारी प्रार्थना आहे. पसायदानाच्या ओव्यांमधून ज्ञानदेवांची साहित्याचे फल, परिणाम आणि अपेक्षा मोठ्या उदात्ततेने व्यक्त झाली आहे असे म्हणता येईल.

**विश्वरूप परमेश्वराचा प्रसाद :** साहित्यसृजनाने विश्वरूप असलेले परतत्त्व प्रसन्न होऊन त्याने विश्वकल्याणाचा प्रसाद द्यावा अशी ज्ञानदेवांची अपेक्षा आहे. अर्थातच यासाठी वाग्यज्ञ हा साहित्यिक आणि भोक्ता म्हणजेच आस्वादक या दोहोंकडून घडला पाहिजे असे ज्ञानदेवांनी स्पष्ट केले आहे, असे म्हणता येईल. ज्ञानमय अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी सारस्वताचा माध्यम म्हणून उपयोग होतो असेच ज्ञानदेवांना सांगावयाचे दिसते. विश्वातील सर्व मनुष्यमात्रांस परतत्त्वस्पर्श घडविण्याचे, म्हणजेच निरामय आनंद मिळवून देण्याचे, म्हणूनच खरे ज्ञान प्राप्त करून देण्याचे काम साहित्यातून साहित्यिक आणि रसिक यांच्या हृदयसंवादातून घडू शकेल असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे आहे. याकरिता ज्ञानदेवांनी वाग्यज्ञाचा म्हणजेच साहित्याचा बढीवार केला आहे आणि परतत्त्वस्पर्शातून स्फुरलेले हे साहित्य परतत्त्वासच अर्पण करून सर्वांना परतत्त्वस्पर्शानुभूती घडविण्याची विनंती त्या परतत्त्वासच केली आहे असे म्हणता येईल. यातून ज्ञानदेवांची प्रसाद भूमिका स्पष्ट होऊ शकेल असे वाटते. म्हणूनच ज्ञानदेवांची पसायदानातील ओव्यांमधून व्यक्त झालेली भावना समजावून घेणे आवश्यक आहे.

विश्वरूपी देवाने या वाग्यज्ञाने संतुष्ट होऊन आपणास असा प्रसाद द्यावा, खलांचा कुटिलपणा नाहीसा व्हावा, त्या खलांची सत्कर्माच्या ठिकाणी आवड वाढावी, प्राणिमात्रांची जीवाभावापासून एकमेकांशी मैत्री घडावी, पापाचा (अज्ञान) अंधार जावा व विश्वात स्वधर्मरूपी सूर्याचा (आत्मतत्त्वाचा बोध किंवा परतत्त्वस्पर्श) उदय व्हावा. प्राणिमात्रात जो जे इच्छील ते त्याला प्राप्त होवो म्हणजेच सर्व मार्गांनी सुखाचीच म्हणजेच परतत्त्वस्पर्शाचीच अनुभूती घडो. ईश्वरनिष्ठांचा समुदाय संपूर्ण कल्याणाचा वर्षाव करीत या भूतलावर निरंतर सर्व प्राण्यांना भेटो. म्हणजेच सर्व मार्गांनी एकाच प्रकारे (परतत्त्वस्पर्श स्वरूप) सर्व प्राण्यांचे कल्याण होते म्हणून सर्व मार्गांनी एकत्रितपणे सर्व प्राण्यांच्या कल्याणाचा प्रयत्न करावा व त्यामुळे कल्पतरूंचे बाग, चिंतामणींचे गाव, व अमृताचे सागर, कलंकरहित चंद्र आणि उष्णतारहित सूर्य (ही सर्व विशेषणे ज्ञानदेवांनी साहित्याला लावलेली असावीत-तसेच साहित्यिकांना लावलेली दिसतात) असे ते सज्जन (संत, तत्त्वज्ञ, साहित्यिक, रसिक, ज्ञानी, भक्त) सर्वांना आवडते होवोत, तिन्ही लोकांनी या ग्रंथाच्या योगाने (साहित्यातील निखळ आनंदाने) पूर्ण सुखी होऊन आदिपुरुषाच्या ठिकाणी (परतत्त्वाच्या ठिकाणी) अखंडित भजावे. हा ग्रंथ ज्यांचे जीवन होऊन राहिला आहे (साहित्यिक आणि आस्वादक) त्यांनी इहलोकीच्या व परलोकाच्या भोगावर विजयी व्हावे, त्यांना अंतिम परम सुख प्राप्त व्हावे (परतत्त्वस्पर्श घडावा), अशा तऱ्हेच्या प्रसाद दानातूनदेखील परतत्त्वस्पर्शवादात्मक

विचार ज्ञानदेवांनी मांडलेले आहेत असे म्हणता येईल.

ज्ञानदेवांचा प्रयोजन विचार अशा प्रकारे मूलगामी, सर्वांगीण आणि सर्वस्पर्शी आहे असे म्हणता येईल.



## पाच

# साहित्यिक व औचित्यविचार

साहित्यकारणे, फल, परिणाम, व अपेक्षा या गोष्टींची चर्चा केल्यानंतर आता साहित्यसृजन करणारा साहित्यिक, त्याची भूमिका याविषयी ज्ञानदेवांचे विचार समजावून घेण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. ज्ञानेश्वरांनी प्रवचनाच्या ओघात श्रोत्यांशी सलगी करीत असताना, गुरुंना वंदन करीत असताना, साहित्यिकाचे गुण आणि भूमिका या विषयी परोपरीचे विचार व्यक्त केले आहेत. प्रथमतः साहित्यिकाच्या अंगी कोणते गुण असावेत असे ज्ञानदेवांना वाटते, याची चर्चा करणे योग्य होईल असे वाटते.

**दैवीगुणयुक्त साहित्यिक :** ज्ञानदेवांना साहित्यिकाच्या अंगी दैवी संपत्ती किंवा दैवी गुण असावेत असे वाटत असावे असे म्हणता येईल. अध्याय सोळामध्ये ज्ञानदेवांनी व्यक्त केलेले दैवी संपत्तीविषयीचे विचार कलावंत, रसिक, ज्ञानी या सर्वांनाच अनुलक्षून केले असावेत असे म्हणता येईल. (अ.१६, ६८ ते २११) मूळ गीतेतील चार श्लोकांवर एवढे विस्तृत भाष्य करण्याचे कारण ज्ञानदेवांना श्रेष्ठ गुण, किंवा दैवीगुण, आणि असुरी गुण यांची चर्चा ज्ञान आणि अज्ञान या संदर्भात करावयाची आहे असे दिसते. अर्थात ब्रह्मज्ञानाचा सुकाळ साहित्यातून व्हावा असे वाटणाऱ्या ज्ञानदेवांना अभय, तत्त्वशुद्धी, ज्ञानयोग व्यवस्थिती, दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, आर्जव, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांती, अपैशून्य, दया, अलौलुप्य, मार्दव, लाज, अचापल्य, तेज, क्षमा, धैर्य, शौच, अद्रोहत्व, आणि अमानित्व असे श्रीकृष्णाने सांगितलेले सव्वीस दैवी गुण साहित्यिकाजवळ असणे आवश्यक वाटणे स्वाभाविक आहे. वास्तविक हे गुण अचूक मोक्षप्राप्ती करून देणाऱ्या साधकांसाठी सांगितलेले आहेत हे खरे, परंतु परतत्त्वस्पर्शवाद लक्षात

घेतला तर परतत्त्वाचा साक्षात्कार हाच खरा मोक्ष, तीच ज्ञानमय अवस्था होय, असे लक्षात येईल. येथे मोक्ष म्हणजे केवलानंदमय अवस्थेची प्राप्ती असा अर्थ घेतला आहे. साहित्यिकाचे कार्य विविध स्वरूपाचे आहे असे ज्ञानदेवांना वाटते असे दिसते. साहित्यिकाला साहित्यातून हा परतत्त्वस्पर्श घडविता आला पाहिजे. त्याची ही आत्मसाक्षात्कारानुभूती शब्दब्रह्मात अडकवून सर्वांपर्यंत पोहोचवावयाची आणि ती अशा तऱ्हेने पोहोचवावयाची की त्यामुळे दृष्ट आणि अदृष्ट अशा सर्वांनाच आत्मसाक्षात्कारात यशप्राप्ती होऊ शकेल, म्हणून त्यांनी पसायदानाच्या अंती –

**आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।**
**दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।।** (अ.१८, १८००)

असे आपल्या व्याख्यानाच्या ओघामध्ये सांगितले. व्याख्यानाच्या ओघामध्ये ज्ञानेश्वरांनी स्वतःच्या वर्तनातून अत्यंत नम्रतेने काही महत्त्वाच्या गुणांची चर्चा केली आहे.

**श्रेष्ठ व्यासंगी :** साहित्यिक हा श्रेष्ठ व्यासंगी असला पाहिजे हे त्यांनी गणेशस्वरूपात संपूर्ण साहित्याचे दर्शन घडवून सूचित केले आहे. पूर्वसूरींनी निर्मिलेले साहित्य, मतांतरांसहित साहित्यिकास अवगत असणे श्रेयस्कर होय. किमान पूर्वसूरींविषयी आत्यंतिक आदरभाव असणे आवश्यक आहे असे स्पष्ट केले आहे. साहित्यिकाची साधना अखंड चालू असली पाहिजे हेही त्यांनी आवर्जून सांगितले आहे. आपली गुरुपरंपरा सांगून त्यांच्या कृपाप्रसादानेच आपणास त्रिजगताचे चैतन्यतत्त्व अनुभूतीतून अवगत झाले आहे, असे ते आवर्जून सांगतात. व्यासांनी महाभारतात मांडलेले विचार श्रेष्ठ होत; त्यांची उष्टावळी चाखण्याचे भाग्य लाभले असे त्यांना वाटते (अ.१, ४७). म्हणूनच ज्ञानदेवांनी 'तैसा व्यासाचा मागोवा घेतु । भाष्यकारांतें वाट पुसतु ।' (अ.१८, १७२२) असे म्हटले आहे. आपण स्वतः वेगळे किंवा नवीन असे काहीही सांगत नसून जे सांगितले गेले आहे तेच नव्याने सांगत आहोत; अर्थात ते व्यासांच्या आधारानेच होय. म्हणूनच ज्ञानदेवांनी आपल्या सर्व साहित्यसृजनाचे श्रेय निवृत्तिनाथांना दिलेले दिसते. ज्ञानदेवांच्या या उदाहरणावरून व्यासंगाचे महत्त्व ज्ञानदेवांनी कसे स्पष्ट केले आहे, ते लक्षात येऊ शकेल. आधुनिक विचारातही अनुभवविश्व विस्तारण्याच्या दीर्घोद्योगाचे महत्त्व विचारवंतांनी स्पष्ट केलेच आहे, हे लक्षात घ्यावयास हवे. जेवढे अनुभवांचे क्षेत्र विस्तीर्ण तेवढी कल्पनेची झेप पल्लेदार व तेवढाच प्रतिभेचा स्पर्श अधिक असे सूत्र प्रा. ना. सी. फडके यांनी आपल्या 'प्रतिभासाधन' या ग्रंथात मांडलेले आहे.



त्याची येथे आठवण होणे शक्य आहे.

**सिद्धसरस्वतीचा प्रसाद :** साहित्यिकास सिद्धसरस्वतीचा म्हणजेच शारदेचा अर्थातच प्रतिभेचा स्पर्श होणे आवश्यक आहे. ही सिद्धशक्ती व्यासंग आणि गुरुकृपा यांच्या योगाने प्राप्त होते असे ज्ञानदेवांना वाटते. पाश्चात्त्य साहित्यविचारातही 'इन्स्पिरेशन'ला म्हणजे प्रतिभाशक्तीला स्फूर्तीला 'प्रेस्पिरेशन'ची म्हणजे प्रयत्नांची अर्थातच व्यासंगाची जोड आवश्यक आहे असे म्हटले जाते. ज्ञानदेवांनी स्वसंवेद्य असा ओंकार म्हणजे शब्दब्रह्म आहे असे म्हटले आहे. सरस्वती प्रसन्न झाली तर मुका म्हणजेच अनभिज्ञ देखील महाभारत, म्हणजेच श्रेष्ठ साहित्य सृजन करू शकेल (सांगू शकेल) असे म्हटले आहे. (अ.१, ७८). ही शारदा प्रकट झाल्यानेच साहित्यसृजन शक्य आहे हे खरे; परंतु ती प्रकट करण्याचे सामर्थ्य गुरुप्रसादामध्ये आहे, असे ज्ञानदेवांना वाटते. म्हणूनच ते म्हणतात की गुरुस्नेहरूपी वागेश्वरीने मुक्याचा अंगीकार केला तरी तोही वाचस्पती बनू शकेल. ज्ञानदेवांचे हे विवेचन साहित्यसृजनाच्या संदर्भात महत्त्वाचे आहे असे म्हणता येईल. येथे अध्यात्मिक ज्ञानासाठी व प्रबंध लेखनासाठी प्रतिभास्पर्श हवा असेल तर श्रीगुरुचा प्रसाद हवा; म्हणजेच गुरुप्रसादाचे म्हणजेच व्यासंगाचे महत्त्व स्पष्ट केले आहे व या व्यासंगातूनच शारदाप्रसाद शक्य आहे असे म्हटले आहे. लोकसाहित्यात डोकावले तरी लोकसाहित्याचे सृजन परंपरेनेच घडत असते असे लक्षात येईल. जुन्या परंपरांच्या प्रसादाने नवनवोन्मेष स्फुरतात असे दिसेल. साहित्यिकांवर आपले साहित्य– सृजन करीत असताना पूर्वसूरींचा प्रभाव जाणवत असतो. ही जी मानसिक प्रक्रिया आहे तीच एकपरीने ज्ञानदेवांनी प्रकट केली आहे असे म्हटले तर ते गैर ठरू नये. साहित्य भाषेच्या माध्यमातून प्रकट होते आणि भाषेला शब्दब्रह्मबीजापासूनची परंपरा आहे असे ज्ञानदेवांचे म्हणणे आहे. आदिबंधात्मकतेने विचार समजावून घेऊ लागलो तर सिद्धसरस्वतीचा प्रसाद मिळण्यास श्रीगुरू हा कशा प्रकारे दुवा ठरतो हे ध्यानात येऊ शकेल.

**आदरभावाची आवश्यकता :** साहित्यिकाच्या अंगी पूर्वसूरी, गुरू, पूर्वसूरींचे साहित्य यांविषयी आदरभाव असला पाहिजे, हे वरील विवेचनावरूनही सहज लक्षात येऊ शकेल. समग्र साहित्यस्वरूप असलेल्या गणेशाला ज्ञानदेव याकरिताच वंदन करतात असे म्हणता येईल. आदिनाथ शंकरापासूनची आपली गुरुपरंपरा सांगून त्यांनाही ज्ञानदेवांनी वंदन केले आहे. साहित्याचे बीज जो ॐ कार त्यास ज्ञानदेवांनी वंदन केले आहे. परंतु तेवढ्यानेच ज्ञानदेवांचे समाधान झालेले नाही. श्रोता, वाचक, रसिक आणि समीक्षक या सर्वांविषयीचा आदरभावही ज्ञानदेव

व्यक्त करताना दिसतात. श्रोत्यांना त्यांनी सर्वज्ञ, प्रभू, माता अशा शब्दांत गौरविले आहे. अध्याय नऊमध्ये त्यांनी श्रोत्यांची केलेली विनवणी विलक्षण आहे असे म्हणता येईल.

**नम्रता :** साहित्यिकाला जे सांगावयाचे किंवा मांडावयाचे आहे ते त्याने हळुवारपणाने व नम्रतेने मांडावयास हवे. रसिकांना, जाणकारांना सर्वस्वी मोठेपणा देऊन, एवढेच नव्हे तर समोर असणाऱ्या सर्वच श्रोत्यांना नम्रतेने विषयप्रतिपादन केले पाहिजे, मग ते अज्ञानी असले तरी! असेच जणू ज्ञानदेवांना सांगावयाचे आहे. ज्ञानदेवांनी नम्रतेने रसिकांना जिंकून आस्वाद प्रक्रियेसाठी सिद्ध करावे, असे म्हटले आहे. ज्यांच्यासमोर आपण साहित्य सादर करीत आहोत, त्यांना ते सर्वज्ञ आहेत असे समजून आपले वर्तन नम्र व बोलणेही नम्र ठेवावे असे ज्ञानदेव सूचित करतात–

**हें अनावर न विचारितां । वायांचि धिंवसा उपनला चित्ता ।**
**येऱ्हवीं भानुतेजीं काय खद्योता । शोभा आथी ।**
**तैसा मी अनुग्रहीतु । साधूंचा निरूपितु ।**
**ते आपुला अलंकारितु । भलतयापरी ।।** (अ.१, ६७ व ८२)

हे न झेपणारे काम आहे, याचा विचार न करता उगाच हे साहस मनात आणले, खरे तर सूर्यप्रकाशात काजव्याची काय शोभा? असे नम्रतेने सांगून आपण श्रोत्यांच्याच कृपेमुळे साधूंचा निरोप्या म्हणून बोलतो आहोत, असे ज्ञानदेव बोलतात आणि श्रोत्यांची मने जिंकून घेऊन त्यांना श्रवणास प्रवृत्त करतात. नम्रतेचा असा प्रभाव आहे असे ज्ञानदेवांना स्पष्ट करावयाचे आहे असे म्हणता येईल. वास्तविक पाहता ज्ञानदेव हे खऱ्या अर्थाने ज्ञानदेव होते तरीदेखील त्यांनी ही नम्रता स्वीकारलेली आहे. त्यांच्या मते खरा साहित्यिक रसिकांना साहित्याद्वारे केवलानंदाची अनुभूती घडवितानाच काय तो, 'स्वधर्मी थोरू । अवसरीं उदारू । आत्मचर्चे चतुरू ।' (अ.१३, २११), असा असतो. एरवी तर तो वेड्याचे सोंग घेऊन सामान्य माणसांमध्ये वावरतो. याचा अर्थ असा की नम्रतेने साहित्य निवेदण्यास योग्य वातावरण निर्माण करून नंतरच साहित्यसौरभाने सर्वांना मोहित करावे. कवी वेडे असतात तर तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, कलावंत तऱ्हेवाईक असतात असे म्हटले जाते. परंतु कलाप्रकटीकरण प्रसंगी ते आपल्या कलेने लोकांना दिपवून टाकतात. ज्ञानदेवांना हेच सांगावयाचे आहे असे म्हणता येईल. साहित्यिकाने परतत्त्वस्पर्शानुभूतीत तल्लीन असावे. आपण ज्ञानी असलो तरी लौकिकाच्या दृष्टीने व्यवहारात वावरणाऱ्या लोकांना मोठेपणा देऊन आपले म्हणणे ऐकण्यास सिद्ध करावे व मगच आपल्या साहित्यातून त्यांना परतत्त्वस्पर्श घडवावा, असे ज्ञानदेव स्पष्ट करतात.

नम्रतेमुळे साहित्यिकाविषयी आपुलकीची भावना निर्माण होते आणि प्रेममय संवाद रसवृत्ती निर्माण करते असे ज्ञानदेवांना वाटते. नम्रतेने रसिकाला आपलेसे केले तर हृदयसंवादाने रसिकजन साहित्यातील परतत्त्वस्पर्श अनुभवू लागतो; त्यासाठी ज्ञानदेवांनी अनेक उदाहरणे दिली आहेत. (उदा. अ. १३, ११५१ व अ. १५, ४५४ इ.)

ज्ञानदेव रसिकांना सरस्वतीपुत्र, सूर्य, अमृताचे ताट, नादब्रह्म, प्रत्यक्ष सुगंध आदी विशेषणांनी संबोधतात आणि त्यांच्यासमोर आपण केवळ काजवा, साधे अन्न, नादब्रह्मापुढील गाणे असे संबोधून नम्रता व्यक्त करतात व रसिकांशी सलगी करून निवेदन करतात (अ.९, १ ते २१).

**योग्य भाषा :** साहित्यिकाला आपले साहित्य रसिकांपुढे मांडावयाचे असल्याने रसिकांस आवडणाऱ्या, समजणाऱ्या सोप्या परंतु रसाळ भाषेत आपले निवेदन करावे असे ज्ञानेश्वर सुचवितात. हे त्यांच्या मराठीतून ग्रंथरचना करण्याच्या धोरणावरूनही स्पष्ट होते. शक्यतो रसिकांच्या स्वभाषेत सोपेपणाने विषय मांडला जावा, यासाठी त्या भाषेचे उत्तम ज्ञान हवे व शब्दनिवड उत्तम करता यावी, अशी ज्ञानदेवांनी अपेक्षा व्यक्त केली आहे (अ.३, १७, अ. १२, १७ व अ. १८, १८०८).

**आत्मविश्वास :** साहित्यिकाजवळ अनुभूती प्रकटीकरणविषयक आत्मविश्वास असला पाहिजे. ज्ञानेश्वरांजवळ दृढ आत्मविश्वास होता आणि तो त्यांनी अनेक वेळा प्रकटही केला आहे. या दृष्टीने

**'अमृतातेही पैजासी जिंके ।**
**ऐसी अक्षरे रसिकें । मेळवीन ।'** (अ.६, १४),
**'तरी अवधान एकवेळें दीजे ।**
**मग सर्व सुखासि पात्र होईजे ।**
**हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड ऐका ।।'** (अ.९, १)

या ओव्या पुरेशा बोलक्या आहेत. ज्ञानदेवांचा आत्मविश्वास व्यक्त होणाऱ्या अनेक ओव्या ज्ञानेश्वरीत निरनिराळ्या संदर्भाने आलेल्या आहेत. मानसशास्त्रीय दृष्टीने विचार केला तर आत्मविश्वास म्हणजे स्वबुद्धी आणि प्रज्ञा यावरचा विश्वास. म्हणजेच आपला अभ्यास व साधने यांवरील विश्वास होय. स्वाभाविकच या आत्मविश्वासाने सूक्ष्म मर्मग्राही भेदक दृष्टी प्राप्त होऊन प्रतिभेचा स्पर्श होतो. आणि

साहित्याने अंत:करण भरून जाते. आपल्या साधनेवरील विश्वास हा ध्येयापर्यंत पोहोचविणारा असतो, या दृष्टीने साहित्यिकाजवळ आत्मविश्वास असणे आवश्यक असते.

**साहित्य प्रकटीकरण किंवा रचनापद्धतिविषयक ज्ञान :** साहित्य प्रकटीकरण किंवा रचनापद्धतिविषयक ज्ञान पूर्वसूरींकडून प्राप्त होऊ शकते. श्रीगुरुंकडून हे ज्ञान प्राप्त होऊ शकते (अ.१७, २०). ज्ञानेश्वरांनीदेखील असे ज्ञान प्राप्त करून घेतल्याचे किंवा प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे.

**शब्द कैसा घडिजे । प्रमेयीं कैसें पां चढिये ।**
**अळंकारु म्हणिजे । काय तें नेणें ।।** (अ.१८, १७६७)

ज्ञानेश्वरांनी नम्रपणाने शब्द, प्रमेय, अलंकार या विषयीचे अज्ञान व्यक्त केलेले असले तरी श्रोते, गुरू यांच्या कृपेने ते आपल्याला अवगत झाल्याचेही म्हटले आहे. साहित्यिकांना स्वाभाविकपणे युगशैलीचा उपयोग करावा लागतो किंवा तो त्यांच्याकडून केला जातो. त्या शैलीचे ज्ञानही त्यांना आवश्यक असते. प्रतिभावंत साहित्यिक एक प्रकारे त्या शैलीमध्ये स्वप्रज्ञेने नावीन्य आणण्याचा प्रयत्न करीत असतात. ज्ञानदेवांनी ओवी आणि अभंग या अस्सल मराठी छंदांचा वापर केलेला आहे. (अ.१३, ११५); परंतु अलंकार, रस यांविषयी ज्ञानदेवांचा गाढा अभ्यास होता असे लक्षात येते. ज्ञानदेवांनी शृंगाराच्या माथ्यावर पाय ठेवणारा शांतरस निपजविण्याची केलेली प्रतिज्ञा (अ.१३, ११५५); बाराव्या अध्यायात त्यांनी आपल्या काव्याविषयी अपेक्षा व्यक्त करताना नवरसांचे भरते येवो, अलंकार रत्नांची खाण उघडो, संवाद-फळे येवोत, सिद्धान्तांच्या बागांना फलहार येवो, असे म्हटले आहे (अ.१२, ११ ते १३). सूचक शब्द, उपमा, श्लोक यांची रेलचेल, अर्थभरित पदे, अर्थपूर्ण ग्रंथरचना आपण घडवू (अ.१३, ११६३) असे ज्ञानदेवांनी म्हटले आहे. यावरून साहित्यिकाजवळ साहित्यप्रकटीकरणासाठी शास्त्रतंत्राची आवश्यकता ज्ञानेश्वरांनी अपेक्षिलेली आहे.

**सूक्ष्मनिरीक्षण शक्ती, भेदक दृष्टी, निवड शक्ती :** ज्ञानदेवांनी या गुणांचीही चर्चा व्याख्यानाच्या ओघात केली आहे असे दिसते. विश्वव्यापक चैतन्य सर्व वस्तुमात्रांत भरलेले आहे. ते तत्त्वज्ञ संत बरोबर शोधून काढतात (अ.२, १२६). येथे सहजच केशवसुतांच्या 'निवडितो ते सत्त्व आम्ही निके' या उद्‌गारांची आठवण होते. अशी सत्य, सौंदर्य, शोधण्याची भेदक दृष्टी साहित्यिकाजवळ असणे आवश्यक आहे. ज्ञाता, ज्ञेय, आणि ज्ञान या तिन्ही गोष्टी सर्व कामास प्रवृत्त करतात, परंतु ज्ञात्याला ज्ञेय प्रिय असेल तर ज्ञान होण्यास क्षणाचाही विलंब



लागणार नाही (अ.१८, ४८५ व ४८६). अर्थातच साहित्यिकाला आपले ज्ञेय जर नक्की माहीत असेल, त्याचा ध्यास असेल तर त्याचे ज्ञान होण्यास विलंब लागणार नाही, असे ज्ञानदेवांनी सुचविलेले दिसते. येथे वर्डस्वर्थच्या 'झपाटून निसर्गसौंदर्य पाहात भटकण्याची' सहजच आठवण होते. 'अढळ सौंदर्याचा ध्यास असेल तर साहित्यिकाचा दीर्घोद्योग सुरू होईल आणि त्याला ते गवसेल' असे ज्ञानदेवांना सुचवावयाचे आहे.

**सूक्ष्मसंवेदना स्वीकारणारे संवेद्य मन :** साहित्यिकाचे मन सूक्ष्म संवेदनशील असले पाहिजे. कारण बाहेरील पंचेंद्रियांनी ज्ञान झाले तरी मनाच्या संवेदनशीलतेशिवाय जाणीव होणे शक्य नाही. प्रतिभेचा स्पर्श हा उत्कट संवेद्य हृदयास होतो. अहिंसेचे रूप कसे असते, यावर व्याख्यान देताना ज्ञान आणि मन यांच्या संयोगाशिवाय अहिंसा बिंबाची जाणीव होणार नाही असे म्हटले आहे (अ. १३, २४४). हीच गोष्ट सौंदर्यरूप दर्शनाच्या संदर्भात म्हणता येईल. अठराव्या अध्यायात बाह्यंद्रिये आणि अंत:करणातील इंद्रिये यांचा संबंध ज्ञानदेवांनी स्पष्ट केला आहे (अ. १८, ४९८ ते ५०२). त्यातून त्यांना संवेद्य मनाचा विचार मांडावयाचा आहे, असे म्हणता येऊ शकेल. संवेद्य मनालाच परतत्त्वस्पर्श शक्य आहे असे ज्ञानेश्वरांना म्हणावयाचे आहे, असे म्हणता येईल. साध्या विषयातही गुप्त असलेले परतत्त्व केवळ या सूक्ष्मसंवेदनशील मनानेच साक्षात्कारित होईल. म्हणून साहित्यिकाने मनाला, अंत:करणाला जाणीव घडविण्याचा प्रयत्न करावा.

**साहित्यिकाची भूमिका :** साहित्यिकाची साहित्याविषयीची भूमिका ही एखाद्या साधकासारखी असावी असे जणू ज्ञानेश्वरांना सूचित करावयाचे आहे. त्याने सौंदर्यशोध आणि आनंदबोध घडविण्यासाठी, आपणास झालेला साक्षात्कार इतरांना घडविण्यासाठी, सतत प्रयत्नशील असले पाहिजे. त्यासाठी वर चर्चिलेले गुण साहित्यिकाच्या अंगी ज्ञानेश्वरांना अपेक्षित दिसतात. त्याचे साहित्य ही त्याला स्वतःला झालेली परतत्त्वाची आत्मनिष्ठ जाणीव असली तरी तो परतत्त्वस्पर्श सर्वांना घडविण्याची सामाजिक जबाबदारी साहित्यिकाने अत्यंत नम्रतेने स्वीकारली पाहिजे आणि मोठ्या विचक्षणतेने ती पार पाडली पाहिजे असे ज्ञानदेवांना वाटते. साहित्याचे सृजन हे केवळ आत्मनिष्ठ किंवा स्वतःपुरते मर्यादित नाही. कारण साहित्य हेच मुळी चराचर सृष्टीतील चैतन्यतत्त्व प्रकटविणाऱ्या बीजरूप ॐ काराचा विस्तार आहे. ते चैतन्यतत्त्व, आत्मबोध, परमात्मतत्त्वाचे दर्शन, म्हणजेच परतत्त्वस्पर्श सर्वांना घडला पाहिजे आणि सर्वांना आनंदाचे आवार मिळाले पाहिजे, सर्वांना ब्रह्मविद्येचा सुकाळ झाला पाहिजे असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे आहे. केवळ

सामाजिक बांधिलकी नव्हे तर वैश्विक बांधिलकी मानणारे साहित्यिक, तत्त्वज्ञ आणि संत म्हणून ज्ञानदेवांचा गौरव त्यासाठीच करावयाचा. साहित्यिक कसा असावा? त्याची भूमिका काय किंवा कोणती असावी? या प्रश्नाचे संक्षेपाने उत्तर द्यावयाचे असेल तर ज्ञानदेवांचे साहित्यिक म्हणून अनुकरण करावे; या दृष्टीनेही ज्ञानेश्वर साहित्यिकांची माउली आहेत असे म्हणता येईल. आपणासारखे बनण्यासाठी ज्ञानदेवांनी मार्गदर्शनही केलेले आहे. एकच महत्त्वाचा गुण साहित्यिकाजवळ अपरिहार्यपणे असावा तो म्हणजे औचित्यविचार होय.

**औचित्यविचार :** शब्दांपासून तो विषयांपर्यंत साहित्याच्या सर्व अंगांसंबंधी ज्ञानदेवांनी औचित्याला विशेष महत्त्व दिले आहे हे ध्यानात घेणे औचित्याचे ठरेल. साहित्यसौंदर्य मीमांसेत आधुनिक काळात औचित्यविचाराला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. औचित्यामुळेच खरे सौंदर्य प्रकटते हा तो विचार होय. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला तर औचित्य हा विचारप्रक्रियेचा आत्मा आहे असे मानले तर गैर होणार नाही. योग्य-अयोग्य, शुद्ध-अशुद्ध, चांगले- वाईट, सत्य-असत्य, या विषयी न्यायबुद्धी किंवा मती किंवा सारासार विचार किंवा विवेक म्हणजेच औचित्यबुद्धी असे म्हणता येईल. अध्यात्म काय किंवा सौंदर्यशास्त्र काय किंबहुना कोणत्याही शास्त्रात या बुद्धीला अनन्यसाधारण महत्त्व आहे व ते अपरिहार्य होय. व्यवहारातील साक्षेप हा महत्त्वाचाच ठरतो. ज्ञानदेव कवी, तत्त्वज्ञ आणि संत असे त्रिविध व्यक्तिमत्त्व प्राप्त झालेले सिद्धयोगी होते, त्यामुळे साहित्यिक आणि तत्त्वज्ञ म्हणून त्यांना औचित्यविचार विशेष महत्त्वाचा वाटणे स्वाभाविकच होते. ज्ञानदेवांचे साहित्य-विचारात्मक औचित्य- विचाराविषयीचे उद्‌गार आपणास येथे ध्यानी घ्यावयाचे आहेत.

राजहंसाचा नीरक्षीरन्याय तत्त्वज्ञाजवळ किंवा बुद्धिमंताजवळ असतो म्हणूनच त्याला चराचरात गुप्त स्वरूपात असलेले आत्मतत्त्व शोधता येते. चतुर लोक अग्नीच्या सहाय्याने हिणकस धातू काढून टाकून केवळ शुद्ध सोने निवडून घेतात. भूस आणि धान्य उफणण्याने धान्य जाग्यावर राहून फोलकटे दूर जातात, अशी उदाहरणे देऊन ज्ञानदेवांनी विवेकाचे म्हणजेच औचित्य विचाराचे सामर्थ्य स्पष्ट केले आहे (अ.२, २६ ते ३१).

शब्द असा औचित्यपूर्ण असावा की ज्याजोगे कलावंतांच्या मनात प्रकाशित झालेले सौंदर्यबिंब अवघ्या जगाला दिसेल. शब्दातून समग्र अर्थ प्रकाशित होऊन अज्ञान नाहीसे होईल. सूर्य उगवल्यावर सर्वदूर प्रकाशच प्रकाश होऊन जसा अंधार नाहीसा होतो त्याप्रमाणे शब्द वापरला जावा. अर्थपूर्ण शब्दनिवडीला ज्ञानदेवांनी



विशेष महत्त्व दिले आहे (अ.४, २१५) उत्तम शब्दरचनेचा उल्लेख ज्ञानदेवांनी गणेश नमनात केला आहेच. हे शब्द छंदोबद्ध यावेत असेही ते म्हणतात.

आपण अतिशय चातुर्याने गीताशास्त्रातील पदे वर्णन करू, अतिशय स्वच्छ आशय निष्पन्न होईल, कोणतीही शंका मनात राहणार नाही, असे आपले बोलणे असेल (अ.१४, २९, ३० व ३१), असे म्हणून वाक्यावाक्यांतून निवेदनातील औचित्य सूचित केले आहे असे म्हणता येईल. उचित-पदबंधांचा विचार ज्ञानदेवांनी केला आहे (अ.१०, ४२).

विषय आणि तत्त्व यांना योग्य अशी भाषा वापरावयास हवी असे ज्ञानदेवांना वाटते. मराठी भाषा आपण किती औचित्यपूर्णतेने वापरत आहोत याविषयी आत्मविश्वासपूर्ण वचने मराठीविषयीच्या अनेक ओव्यांतून प्रकट झाली आहेत. भाषेच्या सौंदर्याने ओव्या अलंकाराला भूषण ठरतील, शांतरस शृंगाराला जिंकेल, मराठी आणि संस्कृत एकाच पंगतीत बसतील असे ज्ञानदेवांना वाटते (अ.१०, ४६ व ४७). भाषा कोणतीही असली तरी ती कशी वापरली जाते याला महत्त्व आहे असे ज्ञानदेवांना सांगावयाचे आहे असे म्हणता येईल.

विषयप्रतिपादन, मांडणी, शैली कशी असावी, या विषयी त्यांनी स्वतःचे साहित्य कसे असावे या विषयी केलेली अपेक्षा, लक्षात घेण्यासारखी आहे. रस, अलंकार, अर्थगांभीर्य, आत्मानात्मविचार, संवाद, सिद्धान्त इ. गोष्टी अतिशय औचित्यपूर्ण असाव्यात असे म्हणून अखेर श्रोत्यांना श्रवणराज्यावर अधिष्ठित करावे अशी अपेक्षा केली आहे. रसिकांना, जाणकारांना, समीक्षकांना साहित्य प्रसन्न करू शकेल असे साहित्य असावे म्हणजेच रसौचित्य, अलंकारौचित्य, रचनौचित्य, विषयौचित्य या सर्व गोष्टींना ज्ञानदेवांनी किती साक्षेपाने स्पर्श केला आहे, हे सहज ध्यानात येऊ शकेल.

महाभारतातील गीताप्रसंग हा सर्वांगपरिपूर्ण असा विषय आहे, हे पटवून देताना विषयाची निवड कशी करावी किंवा साहित्याच्या विषयास कोणती परिमाणे लावावीत आणि अलौकिक सौंदर्य निधानाकडे पोहचण्याच्या दृष्टीने विषयाचे औचित्य कोणते, याचे विवेचन केले आहे. नवरसयुक्त, सुखकारक, अचूक व योग्य असा विषय असावा (उदा. अ. १, २९, ३६, ४०, ४७) असे ज्ञानेश्वरांनी सूचित केले आहे असे म्हणता येईल.

आपण आपले साहित्य कोणापुढे मांडत आहोत म्हणजेच साहित्याचे आस्वादक कोण आहेत याचे भान साहित्यिकाला असले पाहिजे, असे ज्ञानदेवांना सुचवायचे आहे. समोरचे श्रोते कोण आहेत? ते सतर्क, स्वस्थचित्त, प्रसन्नचित्त

आहेत की नाही? त्यांचे आपल्या विषयप्रतिपादनाकडे लक्ष आहे की नाही? ते जाणकार आहेत की नाहीत, किंवा ते अभिरुचिसंपन्न आहेत की नाहीत? त्यांची भाषा कोणती आहे किंवा त्यांना कोणत्या भाषेत प्रवचन केले असता समजू शकेल? या सर्व गोष्टींना साहित्यिकाच्या, साहित्य प्रकाशनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्व ज्ञानदेव देताना दिसतात. ज्ञानेश्वर प्रवचन करीत होते. अर्थात श्रोते समोर बसलेले होते आणि त्यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क. ज्ञानदेवांचा येत होता. हे सर्व खरे असले तरी, आपण कोणत्या प्रकारच्या रसिकांसाठी लिहीत आहोत हे साहित्यिकांना निश्चित करता येणे शक्य आहे. शिवाय आपण लिहिलेले लेखन वाचक कोणत्या प्रकारे स्वीकारतात याचा अंदाज घेणे साहित्यिकांना शक्य आहे व त्यानुसार आपल्या लेखनात औचित्यपूर्ण बदल करणे शक्य होईल. ज्ञानेश्वरांनी या दिशेने प्रयत्न केला आहे हे लक्षात घ्यावयास हवे एवढे खरे.

श्रोत्यांना त्यांनी वेळोवेळी केलेले आवाहन (अ.९), त्यांच्या चित्तप्रसन्नतेसाठी केलेली खटपट, त्यांच्या अवधानाची केलेली अपेक्षा, आपल्या विषय प्रतिपादनासाठी मराठी भाषेचा केलेला वापर, या गोष्टी साहित्यिकाला साहित्य प्रकाशनातील औचित्यविचाराविषयी खूप काही सूचित करतात असे म्हणता येईल. येथे सहजच 'अरसिकेषु कवित्व निवेदनं । शिरसी मा लिख मा लिख मा लिख ।।' ही कालिदासांची उक्ती आठवणे शक्य आहे. अर्थात साहित्यिकाने रसिकांच्या संदर्भात औचित्य राखले नाही तर साहित्यिकाचे श्रम वायाच जाणार!

साहित्यातील साहित्यपण प्रकट व्हावयाचे असेल, सिद्ध व्हावयाचे असेल, तर औचित्य साधले गेले पाहिजे किंबहुना औचित्य म्हणजेच शब्द, अर्थ, भाव, पद, रचना, अभिव्यक्ती, विषय या सर्व गोष्टींमधील सौंदर्यात्मकता हेच ज्ञानदेवांना सांगावयाचे आहे, असे म्हणता येईल. साहित्यात औचित्याचा परमोत्कर्ष कसा साधता येईल याचे उत्तम उदाहरण म्हणजे ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायामध्ये मांडलेले विचार होत. ज्ञानदेव म्हणतात

**ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होति जिभा ।**
**बोलें इंद्रिया लागे कळंभा । एकमेकां ।।** (अ.६, १६)

✦✦



## सहा

# साहित्यनिर्मिती प्रक्रिया विचार

ज्ञानदेवांनी साहित्यनिर्मिती प्रक्रियेसंबंधी बराच विचार केलेला दिसतो. त्यांची विचार करण्याची पद्धती अतिशय मूलगामी आणि मानसशास्त्रीय दृष्टिकोनानुसार तसेच तर्कशुद्ध आहे असे लक्षात येईल. परतत्त्वस्पर्श घडणे व साहित्य प्रकटविण्याची अवस्था प्राप्त होणे ही प्रक्रिया पायरीपायरीने घडते असे त्यांना वाटत असले पाहिजे, असे त्यांनी केलेल्या चर्चेवरून लक्षात येईल. आत्मसाक्षात्कार, आत्मबोध किंवा आत्मानुभव यावरच त्यांचा अधिक भर असला, म्हणजेच अद्वैत तत्त्वज्ञानास अनुषंगून त्यांनी विचार मांडलेले असले, तरी देखील त्यांनी मांडलेले विचार गूढ नाहीत किंवा संदिग्ध तर नाहीतच नाहीत. ज्ञानेश्वरांनी मांडलेले विचार आध्यात्मिक अनुभूती संबंधात असल्याने व केवळ वेळोवेळी त्याच संदर्भाने आलेले असल्याने त्यांचा या संबधात विचारही करावयाची गरज नाही असे मत अनेक विद्वानांनी प्रदर्शित केलेले असले, तरी कविश्रेष्ठ म्हणून ज्ञानेश्वरांची योग्यता त्यांनी मान्य केलेलीच आहे. तत्त्वज्ञ म्हणून ज्ञानदेवांची योग्यता सिद्धच आहे. तत्त्वज्ञानी माणसाचे विचार केवळ तत्त्वज्ञानापुरते मर्यादित नसतात, ते जीवनाच्या सर्व अंगांचा मुळातून विचार मांडणारे असतात. पाश्चात्य साहित्यविचारात प्लेटो, ॲरिस्टॉटल, कांट, हेगेल आदि तत्त्वज्ञ मंडळी साहित्याविषयी सिद्धान्त मांडताना दिसतात. त्यांनी मांडलेले विचारदेखील वेगवेगळ्या संदर्भात आलेले असतात. मार्क्सवादी साहित्यविचाराच्या संदर्भातही आपला हाच अनुभव आहे. म्हणूनच ज्ञानेश्वरीत प्रवचनाच्या ओघात व्यक्त झालेले साहित्यनिर्मितीविषयक विचार ज्ञानेश्वरांची साहित्यनिर्मिती प्रक्रियेसंदर्भातील संकल्पना स्पष्ट करताना दिसतात हे खरेच.

साहित्यिकाच्या हातून साहित्यनिर्मिती होते, ती त्याच्याजवळ असलेल्या

दैवी गुणांमुळे होय. परंतु ही दैवी संपत्ती (अ.१६, ६८ ते २१२) कशी प्राप्त होते? यासाठी ध्यास असणे आवश्यक आहे. साधना आवश्यक आहे. ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान या तीनही गोष्टी सर्व कर्मांना प्रवृत्त करतात. ज्ञेय ज्ञात्याला प्रिय असेल तर ज्ञान घडण्यास (होण्यास) वेळ लागत नाही (अ.१८, ४८५, ४८६). ही दैवी संपत्ती म्हणून ज्या गुणांची चर्चा श्रीकृष्णाने गीतेत केली आहे, ती संपत्ती ज्ञानी माणसाला प्राप्त होते आणि ज्ञान प्राप्त झाले असता कर्म आपल्या जीविताने मुक्त होऊन ते लयाला जाते, म्हणजेच अद्वैत प्राप्त होते. या संदर्भात ज्ञानदेवांनी 'आश्चर्यकारक सूर्याची' उपपत्ती मांडली आहे.

**मावळवीत विश्वाभासु । नवल उदयला चंडांशु ।**
**अद्वयाब्जिनीविकाशु । वंदूं आता ।**
**जो अविद्ये राती रुसोनियां ।। गिळी ज्ञानाज्ञानचांदणियां ।**
**जो सुदिनु करी ज्ञानियां ।। स्वबोधाचा ।।**
**जेणें विवळतिये सवळे । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे ।**
**सांडिती देहाहंतेचीं अविसाळें । जीवपक्षी ।।** (अ.१६, १ ते ३)

ज्ञानदेव म्हणतात अद्वैतस्थितीरूपी आश्चर्यकारक सूर्य उगवला असता मायारात्रीचा नाश करून अज्ञानरूपी चांदण्या नाहीशा करतो व अध्यात्म ज्ञानाच्या चांगल्या निरभ्र दिवसाची जोड करून देतो. ज्ञानरूपी दृष्टी प्राप्त होऊन जीवरूप पक्षी देहरूपी घरटी टाकून चैतन्यस्वरूप पावतात. ज्ञानेश्वरांनी गीतेतून स्वीकारलेली दैवी संपत्तीविषयक कल्पना; ज्ञाता, ज्ञान आणि अद्वैत ही उपपत्ती जर साहित्यनिर्मिती प्रक्रियेत साहित्यिक किंवा कलावंताला लावण्याचा प्रयत्न केला तर अनेक गोष्टी स्पष्ट होतात. अलौकिक सुख, अलौकिक किंवा निखळ सौंदर्य सर्वांनाच हवे असते. सामान्य माणसापेक्षा साहित्यिक, कलावंत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ वेगळे असतात. ते ज्ञाते साधक असतात, म्हणजेच त्यांची ज्ञानासाठीची अखंड धडपड चाललेली असते. अलौकिक सौंदर्य किंवा अलौकिक सुख हे त्यांचे ज्ञेय असते. या ज्ञेयाचे ज्ञान त्यांना झाले, की त्या सौंदर्यसाक्षात्काराने अज्ञानामुळे येणारे व्यावहारिक अडथळे दूर होतात आणि त्या सौंदर्याशी ज्ञाता सारे काही विसरून एकरूप होतो आणि आत्मरूपातच ते सौंदर्य अनुभवू लागतो. हाच परतत्त्वस्पर्श किंवा आत्मासाक्षात्कार, आत्मबोध किंवा परमतत्त्वाचे ज्ञान होय. त्या परतत्त्वाशी तो एकरूप झाल्याने अद्वैतरूप नगरात बह्मानंदाची रेलचेल होते आणि मग आनंदानुभवाची देवघेव कमी पडावयास लागते (अ.१६, १२). ही दिव्यानुभूती, ही अलौकिक सौंदर्यानुभूती, जेव्हा साहित्यिकाला होते किंवा परतत्त्वस्पर्श जेव्हा



साहित्यिकाच्या अंत:करणाला जाणवतो, तेव्हा त्याचे हृदय उचंबळून येते. ही अद्वैत स्थिती म्हणजे अद्वैताची जाणीव किंवा आत्मतत्त्वाच्या वस्तुमात्रांतील स्फुरणाची जाणीव असते. आत्मतत्त्वाचा साक्षात्कार 'याचि देही याचि डोळा' घडलेला असतो. हीच अवस्था निखळ सौंदर्य अनुभवण्यासाठी आवश्यक असते. येथे ब्रह्मज्ञान घडलेले असते. परंतु दैवी गुणांनी युक्त असलेले साहित्यिक, संत, तत्त्वज्ञ ही आत्मनिष्ठ अनुभूती केवळ स्वत:जवळ ठेवीत नाहीत; तर अद्रोह, दया, मार्दव असे दैवी गुण असलेल्या साहित्यिकाला, कलावंताला ब्रह्मविद्येचा सर्वांसाठी सुकाळ व्हावा, आपणास अवगत झालेला, अनुभूत झालेला निखळ किंवा अलौकिक आनंद सर्वांना प्राप्त व्हावा असे उत्कटतेने वाटते. म्हणूनच त्याची धडपड सुरू असते. येथे सिद्ध सरस्वती, प्रतिभा प्रकटते आणि साहित्यिकाकडून साहित्यसृजन होऊ लागते. येथे सहजच 'स्पॉन्टेनिअस ओव्हरफ्लो ऑफ पॉवरफुल फीलिंग्ज' या उक्तीची आठवण होते.

हा सौंदर्यतत्त्वाचा किंवा अलौकिक सुखाचा अनुभव नेमका साहित्यातूनच का प्रकटतो व कसा प्रकटतो? या प्रश्नाचे विवेचन देखील ज्ञानदेवांनी केलेले आहे. हे विवेचन आदिबंधात्मक स्वरूपाचे म्हणजेच अतिशय मूलगामी आहे.

**पैं ब्रह्मबीजा जाहला अंकुरु । घोषध्वनी कारु नादा ।**
**तयांचे गा भुवन जो ॐ कारु । तोही मी गा ।।**
**जया ॐ काराचिये कुशी । अक्षरें होती अउम कारेंसीं ।**
**जिगें उपजत वेदेंसीं । उठलीं तिन्हीं ।।**
**म्हणोनि ऋग्यजुः सामु । हे तीन्ही म्हणे मी आत्मारामु ।**
**एवं मीचि कुलक्रमु । शब्दब्रह्माचा ।।** (अ.९, २७५ ते २७७)

ब्रह्मरूपी बीजाला म्हणजेच संपूर्ण विश्वाला - पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश यांनी बनलेल्या चराचरसृष्टी असलेल्या आणि दशदिशा व सप्तपाताल असलेल्या ब्रह्मांडाला - अंकुर व घोष (परा), ध्वनी (पश्यन्ती), नाद (मध्यमा), आकार (वैखरी) यांचे मंदिर म्हणजे आद्य स्वसंवेद्य असा ॐ कार होय, म्हणजेच परमतत्त्व किंवा परतत्त्व होय. त्या ओंकाराच्या पोटात अ उ म अशी अक्षरे होती. ती उद्भवली, प्रकट झाली, ती वेदांना म्हणजे अपौरुषेय साहित्याला घेऊनच प्रकटली. याचा अर्थ असा की सौंदर्यतत्त्वाचे, दिव्यत्वाचे, अलौकिकत्वाचे दर्शन किंवा परतत्त्वाची जाणीव हीच ओंकाररूप आहे. म्हणजेच आत्मसाक्षात्कार किंवा सौंदर्यतत्त्वाची जाणीव, सौंदर्यतत्त्व, सौंदर्यस्वरूप आणि भोक्ता यांची एकरूपता, ही ओंकारस्वरूप आहे; आणि या ओंकारतत्त्वात मुळातच किंवा स्वभावत:च

अक्षरामध्ये, साहित्यामध्ये विस्तारण्याचे निसर्गतत्त्व आहे. त्यामुळे स्वभावतः सौंदर्यतत्त्वाचा साक्षात्कार किंवा अनुभूती घडली की सहजच त्याचा विस्तार होतो; तो साहित्यातच होय, असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे आहे.

आता आत्मसाक्षात्कार किंवा परतत्त्वस्पर्श घडतो तरी का आणि केव्हा? या प्रश्नाचे विवेचनही ज्ञानदेवांनी केलेले दिसते. आत्मतत्त्वाचा, चैतन्यतत्त्वाचा किंवा परतत्त्वाचा साक्षात्कार होतो तो कोणाला? कायेच्या घरट्यात राहणाऱ्या जीवाला म्हणजे आत्म्याला आणि तो आत्मा 'त्या' आत्मतत्त्वाशी अद्वैत असल्याची अनुभूती घेतो आणि ही अनुभूती शब्दांत प्रकट होत जाते हे तरी सहज आपोआप घडते काय? नव्हे. याचा अर्थ अशी अनुभूती घडणाऱ्या जीवाच्या ठिकाणी काही वेगळेपण प्राप्त झालेले असते. या वेगळेपणाचा विचार त्यांनी साहित्यिकाच्या गुणांच्या दृष्टीने केला आहे. त्यात व्यासंगाला सर्वाधिक महत्त्व दिले आहे, म्हणजेच ज्ञानसाधनेला महत्त्व दिलेले दिसते. म्हणूनच ज्ञानदेव पूर्वसूरींकडून घडलेल्या समग्र साहित्याचे दर्शन ज्या स्वरूपात घडले त्या गणेशाला प्रारंभीच वंदन करतात. म्हणजेच ज्ञानदेवांच्या मते साहित्यसृजनाची परंपरा ओंकारपासूनच आलेली आहे आणि प्रत्येक साहित्यिक ती सृजनपरंपरा पुढे नेणाऱ्या त्या परतत्त्वाच्या सृजनाचा एक घटक असतो. हे त्याचे असणे स्वाभाविकपणे परंपरेच्या ज्ञानावर आधारलेले असते. त्यामुळे ते परतत्त्व शोधण्याचा त्याचा दीर्घोद्योग सतत त्याच्याकडून घडावा लागतो. हा दीर्घोद्योग करण्यातच त्याचे वेगळेपण आहे. म्हणजे साहित्यिक हा साधक असतो आणि त्याची साधना आत्मतत्त्वाला अनुसरून चाललेली असते. परंतु मग प्रत्येक जीव हाच साधक बनावयास काय हरकत आहे? खरे तर त्याच्या त्याच्या परीने तो तसा असतोसुद्धा; परंतु ते त्याचे चाचपडणे असते. येथेच ज्ञानदेवांनी श्रीगुरुकृपेची आवश्यकता प्रकट केली आहे. ज्ञानलालसा उपजत असली तरी ती सुप्त असते. गुरुकृपेने ती प्रेरित होते आणि तिचा दीर्घोद्योग सुरू होतो. ज्ञानदेवांनी श्रीगुरुला गणेशरूपात पाहिले व वंदिले आहे. जगाचा आश्रयदाता असलेल्या श्रीगुरुला ज्ञानदेव, श्रीगुरुंनी प्रसन्न होऊन स्फूर्तिरूपी पौर्णिमा आपल्या हृदयात उदयास आणावी, अशी प्रार्थना करतात.

**अगा विश्वैकधामा । तुझा प्रसादुचंद्रमा ।**
**करू मज पूर्णिमा । स्फुर्तीची जी ।।** (अ.१४, २३)

साहित्यसृजनासाठी अनुभवांच्या दीर्घोद्योगाची आवश्यकता प्रकट करताना त्या दीर्घोद्योगाला दिशा आणि परिमाणही दिलेले दिसते. चराचरसृष्टीमध्ये वस्तुमात्र व प्राणिमात्र या सर्वांच्या ठिकाणी गुप्त स्वरूपात चैतन्य वसलेले आहेच. तत्त्वज्ञ त्याचा शोध घेत असतात. (अ.२, १२६) या पद्धतीने अनुभूती घेत गेले पाहिजे. साहित्यिकाची दृष्टी अशी सूक्ष्म, शोधक आणि विवेकी हवी. या अनुभूती संपादनात सातत्याची व अभ्यासाची आवश्यकता ज्ञानदेवांनी स्पष्ट केली आहे. श्रीकृष्णाने सांगितलेले अभ्यासतत्त्व ज्ञानदेवांनी अचूकपणे स्वीकारले आहे.

**म्हणोनि अभ्यासासि कांहीं । सर्वथा दुष्कर नाहीं ।**
**यालागी माझां ठायीं । अभ्यासे मिळ ।।** (अ.१२, ११३)

यावरून लक्षात येते की परतत्त्व शोधनाचा आणि परतत्त्व अनुभूतीचाही अभ्यास ज्ञानदेवांनी अपेक्षित मानला आहे. अभ्यासाने, सततच्या परिश्रमाने सहज आत्मसाक्षात्कार होईल, म्हणजेच परतत्त्वस्पर्श होईल, म्हणजेच अंत:करणात ओंकार प्रकट होईल आणि हा ओंकार एकदा प्रकट झाला की त्याबरोबरच स्वभावत:च साहित्यसृजन घडेल. यासाठी त्यांनी 'बीज वृक्ष बीज' सिद्धान्त प्रतिपादिलेला आहे. (अ.१०, ९८, ९९ व १००). प्रारंभी एकमेव असलेले बीज रुजते व त्याचाच विस्तार मूळ, खोड, फांद्या, पल्लव, पाने, व त्यालाच फुले आणि फळे येतात. त्या विस्ताराला वृक्ष असे आपण नाव दिले. परंतु सूक्ष्म दृष्टी पाहता किंवा हा विस्तार म्हणजे खरे काय, याचा विचार करता; केवळ बीज हेच खरे असा साक्षात्कार होतो. याच पद्धतीने साहित्याचा विस्तार होतच राहतो व आत्मतत्त्वाचे प्रकटीकरण होतच राहते.

परतत्त्वस्पर्श आणि साहित्यसृजन यांचा मानसशास्त्रीय दृष्टीनेही ज्ञानदेवांनी अन्वय लावलेला दिसतो. ज्ञानदेव अध्यात्मातील धूसरता नष्ट करण्याचा प्रदीर्घ खटाटोप करताना दिसतात, ही गोष्ट ध्यानी घेतली पाहिजे. याच दृष्टीने ज्ञानदेवांनी मानसिक शक्ती व ऐंद्रिय शक्ती यांचा विचार केला आहे. साधक किंवा ज्ञाता, आपण येथे कलावंत किंवा साहित्यिक म्हणू या, कर्ता असतो तेव्हा शरीर आणि अंत:करण यांच्या क्रिया घडतात. बुद्धी, मन, चित्त आणि अहंकार हे अंत:करणाचे चार प्रकार आहेत. अंत:करणाबाहेर त्वचा, कान, डोळे, जिव्हा व नाक ही पाच प्रकारची ज्ञानेंद्रिये आहेत. कर्ता अंत:करण चतुष्ट यांनी कर्तव्याचा (कर्माचा) विचार करतो व ते कर्म सुखकर होईल असे जर त्याला वाटले तर बाहेरील चक्षू वगैरे दहा इंद्रियांनाही लगबगीने उठवून तो कामास लावतो. मग आरंभ केलेल्या कर्माचे फल हस्तगत होईपर्यंत त्या ज्ञानेंद्रियांकडून मेहनत करवितो; असे विवेचन ज्ञानेश्वरांनी कर्ममीमांसा करताना श्रीकृष्णाने केलेल्या स्पष्टीकरणानुसार केले आहे. साहित्यिकाच्या दीर्घोद्योगातही या क्रियेचा समावेश असतो. दु:खाचा निरास होईपर्यंत आणि त्याग स्वीकाराची अवस्था येईपर्यंतच तो कर्ता असतो.

त्याग स्वीकारताच त्याचा अहंकार नाहीसा होतो. या विषयी विचार स्पष्ट करताना ज्ञानदेवांनी सात्त्विकभावाचा व त्यापासूनच्या कर्माचा विचार स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते राजस आणि तामस गुणांपासून निर्माण झालेले कर्म परतत्त्वस्पर्श घडवीत नाही. सात्त्विक गुणापासून निर्माण झालेले कर्म परतत्त्वस्पर्श घडविते. असे निरपेक्ष कर्मच अपेक्षित आहे. कारण शुद्धसात्त्विक ज्ञान प्राप्त झाले असता ज्ञाता व ज्ञेय शिल्लकच राहात नाही व आत्मतत्त्व स्पर्श घडतो (अ. १८, ४९८ ते ५३०). या सर्व गोष्टींची साहित्यिकाच्या दृष्टीने संगती कशी? तर सोलीव सुख प्राप्त करून देणारे, केवल आनंद देणारे किंवा अलौकिक, निखळ आनंद देणारे सौंदर्यतत्त्व कलावंताला प्राप्त होते. किंबहुना त्याच्या मनात तसे सौंदर्य पाहण्याची इच्छा व ध्यास असतो म्हणून निरपेक्ष सौंदर्यतत्त्व सापडेपर्यंत म्हणजे निरपेक्ष सौंदर्याचा साक्षात्कार होईपर्यंत त्याचा दीर्घोद्योग सुरूच राहतो आणि त्या तत्त्वाचा साक्षात्कार होताक्षणीच त्या सौंदर्याचे स्फुरण त्याच्या अंत:करणाच्या योगाने होते.

आता ज्ञानेंद्रिये हीच विश्वातील उपाधींचा म्हणजे प्राणिमात्र आणि वस्तुमात्र यांच्या व्यापाराचा अनुभव घेणारी साधने असतात. ही अनुभूती घेत असताना मनाच्या शक्ती कार्यान्वित झालेल्या असतात. त्यांचाही विचार ज्ञानदेवांनी केलेला आहे व त्यांची सुव्यवस्थित मांडणी केली आहे असे दिसेल. आपले वक्तृत्व कोणत्या पद्धतीने प्रकट व्हावे या विषयी विवेचनही केले आहे. (अ. १४, १ व १६ ते ३०). डॉ. मा. गो. देशमुख यांनी याचे साधार विवेचन केले आहे. ते लिहितात –

''काव्यात्मता व अलंकार बाजूला सारले तर असे दिसेल की, आपल्या काव्याच्या पूर्तीसाठी ईश्वरस्वरूप श्रीगुरुंपासून ज्ञानेश्वरांनी अनुक्रमे पुढील गोष्टींची अपेक्षा दाखविली आहे –

| अ. ओवी क्र. | १४ संज्ञा क्र. | गुरुंना दिलेले उपमान | अपेक्षित प्रसाद | प्रसादाचे दृश्यफळ | फलाची अधिष्ठात्री शक्ती | |
|---|---|---|---|---|---|---|
| १९ | १ | (हितचिंतक) | स्नेह | अर्थज्ञान | मन | काव्यकारण |
| २० | २ | (चंद्रसूर्य) | कारुण्य | शब्दज्ञान | बुद्धी | |
| २१ | ३ | (वसंतऋतू) | स्नेह | काव्यरचना | प्रज्ञा | |
| २२ | ४ | (मेघ) | दीठी (कृपा) | प्रमेय | मती | |
| २३ | ५ | विश्वैकमधाम | प्रसाद | -- | स्फूर्ती | |
| २४ | ६ | -- | -- | रसवृत्ती | उन्मेष | |



या कोष्टकावरून ईश्वररूपी गुरुच्या प्रसादामुळे 'मना'ला अर्थज्ञान होते. 'ऋषे, प्रबुद्धोऽसि वागात्मनि ब्रह्माणि' या भवभूतीच्या वचनाप्रमाणे 'बुद्धी' ला शब्दब्रह्माची किंवा वाङ्मयस्वरूपाची जाणीव होते आणि बुद्धी व मन यांच्या सहायाने शब्द आणि अर्थ या काव्यशरीराची सांगता झाल्यावर काव्याची अधिष्ठात्री शक्ती जी 'प्रज्ञा' ती काव्यरचना करते. 'मती'मुळे प्रमेयाची किंवा प्रतिपाद्य–विषयाची मांडणी केली म्हणजे 'स्फूर्ती'ला 'उन्मेष' किंवा अंकुर फुटून काव्य हे रसवृत्तींनी उचंबळून येते. एवढी विशद कल्पना व्यक्त होत आहे.'' (मराठीचे साहित्यशास्त्र, दु.आ. पृष्ठ १३६ ते ४०).

ज्ञानदेवांनी अंत:करणाच्या शक्तींमध्ये मन, बुद्धी, प्रज्ञा, मती, स्फूर्ती आणि उन्मेष या शक्ती कल्पून त्यांचे वेगवेगळे कार्य प्रतिपादिले आहे असे दिसते. वर उल्लेखिल्याप्रमाणे पंचज्ञानेंद्रिये ही मनाची ज्ञानग्रहणाची साधने आहेत. या पंचज्ञानेंद्रियांच्या सहाय्याने मन विश्वातील चराचराचे ज्ञान मिळविण्याची खटपट करीत असते. परंतु ते तेथेच थांबत नाही, तर बुद्धीच्या सहाय्याने शब्दज्ञान मांडते. शब्द हे साहित्याचे माध्यम आहे. मनाला अवगत असा अर्थ शब्दांत प्रकटतो आणि शब्दांतून मनात अर्थबोध होत असतो. म्हणजेच बुद्धी ज्ञानाची संगतवार मांडणी करते. परंतु प्रज्ञेचा व्यापार त्याहीपुढचा आहे. ती हे संगतवार ज्ञान सुव्यवस्थितपणे हवे तसे पुनर्रचित करण्याचा प्रयत्न करते. हे करीत असताना प्रज्ञेला प्रतिभेचा स्पर्श होतो. प्रतिभेचा स्वतंत्र उल्लेख ज्ञानदेवांनी वरील ओव्यांमध्ये केलेला नसला तरी 'उन्मेष' या शक्तीतून ज्ञानदेवांना 'प्रतिभा' शक्तीच स्पष्ट करावयाची आहे हे दिसून येते.

**जी अवलोकिलिया मातें । उन्मेषसागरीं भरितें ।**
**वोसंडेल स्फूर्तीतें । रसवृत्तीचे ।।** (अ. १४, २४)

तसेच स्नेहाचा परमोत्कर्ष साधला जातो व अशी वेल्हाळ म्हणजे सुंदर काव्यफळे येतात असे म्हटले आहे. याचाच अर्थ ज्ञानदेवांना गुरुकृपेने सरस्वती प्रकट झाली आहे, असे म्हणावयाचे आहे. सिद्धसरस्वती प्रकटली असता मुक्यालाही वाचा फुटते एवढे सरस्वतीचे म्हणजेच प्रतिभेचे सामर्थ्य आहे असे स्पष्ट केले आहे. (अ.१, ७८). याच सरस्वतीचे वर्णन करताना 'अभिनव वाग्विलासिनी' 'चातुर्यकलाकामिनी', आणि 'विश्वमोहिनी' या विशेषणांनी केले आहे हे लक्षात येईल. येथे सौंदर्ययुक्त साहित्य प्रकटविणारी असाच अर्थ निष्पन्न होतो असे म्हणता येईल. या प्रतिभास्पर्शाने मती आणि स्फूर्ती या दोन्ही शक्ती प्रज्ञेला सहाय्यभूत होतात असे ज्ञानदेवांना वाटते, असे दिसते. मतीने सिद्धान्त स्पष्ट

होतात, परंतु ते केवळ रुक्षतेने नव्हे तर सौंदर्यात्मकतेनेच होय. कारण या वेळी स्फूर्तिरूपी पौर्णिमेच्या चांदण्याने नवउन्मेषांच्या सागरालाच जणू भरती येते आणि तो रसवृत्तीने ओसंडतो. मती या शक्तीने प्रमेय महापूर येतो असे म्हणताना ज्ञानेश्वरांनी एक प्रकारे विवेक म्हणजे औचित्य यांचे सूचन केले आहे. या विवेकानेच पवित्र विचारगंगा दुथडी भरून वाहते. या वेळी अलौकिक सौंदर्य नित्यनावीन्याने प्रत्यही साक्षात्कारित होते. परतत्त्वस्पर्श विविध प्रकाराने जाणवत राहतो व साहित्यिकाची चित्तवृत्ती दंग होऊन जाते. रसवृत्तीने ओसंडते म्हणजेच सौंदर्याच्या नित्य नव्या स्फुरणाने सहृदयतेला उधाण येते. त्या सौंदर्यतत्त्वाची अनुभूती अनुभवीत राहण्यासाठी हृदय उचंबळते, अष्टसात्त्विक भाव दाटून येतात, असेच जणू ज्ञानदेवांना सुचवावयाचे असते (अ.१४, २१ ते २४). त्यामुळेच सर्व संदेह फिटून जातात आणि अधिकाधिक विवरावे असे वाटू लागते.

**परी जीवा आंतुलीकडे । जैसी संदेहाची डोणी बुडे ।**
**ना श्रवणीं तरी चाडे । वादु दिसे ।।** (अ.१४, ३०)

मनःशक्तींच्या आधाराने येथे प्रकट झालेली साहित्यनिर्मितीविषयक चर्चा ही पाश्चात्त्य आणि पौर्वात्य आधुनिक साहित्यशास्त्रातील विचारांइतकीच प्रगत अशी आहे किंबहुना अधिक स्पष्ट आहे. मनाच्या सर्व शक्तींचे वर्णन ज्ञानदेवांनी स्वतंत्रपणे विशद केले आहे, त्यामुळे साहित्यनिर्मिती प्रक्रियेची जणू सूक्ष्म उकल झाली आहे असे म्हणता येईल. अलौकिक सौंदर्याचा अनुभव सात्त्विक प्रवृत्तीने म्हणजे निरपेक्ष वृत्तीनेच घेता येतो. तेथे व्यवहारिकता लोप पावते आणि परिपूर्ण सुखाचा अनुभव घेता येतो, असे ज्ञानदेवांचे मत आहे. सात्त्विक गुणयुक्त अवस्था अगोदर प्राप्त होते की अगोदर परतत्त्वस्पर्श होतो? याचे उत्तर या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडतात आणि त्यामुळे निरपेक्ष ज्ञानमय अवस्था प्राप्त होते.

**तरी अर्जुना गा तें फुडें । सात्त्विक ज्ञान चोखडें ।**
**जयाचा उदयीं ज्ञेय बुडे । ज्ञातेनिसीं ।।**
**जैसा सूर्य न देखें आंधारें। सरिता नेणिजती सागरें ।**
**कां कवळिलिया न धरे । आत्मच्छाया ।।** (अ.१८, ५२९, ५३०)

शुद्ध सात्त्विक ज्ञान प्राप्त झाले म्हणजेच परतत्त्वस्पर्शानुभूती घडली की ज्ञेय आणि ज्ञाता यांचे वेगळेपण राहत नाही. म्हणजेच द्वैत नाहीसे होते. ज्याप्रमाणे सूर्याला अंध:काराचे दर्शनही घडत नाही किंवा समुद्रास नद्यांची खबरही नसते किंवा आपली सावली आपणास कधी धरता येत नाही, त्याप्रमाणे ज्ञेय आणि ज्ञाता परस्परांत मिसळून जातात. ज्ञाता हेच ज्ञेय आणि ज्ञेय हाच ज्ञाता अशी



अवस्था प्राप्त होते. म्हणजेच आत्मतत्त्वाचेच स्फुरण वस्तुमात्रांत असल्याचा बोध होतो आणि असा परतत्त्वस्पर्श घडल्याने स्वाभाविकच त्या परतत्त्वस्पर्शातून परतत्त्व साहित्यामध्ये विस्तारित होऊ लागते. असे एकूण या अवस्थेचे स्पष्टीकरण करता येईल. कांटच्या सौंदर्यमीमांसेत डोकावले तर परतत्त्वस्पर्शाने होणारी किंवा सौंदर्याची आत्मसाक्षात्कारिता जाणीव ही जणू 'हेतुरहित हेतुपूर्णतेची' सौंदर्यविधानाचे स्पष्टीकरण देणारीच आहे असे म्हणता येऊ शकेल.

साहित्यनिर्मिती प्रक्रियेसंबंधीची चर्चा, अवलोकन, निरीक्षण, अनुभव, संपादन, बुद्धी, प्रज्ञा, कल्पना, स्फूर्ती, प्रतिभा, मनःशक्ती या सर्वांच्या संदर्भातून केली जाते. ज्ञानदेवांनी या सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार केला आहे. अध्यात्म, साधक आणि आत्मसाक्षात्कार किंवा परतत्त्वस्पर्श, ज्ञानमय अवस्था, केवलानंद अवस्था, अद्वैत आणि अद्वैतावस्था या संकल्पनांच्या स्पष्टीकरणासाठी ज्ञानदेवांनी वेळोवेळी केलेले प्रवचन हे केवळ मर्यादितपणाने घेण्याचे कारण नाही, हे सहज ध्यानात येईल. याचे सहज कारण हेच आहे की ज्ञानेश्वर हे आत्मानुभवी योगी आहेत, परंतु त्या अगोदरही ते सिद्धसरस्वतीचा प्रसाद लाभलेले आणि पूर्वसंचित पाठीशी असलेले कवी होते. त्यामुळेच त्यांनी साहित्यनिर्मिती प्रक्रियेसंबंधी मानसिक शक्तींचा विचार सूक्ष्मपणाने केलेला दिसतो. पंचज्ञानेंद्रियांबरोबर मन हे सहावे ज्ञानेंद्रिय आहे, या गीतावचनाचा जाणीवपूर्वक विचार ज्ञानदेवांनी केलेला आहे.

**पैं मनादि साही इंद्रियें । श्रोत्रादि प्रकृतिकार्ये**
**तियें माझी म्हणौनि होये । व्यापारारूढ ।।**
**ऐसेनि देहेंद्रियनायकें । धरूनि मन जवळिकें ।**
**भोगिजती शब्दादिकें । विषयभरणें ।।**
**मग येथ अथवा स्वर्गी । जेथ जें देह आपंगी ।**
**तेथ तैसेंचि पुढती पांगी। मनादिक ।** (अ.१५, ३५२, ३६० व ३६८)

या ओव्या मन, शरीर, आणि आत्मा यांचे संबंध स्पष्ट करतात. त्यातून मनाचे मुक्तपण, इंद्रिय म्हणून उपयोग, व मनाचा आत्म्याशी असलेला अतूट संबंध स्पष्ट करतात. या मनाविषयीच्या त्यांच्या चिंतनामुळेच ते पूर्वसंचित कल्पना स्पष्टपणे मांडू शकले व त्यामुळे साहित्यनिर्मिती प्रक्रियेतील प्रज्ञा, स्फूर्ती आणि सिद्धसरस्वती प्रतिभा यांच्यातील धूसरता नष्ट होऊ शकली, हे लक्षात घ्यावयास हवे. देह आणि इंद्रिये यांचा स्वामी 'जीव' (आत्मा) तो मनास हाताशी धरून शब्दादिक विषयांचा समुदाय भोगतो. ज्ञानदेवांनी साहित्यनिर्मिती प्रक्रियेतील

इंद्रियांचे स्थान आणि कार्य स्पष्ट करून सांगितले आहे. याचाच अर्थ परतत्त्वाचा अनुभव घेण्यासाठीदेखील मन आणि पंचज्ञानेंद्रिये यांचा सहभाग घडतो, हे ज्ञानदेवांनी गृहीत धरले आहे. गीतेतील विषयविस्तारास अनुसरून जरी ज्ञानदेवांनी हा विषय मांडला असला तरी साहित्यनिर्मिती प्रक्रियेतील त्यांचा अनुभव या निमित्ताने त्यांनी तपशीलवार निवेदित केला आहे.

आणखी एका विशेष गोष्टीकडे ज्ञानदेव साहित्यनिर्मितीच्या दृष्टीने लक्ष वेधतात, ते म्हणजे स्थळ आणि काळ यांचे औचित्यदेखील साहित्यनिर्मितीस सहाय्यभूत होते. सहाव्या अध्यायातील निसर्गवर्णन हे योगसाधनेच्या दृष्टीने सुचविलेले असले तरी प्रसन्न चित्ततेसाठी, निरपेक्ष मनःप्रवृत्तीसाठी म्हणजेच सात्त्विक गुण प्रकटीकरणासाठी, वातावरणाचा विचार करावयास हवा असे ज्ञानदेवांना सांगावयाचे आहे हे लक्षात येते.

त्याचबरोबर ज्ञानदेवांनी रसिकांचा प्रतिसादही महत्त्वाचा विषय मानला आहे. श्रोत्यांच्या प्रतिसादामुळे रसवृत्तीत वाढ होते व काव्य स्फुरते असे त्यांचे मत आहे.

**तुमचेया दिठिवेयाचिये वोले । सासिन्मले प्रसन्नतेचे मळे ।**
**ते साउली देखोनि लोळें । श्रांतु जी मी ।।**
**कां जैं दिठिवा तुमचा वरुषे । तैं सकळार्थसिद्धि मती पिके ।**
**एऱ्हवीं कोंभेला उन्मेषु सुके। जरी उदास तुम्ही ।।** (अ.९, ४ व २५)

एकूण रसिकांचा प्रतिसाद चांगला मिळत गेला तर साहित्यसृजन अधिक घडत राहील. घडलेला परतत्त्वस्पर्श साहित्यात विस्तारित होत राहील, साहित्यात स्फुरेल.

अशा रीतीने पर्यावरणाचा साहित्यनिर्मितीमधील सहभाग ज्ञानदेवांनी सूचित केला आहे. अलीकडील काळात पर्यावरणाकडे मानसशास्त्रीय दृष्टीने सर्वांचेच विशेष लक्ष वेधले गेले आहे. ज्ञानेश्वरांनी या विषयालाही आपल्या प्रवचनात स्पर्श केला आहे. हे पाहिले की त्यांचे विचार प्रगत आहेत हे तर अनुभवास येतेच; परंतु त्यांनी साहित्यनिर्मिती प्रक्रियेतील धूसरता नाहीशी केली हे जाणवते.



## सात

# साहित्याची भाषा व शैली

साहित्याची भाषा कोणत्या प्रकारची असावी याचा विचार करताना ललितसाहित्याची भाषा कशी असावी असाच अर्थ अभिप्रेत असतो. ज्ञानदेवांच्या मते शास्त्रीय वाङ्मयाची भाषा किंवा तत्त्वज्ञान मांडण्याची भाषा ही देखील लालित्यपूर्ण असावी असे दिसते. सुंदर भाषेच्या सहाय्याने शांतरस शृंगाररसालाही जिंकेल असा आत्मविश्वास ते व्यक्त करतात –

**देशियेचेनि नागरपणें । शांतु शृंगारातें जिणे ।**
**तरि ओंविया होती लेणें । साहित्यासी ।।** (अ.१०, ४२)

अशा प्रकारे वाणी प्रकटेल की शांतरस शृंगाराच्या माथ्यावर पाय ठेवील (अ.१३, ११५५) ज्ञानेश्वरांचे हे उद्‌गार फार महत्त्वाची गोष्ट सांगून जातात. विषय कोणताही असला तरी मांडण्याची भाषा उत्तम असेल तर तो विषय सहज अवगत होऊ शकतो. त्या विषयातील आल्हाद उपभोगता येतो.

आता लालित्यपूर्ण, सुंदर, उत्तम भाषा म्हणजे नेमकी कोणती आणि कोणत्या प्रकारची भाषा याविषयी ज्ञानेश्वरांची निश्चित प्रणाली आहे. भाषा कोणती आहे यापेक्षा त्या भाषेचा म्हणजे त्या भाषेतील शब्दांचा आपण कोणत्या प्रकारे उपयोग करतो, त्यावरच त्या भाषेची थोरवी अवलंबून आहे. भाषेवर प्रभुत्व असेल व ती औचित्याने वापरण्याचे ज्ञान असेल तर तीच भाषा मधुर आणि रसाळ वाटू लागते. आत्मसाक्षात्काराचे सौंदर्य त्यातून सहज प्रकटते, म्हणजेच परतत्त्वस्पर्श घडविण्याचे सामर्थ्य तीस प्राप्त होते. मराठी आणि संस्कृत भाषा एकाच पालखीत बसतील असा अभिप्राय ज्ञानेदवांनी प्रकट केला आहे.

**तैसी देशी आणि संस्कृत वाणी । एका भावार्थाचा सोकासनीं ।**
**शोभती आयणी । चोखट आइका ।।** (अ. १०, ४५)

भाषा हे साहित्याचे माध्यम आहे. त्यामुळे साहित्यसौंदर्य भाषेवर अवलंबून असते असाच ज्ञानदेवांचा अभिप्राय दिसतो. भाषा हे साहित्याचे माध्यम की साधन असा वाद आपण करीत असताना आणि शैलीविज्ञानाच्या अंगाने ललित साहित्याचा अभ्यास करताना ज्ञानदेवांच्याच विचारातून बरेच काही सूचित होते असे म्हणता येईल. साहित्यिकाला साक्षात्कारित झालेल्या अलौकिक सौंदर्याचा किंवा आत्मतत्त्वाचा किंवा परतत्त्वाचा स्पर्श रसिकांना घडवायचा असेल, तर भाषेचा माध्यम म्हणूनच वापर ज्ञानदेवांना अभिप्रेत दिसतो. बहुधा त्यांचा हा विचार ओंकाराच्या पोटातून अ उ म हे आपणाबरोबर वेद घेऊनच प्रकटले, या कल्पनेतूनच विकसित होत गेला असावा. येथे हाही विचार पुन्हा मनाला स्पर्श करतो की ज्ञानदेवांना साहित्यातील आत्मप्रकटीकरण मान्य असले तरी ते विश्वात्मक भूमिकेतून विचार प्रकट करीत होते. म्हणूनच भाषा कोणती वापरावयाची याविषयी विचार करीत असताना निर्मितीच्या क्षणीही आत्मगत झालेले सौंदर्य आपण आपणासारख्याच सर्वांना म्हणजे मनुष्यमात्राला अनुभवास आणवून द्यावे अशी ऊर्मी साहित्यिकास असते असे ज्ञानदेव स्वानुभवातून स्पष्ट करतात. याचबरोबर भाषेच्या संदर्भात विचार करताना त्यांचा आणखी एक दृष्टिकोन स्पष्ट होतो की भाषा हे माध्यम म्हणून वापरावे ते साहित्यिकाला झालेले सौंदर्यतत्त्वाचे म्हणजेच परतत्त्वाचे ज्ञान सर्वगत करण्यासाठी, म्हणजेच सर्वांपर्यंत ज्ञान पोहोचविण्यासाठी होय. याचाच अर्थ भाषेच्या बाबतीतही ज्ञानदेवांनी सामाजिक जबाबदारी साहित्यिकांवर टाकलेली आहे. त्यामुळे साहित्यिकाने साहित्याची भाषा म्हणून लोकभाषेचा वापर करावा, असे ते आग्रहाने प्रतिपादितात आणि स्वतः त्याचा अवलंब जाणीवपूर्वक केल्याचे निवेदनही करतात.

सर्वांना गीतार्थ डोळ्यांना दिसावा म्हणून आपण मराठी भाषेमध्ये काव्य करीत आहोत असे ज्ञानदेवांनी स्पष्ट केले आहे आणि त्यासाठी संस्कृतइतकीच श्रेष्ठ परंतु संस्कृतपेक्षा सुलभ अशी मराठी भाषा आपण वापरीत आहोत असेही ते म्हणतात–

**याकारणें मियां । गीतार्थ मऱ्हाठीया ।**
**केला लोकां यया । दिठीचा विषो ।**
**परी मऱ्हाठे बोल रंगे । कवळितां पैं गीतांगें ।**
**तैं गातयाचेनि पांगें । येकाढता नोहे ।**



**म्हणौनिं गीता गावों म्हणे । तैं गाणिवें होती लेणें ।**
**ना मोकळे तरी उणें ।**
**गीताही आणित ।।** (अ.१८, १७३५, १७३६ व १७३७)

संस्कृत न येणाराही गीता समजावून सांगू शकेल कारण त्याला आपली भाषा आणि ओवीबंध अलंकारस्वरूप ठरतील. निवृत्तिनाथांनी सर्वांसाठी म्हणूनच आपल्याला कारणीभूत करून संस्कृत भाषारूपी कठीण किनारे फोडून मराठी भाषेतील शब्दरूपी पायऱ्यांचा घाट बांधला (अ.११, ९) विषयाची आवड असलेल्या सर्वांना मराठी भाषेतील प्रवचनाने आनंदाचा सुकाळ होईल. (अ.११, १४) म्हणूनच व्यासांची पदे पाहता पाहता त्यांनी मराठी भाषेतून श्रोत्यांपर्यंत पोहोचविली आहेत. ज्ञानदेव विनयशीलतेने परंतु आत्मविश्वासपूर्वक असे सांगतात. एकूण ज्ञानदेवांनी ब्रह्मविद्येचा सुकाळ सर्व लोकांना व्हावा या हेतूने लोकभाषेमध्ये साहित्यनिर्मिती केलेली दिसते.

आता एक गोष्ट खरी की लोकभाषेचा म्हणजे मराठी भाषेचा वापर करतानाही ज्ञानदेवांनी हे स्पष्ट केले, की जी भाषा आपण वापरतो त्याच भाषेमधून साहित्यसौंदर्य प्रकट करण्याचा आपण आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. अर्थात या गोष्टीसाठी ज्या भाषेत आपण साहित्यनिर्मिती करणार, त्या भाषेविषयीचा रास्त अभिमान आणि आत्मविश्वास साहित्यिकाच्या मनात असल्याशिवाय साहित्यसृजन शक्य नाही. त्याचबरोबर अशा रीतीने लोकभाषेचा वापर करताना पारंपरिकता सोडल्यामुळे ज्या लोकांसाठी आपली साहित्यनिर्मिती घडत आहे किंवा ज्या लोकांपुढे साहित्य मांडण्याची आपली इच्छा आहे त्यांनी दुर्लक्ष करता कामा नये; तर जाणीवपूर्वक त्यातील आनंद लुटण्यासाठी सिद्ध झाले पाहिजे असेही ज्ञानदेवांना वाटते. मराठी भाषेविषयीचा आपला आत्मविश्वास प्रकट करताना त्यांनी

**माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेही पैजासी जिंके ।**
**ऐसी अक्षरे रसिकें । मेळवीन ।।** (अ.६, १४)

अशी ग्वाही स्पष्ट शब्दांत दिली आहे. मूळ संस्कृत ग्रंथ असतासुद्धा मराठी टीका वाचू लागले की मूळ ग्रंथ कोणता असा संभ्रम पडेल अशी समर्थ भाषा आपण वापरणार आहोत असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे आहे.

समर्थ, सुंदर भाषा म्हणजे कशा प्रकारची भाषा, या विषयीदेखील ज्ञानदेवांनी ठिकठिकाणी स्पष्ट अभिप्राय दिलेले दिसतात. त्यातून ललित साहित्याची भाषा कशा प्रकारची असावी याचे सूचन झालेले दिसते. भाषेचे लालित्य नेमके आहे तरी कशात? याचाही बोध यातून होईल. सरळ मराठी भाषेत आपण निवेदन

करू. बुद्धीला शब्दार्थ केवळ सहज कळेल व केवळ अक्षरांच्या शोभेनेच इंद्रियांना समाधान मिळेल. मराठी भाषेच्या सौंदर्याने इंद्रिये आनंदाच्या किंवा सुखाच्या राशीवर राज्य करतील. ज्या सिद्धान्तापुढे शब्द नाहीसे होतात, ते सिद्धान्त सुंदर रीतीने आपण मांडू व व्यापक अर्थप्रतीती घडविणारी सखोल शब्दयोजना आपण करू असे ज्ञानदेव आत्मविश्वासपूर्वक सांगतात –

**तिये अवधान द्यावें गोठी । बोलिजेल नीट मऱ्हाटी ।**
**जैसी कानाचे आधीं दृष्टी । उपेगा जाये ।।**
**बुद्धीचिया जिभा । बोलाचा न चाखतां गाभा ।**
**अक्षरांचियाचि भांबा । इंद्रियें जिती ।।** (अ.७, २०६ व २०७)
**तैसे देशियेचिया हवावा । इंद्रियें करिती राणिवा ।**
**मग प्रमेयाचिया गांवा । लेसा जाईजे ।।** ( अ.७, २०९)
**तो शांतुचि अभिनवेल । ते परियसा मऱ्हाठे बोल ।**
**जे समुद्राहूनि खोल । अर्थभरित ।।**
**जैसे बिंब तरी बचकें एवढें । परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडें ।**
**शब्दाची व्याप्ति तेणें पाडे । अनुभवावी ।।** (अ.४,२१४ व २१५)

संगीत आणि सुगंध यापेक्षाही अरुवार (सुकोमल) आणि नादमधुर शब्द आपण वापरू की जणू कानांना जिभा फुटतील (अ.६, १५), सर्व सुखे प्राप्त होतील असे शब्द आपण वापरू असे आश्वासन ज्ञानदेवांनी दिलेले आहे (अ.१३, ११५४ ते ११६२). वाक्यावाक्यांतून ज्ञान प्रकटेल आणि संपूर्ण अज्ञान नाहीसे होईल अशी वाक्यरूपी सूर्यकिरणे प्रकटवावी (अ.१०, १६३) असे त्यांना वाटते. भाषेच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्व शब्दाला दिलेले आहे आणि पदे-वाक्ये यांच्या द्वारे शब्द एकत्रितपणे ज्ञानसौंदर्य प्रकट करण्याचे काम करतात. परंतु अशा शब्दांना व पदांना एक लय असणे किंवा बंध असणे व तो बंध भाषा सौंदर्य वाढविणारा व सहजसुलभ परंतु औचित्यपूर्ण असला पाहिजे असे ज्ञानदेवांना वाटते. सहज सुलभतेचे परिमाण ज्ञानदेवांनी स्वीकारल्यामुळे लोकभाषेला लोकछंदामधून प्रकट करणे ज्ञानदेवांना औचित्यपूर्ण वाटले असणे स्वाभाविक आहे. म्हणूनच ज्ञानदेवांनी ओवी हा खास मराठी छंद आपल्या काव्यासाठी स्वीकारला. श्रीकृष्णाने संस्कृतात नागरबोलांमध्ये जे अर्जुनाला निवेदिले ते आपण ओवी बंधामधून सहज प्रकट करू असे ज्ञानदेव आत्मविश्वासाने म्हणतात–

**आता अर्जुनेंसी मुकुंदे । नागर बोलिजेल विनोदें ।**
**तें वोंवियेचेनि प्रबंधे । सांगेन मी ।** (अ.६, ४९७)



आपल्या या ओव्या साहित्यालंकार ठरतील असा त्यांना विश्वास आहे (अ. १०, ४२).

**तैसी गाणिवेने मिळवी । गीतेवीणही रंगु दावी ।**
**तो लाभाचा बंधु ओंवीं । केला मियां ।।**
**तेणें आबालसुबोधें । वोवीयेचेनि बंधें ।**
**ब्रह्मरससुस्वादें । अक्षरे गुंथिलीं ।।** (अ.१८, १७४१ व १७४२)

अशा प्रकारे ज्ञानदेवांनी आपल्या ओवीबंधाविषयी किंवा मराठी छंदाविषयी विशेष अभिमान व आत्मविश्वास प्रकट केला आहे.

शब्द, वाक्य आणि पदबंध यांचा औचित्यपूर्णतेचा उच्चार ज्ञानदेवांनी केला; परंतु भाषा ही स्वाभाविकपणे वापरली गेली पाहिजे, त्यात अर्थ, भाव, रस व अलंकार यांची रेलचेल झाली पाहिजे आणि त्यातून अतिशय आत्मीयतेने विषय प्रतिपादिला गेला पाहिजे; कारण मूलत: साहित्य हा परतत्त्वाचा विकास आहे. म्हणजे बीजाचा ज्या प्रमाणे वृक्षरूप विकास होतो; पाने, फुले, फळे यांचा बहर येतो व त्या सर्वांत बीज सामावलेले दिसते, तसे आत्म्याला झालेला परतत्त्वाचा साक्षात्कार हा स्वभावत: भाषारूप होऊन साहित्यप्रबंधाच्या स्वरूपात प्रकटतो असे ज्ञानदेवांना वाटते. ज्ञानदेवांना साहित्य हा व्यक्तित्वाचा, आत्मतत्त्वाचा विकास आहे असे म्हणावयाचे आहे असे म्हणता येईल.

पूर्वसूरींच्या संस्कारांचा ठेवा श्रीगुरुंनी व्यक्तीपर्यंत पोहोचविला त्यामुळे व्यक्तित्व घडले, असेही ज्ञानदेव स्पष्ट करतात असे दिसते. साहित्यिकास गणेश, शारदा, गुरू यांचा प्रसाद मिळाल्याने साहित्य निर्मिती घडते हे ज्ञानदेवांनी आवर्जून प्रतिपादिले असले, तरी आत्मसाक्षात्कारामुळे म्हणजे प्रत्यक्ष परतत्त्वाच्या अनुभवाशिवाय किंवा चैतन्यतत्त्वाच्या दर्शनाशिवाय किंवा निर्मळ निरपेक्ष सौंदर्याच्या प्रचितीशिवाय किंवा सोलीव सुखाच्या अनुभूतीशिवाय, त्या तत्त्वाच्या ओंकारस्वरूपाचा विकास होत नाही. त्यामुळे साहित्य हे साक्षात्कारी व्यक्तीच्या साक्षात्काराचे स्वाभाविक प्रकटीकरण असते. स्वाभाविकच त्या साहित्यिकाचे व्यक्तित्व म्हणजेच आत्मतत्त्व त्यात प्रकटते. साहित्यिकाचे ज्ञान, बुद्धी, जाणीव, स्वभाव, त्याला झालेली अनुभूती आत्मतत्त्वाच्या साक्षात्काराने, आनंदनिर्भरतेने प्रकट होत असते. त्यामुळे साहित्याला एक आगळ्या ढंगाचे चैतन्यपूर्ण स्वरूप प्राप्त झालेले असते, असे ज्ञानदेवांना वाटत असावे असे म्हणता येऊ शकेल. माणसाचे व्यक्तित्व त्याच्या शैलीतून प्रकटते. त्याचे व्यक्तित्व म्हणजे त्याची साहित्यगत शैली, असा आधुनिक विचार ज्ञानदेवांच्या प्रवचनामधून सातत्याने

प्रकट होत गेला आहे असे म्हणता येऊ शकेल. त्याचबरोबर कालमान आणि परिस्थित्यनुरूप प्रचलित लेखनपद्धती स्वीकारावी लागते हेही ज्ञानदेवांना मान्य आहे. परंतु केवळ लेखनाची बाह्य पद्धती एवढाच त्यांचा विचार मर्यादित नाही, तर साहित्याच्या एकूणच प्रकटीकरणाचा संबंध साहित्यिकाच्या आत्म्याशी व त्याच्या मन आणि पंचेंद्रियांशी आहे, असे ज्ञानदेवांना वाटत असल्यामुळे आणि साहित्याचे असे प्रकटीकरणही आपण ज्या समाजामध्ये राहतो त्याला अनुकूल असे असले पाहिजे, असा त्यांचा आग्रह असल्यामुळे, त्यांनी 'साहित्य रेखा' ही कल्पना अतिशय व्यापक स्वरूपात मांडली. ही कल्पना आधुनिक विचारसरणीतील (style) स्टाइल ह्या इंग्रजी संकल्पनेपेक्षाही कदाचित अधिक व्यापक आणि अधिक सर्वांगीण आहे असा दावा करता येऊ शकेल. 'मराठीचे साहित्यशास्त्र' या ग्रंथात 'रेखा' या उल्लेखामध्ये डॉ. मा. गो. देशमुख यांनी केलेली चर्चा या दृष्टीने उपयुक्त आणि महत्त्वाची वाटते. त्यातील काही भाग येथे मुद्दाम द्यावासा वाटतो. रेखा म्हणजे रसाविष्कार करण्याची शैली. चवथ्या अध्यायाच्या उपसंहारात ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांना उद्देशून पुढील उद्‌गार काढले आहेत–

**जेथ साहित्य आणि शांति । हे रेखा दिसे बोलती ।**
**जैसी लावण्यगुणकुळवती । आणि पतिव्रता ।।** (अ.४,२१८)

ज्याप्रमाणे एखादी तरुणी सौंदर्यगुणयुक्त असून शिवाय पतिव्रता आहे, त्याप्रमाणे ही बोलण्याची रेखा साहित्य आणि शांतरस यांच्यामुळे दिसत आहे. या ठिकाणी ज्ञानेश्वरांनी रेखा ही काव्यातील साहित्य आणि शांतरस यांना बोलके करणारी अर्थात त्यांचा आविष्कार करणारी दिसते, असे सुचवून बोलती रेखा म्हणजे बोलण्याची शैली ही साहित्य आणि शांती यांना ही अभिव्यक्त करते, असा आशय ध्वनित केला आहे. पूर्वी सांगितल्याप्रमाणे येथे युवतीच्या सौंदर्यगुणांप्रमाणे साहित्य ही काव्यरेखेची बाह्यशोभा असून पातिव्रत्य या आत्मगुणाप्रमाणे शांत 'रस' हा तिचा आत्मा आहे, हा ध्वनित अर्थदेखील अतिशय सूक्ष्म व मनोज्ञ रीतीने व्यक्त केला आहे. या ओवीत रेखा हा शब्द बोलण्याच्या शैलीला उद्देशून योजलेला असून बोलण्याच्या शैलीतून साहित्य आणि शांत रस हे व्यक्त होतात असे ध्वनित केल्यामुळे रेखा म्हणजे साहित्य व रस यांचा आविष्कार करण्याची शैली ठरते.

ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात प्रारंभीच अमृतातेही पैजेसी जिंकणाऱ्या 'रसाळ अक्षरां' चे वर्णन केल्यानंतर ज्ञानेश्वर म्हणतात–



**नवल बोलतीये रेखेची वाहणी ।**
**दावितां डोळ्यांही पुरों लागे धणी ।**
**ते म्हणति उघडली खाणी । रूपांचि हे ।।** (अ.६, १८)

काय नवल सांगावे, बोलण्याच्या रेखेचा प्रवाह डोळ्यांना दाखविला तर त्यांची देखील इच्छा (आणि आयणी) परिपूर्ण होते व ते म्हणतात, 'तेथे सौंदर्याची खाण उघडली आहे की काय?' या ओवीत रेखा ही 'वाहाणी' या शब्दाशी अन्वित झाली आहे. त्यामुळे वरील दोन ओव्यांतून तिचा जो शैली असा अर्थ केला त्याचाच पाठपुरावा होतो. शिवाय येथील आधीचे वर्णन रसिक अक्षरांचे असल्यामुळे रेखा म्हणजे रसाविष्कार करण्याची शैली हा अर्थ निश्चित होतो (पृ.१८६/८७). या विवेचनाबरोबरच 'रेखेच्या विवेचनावरील विद्वच्चर्चा' या मथळ्याखालील विवेचनात श्री. ना. कृ. दिवाणजी आणि डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्या अनुक्रमे 'वऱ्हाड शाळा-पत्रक' (अमरावती दिवाळी अंक, १९४२) आणि 'ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ती' या दोन लेखांच्या उल्लेखांमधील अवतरणाचा उल्लेख केला आहे तो वरील विवेचनास पुष्टी देणारा आहे. ना. कृ. दिवाणजी यांनी ज्ञानेश्वरांनी जी रेखा ही संस्कृत साहित्यशास्त्रात व काव्यवाङ्‌मयात कुठेही न आढळणारी साहित्यशास्त्रीय स्वतंत्र अशी संज्ञा आपल्या सौंदर्यवादी प्रतिभेने निर्माण केली असा अभिप्राय दिला. डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी 'ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ति' या ग्रंथात 'बोलतीये रेखेची वाहणी' या मथळ्याखाली ही संज्ञा साहित्यशास्त्रीय परिभाषेनुसार वापरली आहे, असे मत देऊन रेखेतून शैलीचे सौंदर्य निर्माण होत असते असा निष्कर्ष काढला आहे. डॉ. मा. गो. देशमुख यांनी केलेली ही चर्चा ज्ञानदेवांची शैलीविषयक कल्पना समजावून घेण्यास उपयुक्त आहे. ज्ञानदेवांना संस्कृत साहित्यशास्त्राविषयीचे ज्ञान असावे असे अनेक उल्लेखांवरून आणि विशेषतः रसचर्चेवरून दिसत असले तरी ज्ञानेश्वरांची साहित्यशैलीविषयीची काही ठाम मते असावीत आणि त्यानुसारच त्यांनी आपला साहित्य प्रपंच केला असावा हे ध्यानी येते.

ज्ञानेश्वरांच्या साहित्यशैलीविषयी मत समजून घेतल्यानंतर त्यांच्या साहित्यलेखनात अर्थात ज्ञानेश्वरीत आलेल्या शैलीविषयक उद्‌गारांवरून त्यांच्या शैलीचे स्वरूप कसे स्पष्ट होते, हे समजावून घेण्याचा प्रयत्न करू या. शैलीस्वरूप समजावून घेताना स्वाभाविकपणे भाषास्वरूपही अधिक स्पष्ट होऊ शकेल.

ज्या पद्धतीने रसिकाच्या चित्तास सहज बोध होईल अशा प्रकारचे निवेदन करावे. श्रोता (रसिक वाचक) समजू शकेल अशा कौशल्याने निवेदन करावे, असे

ज्ञानदेवांचे मत दिसते.

**अर्जुना जेणें भेदें । तुझें कां चित्त बोधे ।**
**तैसें तैसें विनोदें निरूपिजेल ।।** (अ.५, १७६)

पूर्व दिशेला सूर्य उगवला असता सर्व दिशांचा अंधार ज्याप्रमाणे नाहीसा होतो त्याप्रमाणे शब्दांतून अर्थभाव छटा स्पष्ट होऊन रसिकाला कलावंताच्या मनात प्रकाशित झालेले सौंदर्यबिंब अवगत व्हावे (अ. ५, ८६). अतिशय रसाळपणाने साहित्य प्रकट होत जावे म्हणजेच भाषा अशा पद्धतीने वापरावी की जणू अमृताचा वर्षाव होतो आहे. भाषेच्या माधुर्यापुढे आणि भावस्पर्शतेपुढे संगीत आणि सुगंधही माघारा फिरतील. या रसाळ भाषेचा आस्वाद घेताना पंचेंद्रियांमध्ये चढाओढ, भांडण लागेल. शब्द हा खरे तर कानांनी ऐकण्याचा विषय असतानाही, रसनेला (जिभेला) तो रस विषय (चव घेण्याची वस्तू) वाटेल, नाकाला तो सुगंधरूपाने अनुभवावा असे वाटेल. बोलांची म्हणजेच शब्दांची म्हणजेच भाषेची शैली (सारणी / पद्धती) अशी असावी की जणू रूप कोठार उघडले आहे असे वाटेल. जेथे वाक्ये किंवा पदे निर्माण होऊन येतात तेथे त्या पदांना, शब्दांना मनात साठविण्यासाठी पदातील भावपूर्णता आपणास भिडावी म्हणून अंत:करण बाहेर धावेल. एवढेच नव्हे तर त्या भाषेला कवटाळावे, आलिंगन द्यावे म्हणून बाहू पुढे सरसावतील. याप्रमाणे सर्व इंद्रिये आपापल्यापरीने आस्वाद घेण्यास उत्सुक, आतुर असतील व त्यांच्यात स्पर्धा चाललेली असेल तरीसुद्धा साहित्यिकाची साहित्यशैली, प्रकटीकरणातील औचित्य, सर्वच इंद्रियांचे सारखेच समाधान करू शकेल आणि शब्दांचे हे व्यापकपण लक्षात घेऊन रसिकांना उदंड आनंद मिळेल. एकूण रंग, रूप, नाद, गंध, स्पर्श या गोष्टी एकाच कसोटीवर उतरवून; निर्मिलेले साहित्य वैभवाने आणि सौंदर्याने वाचक, रसिक, श्रोता पूर्ण समाधानी होईल असे साहित्य आपणाकडून प्रकट होवो असे ज्ञानदेवांना वाटते (अ.६, १४ ते २१). साहित्याच्या प्रकटीकरणाने साहित्याच्या, साधकाच्या, अभ्यासकाच्या, रसिकाच्या मनात अष्टसात्त्विक भाव दाटून यावेत अशी अपेक्षा ज्ञानदेव करतात, त्यामुळे रसिकाची इंद्रिये सौंदर्याच्या राज्यावर बसतील असे साहित्य प्रकटावे असे ज्ञानदेवांना वाटते. परतत्त्वस्पर्शानुभूतीतूनच साहित्य प्रकट होत जाते, असे ज्ञानदेवांचे मत असल्याने ते परतत्त्व खरे तर अनिर्वचनीय असून केवळ जाणविण्याची गोष्ट आहे. परंतु ही जाणीव स्पष्ट होण्यासाठी जसा बीजाचा वृक्षात विकास होऊन अखेर बीजरूपाचा साक्षात्कार घडतो तसा साहित्याच्या विस्तारातून परतत्त्व अनुभूती घडू शकते, म्हणूनच साहित्याची शैली ही –



**तेणें कारणें मी बोलेन । बोलीं अरूपाचें रूप दावीन ।**
**अतींद्रिय परि भोगवीन । इंद्रियांकरवीं ।।** (अ.६, ३६)

अशा प्रकारची असावी. ज्ञानेश्वरांनी आत्मविश्वासपूर्वक अशा प्रकारच्या शैलीने साहित्यसृजन करीन असे म्हटले आहे.

साहित्यशैलीचे असे स्वरूप उघड करीत असताना ज्ञानदेवांनी आपल्या काव्याविषयीच्या अपेक्षा प्रकट करून अधिक तपशीलवार विचार केलेला आहे असे दिसते. शब्दरूप विषय बुद्धीला आकलन करता येवो आणि अशा बुद्धीला काव्य स्फुरो अशी अपेक्षा ज्ञानेश्वर करतात–

**हे वाक्सृष्टि एके वेळे । देखतु माझे बुद्धीचे डोळे ।**
**तैसा उदैजो जी निर्मळें । कारुण्यबिंबें ।।**
**माझी प्रज्ञावेली वेल्हाळ । काव्यें होय सुफळ ।**
**तो वसंतु होय स्नेहाळ– । शिरोमणी ।।** (अ.१४, २० व २१)

आणि ही अपेक्षा व्यक्त करून सहजता आणि उत्स्फूर्तता या गुणांकडे लक्ष वेधतात. शब्दसृष्टीतील अवघे सारस्वत उत्स्फूर्तपणे उदयाला यावे असे त्यांना वाटते. त्याद्वारा नवरस सेवेला हजर होतील असे रसाळ साहित्य बाहेर पडावे अशी त्यांची अपेक्षा आहे.

**जयांचेनि आठवें । शब्दसृष्टी आंगवे ।**
**सारस्वत आघवे । जिव्हेसि ये ।।**
**वक्तृत्व गोडपणें । अमृतातें पारु म्हणे**
**रस होती वोळगणें । अक्षरांसी ।।**
**भावांचे अवतरण । अवतरविती खूण ।**
**हाता चढे संपूर्ण । तत्त्वभेदें ।।** (अ.१३, २ ते ४)

हे या वरील ओव्यांमधून स्पष्ट होईल. मलयपर्वतावरील वारा जसा स्वभावत:च मंद, सुगंधित असतो अशा वाऱ्याला दैवयोगाने अमृताची गोडी आणि सुस्वर प्राप्त झाला तर तो आपल्या स्पर्शाने सर्व शरीर शांत करील. तशी स्पर्श करणारी व समाधान देणारी शैली ज्ञानदेवांना अभिप्रेत दिसते. त्याकरिता जी भाषा साहित्याला अलंकृत करील व अमृताला आपल्या गोडपणात मागे सारील अशा अपूर्व सुंदर अशा लोकभाषेत काव्य निवेदिताना चंद्रावतरण करणारी शांतता मिळवून देणारी शक्ती शब्दांत प्रकटेल, रसातील रंगांच्या मोहक शक्तीने नादब्रह्मास लोपवेल, एवढेच नव्हे तर पिशाच्यांनाही सात्त्विकभाव प्रकटवेल. शुद्ध अंत:करणाच्या लोकांना समाधी लागेल (तल्लीन होतील) असा वाग्विलासाचा

विस्तार आपण करू व आपल्या विषयातील महदार्थाने सर्व विश्व भरून टाकू. आपल्या विषयातील महद् अर्थ म्हणजे परतत्त्वस्पर्श, सौंदर्यतत्त्व, सोलीव सुख, आत्मानंद, अद्वैत-अनुभूती, अशा स्वरूपात असल्याने तो निरपेक्ष ब्रह्मानंदाचा विषय आहे; असे ज्ञानदेवांना म्हणावेसे वाटते असे दिसते, म्हणूनच आपल्या शैलीने साहित्यातून आपण जगाला आनंदाचे आवार मांडू असे ज्ञानदेव म्हणतात. सर्व संशय फिटून जाऊन ब्रह्मज्ञानाची प्राप्ती व्हावी, म्हणजेच सूक्ष्म सौंदर्याची जाणीव व्हावी व त्यामुळे प्रत्यक्ष परतत्त्व, परमेश्वर, आत्मतत्त्व, डोळ्यांना दिसो, म्हणजेच प्रत्यक्ष सौंदर्य डोळ्यांना दिसो व सुखाचा उत्सव सुरू होवो. आपली शैली मर्म स्पष्ट करणारी असल्याने शब्दांतून उपमा व काव्य (लयबद्धता) (कल्पनाविलास) यांची रेलचेल होईल. जेवढे विस्तृत निवेदन किंवा प्रकटीकरण होईल ते सगळेच रसिकमान्य होऊ शकेल. प्रतिभेच्या प्रसादाने समृद्ध अशी ही साहित्यनिर्मिती असल्याने आपल्या बोलण्याने नवरसांचा वर्षाव होईल अशा खुबीने, शैलीने (आत्मप्रकटीकरण करीत) ग्रंथ निवेदन करू असे ज्ञानदेव आत्मविश्वासाने सांगतात. या सर्व गोष्टी आपणास गुरुप्रसादाने प्राप्त होतील आणि आपला विषय गीतार्थ हा असल्यामुळे साहित्य वरील प्रकारे निपजेल असे ज्ञानेश्वरांनी म्हटले असले तरी साहित्यशैलीची त्यांना अभिप्रेत असलेली वैशिष्ट्ये आपोआपच स्पष्ट झाली आहेत. साहित्यसृजन हे शैलीच्या म्हणजे 'शब्द' आणि 'रेखा' यांच्या माध्यमातून होत असल्याने आत्म्याशी व आत्मानुभूतीशी 'शब्द' आणि 'रेखा' यांची असलेली एकरूपता ज्ञानदेवांना अभिप्रेत आहे असे म्हणता येईल; त्याचबरोबर या माध्यमाचा विचार जसा साहित्यिकाच्या बाजूने करावयास हवा त्याहीपेक्षा तो रसिकाच्या बाजूने अधिक व्हावा, असे ज्ञानदेवांचे मत होते हेही स्पष्ट आहे. साहित्य हे मुळी आस्वादकांसाठीच प्रकाशित करावयाचे असते असे ज्ञानदेवांचे ठाम मत दिसते. अलीकडे आपण 'शैलीविज्ञान' म्हणून साहित्यातील शब्दार्थ व मांडणी यांच्या बाजूने विचार करू लागलो आहोत. या दृष्टीने भाषा आणि बंध या संदर्भातील ज्ञानदेवांचा विचार सूचक आहे. शैली साहित्यिकाच्या साहित्याबरोबरच म्हणजे आत्मसाक्षात्काराबरोबरच उत्स्फूर्त असली तरीसुद्धा त्यातील औचित्याविषयीचे भान साहित्यिकाने सतत बाळगले पाहिजे, असे ज्ञानदेवांना वाटते.

शैली आणि भाषेच्या संदर्भात सर्वाधिक महत्त्व सहजता, उदारता किंवा सोपेपणा, प्रासादिकता यांना आहे, असे ज्ञानदेवांना वाटत असावे असे वाटते. म्हणून 'मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळ' करण्यासाठी 'मराठीचि बोलु', ओवीबंधातून मांडण्याचा ज्ञानेश्वरांचा आग्रह दिसतो, तर आपल्या शैलीने आपले



साहित्य सहज अनुभविता येईल, असा ज्ञानदेवांना विश्वास वाटतो.

**अर्थ बोलाची वाट पाहे । तेथ अभिप्रावो अभिप्रायातें विये ।**
**भावांचा फुलौरा होत जाये । मतिवरी ।।** (अ.९, २७)

या चर्चेतून असेही लक्षात येऊ शकेल की भाषा आणि शैली या दोन्ही गोष्टी एकत्रितपणे विचारात घेणेच ज्ञानदेवांना अभिप्रेत आहे. कारण शैली ही केवळ एक पद्धती नसून परतत्त्वस्पर्शानुभूतीचा शब्दांत घडणारा विस्तार आहे. म्हणूनच साहित्यातून साहित्यिकाचे अंत:करणच प्रकट होत जाते. तो त्याच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचा विकास आहे, प्रकर्ष आहे असे ज्ञानदेवांच्या विचारातून स्पष्ट होत जाते असे म्हणता येईल.

## आठ

# साहित्यास्वाद

साहित्यास्वाद म्हणजे साहित्यातील आनंदाची अनुभूती घेणे किंवा घडणे, अथवा साहित्याच्या आस्वाद्यतेतून मिळणारा आनंद होय, असे म्हणता येईल. ज्ञानेश्वरीत साहित्याच्या आस्वादाच्या संदर्भात चर्चा घडलेली आहे. येथे साहित्याच्या आस्वादाची अनुभूतिप्रक्रिया कोणत्या स्तरांवर कशी घडते हे पाहावयाचे आहे. या विषयी काही विचार ज्ञानेश्वरांनी व्यक्त केले आहेत असे दिसते. ते समजावून घेण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. हा प्रयत्न दोन बाजूंनी करता येतो व तसा करणे आवश्यक आहे असे वाटते. एक म्हणजे साहित्यिकाला मिळणारा किंवा घडणारा आस्वाद, आणि दुसरी बाजू म्हणजे रसिकाला मिळणारा किंवा घडणारा आस्वाद. या दृष्टीने विचार करू लागलो की पुन्हा आपण येऊन पोहोचतो ते साहित्यिक साहित्यसृजन का करतो या प्रश्नाजवळ. यामध्ये साहित्यिकाला कोणत्या प्रकारची आनंदानुभूती येते? साहित्यिकाचा साहित्य- निर्मितीचा एवढा खटाटोप का? 'साहित्यप्रयोजन' या प्रकरणात साहित्य कारणे, साहित्य फल परिणाम, अपेक्षा या विषयी चर्चा करीत असताना सर्वश्रेष्ठ कारण परतत्त्वस्पर्श होय आणि सर्वश्रेष्ठ फल, परिणाम, अपेक्षा परतत्त्वस्पर्शानुभूतीने होणारा केवलानंद होय. या दोन्ही गोष्टींचा विचार करताना ज्ञानेश्वरांच्या परतत्त्वस्पर्शवादातच याचे अधिक स्पष्टीकरण होऊ शकते असे दिसते.

साहित्यिकाला साहित्यास्वाद तीन स्तरांवर घडतो असे म्हणता येईल. ज्ञानदेवांच्या बाबतीत या तीन स्तरांच्या संदर्भात विचार केला तर काय दिसते? ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वरी म्हणजेच गीतेवरील टीका लिहावयास सिद्ध झाले आहेत म्हणजे साहित्यसृजनास सिद्ध झाले आहेत. का? या प्रश्नाची अनेक उत्तरे आहेत. गीतेतील



तत्त्वज्ञान सामान्य लोकांपर्यंत पोहचवावे आणि निवृत्तिनाथांची आज्ञा, ही दोन उत्तरे सरळच लक्षात येतात. परंतु तेवढीच उत्तरे आहेत काय ?

'ब्रह्मविद्येचा सुकाळ' करावयास निघालेले ज्ञानेश्वर 'आनंदाचे आवार सर्वांसाठी मांडू' इच्छितात हे का? तर गुरू आणि गणेश यांच्या कृपाप्रसादाने त्या ब्रह्मविद्येचे ज्ञान ज्ञानेश्वरांना झालेले आहे, परतत्त्वाचा साक्षात्कार त्यांना झाला, अद्वैताचा अनुभव त्यांना घडला, त्यांना ज्ञानमय अवस्था प्राप्त झाली. त्या परतत्त्वाचा साक्षात्कार पुनःपुन्हा घडतो आहे असा अनुभव ज्ञानेश्वरांना गीता ग्रंथातून येतो आहे असे दिसते. गीतेत परतत्त्वाचाच विकास बीजवृक्ष न्यायाने झाला आहे. त्यामुळे परतत्त्वाचा स्पर्श घडविणारे असे साहित्यसृजन व्हावे असे ज्ञानदेवांना वाटते. अर्थात असे परतत्त्वस्पर्श घडविणारे साहित्य त्यांच्या परतत्त्वस्पर्शानुभूतीतून प्रकट होऊ लागते.

ज्ञानेश्वर सिद्ध आत्मानुभूती योगी होते, तत्त्वज्ञ होते, संत होते, त्याचप्रमाणे ते सिद्ध सरस्वतीचा प्रसाद मिळालेले अर्थात प्रतिभावंत कवीही होते. गुरुपरंपरेकडून त्यांना शब्दब्रह्माचे ज्ञान झाले होते. निरपेक्ष आत्मतत्त्वाचा आनंद घेणे, परतत्त्व डोळ्याने पाहणे किंवा आत्मा आणि परमात्मा किंवा विश्वात स्फुरणारे चैतन्य यांचे अद्वैत पाहणे, चराचरातील आत्मतत्त्व शोधणे आणि चराचराशी आपले असलेले अद्वैत अनुभवणे हा ध्यास त्यांच्या अंतःकरणाला लागलेला होता. येथे हे परतत्त्व, विश्वचैतन्य म्हणजेच अलौकिक, शुद्ध, सोलीव निरपेक्ष, निखळ सौंदर्य होय आणि त्याचा वेध ज्ञानदेव घेत निघाले आहेत.

**दिसो परतत्त्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा ।**
**रिघो महाबोध सुकाळा । माजीं विश्व ।।** (अ.१३, ११६१)

अशी त्यांची भूमिका आहे. त्यामुळेच –

**या उपाधिमाजीं गुप्त । चैतन्य तैसे सर्वगत ।**
**तें तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती ।।** (अ.२, १२६)

असा ज्ञानदेवांचा दीर्घोद्योग सुरू होता. त्या चैतन्यतत्त्वाविषयी चाललेला कृष्णार्जुनातील संवाद ते वाचीत होते आणि श्रीकृष्णमुखीच्या बोलातून त्यांना आत्मबोध किंवा परतत्त्वस्पर्शाचा वारंवार अनुभव होत होता. त्यामुळे ब्रह्मविद्येने भरलेले, म्हणजेच आत्मानुभव घेणारे त्यांचे हृदय ब्रह्मानंदाने भरून जात होते. ही स्थिती जरी गुरुप्रसादाने प्राप्त झाली तरी आत्मज्ञानाने ज्ञानेश्वर पूर्ण समाधानी झाले. सोलीव सुखाचा, केवलानंदाचा ठेवाच जणू त्यांना सापडला.

**जैसे डोळ्यां अंजन भेटे । ते वेळी दृष्टीसी फांटा फुटे ।**
**मग वास पाहिजे तेथ प्रगटे । महानिघी ।**
**कां चिंतामणी जालया हातीं । सदा विजयवृत्ती मनोरथी ।**
**तैसा मी पूर्ण काम निवृत्ती । ज्ञानदेवो म्हणे ।।**
**म्हणोनि जाणतेनो गुरु भजिजे । तेणें कृतकार्या होईजे ।**
**जैसे मूळ संचने सहजें । शाखापल्लव संतोषती ।।**
**कां तीर्थे जियें त्रिभुवनीं । तियें घडती समुद्रावगाहनीं ।**
**ना तरी अमृतरसस्वादनीं । रस सकळ ।।**
**तैसा पुढत पुढती तोचि । मिया अभिवंदिला श्रीगुरुचि ।**
**जी अभिलाषित मनोरुचि । पुरविता तो ।।**
(अ. १, २३, २४, २५, २६, २७)

डोळ्यांत अंजन घातल्याने जशी दिव्यदृष्टी प्राप्त होते तशी श्रीगुरुंच्या योगाने (कृपाप्रसादाने) आपली सर्व मनोरथे पूर्ण झाली आहेत असे परोपरीने ज्ञानदेव पटवून देतात. म्हणजेच त्यांना झालेल्या आत्मसाक्षात्काराचे प्रकटीकरण करतात, परतत्त्वस्पर्श घडल्याबद्दल निवेदन करतात असे दिसते. येथे परतत्त्व– स्पर्शानुभूतीची उत्कट, निरामय, केवल, निरपेक्ष, निखळ आनंदाची अनुभूती घडते असे म्हणता येईल. हा आनंद साहित्यनिर्मितीपूर्व साहित्याचा आस्वाद असे म्हणता येईल. अर्थात हा केवळ कलावंताला किंवा साहित्यिकालाच मिळतो. परंतु गीतेत मांडलेला आणि ज्ञानदेवांनी स्वीकारून विस्ताराने सांगितलेला साहित्यउत्पती सिद्धान्त फार महत्त्वाचा आहे. साहित्यनिर्मितीमध्ये त्यास विशेष महत्त्व आहे.

**पैं ब्रह्मबीजा जाहला अंकुरू । घोषध्वनी नादाकारू ।**
**तयांचे गा भुवन जो ॐ कारू । तोही मी गा ।।**
**जया ॐ काराचिये कुशी । अक्षरें होती अउमकारेंसी ।**
**जियें उपजत वेदेंसी । उठली तिन्ही ।**
**म्हणोनि ऋग्यजुः सामु । हे तीन्ही म्हणे मी आत्मारामु ।**
**एवं मीचि कुलक्रमु । शब्दब्रह्माचा ।।** (अ.९,२७५,२७६,२७७)

ब्रह्मरूपी बीजाला फुटलेला जो अंकुर व घोष (परा), ध्वनी (पश्यन्ती), नाद (मध्यमा), आकार (वैखरी) यांचे मंदिर असा जो ओंकार (तो मीच आहे असे श्रीकृष्ण म्हणजे प्रत्यक्ष परतत्त्व बोलले) त्या ओंकाराच्या पोटात अ, उ, म अशी अक्षरे होती व ती उपजताक्षणीच तिन्ही वेदांना घेऊन प्रकटली. म्हणजेच परतत्त्वाच्या पोटात शब्दब्रह्म आहे आणि परतत्त्वाच्या दर्शनाबरोबरच शब्दब्रह्म



प्रकटते म्हणून ज्ञानदेवांनी ओंकाराला स्वसंवेद्य म्हणून गौरविले आहे. त्यांच्या मते तो ओंकार

**ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।** (अ.१, १)

अर्थात तो ओंकार, आद्य स्वसंवेद्य, आत्मरूप आणि साहित्य सृजन करणारा आहे. त्या परतत्त्व दर्शनाचा आनंद आगळाच आहे. परंतु त्या बरोबर त्या ओंकाराच्या पोटातील शब्दब्रह्माच्या स्फुरणाने किंवा विस्ताराने – विस्तारत जाण्याने साहित्यिकाला आनंद जाणवल्याचा देखील आनंद मिळू लागतो आणि त्यातून जी साहित्यनिर्मिती होते त्याचा आस्वादही घेता येतो. म्हणजे साहित्यउत्पत्ती सिद्धान्तानुसार म्हणजेच परतत्त्ववादानुसार साहित्यिकाला, कलावंताला, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, चिंतक यांना त्रिस्तरांवर साहित्यास्वाद घडतो. (१) साक्षात्कारातील आनंद (२) स्फुरणातील आनंद (३) निर्मितीतील आनंद. परंतु एवढ्याने हे विवेचन पूर्ण होणार नाही; कारण ज्ञानदेवांच्या मते साक्षात्काराचा साहित्यनिर्मितिक्षणी पुन:पुन्हा अनुभव येत असतो. म्हणूनच साहित्यनिर्मितीची ऊर्मी साहित्यिकांमध्ये निर्माण होत राहते. त्याचबरोबर या साक्षात्काराचा प्रसंग, साहित्यसृजनाच्या सहाय्याने भोवतालच्या लोकांना अनुभवित करता येतो. या प्रक्रियेतील म्हणजेच परतत्त्वस्पर्शानुभूतीतील आनंदाची दिवाळी करण्यातील आनंद हा चौथ्या स्तरातील आस्वाद आहे असे म्हणता येईल. येथे सहजच हेही लक्षात येईल की साहित्यिकाला जेव्हा त्याचा वाचक भेटतो आणि तो साहित्याबद्दल सकौतुक समाधान व्यक्त करतो तेव्हा आनंद होतोच होतो; परंतु नवा विषय मांडण्याची प्रेरणाही प्राप्त होते. ज्ञानदेव प्रवचन करीत होते आणि समोरच्या श्रोत्यांना स्नेहार्द्र दृष्टीने अवधान देण्याची सतत विनंती करत होते. यामधून साहित्यिकाच्या चौथ्या स्तरावरील साहित्यास्वादाचा प्रत्यय येईल. ज्ञानदेवांनी रसिकांची थोरवी स्पष्ट करताना, तेच (रसिकच) साहित्याचे प्रेरक आहेत, म्हणून 'अवधान किजो वाढते । मनोरथा माझिया।' असे ते म्हणतात. (अ.९.२४) कारण तसे कल्याने

**कां जैं दाठिवा तुमचा वरुषे । तैं सकलार्थ सिद्धी मती पिके**
**एऱ्हवीं कोंभेला उन्मेषु सुके। जरी उदास तुम्ही ।।** (अ.९.२५)

येथे साहित्यनिर्मितीपूर्वीचा साक्षात्कार प्रसंग आणि स्फुरण प्रसंग हा केवळ आत्मगत संवाद असला किंवा आत्मनिष्ठ प्रत्यय असला तरी निर्मितिप्रक्रिया ही समूहनिष्ठतेकडे नेणारी आहे. 'परतत्त्व' हे सर्व चराचरसृष्टीत सामावलेले आहे म्हणून परस्परांना त्याची अनुभूती येते, हाही परतत्त्वस्पर्शच होय. येथेच आपण

ज्ञानदेवांच्या हृदयसंवादापर्यंत येतो. सहानुभूतीची चर्चा; जी मानसशास्त्रीय दृष्टीने केली जाते, त्याच प्रकाराचा अभिप्राय ज्ञानदेवांना व्यक्त करावयाचा असतो, असे म्हणता येईल. लोकसाहित्यातील सामूहिक आत्मप्रकटीकरण प्रक्रिया यामुळेच अनुभवास येते. पसायदानामध्ये 'भूतां परस्परे पडों । मैत्र जीवांचे ।।' ही व्यक्त केलेली अपेक्षा हीच गोष्ट सूचित करते असे वाटते.

परतत्त्वस्पर्श, परतत्त्वाचे स्फुरण आणि साहित्यनिर्मिती या अनावर प्रक्रियांमुळेच मोठ्या आत्मविश्वासाने स्वसाहित्याविषयीच्या अपेक्षा ज्ञानदेव व्यक्त करतात असे दिसते. साहित्यनिर्मितीविषयीचा आत्मविश्वास हा त्या अनुभूतीचा एक प्रकारे उद्गार असतो. 'अमृतातेंही पैजासी जिंके' अशी अक्षरे मिळवीन, 'आनंदाचे आवार मांडू', 'ब्रह्मविद्येचा सुकाळ करू', 'शृंगाराच्या माथा पाय देईल असा शांतरस निर्माण करू', 'इंद्रिया लागे कळंभा' असे साहित्य निर्माण करू, 'सर्व सुखे प्राप्त होतील' इत्यादी आत्मविश्वासपूर्ण उद्गार हे या साहित्यिकाच्या आनंदोर्मीचे, आस्वादप्रक्रियेचे दृश्यस्वरूप आहे असे म्हणता येईल. साहित्यिकाला घडणाऱ्या आस्वादाचे किंवा आनंदानुभूतीचे स्वरूप ज्ञानेश्वरांच्या कल्पनेप्रमाणे हे असे आहे. मानसशास्त्रीय स्तरावर, तत्त्वज्ञान स्तरावर, या आस्वादप्रक्रियेची संगती विशेष जाणवते असे म्हणता येईल.

रसिकाच्या बाजूने साहित्यास्वाद प्रक्रिया कशी घडते या विषयी देखील ज्ञानदेवांचे विचार अगदी स्पष्ट आहेत. ज्ञानेश्वरांनी रसिकांच्या अवधानाला विशेष महत्त्व दिलेले आहे. त्याचा परामर्श प्रथम घेऊ या. येथेही ज्ञानदेवांनी 'रसिक श्रोत्यांच्या' आस्वाद प्रक्रियेसंबंधी भाष्य केले आहे असे म्हणता येईल. येथे रसिक श्रोता म्हणजे साहित्यास्वादक होय. आस्वादक सर्वज्ञ जाणकार आणि प्रेमळ म्हणजे सहृदयी असला पाहिजे, ही किमान अपेक्षा ज्ञानदेवांनी प्रथम व्यक्त केली आहे व तसे असेल तर आस्वाद कसा घेता येईल, या विषयी अभिप्राय व्यक्त केला आहे. या दृष्टीने ज्ञानदेवांचे सुप्रसिद्ध उद्गार प्रथमतः विचारात घेऊ–

**तरी अवधान एकवेळें दीजे । मग सर्व सुखासि पात्र होईजे ।**
**हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड ऐका ।।** (अ.९, १)

अवधान दिले तर सर्व सुखे प्राप्त होतील हे खरे, परंतु हे अवधान म्हणजे ज्ञानदेवांना काय अभिप्रेत असावे? आस्वादक हा आस्वाद घेण्यास प्रवृत्त किंवा उत्सुक असला पाहिजे व अतिशय प्रेमपूर्वक आपली सर्वज्ञता म्हणजे आपला व्यासंग, चिंतन व ज्ञान यांच्यासह आस्वादानुभूतीस त्याने सिद्ध झाले पाहिजे असे ज्ञानदेवांना वाटते (अ.९, १ ते २६). श्रोत्यांना अवधान देण्याची विनंती परोपरीने करताना ज्ञानदेवांनी हेच स्पष्ट केले आहे. ज्ञानदेव म्हणतात –

**अवधानाचेनि हातें । नेयावे हृदयाआंतौते ।**
**हे रिझवितील आयणीतें । सज्जनांचिये ।।** (अ.६, ४९५)

सज्जनांनी अवधानाच्या हाताने शब्द हृदयात न्यावे. हे शब्द सज्जनांच्या बुद्धीला समाधान देतील म्हणूनच त्यांनी –

**तो म्हणे गा अर्जुना । अवधानाची सर्व सेना ।**
**मेळौनि इया ज्ञाना । झोंबावे हो ।** (अ.१४, ३९)

अवधानाची सर्व सेना घेऊन रसिकाने साहित्याला झोंबावे असे म्हटले आहे. यावरून असे लक्षात येईल की रसिक एकाग्र चित्ताने साहित्याकडे अवधान देऊ लागला की त्याला साहित्याचा आस्वाद घेता येईल. अवधानाच्या योगाने रसिकाची साहित्याशी एकचित्तता होऊ लागली की, स्वाभाविकपणे परतत्त्व– स्पर्शानुभूतीत साहित्यस्फुरण घडलेले असल्याने साहित्यात शब्द, पद, वाक्ये, अलंकार, बंध प्रमेय यांत सामावलेले किंवा विस्तारित झालेले परतत्त्व रसिकाच्या अंत:करणाला जाणवू लागते. म्हणजेच साहित्यिकाच्या हृदयातील आनंद साहित्याच्या माध्यमातून रसिकाच्या अंत:करणामध्ये साक्षात्कारित होऊ लागतो. येथेच ज्ञानेश्वरांच्या मते 'रससोहळा' घडतो. येथेच रसिक आनंदाच्या राशीवर बसतो. या संदर्भात पुन्हा एकदा या आनंदाचा अनुभव घेण्यासाठी शब्द जाणवून घेण्याची संधी इंद्रियांमध्ये कशी सुरू होते हे रसिकाच्या बाजूने पाहता येऊ शकेल. शब्द हा श्रवणाचा विषय असताना, रसना त्याचा रसविषय म्हणून अनुभव घेण्यास उत्सुक होईल. नाक त्यातील सुगंध लुटण्यास, तर डोळा शब्दरूप अनुभवण्यास उत्सुक होईल आणि शब्दातील भावार्थ जाणून घेण्यासाठी अंतः करण बाहेर धावेल, शब्दांना आलिंगन देण्यास बाहू सरसावतील. एकूण अशा प्रकारे रसिक अतींद्रियाचे सुख इंद्रियांद्वारे घेऊ लागेल. साहित्यातून अरूप अशा सौंदर्यतत्त्वाचे, परतत्त्वाचे रूप रसिकांच्या अंत:करणात स्पष्टपणे प्रकट होईल आणि रसिक आनंदसागरात डूब घेईल. ज्याप्रमाणे एकाच फळाचा आस्वाद, निरनिराळ्या इंद्रियांनी परंतु एकरूपतेने घेता येतो तसे शब्द, रस, गंध, रूप आणि स्पर्श ह्या एकाच ज्ञेयाच्या पाच प्रकारांनी रसिक आस्वाद घेतो असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे असते.

**तरी शब्द स्पर्श । रूप गंध रसु**
**हा पंचविध आभासु । ज्ञेयचा जो ।।** (अ.१८, ४७२)

रसिक पंचेंद्रियांनी परंतु एकरूपतेने आस्वाद घेत असताना त्याला परतत्त्वाचा

अनुभव क्रमाक्रमाने यावयास लागतो. रसिकाची साहित्याशी एकाग्रता झाली की त्याला साहित्याची अनुभूती क्रमाने परंतु एकदम व अनिवारपणाने येऊ लागते; येथेच साहित्यिकाशी त्याचा हृदयसंवाद घडूनच ही अनुभूती येत असते –

**अर्थ बोलाची वाट पाहे । तेथ अभिप्रावो अभिप्रायातें वियें ।।**
**भांवाचा फुलौरा होत जाये । मतिवरी ।।**
**म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे । तरी हृदयाकाश सारस्वतें वोळे ।**
**आणि श्रोता दुश्चिता तरी वितुळे । मांडला रसु ।।**

(अ. ९, २७ व २८)

ती याप्रकारे होय असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे आहे असे वाटते. या दृष्टीने रसाच्या मुळाशी असलेले तत्त्व म्हणजे– हृद्संवाद– याला ज्ञानदेवांनी खूप महत्त्व दिले आहे. रसानुभूती याचाच अर्थ साहित्यास्वाद असा घेता येऊ शकेल. हृदय संवादाला आस्वादप्रक्रियेत सर्वाधिक महत्त्व आहे, हे बहुधा आता सर्वांनाच पटले आहे, असे म्हणता येईल. साहित्यिक आणि रसिक समपातळीवर येण्याची आवश्यकता आस्वाद प्रक्रियेत असते, याकडे 'हृदयसंवाद' या शब्दाने ज्ञानेश्वरांनी लक्ष वेधले आहे असे म्हणता येईल. हा हृदयसंवाद म्हणजेच साहित्यिकाच्या साहित्याशी एकरूप होणे होय. अर्थात ही एकरूपता विशिष्ट मर्यादेपर्यंत असते. या संदर्भातील डॉ. मा. गो. देशमुख यांनी आपल्या 'मराठीचे साहित्यशास्त्र' या प्रबंधात (दु.आ. पृ. २३९ व ४०) केलेली चर्चा मौलिक आहे. ते लिहितात, 'वक्ता आणि श्रोता यांच्या हृदयसंवादाची पार्श्वभूमी रसनिष्पत्तीसाठी आवश्यक असली तरी हृदयसंवाद किंवा तादात्म्य एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच हवे.' ही मर्यादा ज्ञानेश्वरांनी–

**का आपुला ठा ॐ न सांडिता । आलिंगिजे चंद्रु प्रकटतां ।**
**हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणे ।।** (अ.१, ६०)

आपला ठाव न सोडता चंद्राचा अनुराग उपभोगणाऱ्या कुमुदिनीचा दृष्टान्त देऊन ग्रंथाची 'सेविती परि' (रसास्वाद पद्धतीत) सांगताना स्पष्ट केली आहे. हा हृदयसंवाद अत्यंत हळुवारपणाने झाला पाहिजे असे ज्ञानदेवांचे मत दिसते.

**जैसें शारदीयेचें चंद्रकळे । माजीं अमृतकण कोंवळे ।**
**ते वेंचिती मनें मवाळें । चकोर तलगें ।।**
**तियापरी श्रोता । अनुभवावी हे कथा ।**
**अतिहळुवारपण चित्ता । आणुनियां ।।** (अ.१, ५६ व ५७)

शरदऋतूतील चांदण्यात चंद्रकळेतील अमृताचे कोमल कण वेचणाऱ्या



चकोरांच्या पिलांचे तसेच कमलदलाला धक्का न लावता पराग घेऊन जाणाऱ्या भ्रमराचे उदाहरण दिले आहे. म्हणजे हळुवारपणा आणि चतुरपणा यांच्या सहाय्याने रसिक साहित्यास्वाद उपभोगतो असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे असावे.

रसिकाच्या बाजूने साहित्यास्वाद कसा घडतो, याचे विवेचन करताना ज्ञानदेवांनी मानसशास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारला होता असे म्हणता येऊ शकेल. येथेही भाषा आणि शैलीच्या माध्यमातून रसिक परतत्त्वापर्यंत कसा पोहचेल हे ज्ञानदेवांनी स्पष्ट केले आहे. येथे रसिकाला शब्दब्रह्मात प्रकट झालेला सोलीव सुखाचा, निखळ सौंदर्याचा म्हणजेच परतत्त्वस्पर्शाचा आनंद लुटता येऊ शकेल असे म्हणता येईल. अशा एकरूपतेने शब्दावीण अंत:करणात सौंदर्यतत्त्व प्रकटते आणि अतींद्रिय अनुभूती घडते –

**हे शब्देविण संवादिजे । इंद्रिया नेणतां भोगिजे**
**बोला आदि झोंबिजे । प्रमेयासी ।।** (अ. १, ५८)

अर्थातच ज्ञानेश्वरांच्या मताने ही एकरूपता अतिशय गांभीर्यपूर्वक आणि सावधपणाने आस्वादक स्वीकारतो, त्यामुळे त्याला परतत्त्वस्पर्शाची, अद्वैताची अनुभूती ज्ञानमयतेने घडते –

**ऐसेनि गंभीरपणे । थिरावलेनि अंत करणे । –**
**आथला तोचि जाणे । मानूं इये ।।** (अ. १, ६१)

ज्ञानदेवांचे रसिकाच्या बाजूने अशा प्रकारे आस्वादप्रक्रियेविषयीचे विचार पाहताना त्यांनी हृदयसंवादाच्या आणि एकरूपतेच्या संदर्भात मांडलेले निकष – गंभीरपणा (सावधपणा), स्थिर अंत:करण, आपला ठाव (अस्तित्व / जागा) न सोडता, हे वर आलेले उल्लेख पाहिले की मराठी टीकेमध्ये आधुनिक दृष्टिकोनातून विशेष भर घालणाऱ्या टीकाकारांच्या तादात्म्यविषयक उपपत्तींची सहज आठवण होते. अद्वैतसिद्धान्त मांडणारे ज्ञानेश्वर ज्ञानमय अवस्थेतून जाणीवपूर्वक आस्वादविषयक विचार कसे मांडत होते, या विषयी अधिक स्पष्ट कल्पना येते.

येथे स्वाभाविकच प्रा. द. के. केळकर यांची 'स्वायत्त तादात्म्य' उपपत्ती स्पष्ट करतानाचे नटाचे उदाहरण घेता येईल. नट स्वतः आपण कोण आहोत हे न विसरता भूमिकेशी एकरूप होऊन जगत असतो. त्याप्रमाणे आपले शरीरबद्ध असलेले अस्तित्व न विसरता परतत्त्वस्पर्शानुभूती मिळू शकते, अशी तुलना करता येईल. तसेच साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी मांडलेली 'सविकल्प समाधी' उपपत्ती. त्यांनी योग्याची समाधी आणि साहित्यिकाची आणि आस्वादकाची समाधी यांतला फरक स्पष्ट केला आहे. स्वतःला न विसरता एकरूप होणे ज्ञानेश्वरांनी

'जाणकार' आणि 'ज्ञानी' हे शब्द वापरून तसेच 'सज्जन' असा रसिकांचा उल्लेख करून विकल्पपूर्वक एकरूपतेची, हृदयसंवादाची चर्चा केली आहे असे म्हणता येईल. प्रा. वा. म. जोशी यांनी मांडलेली 'आत्मौपम्यपूर्वक पराकायाप्रवेश' अशी उपपत्ती, या संदर्भात आत्मबोधाने चराचरसृष्टीतील उपाधींमध्ये दडलेले चैतन्य हे त्या परतत्त्वाचेच स्फुरण आहे याचा अनुभव घेणे व तो केवळ अवधानपूर्वक साहित्याचा अनुभव घेणे, अशी तुलना करता येईल. रा. श्री. जोग यांनी मांडलेली 'सहानुभूतीपूर्वक ताटस्थ्याची उपपत्ती' याचाही 'आपला ठाऊँ न संडिता' या उद्‌गाराशी तुलना करून विचार करता येईल. अर्थात आपण अशा प्रकारचा तुलनात्मक अभ्यास करावयाचे ठरविलेले नाही; परंतु ज्ञानदेवांची 'हृदयसंवाद' व 'इंद्रिया नेणता भोगिजे' या संदर्भात 'आपुला ठाऊँ न संडिता' ही मर्यादा लक्षात घेता ज्ञानदेवांनी किती व्यापक, प्रगत आणि शास्त्रीय (मानसशास्त्रीय) असे विचार मांडले आहेत हे लक्षात येण्यास मदत होईल.

आता आस्वादकाच्या बाजूने हा आस्वाद कोणकोणत्या स्तरावर घडतो, याचा विचार करू या. वरील विवेचनामधून या विषयीचे सूचन आपोआपच घडते. प्रथमतः डोळे, कान, आणि तत्पर इंद्रिये यांच्या सहाय्याने साहित्याच्या बाह्य स्वरूपावरच आस्वादकाचे अवधान स्थिर होते. त्याचबरोबर तो मनाची एकाग्रता साधतो आणि त्यातूनच त्याच्या अंत:करणाला शब्द आपले शब्दपण टाकून स्पर्श करतात. परंतु प्रथमस्तरावर शब्द, पद, बंध, अलंकार यांच्या सौंदर्याकडेच आस्वादकाचे लक्ष जाते म्हणूनच ज्ञानदेवांनी या सर्व गोष्टीलाही पुरेसे महत्त्व साहित्यप्रकटीकरणात (लेखनात) दिलेले दिसते. या प्राथमिक स्तरावरील आनंद हा अंतस्थातील वस्तुनिरपेक्ष सौंदर्यापर्यंत पोहोचविणारा असतो. बाह्य सौंदर्य ही संमोहिनी आहे; तर त्यातील अर्थ, भाव, स्पर्श, सुगंध, नाद या आत्म्यास होणाऱ्या जाणिवा आहेत. त्यामुळेच परतत्त्वस्पर्श साहित्यातून आस्वादकाला घडू शकतो. त्यामुळेच निरपेक्ष स्वरूपाचा आस्वाद घडतो असे ज्ञानदेवांना वाटते.

**तैसा मनाचा मारु न करितां । आणि इंद्रियां दुःख न देतां ।**
**एथ मोक्षु असे आयता । श्रवणाचिमाजी ।।** (अ.४, २२४)

मनाला वा इंद्रियांना क्लेश न होता सहजगत्या श्रेष्ठ साहित्य एकरूपतेने आस्वाद घेऊ लागताच (अर्थात वर उल्लेखिल्याप्रमाणे) आत्मानंदाचा निवडक भाग रसिकास अनुभवास आणवून देऊन सर्वच इंद्रियांचे पोषण होते; म्हणजे मनाबरोबरच इंद्रियांनाही आनंद मिळतो. यावरून असे सहज लक्षात येऊ शकेल की रसिकाला साहित्यास्वाद बाह्यइंद्रियांच्या द्वारे आणि मनाने अशा दोन्ही स्तरांवर भोगता येतो. अशा प्रकारे आनंद मिळत असताना स्वाभाविकच रसिकाला ज्ञानमय अवस्था प्राप्त होते. ही ज्ञानमय अवस्था अर्थातच आत्मतत्त्वबोधाच्या स्वरूपात अंत:करणात प्राप्त होते. साहित्यिकाला साधनेच्या द्वारे परतत्त्वाचा साक्षात्कार झाल्याने ही आनंदानुभूती घडते. तीच अनुभूती साहित्याशी एकाग्र चित्ताने समरस झाल्यास साहित्याच्या माध्यमातून घडते आणि तोही आनंदनिर्भर होतो.

साहित्यआस्वादाच्या आणखी एका स्तराचा ज्ञानेश्वरांच्या परतत्त्व-स्पर्शवादानुसार आणि साहित्य उत्पत्ती सिद्धान्तानुसार विचार करता येतो. परतत्त्वस्पर्शानुभूती साहित्यातून घडली की रसिकाच्या मनात त्या परतत्त्वाचा पुन्हा विस्तार होऊ लागतो. तो त्याच्या अनुभूती विश्वाने मर्यादित होत असला तरी येथेच रसिक किंवा आस्वादक टीकाकाराची पातळी गाठतात. येथेच टीकाकार-भाष्यकार-समीक्षक निर्माण होतो. म्हणजे पुनः प्रसरण अनुभूतीतील आनंदही आस्वादकाला भोगता येतो ही त्याची तिसरी अवस्था म्हणता येईल. त्याला साहित्यातून आलेली अनुभूती हीच अन्य लोकांनाही समाधान देणारी मान्य होणारी असल्याचे त्यास अनुभवास आले, तर त्यास सामूहिक आनंदसोहळा अनुभवता येतो. हा आस्वादकाच्या बाजूने चवथा स्तर असे म्हणता येईल.

एकूण आस्वादप्रक्रिया ही साहित्यिक आणि आस्वादक या दोहोंच्या ठिकाणी चालणारी थोड्याफार फरकाने समान मानसिक प्रक्रिया आहे, असे म्हणता येईल.

ज्ञानदेवांच्या एकूण विवेचनामध्ये साहित्यास्वादात येणाऱ्या अडथळ्यांचेही सूचन झाले आहे असे म्हणता येईल. अनावधान, दुश्चित्त, ज्ञेयाविषयी प्रेम नसणे, अज्ञान, इंद्रियांची दुर्बलता, शास्त्रज्ञानाचा अभाव, व्यासंगाकडे दुर्लक्ष अशी काही मोजक्या अडथळ्यांची उदाहरणे देता येतील.

## नऊ

# आस्वादक व अभिरुची विचार

आस्वादक व अभिरुची या खरे तर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हणता येईल. ज्ञानदेवांनी आस्वादकाविषयी काही अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत. प्रास्ताविकातून आणि समारोपातून या अपेक्षा व्यक्त झालेल्या आहेत. त्यातून आस्वादक, रसिक, समीक्षक (श्रोता, वाचक) यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडतो.

भर्तृहरीने अरसिकाला कवित्व निवेदन करण्याचे नाकारले हे सर्वश्रुत आहे. त्याचप्रमाणे ज्ञानदेवांनीही अंत:करणाने कठोर असलेल्या व परतत्त्वस्पर्शाची आवड नसणाऱ्या, तसेच अवधान नसणाऱ्या व दुश्चित्त असणाऱ्यांना आस्वाद घेता येणार नाही असेच परोपरीने सांगितले आहे. उदा. –

**ऐसें हळुवारपण जरी येईल । तरीच हें उपेगा जाईल ।**
**एरव्हीं आघवी गोठी होईल । मुकयाबहिरयाची ।।**
**जिहीं आत्मबोधाचिया आवडी । केली स्वर्ग संसाराची कुरोंडी ।**
**ते वांचूनि एथिंची गोडी । नेणती आणिक ।।** (अ.६, २६ व २८)

श्रोता-रसिक-आस्वादक कसा असावा या विषयी ज्ञानदेवांनी विवेचन केले आहे. ज्ञानदेवांना 'वक्ता' आणि 'श्रोता' (साहित्यिक आणि आस्वादक) परस्परावलंबी वाटत होते हे 'म्हणऊनि वक्ता तो वक्ताचि नोहे । श्रोतेनविण।।' (अ.९, २९) या प्रसिद्ध उक्तीतून व्यक्त झालेले आहे. हा श्रोता म्हणजेच साहित्याचा आस्वादक होय. 'हृदयसंवाद' या कल्पनेमध्ये अर्थातच साहित्यिकाच्या हृदयाशी हृदयसंवाद साधू शकेल अशा रसिकाची अपेक्षा ज्ञानदेव करतात. त्याकरिता त्यांनी अर्जुनाचे उदाहरण वारंवार दिले आहे, असे म्हणता येईल. श्रीकृष्ण हा आदर्श वक्ता आणि अर्जुन हा आदर्श श्रोता अशी ही जोडी ज्ञानदेवांच्या समोर आहे. गीतार्थ सांगण्याच्या मिषाने जरी ज्ञानदेवांनी प्रवचनाच्या वेळी श्रोत्यांना वारंवार विनवणी केलेली असली तरी त्यातून रसिकाचे गुण सांगण्याकडेच ज्ञानदेवांचे लक्ष होते असे वाटते, श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यासारखी तुल्यबळ जोडी असल्याशिवाय हृदयसंवाद शक्य नाही आणि हृदयसंवादाशिवाय रसनिष्पत्ती किंवा साहित्यास्वाद नाही असेच बहुधा ज्ञानदेवांना सांगावयाचे दिसते. रसिकांचे गुण सांगत असताना त्यांनी जो विचार केलेला आहे तो अशिक्षित, स्त्री, व शूद्र यांचाही केलेला आहे. परंतु सर्वांना ही अनुभूती घडावयाची असेल तर सर्वांच्या ठायी काही किमान गुण निर्माण होणे आवश्यक आहेत, असे ज्ञानदेवांचे मत होते हे लक्षातच घेतले पाहिजे. त्यांत सर्वाधिक महत्त्व ज्ञानदेवांनी अवधानाला दिले आहे.

**अवधानपूर्वक आस्वादास सिद्ध :** साहित्याचे श्रवण, पठण हे अवधानपूर्वक केले तरच साहित्यातील शब्द, पद, बंध, वाक्ये, प्रमेये इ. गोष्टी आस्वादकाला समजू शकतील असे ज्ञानदेवांना वाटते. अवधान दिल्याने शब्द मनापर्यंत पोहोचू शकतील व ज्ञान आणि मन यांचा संयोग होऊन परतत्त्वस्पर्श घडेल असे ज्ञानदेवांचे मत आहे. सतत सतर्कतेने आणि सूक्ष्मतेने अवधान दिले पाहिजे. ज्ञानदेव वारंवार अवधान द्यावे अशी विनंती करतात, त्याचेही तेच कारण आहे. एवढेच नव्हे तर अवधानाची महती सांगताना एकवेळ अवधान दिलेत, तरी सर्व सुखे आपणास प्राप्त होतील अशी ग्वाही ज्ञानदेव देतात.

**तरी अवधान एकवेळें दीजे । मग सर्व सुखासि पात्र होइजे ।**
**हें प्रतिज्ञोत्तर माझे । उघड ऐका ।।** (अ.९, १)

सहज अवधान दिले तरी साहित्यगत सौंदर्य सहजच दृष्टीस पडू शकते असे म्हणताना त्यांनी –

**अर्थ बोलाची वाट पाहे । तेथे अभिप्रावो अभिप्रायाते विये ।**
**भावाचा फुलौरा होत जाये । मतिवरी ।।**
**म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे । तरी हृदयाकाश सारस्वतें वोळे ।**
**आणि श्रोता दुश्चिता तरी वितुळे । मांडला रसु ।।** (अ.९, २७ व २८)

म्हणूनच अळूमाळ अवधान दिले तरी आनंदाच्या राशीवर बसावयास मिळेल. (अ.९, ५३४) असे ठामपणाने सांगितले आहे.

आता रसिकाने अवधान द्यावे हे खरे; परंतु हे अवधान कोणत्या प्रकारचे असावे या विषयी ज्ञानदेवांनी मार्गदर्शन केले आहे. (१) शरदाच्या चांदण्यातील कोवळे अमृतकण ज्याप्रमाणे चकोर घेऊन जातात तितक्या हळुवारपणाने श्रोत्यांनी अवधान द्यावे असे ज्ञानदेव सुचवितात (अ. १, ५६ ते ५९). (२) अंत:करण

स्थिर करून अतिशय गंभीरपणे व सतर्कपणाने अवधान द्यावे, त्यातही आपले अस्तित्व न गमावता (आपला ठाउँ न सांडिता) (अ.१, ६०) अवधान द्यावे. (३) आई-वडिलांच्या मायेने साहित्यिकाकडे पाहून प्रेमपूर्वक अवधान द्यावे. (अ.१, ६४). (४) सर्व इंद्रिये एकत्र करून म्हणजेच अतिशय एकाग्र चित्ताने अवधान दिले जावे असे ज्ञानदेवांना वाटते (अ.४, ५). (५) प्रसन्न चित्ताने अवधान द्यावे.

**वरी अवधानाचा वाफसा । लाधला सोनयाऐसा ।**
**म्हणोनि पेरावया धिंवसा । निवृत्तीसी ।** (अ.६, ४९१)

म्हणजे सहज वक्तृत्व स्फुरेल, साहित्य सृजन होईल. (६) अहंभाव आणि विकल्प सांडून अनुरागपूर्वक अवधान द्यावे (अ.७, ९९). (७) विषय कोणता आहे. त्या विषयाला केंद्रस्थानी ठेवून अवधान द्यावे. (अ.७, २०६). (८) साहित्याला प्रतिसाद देणारे अवधान असावे.

**नातरी बालक बोबडा बोलीं । कां वांकुडा विचुकां पाउलीं ।**
**तें चोज करूनि माउली । रिझे जेवीं ।।** (अ. ९, ६)

(९) अभ्यासपूर्वक अवधान द्यावे व ते वाढते असावे -

**हें सरस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड ।**
**तरी आतां अवधानामृतें वाड । सिंपोनि किजो ।।** (अ.११, १९)

आस्वादकांशिवाय साहित्याचा काय उपयोग हे लक्षात घेऊन आपणच याचे प्रेरक आहोत, या दृष्टीने अवधान द्यावे. अशा विविध तऱ्हेने अवधानाविषयी अपेक्षा ज्ञानदेवांनी व्यक्त केल्या आहेत.

आता येथे एक प्रश्न निर्माण होतो, की एवढ्या गुणांनी युक्त असलेले अवधान हे सामान्य माणसाचे खचितच काम नाही. अर्थातच असा अवधान देऊ शकणारा आस्वादक हा काही श्रेष्ठ गुणांनी युक्त असला पाहिजे अशी ज्ञानदेवांची अपेक्षा असली पाहिजे. ज्ञानदेवांनी श्रोत्यांना अवधानाविषयी विनवणी करताना श्रोत्यांच्या ठिकाणी असलेल्या गुणांचा उल्लेख जरूर केला आहे. केवळ नम्रतेचे प्रदर्शन करावे किंवा श्रोत्यांनी आपल्याकडे लक्ष द्यावे म्हणून श्रोत्यांची वायफळ स्तुती करावी, असा उद्देश ज्ञानदेवांचा खचितच नसावा असे वाटते. म्हणूनच श्रोत्यांची स्तुती करताना समोर निवृत्तिनाथ, सच्चिदानंद बाबा आणि अशीच संतमंडळी बसली होती याचा उल्लेख ज्ञानदेवांनी केलेला आहे. म्हणून श्रोत्यांच्या ठिकाणी असणाऱ्या योग्यतेचा केलेला उल्लेख, आस्वादकाच्या अंगी कोणते श्रेष्ठ गुण असावे यासाठीचाच आहे असे म्हणता येऊ शकेल. श्रोत्यांनी अर्जुनाच्या



पंगतीत बसावे असे त्यांना वाटते. त्या दृष्टीने अर्जुनाच्या अंगी आस्वादकाचे जे गुण ज्ञानदेवांना दिसतात त्या गुणांची ते आस्वादकांकडून अपेक्षा करतात. वास्तविक ज्ञानदेव हे तर श्रेष्ठ आस्वादक आहेतच. शिवाय श्रेष्ठ साहित्यिक आणि रचनात्मक टीकाकारही आहेत. स्वतःच्या उदाहरणावरूनही ते या गुणांची अपेक्षा करीत असावेत असे म्हणता येईल.

**सर्वोत्तम, पुण्यवान, दैवी गुणयुक्त आस्वादक :** अर्जुनाप्रमाणे सर्वोत्तम, पुण्यवान असा म्हणजे निखळ सौंदर्याचा अनुभव घेण्याचे भाग्य ज्याला लाभले आहे असा आणि दैवी गुणयुक्त किंवा दैवीसंपत्ती प्राप्त झालेला आस्वादक असावा अशी जणू आदर्श आस्वादकाची कल्पना ज्ञानदेव मांडतात असे वाटते. दैवी संपत्तीचा विस्ताराने विचार श्रीकृष्णाने गीतेत मांडला आहे म्हणजेच व्यासांनी मांडला आहे. तोच विचार ज्ञानदेवांनी स्वीकारलेला आहे असे म्हणता येईल. दैवी गुणी म्हणजेच सात्त्विक प्रवृत्तीचा व ज्ञानी होय. साहित्यिकाच्या ठिकाणीही याच दैवी गुणांची अपेक्षा ज्ञानदेव करतात असे आपण पाहिले आहे. त्याची द्विरुक्ती पत्करून या ठिकाणी सव्वीस दैवी गुण कोणते ते पाहू. अभय, तत्त्वशुद्धी, ज्ञानयोग व्यवस्थिती, दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, आर्जव, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांती, अपैशून्य, दया, अलौलुप्य, मार्दव, लाज, अचापल्य, तेज, क्षमा, धैर्य, शौच, अद्रोहत्व आणि अमानित्व हे ते दैवी संपत्तीचे गुण होत. या गुणांनी युक्त असा आस्वादक असेल तर स्वाभाविकच तो साहित्यिकाच्या समपातळीवरचा आस्वादक होईल आणि सहजच त्यांचा हृदयसंवाद योग्य प्रकारे घडू शकेल. अर्थातच अशा दैवी गुणांनी युक्त असलेल्या आस्वादकाची अपेक्षा ज्ञानदेवांनी केलेली असली तरी काही विशिष्ट गुणांनी ज्ञानदेवांनी श्रोत्यांना गौरविले आहे. त्यातून आस्वादकाच्या ठिकाणी किमान कोणत्या गुणांची अपेक्षा ज्ञानदेव करतात हे लक्षात येऊ शकेल.

**मर्मज्ञता :** आस्वादकाच्या ठिकाणी मर्म जाणून घेण्याची कुवत हवी तरच त्याला साहित्यातील कल्पनाविलास, आलंकारिकता, प्रतिमासृष्टी, वक्रोक्ती यात दडलेले, साहित्यिकाने प्रकट केलेले, आत्मतत्त्वज्ञान किंवा परतत्त्वस्पर्श होऊ शकेल. म्हणजे नेमके सौंदर्य आत्मसात होऊ शकेल. ही भेदक मर्मज्ञता रसिकाच्या ठिकाणी असावी. ज्याप्रमाणे -

**ऐसा योग युक्तीचा उद्देशु । जेथ बोलिला हृषीकेशु ।**
**तेथ अर्जुनु सुदंशु । म्हणोनि चमत्कारला ।।** (अ.५, १६१)

असे अर्जुनाच्या संदर्भात घडले.

**आत्मबोधास आतुर, ज्ञानी व निष्काम :** ज्ञानदेवांनी निर्मळ आनंद किंवा परतत्त्वस्पर्श अनुभूती या दृष्टीने आस्वादकाच्या ठिकाणी कोणते गुण असावेत या दृष्टीने –

**जिहीं आत्मबोधाचिया आवडी । केली स्वर्गसंसाराची कुरोंडी ।**
**ते वांचूनि एथींची गोडी । नेणती आणिक ।।**
**तैसा सज्ञानासी हा ठावो । आणि अज्ञानासी आनगावों ।**
**म्हणोनी बोलावया विषय पहाहो ।**
**विशेषें नाही ।।** (अ.६, २८ व ३०)

असे म्हटले आहे.

**सत्त्वगुणी आणि विवेकी :** आस्वादक सत्त्वगुणाने युक्त असेल तर निरपेक्ष सौंदर्याची अनुभूती त्याला येऊ शकेल. परतत्त्वस्पर्शाकडे त्याची नजर जाऊ शकेल. सत्त्वगुणामुळे रसिकाच्या मनातील शंका फिटत जातात, ग्रहदूषितता संपत जाते आणि त्याच्या ठिकाणी औचित्य भाव प्रकटतो

**जे सात्त्विकाचेनि वडपें । गेलें आध्यात्मिक खरपें ।**
**सहजें निरोळले वाफे । चतुर चित्ताचे ।।** (अ.६, ४९०)

सर्वत्र चैतन्यतत्त्व गुप्तरूपाने आहे ते तत्त्व जाणणारे संत बरोबर ओळखून त्याचेच ग्रहण करतात. राजहंसाची विवेकबुद्धी त्यांच्या ठिकाणी असते. ती बुद्धी आस्वादकाच्या ठिकाणी असावी लागते. त्यामुळेच ते साहित्यगत परतत्त्व किंवा साहित्यात साठविलेले निखळ सौंदर्य अचूक गवसू शकते.

**अभिरुची संपन्न :** वरील सर्व गुणांबरोबरच साहित्याची व श्रेष्ठ निरपेक्ष सौंदर्य अनुभवण्याची आवड असली पाहिजे. आवड असेल तरच अवधान दिले जाईल व आस्वादकाच्या ठायी असलेल्या उत्तम गुणांचा त्याच्याकडून वापर केला जाईल. (अ.११, ५). अर्थात सत्त्व गुणाच्या योगाने आवड वाढते (अ. १७, १२५). या संबंधात ज्ञानदेवांनी ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान यांत ज्ञेय जर प्रिय असेल तर ज्ञात्याला तात्काळ ज्ञान होऊ शकते म्हणून ज्ञेयाविषयीची आवड पाहिजे (अ.१८, ४८५) असे म्हटले आहे. परंतु गुण आणि आवड असूनही भागणार नाही हे श्रीकृष्णाचे उद्गार ज्ञानदेवांनी स्पष्ट केले आहेत. त्याप्रमाणे –

**तरी याचि शास्त्राचेनी । संप्रदायें पांघुरौनी ।**
**शास्त्रार्थ हा निकेनी । अनुष्ठीं हो ।**
**एहवीं अमृतमंथना । सारिखें होईल अर्जुना**
**जरी रिघसी अनुष्ठाना । संप्रदायेंवीण ।।**



**तैसा गुण प्रसन्नु होये । शिष्य विद्याही कीर लाहे ।**
**परी ते फळे संप्रदायें । उपासिलिया ।। ।।**

(अ. १८, १४८१, १४८२, व १४८४)

सत्त्वगुण आणि आवड याबरोबरच शास्त्रपरिचय, शास्त्रज्ञान व संप्रदाय (पद्धती) यांचा परिचय आस्वादकाला असला पाहिजे. शास्त्रज्ञानाशिवाय मर्म कळणार नाही असे त्यांना वाटते. तथापि आवड आणि शास्त्रपरिचय असेल तर वाचावयास सुरुवात करताच पांडित्याचा प्रकाश पडेल, ज्ञेयापुढे अमृतही फिके वाटू लागेल असे ज्ञानदेवांचे स्पष्ट मत आहे. शास्त्रज्ञानाला त्यांनी असे महत्त्व दिले आहे.

**अष्टसात्त्विकभावांची निष्पती :** आस्वादकाच्या ठिकाणी अष्टसात्त्विकभाव निर्माण झाले तरच साहित्यिकाच्या आत्म्यास साक्षात्कारित झालेले (मनाच्या ज्ञानमय अवस्थेत जाणवलेले) व साहित्यातून व्यक्त होणारे परतत्त्व आस्वादकाला सहज साक्षात्कारित होईल, असे ज्ञानदेवांनी स्पष्ट केले आहे (अ.८, ५६ व ५७), नवव्या अध्यायाच्या शेवटी कृष्णार्जुन संवादाचा आठव होऊन झालेल्या संजयाच्या अवस्थेचे वर्णन करताना या सात्त्विक भावांचा उल्लेख केला आहे. (स्तंभ, स्वरभंग, रोमांच, अश्रू, वेपथू, स्वेद, वैवर्ण्य, आणि प्रलय असे हे अष्ट सात्विक भाव होत.) स्वाभाविकच सात्त्विक प्रवृत्तीपासूनच ते उद्भवतात. म्हणजेच सत्त्वगुणाला साहित्यास्वादात ज्ञानदेवांनी सर्वाधिक महत्त्व दिले आहे. आस्वादकाच्या ठिकाणी परतत्त्वस्पर्श घडताना अष्टसात्त्विक भाव उत्पन्न होतील एवढी सात्विकता असावी.

**सर्वज्ञता :** अर्थातच हे सर्व गुण अंगी येण्यासाठी सर्वज्ञता असणे आवश्यक आहे. सर्वज्ञता ही गाढ्या व्यासंगाने येते. ज्ञानेश्वरांनी आस्वादकांना 'सर्वज्ञ' श्रोते असे संबोधिले आहे व त्यांना महेशमूर्ती, आद्यगुरू असे संबोधिलेले आहे. स्वाभाविकपणे आद्यगुरुंजवळ पूर्वसूरींनी केलेले सर्व साहित्य अवगत असतेच. आस्वादक सर्वज्ञ असावा असे म्हणताना तो साहित्यिकाप्रमाणेच गाढा व्यासंगी असावा असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे असावे असे म्हणता येईल. गाढा व्यासंग ही ज्ञानदेवांची कल्पना ओंकारापासून काव्य, नाटकांपर्यंत सर्व प्रकारच्या साहित्याला समाविष्ट करणारी आहे. त्या बरोबर सूक्ष्म मर्मभेदक दृष्टीने विश्वातील चराचरात गुप्त स्वरूपात सामावलेले चैतन्यतत्त्व पाहणे ही गोष्ट व्यासंगात सामावलेली आहे असे म्हणता येईल. जाणकार तत्त्वज्ञ असे त्यांचे व्यक्तिमत्त्व असावे असे ज्ञानदेवांना वाटत होते.

यापुढेही जाऊन ज्ञानदेवांनी नवव्या अध्यायात अवधान देण्याची परोपरीने विनवणी केली आहे. असे करताना आस्वादकांना साहित्यिकाच्या दृष्टीने गुरू, मातापिता, सर्वज्ञ आणि सहृदयी संत अशा रूपातही पाहिले आहे. यावरून आस्वादकाच्या व्यक्तिमत्त्वाविषयीच्या ज्ञानदेवांच्या अपेक्षा किती व्यापक होत्या हे सहज लक्षात येते. आस्वाद देणाऱ्या सामान्य आस्वादकांपासून समीक्षकांपर्यंत त्यांनी आस्वादकाला वेगवेगळ्या भूमिकेतून साहित्याचा आस्वाद घेण्याचे आवाहन केले आहे.

**अभिरुची :** आस्वादकाविषयीच्या या विवेचनातूनच ज्ञानदेवांचे अभिरुचीविषयक विचार स्पष्ट होत गेले आहेत. परतत्त्वस्पर्श आणि साहित्यास्वाद हे अभिरुचिसंपन्नतेनेच शक्य आहे असे त्यांचे मत दिसते. अभिरुची म्हणजे निखळ सौंदर्याच्या नवनवीन अनुभूतींविषयी जिज्ञासापूर्ण आतुरता किंवा परतत्त्वस्पर्शाची आतुरता असे म्हणता येईल. या दृष्टीने ज्ञानदेवांनी विचार केला आहे असे वाटते. अभिरुची असा शब्द ज्ञानदेवांनी वापरला नसला तरी –

**जिहीं आत्मबोधाचिया आवडी । केली स्वर्गसंसाराची कुरोंडी ।**
**तेवांचूनि एथींची गोडी । नेणती आणिक ।** (अ.६, २८)

आत्मज्ञानाच्या आवडीनें (येथे निखळ सौंदर्याच्या नवनवीन अनुभूतीच्या आवडीने किंवा परतत्त्वस्पर्शानुभूतीच्या आवडीने असे घेता येईल) म्हणजेच आत्मज्ञानाकरिता ज्याने संसार आणि स्वर्गही ओवाळून टाकले (कुरोंडी उतारा केला आहे) त्या लोकांवाचून दुसऱ्या लोकांना यातील गोडी कळणार नाही (निखळ सौंदर्याच्या नवनवीत अनुभूतीची गोडी किंवा परतत्त्वस्पर्शानुभूतीची गोडी), असे ज्ञानदेवांनी स्पष्ट केले आहे. म्हणजे आवड ही अभिरुचिसंपन्नतेतील प्राथमिक गरज आहे. ही आवड कशाची? ज्ञानदेवांच्या मते ही आवड सारस्वतामधून घडणाऱ्या आत्मबोधाची, परतत्त्वस्पर्शाची होय. ज्यांना आवड असेल त्यांनाच आपला ग्रंथ किंवा (प्रवचन) किंवा वाग्यज्ञ म्हणजे सुकाळ वाटेल असे ज्ञानदेवांनी प्रतिपादिले आहे.

अभिरुची संदर्भाने ज्ञानदेवांनी वापरलेले प्रेम, मर्मज्ञता, शास्त्राभ्यास, भावानुकूलता, विवेक असे शब्दही महत्त्वाचे वाटतात. अभिरुचिसंपन्नतेच्या दृष्टीने त्यांचा विचार करता येईल. यातच अवधान ही गोष्ट ज्ञानदेवांनी सर्वाधिक महत्त्वाची मानली आहे हे ध्यानी घेतले पाहिजे.

आपल्या सर्व इंद्रियांना अवधानाची म्हणजे निरीक्षण, संवेदन अनुभवग्रथन यांची सवय लावणे अत्यंत आवश्यक आहे. पाच ज्ञानेंद्रियांच्या एकाग्रतेने ज्ञान



संपादन केले पाहिजे. इंद्रिये नेहमी कामास तत्पर अशी हवीत. यासाठी ज्या ज्ञानेंद्रियांकडून ज्ञानसंपादनाचे किंवा सारस्वताच्या अभ्यास किंवा आस्वादाचे कार्य चालू असेल तेथे संपूर्ण शक्ती एकवटावी (अ.४, ५). इंद्रिये ही ज्ञानसाधनेमधील वा अनुभूती साधनेमधील प्रत्यक्ष अनुभव घेणारी बाह्य साधने होत. त्यांच्या हालचालींनी कर्त्याला कर्तेपण येत असते. कर्त्याचे कर्म हे त्याच्या माध्यमातून घडते (अ.१८, ४९९). म्हणून इंद्रिये उत्सुक आणि सतर्क राहण्यासाठीची सवय महत्त्वाची आहे.

बाह्य इंद्रियांबरोबरच मन हे सहावे इंद्रियदेखील तत्पर ठेवले पाहिजे. अंत:करणाच्या ठिकाणी बुद्धी, मन, चित्त, अहंकार हे चार प्रकार असतात व प्रकार व बाह्येंद्रिये यांच्या सहाय्याने कर्त्याचे व्यावहारिक म्हणजे संसारातील कर्म घडत असते.

कर्तव्याचे फळ मिळेपर्यंत या दोन्हींचे मिळून काम चाललेले असते. एकूण अंत:करण आणि इंद्रिये संवेदनशील राहणे व त्यासाठीही प्रयत्न करणे हे ज्ञानदेवांना अभिप्रेत आहे. असे असले तरी अंत:करण आणि इंद्रिये यांचे कार्य राजस आणि तामस गुणयुक्त असते, तेथे सत्त्व गुणाची प्रेरणा करणे हे महत्त्वाचे कार्य होय. त्यासाठी गुरुप्रसाद व व्यासंग यांचा विचार ज्ञानदेवांनी केला आहे. सत्त्वगुणाने युक्त झाले तरच रसज्ञता येऊ शकते असे ज्ञानदेवांना वाटते. याचा अर्थ अशी आवड उत्पन्न होण्यासाठी (अभिरुची निर्माण होण्यासाठी) सत्त्वगुणाने युक्त अशा कार्यतत्परतेची अंत:करण आणि शारीर इंद्रियांना सवय लावणे होय. अर्थातच सत्त्वगुणाच्या अस्तित्वाने अंत:करणातील अहंकार नाहीसा होतो. याचीही चर्चा ज्ञानदेवांनी केली आहे (अ.१८, ५१८ व ५१९). सत्त्वगुणामुळेच सात्त्विक ज्ञान प्राप्त होते म्हणजे परतत्त्वस्पर्श घडतो व अद्वैत प्रकटते –

**तरी अर्जुना गा तें फुडें । सात्त्विक ज्ञान चोखडें ।**
**जयाचा उदयीं ज्ञेय बुडे । ज्ञातेनिसीं ।।**
**जैसा सूर्य न देखे आंधारे । सरिता नेणिजती सागरें**
**कां कवळिलिया न धरे । आत्मछाया ।।** (अ.१८, ५२९ व ५३०)

**व्यासंग :** अभिरुचिसंपन्नतेसाठी गाढा व्यासंग आवश्यक आहे, असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे असावे. यासाठीच त्यांनी रसिकांना ‘सर्वज्ञ’ आणि प्रत्यक्ष महेशाची मूर्ती म्हणून संबोधिले आहे (अ.९, २ व १४). असे म्हणत असताना अभिरुचिसंपन्नतेच्या कल्पनेत त्यांनी सर्व वाङ्मय समाविष्ट केले आहे. गणेशस्तवनात, गणेशरूपकामध्ये सर्व प्रकारच्या वाङ्मयाचा विचार ज्ञानदेवांनी

केलेला आहेच.

**शास्त्राभ्यास आणि विवेक :** आवड आणि व्यासंग याबरोबरच अभिरुचि-संपन्नतेत ज्ञानदेवांना शास्त्राभ्यास महत्त्वाचा वाटतो. अर्थातच येथे शास्त्रोक्त संप्रदायाचा उल्लेख त्यांनी आवर्जून केला आहे (अ.१८, १४८१). हे शास्त्र कोणते? अध्यात्म विचारात आत्मज्ञानापर्यंत पोहचविणारे शास्त्र व मार्ग असे ज्ञानदेवांना सांगावयाचे असेल असे म्हणता येईल. परंतु त्याच त्यांच्या उक्तीचा साहित्यास्वादाच्या दृष्टीने विचार केला तर; साहित्यविषयक शास्त्राची जाण त्यांना अभिप्रेत होती; असे म्हणण्यास पुरेसा अवसर आहे. ज्ञानदेवांनी प्रवचन करीत असताना अतिनम्रतापूर्वक शब्द कसा घडावा, प्रमेय कसे मांडावेत व अलंकारशास्त्र (संस्कृत साहित्यशास्त्र) म्हणजे काय, ते आपणास माहिती नाही असे सांगितले. याचाच अर्थ शब्द, सिद्धान्त, साहित्यशास्त्र या विषयाचा अभ्यास ज्ञानदेवांना अभिप्रेत होता असे म्हणता येईल (अ.१८, १७६७). म्हणूनच त्यांनी शास्त्राभ्यास व संप्रदाय यांची अपेक्षा आस्वादाकाकडूनही केली, म्हणजेच अभिरुचिसंपन्नतेच्या दृष्टीने शास्त्राभ्यासाचे महत्त्व विशद केले आहे.

शास्त्राभ्यासाबरोबरच अभिरुचीमध्ये विवेकयुक्ततेची आवश्यकता ज्ञानदेवांनी प्रतिपादली आहे. विवेकयुक्त म्हणजे चतुर, बुद्धिमंत असे ज्ञानी लोक होय. नीरक्षीर विवेकबुद्धी असेल तरच साहित्यातील मर्म जाणता येऊ शकेल असे ज्ञानदेवांना वाटते. सर्वगत असलेले चैतन्य ते अचूक निवडू शकतात. संसारातील अचूक तत्त्व ते ओळखू शकतात. तसे साहित्यातील सौंदर्य (निखळ सौंदर्य) ते अचूकतेने ओळखण्यास पात्र व्हावेत असे म्हणता येईल. ज्ञानदेवांनी श्रोत्यांना –

**तरी न्यून ते पुरतें । अधिक तें सरतें ।**
**करूनि घेयावें हें तुमतें । विनवितु असे ।।** (अ.१, ८०)

असे स्पष्ट शब्दांत विनविले आहे. परतत्त्व डोळ्यांनी पाहण्याची, सुखाचा सोहळा अनुभवण्याची जाण आस्वादकाजवळ असावी, जाणकार आस्वादकांजवळ अज्ञान ही गोष्टच असता कामा नये, असे ज्ञानदेवांनी सुचविले आहे.

**दिसो परतत्त्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा ।**
**रिघो महाबोधसुकाळा । माजीं विश्व ।।**
**तैसी तुम्हां संतांपासीं । अज्ञानाची गोठी कायसी ।**
**यालागीं नवरसीं । वरुषेन मी ।।** (अ.१३, ११६१ व ११६८)

**भावयत्री प्रतिभा :** ज्ञानेश्वरांनी सर्वगुणसंपन्न व सर्वज्ञ आस्वादकांची अपेक्षा केली आहे. साहित्य स्फुरणासाठी जशी सिद्धसरस्वतीच्या कृपाप्रसादाची



आवश्यकता आहे, तशी अभिरुचिसंपन्न माणसालाही आहे असे म्हणता येईल. ज्ञानेश्वरीमध्ये ज्ञानेश्वर स्वतःच त्याचे उदाहरण आहे असे म्हणता येईल. सर्वांसाठी आनंदाचे आवार मांडू असे म्हणणारे ज्ञानदेव, दृष्टादृष्ट रसिकांनाही विजय मिळावा, म्हणजेच परतत्त्वस्पर्श घडावा (अ.१८, १८००) असे म्हणणारे ज्ञानदेव, हे श्रेष्ठ आस्वादक व समीक्षक आहेत. म्हणून कृष्णार्जुन संवादाचा 'गीताप्रसंग' आणि गीतेतील परतत्त्व ते जाणतात. व्यासांची पदे पाहता पाहता मराठीत आणतात. ही जी त्यांना लाभलेली जाण आहे हीच भावयित्री प्रतिभा होय. म्हणूनच त्यांच्या मनाला 'गीताप्रसंग', भावतो असे म्हणता येईल. अभिरुचिसंपन्नता असल्यानेच अर्जुनाला आणि ज्ञानेश्वरांना श्रीकृष्णासारख्या सर्वश्रेष्ठ वक्त्याचे किंवा व्यासांसारख्या श्रेष्ठ साहित्यिकाचे व्याख्यान अवगत झाले हे ध्यानी घेतले पाहिजे.

यावरून ज्ञानदेवांनी अभिरुचीविषयक व्यापक विचार केला आहे असे म्हणता येईल.

**अभिरुची नियत करणारे घटक :** ज्ञानदेवांनी अभिरुची नियत करणाऱ्या काही महत्त्वाच्या ज्या घटकांचा साक्षेपाने उल्लेख केलेला आहे, त्याचा येथेही उल्लेख करणे औचित्यपूर्ण ठरेल.

**अनवधान :** अनवधान वेगवेगळ्या प्रकार होऊ शकते. अन्य ठिकाणी लक्ष गुंतलेले असेल तर अभिरुचिसंपन्नतेतील अन्य घटक असून काय उपयोग? मुळातच जो अंध आहे, अवधानाची क्षमताच नाही, तर तो अवधान कसे देणार? (अ.६०६ व ७). कठोर हृदयाने वा हेतुपूर्वक जो दुर्लक्ष करीत आहे त्याच्याकडून अवधान कसे दिले जाणार? अवधानच दिले जाणार नसेल तर आवड कशी निर्माण होणार व अभ्यास करी कसा होणार? खरे तर कोणतीही गोष्ट अभ्यासाने साध्य होऊ शकते (अ.१२, ११३) आणि अभ्यास नसेल तर अभिरुचीची निष्पत्ती होणे शक्य नाही.

**आवड नसणे :** आवडच नसेल तर तिचे अभिरुचीत रूपांतर तरी कोठून होणार? (अ.६, २८) म्हणूनच आवड निर्माण होणे आवश्यक आहे. आवड ही अभिरुचीची किमान आवश्यक असलेली गोष्ट आहे.

**शास्त्र आणि संप्रदाय यांविषयी अज्ञान :** ज्ञानदेवांनी परंपरा संप्रदाय स्वीकारल्याशिवाय परतत्त्वस्पर्श शक्य नाही, असे म्हटले आहे –

**एऱ्हवीं अमृतमंथना – । सारिखें होईल अर्जुना ।**
**जरी रिघसी अनुष्ठाना । संप्रदायेंवीण ।।**

याचा अर्थ मर्म समजावून घेण्याचा मार्गच माहीत नसेल तर अभिरुचीला मर्यादा

निर्माण होईल.

**मानसिक व शारीरिक अनारोग्य :** अध्यात्मज्ञानामध्ये ज्यांचे मनच नाही त्यांना (मन अस्वस्थ आहे वा मनाला काही पीडा वा त्रास आहे त्यांना) परतत्त्वस्पर्श कसा घडणार? म्हणजे ज्यांचे लक्षच भलतीकडे गुंतले आहे. ('तम' ज्याच्या मनात आहे तो) त्याला निखळ सौंदर्य, आत्मबोध कसा आवडणार? (अ.१३, ८२६) ज्ञेय वस्तूविषयी प्रेमच नसेल तर त्याला त्या ज्ञेयाची ज्ञानमय अनुभूती कशी घडणार? (अ.१८, ४८६). मन पापाने भरून गेले असेल तर मग अभिरुची कशी निर्माण होणार? म्हणून निष्पाप होणे आवश्यक आहे (अ.१७, २१५). मानसिक स्वास्थ्याबरोबरच शारीरिक सुदृढताही कर्माच्या दृष्टीने आवश्यक आहे. अंत:करण शरीर इंद्रियांच्या सहायाने कर्म करते. (अ.१८, ४९८ ते ५०२) ती इंद्रिये कमकुवत असतील तर अभिरुची नियत होईल असे म्हणता येईल.

याकरिता पसायदानामध्ये 'खळांची व्यंकटी सांडो', 'सत्कर्मी रती वाढो', 'दुरितांचे तिमिर जावो' इत्यादि सदिच्छा ज्ञानदेवांनी प्रकट केल्या आहेत.

**भाषा :** नीट भाषाज्ञान नसेल तर अभिरुचिसंपन्नतेत अडथळा येईल. तसेच ग्रंथभाषा ही आस्वादकांना समजेल अशी सोपी व मधुर असली तरच अभिरुची निर्माण होऊ शकेल, असे ज्ञानदेवांना वाटते. म्हणूनच त्यांनी मराठी भाषेत ग्रंथरचना करावयाची ठरविली हे त्यांनी परोपरीने स्पष्ट केले आहे. भाषा व शैली या प्रकरणात आपण या विषयी विशेष विचार केला आहेच.

**व्यासंग नसणे :** अभिरुचिसंपन्नतेसाठी व्यासंगाची आवश्यकता असते हे आपण वर पाहिले आहेच; अर्थात व्यासंग नसेल तर अभिरुची मर्यादित होईल. एकूण अभिरुची नियत करणाऱ्या घटकांतील महत्त्वाच्या घटकांचा विचार केला. अर्थात अभिरुची निर्माण होण्यासाठी ज्या ज्या गुणांची आवश्यकता असते ते गुण नसतील तर अभिरुचीला मर्यादा पडतील आणि अर्थातच आस्वादक परतत्त्वस्पर्शाला पारखा होण्याची शक्यता निर्माण होईल असे म्हणता येईल. म्हणूनच आस्वादक हा अभिरुचिसंपन्न असावा असे ज्ञानदेवांनी परोपरीने सूचित केले आहे.

माणूस सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांनी युक्त आहे. रज आणि तम गुणांनी तो सापेक्ष व्यवहारात अडकतो (अ.१८, ४९८ ते ५०२) तर सत्त्वगुणाने तो अहंकाराचे दमन करून निरपेक्ष आत्मतत्त्वापर्यंत, म्हणजेच परतत्त्वापर्यंत जाऊ शकतो. म्हणूनच दैवीगुण आणि असुरीगुण यांची चर्चा ज्ञानदेवांनी सोळाव्या अध्यायामध्ये मोठ्या विस्ताराने केली आहे. तसेच अठराव्या अध्यायामध्ये



अंत:करण आणि इंद्रिये यांच्या योगाने कर्म कसे घडते आणि सत्त्वगुण निर्माण होताच व्यावहारिक कर्म कसे आपोआपच गळून पडते व निरपेक्ष भावनेने कर्ता कर्म करू लागतो हे स्पष्ट केले आहे. (अ.१८, ५१८ व ५१९). सोलीव, निखळ सौंदर्याचा साक्षात्कार घडावयाचा असेल तर सत्त्वगुण आवश्यक आहे.

आस्वाद प्रक्रिया ही पूर्णत: आस्वादकावर अवलंबून असते की विषयावर अवलंबून असते याचा विचार करता दोन्ही गोष्टींवर ती अवलंबून असते एवढेच नव्हे तर विषय मांडणाऱ्याच्या प्रकटीकरणावर ती अवलंबून असते असेही म्हणता येईल. आस्वादक हा अभिरुचिसंपन्न असेल तरच आस्वादप्रक्रिया घडेल हे लक्षात घेता आस्वादप्रक्रिया ही अभिरुचिसंपन्नतेवर अवलंबून असते अशा निष्कर्षापर्यंत आपण येऊन पोहचतो. मग अशा परिस्थितीमध्ये साहित्यिकाची भूमिका कोणती असावी हा प्रश्न सहजच मनात निर्माण होतो.

**अभिरुचीला वळण लावणे शक्य ? :** येथे आता अभिरुचीविषयक एका वेगळ्या मुद्द्याचा विचार करणे आवश्यक आहे. साहित्यिकाला अभिरुचीला वळण लावणे शक्य आहे का? ज्ञानेश्वरीमध्ये डोकावले तर काय आढळते.

ज्ञानदेवांनी श्रोत्यांना परोपरीने विनवणी केली आहे. (अ.९, १ ते ३०) आणि श्रोत्यांना विशेष गुणांनी गौरविले आहे आणि असे गौरवत असताना श्रोत्यांकडे त्यांनी एकच हट्ट केला आहे तो म्हणजे अवधान द्यावे हा होय. या अवधानाच्या मोबदल्यात सर्व सुखे मिळतील, आनंदाच्या आवारामध्ये स्वैर विहार करता येईल, आनंदाच्या किंवा सुखाच्या राशीवर बसता येईल, परतत्त्व डोळ्यांनी पाहता येईल याची एक प्रकारे केवढी जाहिरात! ज्ञानदेवांनी अज्ञानामध्ये खितपत पडलेल्या, व्रतवैकल्ये आणि सापेक्ष कर्मकांडामध्ये अडकलेल्या तमोगुणी आणि रजोगुणी लोकांच्या मेळाव्यात 'विवेकांच्या वेली' लावल्या आणि त्याही अति हळुवारपणाने आणि लडिवाळपणाने. श्रोत्यांचा 'पढीयंता' होऊन–

**येथ ही जरी सलगी करू बिहों । तरी निवो कें पां ।।** (अ.९, ५)

असे म्हणून 'भाष्यकाराते वाट पुसतु' असे म्हणत धर्मातील कर्मकांडाचा अव्हेर करून सत्त्वगुणाने युक्त होताच व भक्तियुक्त अंत:करणाने पाहता प्रत्यक्ष परमेश्वर डोळ्याने पाहता येतो; हे श्रोत्यांच्या मनावर सतत बिंबविले. येथे एक गोष्ट स्पष्ट होते की वारंवार एखादी गोष्ट नम्रपणाने परंतु ठामपणाने सांगत राहिली की त्याकडे लक्ष जाते आणि अवधानातून आवड निर्माण होऊ शकते आणि अभिरुचीला वळण लागू शकते.

आता येथे मुद्दा उपस्थित होऊ शकेल की ज्ञानेश्वर प्रवचन करीत होते व

त्यांच्या मुखातून निघाणाऱ्या बोलांचा आस्वाद घेणारे श्रोते त्यांच्या समोर होते; त्यामुळे ज्ञानदेवांना ही गोष्ट शक्य होती. या उलट लिखितस्वरूपात साहित्य वाचकांच्या समोर जाणार असते येथे काय ते साहित्य ओरडून सांगणार? परंतु मौखिक परंपरेमध्ये आणि लिखित साहित्याच्या बाबतीत एक गोष्ट समान आहे आणि म्हणजे ओळख करवून देणारा कोणीतरी मध्यस्थ असतो. मौखिक परंपरेत ही भूमिका जरी प्रत्यक्ष निवेदकालाच काही वेळा बजवावी लागत असली तरी, ती सर्व वेळ नव्हे. प्रवचन, कीर्तन वा अन्य सादरीकरणांच्या बाबतीतही सूत्रधार परंपरेत आलेले दिसतात, संयोजक दिसतात, निवेदक दिसतात. लोकसाहित्यात याचा अनुभव वारंवार सर्वदूर येतो. ज्ञानदेव प्रवचन करीत होते, तेथेही निवृत्तिनाथ अशी भूमिका बजावत होते असे दिसते. आता मुद्दा असा की या संदर्भातील जबाबदारी प्रकाशन संस्थांवर आलेली दिसते. त्यांनी या संदर्भात पुढाकार घेतला पाहिजे. जाहिरात, निवेदने, पुस्तकपरिचय, समीक्षणे, परिसंवाद इत्यादी गोष्टींतून हे साधणे शक्य आहे. याचे मार्गदर्शनच जणू ज्ञानदेवांनी 'अवधानाकरिता विनवणी' यातून घडविले आहे, असा विचार मांडता येईल.

आता दुसरी जबाबदारी साहित्यिकाने घ्यावयाची आहे हेही जणू ज्ञानदेवांनी सुचविले आहे असे म्हणता येईल. आपण ज्यांच्यापुढे साहित्य मांडतो आहोत, त्यांच्या भाषेत आपण ते मांडतो की नाही यालाही महत्त्व आहेच. ज्ञानेश्वरीसारखी टीका ज्ञानदेवांनी संस्कृतमध्ये केली असती तर? वेदांप्रमाणेच, वर्तमानातही ती लोकमानसापासून शेकडो मैल दूर राहिली असती. ज्ञानदेवांना ब्रह्मविद्येविषयी सर्वांच्या मनात आवड निर्माण करावयाची होती आणि त्याकरिता त्यांनी सर्वश्रुत व सुप्रसिद्ध घोषणा केली.

**माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजासी जिंके ।**
**ऐसी अक्षरे रसिकें । मेळवीन ।।** (अ.६, १४)

लोकभाषेला यापूर्वी असे खचितच कोणी गौरविले असेल! प्रवचनाच्या ओघात लोकांना अवगत असलेल्या भाषेचा पुन्हा पुन्हा गौरवाने उल्लेख करीत ज्ञानदेवांनी पुन्हा एकवार सर्वांना विश्वासात घेणारी घोषणा केली.

**मऱ्हाटियेचां नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं ।**
**घेणें देणें सुखविवरी । हों देईं या जगा ।** (अ.१२, १६)

ज्यांच्यापुढे सारस्वत मांडावयाचे आहे, त्यांच्याच भाषेचा उपयोग करून ज्ञानदेवांना सर्वांच्या मनात औत्सुक्य, प्रसन्नता निर्माण करावयाची होती म्हणूनच खुबीने (नम्रता, औचित्य इ. गोष्टींच्या सहायाने) आणि धाडसाने त्यांनी परोपरीचा



प्रयत्न केला. असा प्रयत्न साहित्यिकाने केला तर स्वाभाविकपणेच अभिरुचीला वळण लावता येईल असे वाटते. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य यांची आधुनिक काळातील उदाहरणे याच संदर्भात आपणांसमोर येतील.

ज्ञानदेवांचे व्यक्तित्वच असे लोकविलक्षण आहे. ते अभिरुचिसंपन्न, रसिक, आस्वादक होते, तसेच ते श्रेष्ठ कवीही होते. त्याच वेळी ते तत्त्वज्ञ होते, तसेच ते संत आत्मानुभवी योगीही होते. याचबरोबर ज्ञानेश्वरी लेखनातून त्यांच्या आणखी एका पैलूचा विचार करता येतो की ते श्रेष्ठ साहित्यमीमांसकही होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व साहित्याच्या संदर्भात सर्व बाजूंवर प्रकाश टाकू शकले.

**साहित्यिक कसा असावा?**
**-- ज्ञानेश्वरांसारखा !**
**साहित्य म्हणजे काय? ते कसे असावे ?**
**-- ज्ञानेश्वरीचे उदाहरण देऊन सांगावे !**
**आस्वादक कसा असावा?**
**-- ज्ञानेश्वरांसारखा !**
**टीका कशा प्रकारे असावी ?**
**-- ज्ञानेश्वरीसारखी !**

म्हणूनच ज्ञानेश्वर हे साहित्यिक, आस्वादक, समीक्षक आणि अभ्यासक या सर्वांचेच माउली होत असे म्हणता येईल.

ज्ञानेश्वर लोकोत्तर ! आणि ज्ञानेश्वरीही लोकोत्तर !!

# परिशिष्ट

शंकर वामन दांडेकर यांनी संपादन केलेली ज्ञानेश्वरीची प्रत प्रमाण मानून हा ओवीसंग्रह केला आहे. (सार्थ ज्ञानेश्वरी; संपादक – दांडेकर शंकर वामन, प्रसाद प्रकाशन, पुणे २, आषाढ शु. एकादशी, शके १८७५)

**ओवी संग्रह (अध्यायानुसार)**

**अध्याय पहिला**

श्रीगणेशाय नमः
ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।१।।
देवा तूंचि गणेशु । सकलमतिप्रकाशु ।
म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी ।।२।।
हें शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुवेष ।
तेथ वर्णवपु निर्दोष । मिरवत असे ।।३।।
स्मृति तेचि अवयव । देखां अंगीकभाव ।
तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ।।४।।
अष्टादश पुराणें । तीचि मणिभूषणें ।
पदपद्धती खेवणें । प्रमेयरत्नांचीं ।।५।।
पदबंध नागर । तेंचि रंगाथिले अंबर ।
जेथ साहित्य वाणें सपूर । उजाळाचें ।।६।।
देखा काव्यनाटका । जें निर्धारितां सकौतुका ।
त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ।।७।।
नाना प्रमेयांची परी । निपुणपणे पाहतां कुसरी ।
दिसती उचित पदें माझारीं । रत्नें भलीं ।।८।।
तेथ व्यासादिकांच्या मती । तेचि मेखळा मिरवती ।
चोखाळपणें झळकती । पल्लवसडका ।।९।।
देखा षड्दर्शनें म्हणिपती । तेचि भुजांची आकृती ।
म्हणऊनि विसंवादें धरिती । आयुधें हातीं ।।१०।।
तरी तर्कु तोचि फरशु । नीतिभेदु अंकुशु ।
वेदान्तु तो महारसु । मोदकु मिरवे ।।११।।
एके हातीं दंतु । जो स्वभावता खंडितु ।
तो बौद्धमतसंकेतु । वार्तिकांचा ।।१२।।
मग सहजें सत्कारवादु । तो पद्मकरू वरदु ।
धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु । अभयहस्तु ।।१३।।
देखा विवेकवंतु सुविमळु । तोचि शुंडादंडु सरळु
जेथ परमानंदु केवळु । महासुखाचा ।।१४।।
तरी संवादु तोचि दशनु। जो समताशुभ्रवर्ण ।
देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु ।।१५।।
मज अवगमलिया दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं ।
बोधमदामृत मुनी –। अली सेविती ।।१६।।
प्रमेयप्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि निकुंभ ।
सरिसे एकवटत इभ । मस्तकावरी ।।१७।।
उपरि दशोपनिषदें । जियें उदारें ज्ञानमकरंदें ।
तियें कुसुमें मुगुटीं सुगंधें । शोभतीं भलीं ।।१८।।
अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल ।
मकार महामंडल । मस्तकाकारें ।।१९।।
हे तिन्ही एकवटले । तेथें शब्दब्रह्म कवळलें ।
तें मियां गुरुकृपा नमिलें । आदिबीज ।।२०।।
आतां अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी ।
ते शारदा विश्वमोहिनी । नमस्कारिली मियां ।।२१।।
मज हृदयीं सद्गुरू । जेणें तारिलों हा संसारपूरु ।
म्हणऊनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी ।।२२।।
जैसें डोळ्यां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ।
मग वास पाहिजे तेथ प्रगटे । महानिधी ।।२३।।
का चिंतामणी जालया हातीं । सदा विजयवृत्ति मनोरथीं ।

तैसा मी पूर्णकाम निवृत्ती । ज्ञानदेवो म्हणे ।।२४।।
म्हणोनि जाणतेनो गुरू भजिजे । तेणें कृतकार्या होईजें ।
जैसे मूळसिंचनें सहजें । शाखापल्लव संतोषती ।।२५।।
कां तीर्थे जियें त्रिभुवनीं । तियें घडती समुद्रावगाहनीं ।
ना तरी अमृतरसास्वादनीं । रस सकळ ।।२६।।
तैसा पुढतपुढती तोचि । मियां अभिवंदिला श्रीगुरुचि ।
जो अभिलषित मनोरुचि । पुरविता तो ।।२७।।
आता अवधारा कथा गहन । जो सकळां कौतुका जन्मस्थान ।
की अभिनव उद्यान । विवेकतरूचें ।।२८।।
ना तरी सर्व सुखांची आदि । जे प्रमेयमहानिधी ।
नाना नवरससुधाब्धि । परिपूर्ण हे ।।२९।।
माधुर्यीं मधुरता । शृंगारी सुरेखता ।
रूढपण उचितां । दिसे भलें ।।३६।।
कां सुक्षेत्रीं बीज घातलें । तें आपुलियापरी विस्तारलें ।
तैसें भारतीं सुरवाडलें । अर्थजात ।।४०।।
म्हणऊनि महाभारतीं जें नाहीं । ते नोहेचि लोकीं तिहीं ।
येणें कारणें म्हणिपे पाहीं । व्यासोच्छिष्ट जगत्रय ।।४७।।
जैसें शारदीयेचें चंद्रकळे – । माजीं अमृतकण कोंवळे ।
ते वेंचिती मनें मवाळें । चकोरतलगें ।।५६।।
तियापरी श्रोता । अनुभवावी हे कथा ।
अतिहळुवारपणा चित्ता । आणुनियां ।।५७।।
हे शब्देविण संवादिजे । इंद्रिया नेणतां भोगिजे ।
बोलाआदि झोंबिजे । प्रमेयासी ।।५८।।
जैसे भ्रमर परागु नेती । परी कमळदळें नेणती ।
तैसी परी आहे सोविती । ग्रंथीं इये ।।५९।।
कां आपुला ठावो न सांडितां । आलिंगिजे चंदु प्रगटतां ।
हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणे ।।६०।।
ऐसेनि गंभीरपणें । थिरावलेनि अंत:करणें ।
आथिला तोचि जाणे । मानूं इये ।।६१।।
अहो अर्जुनाचिये पांती । परिसणया योग्य होती ।
तिहीं कृपा करूनि संतीं । अवधान द्यावे ।।६२।।

हैं सलगी म्यां म्हणितलें । चरणां लागोनि विनविलें ।
प्रभू सखोल हृदय आपुलें । म्हणऊनियां ।।६३।।
जैसा स्वभावो मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा ।
तरी अधिकचि तयाचा । संतोष आथी ।।६४।।
तैसा तुम्हीं मी अंगीकारिला । सज्जनीं आपुला म्हणितला ।
तरी उणें सहजें उपसाहला । प्रार्थूं कायी ।।६५।।
हें अनावर न विचारितां । वयांचि धिंवसा उपनला चित्ता ।
येऱ्हवीं भानुतेजीं काय खद्योता । शोभा आथी ।।६७।।
परी एथ असे एकु आधारु । तेणेंचि बोलें मी सधरु ।
जे सानुकूळ श्रीगुरु । ज्ञानदेवो म्हणे ।।७५।।
येऱ्हवीं तरी मी मुर्खु । जरी जाहला अविवेकु ।
तरी संतकृपादीपकु । सोज्वळु असे ।।७६।।
जरी प्रकटे सिद्धसरस्वती । तरी मुकया आथी भारती ।
एथ वस्तुसामर्थ्यशक्ती । नवल कायी ।।७८।।
तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें ।
करूनि घेयावें हें तुमतें । विनवितु असे ।।८०।।
आतां देइजो अवधान । तुम्हीं बोलविल्या मी बोलेन ।
जैसें चेष्टे सूत्राधीन । दारुयंत्र ।।८१।।
तैसा मी अनुग्रहीतु । साधूंचा निरूपितु ।
ते आपुला अलंकारितु । भलतयापरी ।।८२।।

**अध्याय दुसरा**

या उपाधिमाजीं गुप्त । चैतन्य असे सर्वगत ।
तें तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती ।।१२६।।
सलिलीं पय जैसे । एक होऊनि मीनलें असे ।
परीं निवडुनि राजहंसें । वेगळे कीजे ।।१२७।।
कीं अग्निमुखें किडाळ । तोडोनियां चोखाळ ।
निवडिती केवळ बुद्धिमंत ।।१२८।।
ना तरी जाणिवेच्या आयणी । करितां दधिकडसणी ।
मग नवनीत निर्वाणीं । दिसे जैसें ।।१२९।।
की भूस बीज एकवट । उपणितां राहे घनवट ।
तेथ उडे तें फलकट । जाणों आलें ।।१३०।।

तैसें विचारितां निरसलें । तें प्रपंचु सहजें सांडवलें ।
मग तत्त्वता तत्त्व उरलें । ज्ञानियांसी ।।१३१।।

**अध्याय तिसरा**

म्हणोनि आइके देवा । हा भावार्थु आतां न बोलावा ।
मज विवेकु सांगावा । महाटा जी ।।१७।।
तया पर्जन्या यज्ञीं जन्म । यज्ञाते प्रगटी कर्म ।
कर्मासि आदि ब्रह्म । वेदरूप ।।१३५।।
मग वेदाते परापर । प्रसवतसे अक्षर ।
म्हणऊनि हें चराचर । ब्रह्मबद्ध ।।१३६।।
तया बोलाचा हन पाडु । का रसवृत्तीचा निवाडु ।
येणें श्रोतयां होईल सुरवाडु । श्रवणसुखाचा ।।२७५।।

**अध्याय चवथा**

आजि श्रवणेंद्रिया पिकलें । जे येणें गीतानिधान देखिलें ।
आतां स्वप्नचि हें तुकलें । साचासरिसें ।।१।।
आधीचि विवेकाची गोठी । वरी प्रतिपादी कृष्ण जगजेठी ।
आणि भक्तराजु किरीटी । परिसत असे ।।२।।
कैसी आगळिक देवाची । जे गंगा वोळली अमृताची ।
हो कां जपतप श्रोतयांची । फळा आली ।।४।।
आतां इंद्रियजात आघवें । तिहीं श्रवणाचे घर रिघावें ।
मग संवादसुख भोगावें । गीताख्य हें ।।५।।
ते वेळी संजयो रायातें म्हणे । अर्जुनु अधिष्ठिला दैवगुणें ।
जे अतिप्रीती नारायणें । बोलिजतु असे ।।७।।
या जगदीश्वराचे प्रेम । एथ दिसतसे निरुपम ।
कैसे पार्थे येणे सर्वोत्तम । पुण्य केलें ।।११।।
हो कां जयाचिया प्रीती । अमूर्त हा आला व्यक्ती ।
मज एकवंकी याची स्थिती । आवडतु असे ।।१२।।
तो शांतुचि अभिनवेल । ते परियसा मऱ्हाठे बोल ।
जे समुद्राहुनि खोल । अर्थभरित ।।२१४।।
जैसे बिंब तरी बचके एवढे । परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडें ।
शब्दाची व्याप्ति तेणें पाडें । अनुभवावी ।।२१५।।
जेथ साहित्य आणि शांति । हे रेखा दिसे बोलती ।
जैसी लावण्यगुणकुळती । आणि पतिव्रता ।।२१८।।
सहजें मलयानिलु मंदु सुगंधु । तया अमृताचा होय स्वादु ।
आणि तेथेंचि जोडे नादु । जरी दैवगत्या ।।२२०।।
तरी स्पर्शे सर्वांग निववी । स्वादें जिव्हेंते नाचवी ।
तेवीचि कानाकरवीं । म्हणवी बापु माझा ।।२२१।।
तैसें कथेचें इये ऐकणें । एक श्रवणासि होय पारणें ।
आणि संसारदुःख मूळवणें । विकृतीविणें ।।२२२।।
तैसा मनाचा मारु न करितां । आणि इंद्रियां दुःख न देतां ।
एथ मोक्षु असे आयता । श्रवणाचिमाजी ।।२२४।।

**अध्याय पाचवा**

जैशी पूर्वदिशेच्या राउळीं । उदयाची सूर्ये दिवाळी ।
कीं येरींही दिशां तियेचि काळीं । काळिमा नाहीं ।।८६।।
ऐसा योगयुक्तीचा उद्देशु । जेथ बोलिला हृषीकेशु ।
तेथ अर्जुनु सुदंशु । म्हणोनि चमत्कारला ।।१६१।।
तंव अर्जुन म्हणे देवो । परचित्तलक्षणांचा रावो ।
भला जाणितला जी भावो । मानसु माझा ।।१६३।।
तरी मागीला ध्वनीआंतु । मज गमला सावियाचि मोहितु ।
जे बलात्कारें असे म्हणतु । परिसें बापा ।।१७५।।
अर्जुना जेणें भेदें । तुझें कां चित्त बोधे ।
तैसें तैसें विनोदें । निरूपिजेल ।।१७६।।

**अध्याय सहावा**

हें जाणोनि मनीं हांसिला । म्हणे म्हातारा मोहें नाशिला ।
एऱ्हवीं बोलु तरी भला जाहला । अवसरी ये ।।६।।
परि तें तैसें कैसेनि होईल । जात्यंधा कैसें पाहेल ।
तेवींचि येरु से घेईल । म्हणोनि बिहे ।।७।।
माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजासी जिंके ।
ऐसी अक्षरे रसिकें । मेळवीन ।।१४।।
जिये कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे ।
वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ।।१५।।
ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होति जिभा ।
बोलें इंद्रिया लागे कळंभा । एकमेकां ।।१६।।

सहजें शब्द तरी विषो श्रवणाचा । परि रसना म्हणे हा रसु आमुचा ।
घ्राणासि भावो जाय परिमळाचा । हा तोचि होईल ।।१७।।
नवल बोलतीये रेखेची वाहणी । देखतां डोळ्यांही पुरों लागे धणी ।
ते म्हणती उघडली खाणी । रूपाची हे ।।१८।।
जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मनचि धावें बाहिरें ।
बोलु भुजाही आविष्करे । आलिंगावयां ।।१९।।
ऐशीं इंद्रिये आपुलालिया भावीं । झोंबती परि तो सरिसेपणेंचि बुझावी ।
जैसा एकला जग चेववी । सहस्रकरु ।।२०।।
तैसें शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण ।
पाहातयां भावज्ञां फावती गुण । चिंतामणीचे ।।२१।।
हें असोतु या बोलाची तातें भलीं । वरी कैवल्यरसें वोगरलीं ।
ही प्रतिपत्ति मियां केली । निष्कामासी ।।२२।।
आता आत्मप्रभा नीच नवी । तेचि करूनि ठाणदिवी ।
जो इंद्रियांतें चोरूनि जेवी । तयासीचि फावे ।।२३।।
येथ श्रवणाचेनि पांगें – । वीण श्रोतयां व्हावें लागे ।
हे मनाचेनि निजांगें । भोगिजे गा ।।२४।।
आहाच बोलाची वालीफ फेडिजे । आणि ब्रह्माचियाचि आंगा घडिजे ।
मग सुखेंसी सुरवाडिजे । सुखाचिमाजि ।।२५।।
ऐसें हळुवारपण येईल । तरीच हें उपेगा जाईल ।
एऱ्हवीं आघवी गोठी होईल । मुकयाबहिरयाची ।।२६।।
परी तें असो आतां आघवें । नलगे श्रोतयांतें कडसावें ।
जे एथ अधिकारिये स्वभावें । निष्कामकाम ।।२७।।
जिहीं आत्मबोधाचिया आवडी । केली स्वर्गसंसाराची कुरोंडी ।
तेवांचूनि एथींची गोडी । नेणती आणिक ।।२८।।
जैसा वायसी चंद्र नोळखिजे । तैसा ग्रंथ हा प्राकृतीं नेणिजे ।
आणि तो हिमांशुचि जेविं खाजें । चकोराचें ।।२९।।
तैसा सज्ञानासी तरी हा ठावो । आणि अज्ञानासी आन गांवो ।
ह्मणोनि बोलावया विषय पहाहो । विशेषें नाहीं ।।३०।।
तें बुद्धीही कळितां सांकडे । म्हणऊनि बोलीं विपायें सांपडे ।
परि निवृत्तिकृपादीपउजियेडें । देखेन मी ।।३२।।
जें दिठीही न पविजे । तें दिठीविण देखिजे ।
जरी अतींद्रिय लाहिजे । ज्ञानबळ ।।३३।।
ना तरी धातुवादाही न जोडे । तें लोहींचि पंधरे सांपडे ।
जरी दैवयोगें चढे । परिसु हातां ।।३४।।
तैसी सद्‌गुरुकृपा होये । तरी करितां काय आपु नोहे ।
म्हणऊनि ते अपार मातें आहे । ज्ञानदेवो म्हणे ।।३५।।
तेणे कारणें मी बोलेन । बोलीं अरूपाचें रूप दावीन ।
अतींद्रिय परि भोगवीन । इंद्रियांकरवीं ।।३६।।
जेथ अमृताचेनि पाडें । मुळेंहीसकट गोडें ।
जोडती दाटें झाडें । सदाफळतीं ।।१७३।।
पाउला पाउला उदकें । परि वर्षाकाळीही चोखें ।
निर्झरें कां विशेखें । सुलभे जेथे ।।१७४।।
हा आतपुही अळुमाळु । जाणिजे तरी शीतळु ।
पवनु अति निश्चळु । मंद झुळके ।।१७५।।
बहुतकरूनि निःशब्द । दाट न रिगे श्वापाद ।
शुक हन षट्पद । तेउतें नाहीं ।।१७६।।
मोटकी देहाकृति उमटे । आणि निजज्ञानाची पांहाट फुटे ।
सूर्यापुढां प्रगटे । प्रकाशु जैसा ।।४५२।।
तैशी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां ।
बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ।।४५३।।
तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे ।
मग सकळ शास्त्रे स्वयंभें । निघती मुखे ।।४५४।।
जे सात्त्विकाचेनि वडपें । गेलें आध्यात्मिक खरपें ।
सहजें निरोळले वाफे । चतुरा चित्ताचे ।।४९०।।
वरी अवधानाचा वाफसा । लाधला सोनयाऐसा ।
म्हणोनि पेरावया धिंवसा । निवृत्तीसी ।। ४९१।।
ज्ञानदेव म्हणे मी चाडें । सद्‌गुरूंनीं केला कोडें ।
माथा हात ठेविला तें फुडें । बीचि वाइलें ।।४९२।।
म्हणऊनि येणें सुखें जें निगे । तें संतांचां ह्रदयीं साचचि लागे ।
हें असो सांगें श्रीरंगे । बोलिलें जें ।।४९३।।
परी तें मनाच्या कानीं एकावें । बोल बुद्धीच्या डोळां देखावे ।
हे साटोवाटीं घ्यावे । चित्ताचिया ।।४९४।।

अवधानाचेनि हातें । नेयावे हृदयाआंतौते ।
हे रिझवितील आयणीतें । सज्जनांचिये ।।४९५।।
हे स्वहितातें निवविती । परिणामातें जीवविती ।
सुखाची वाहविती । लाखोली जीवा ।।४९६।।
आतां अर्जुनेंसी मुकुंदे । नागर बोलिजेल विनोदें ।
तें बोंवियेचेनि प्रबंधें । सांगेन मी ।।४९७।।

**अध्याय सातवा**

जे अहंभावाचें वोझें सांडुनी । विकल्पाचिया झुळकां चुकाउनी ।
अनुरागाचा निरु ताउनी । पाणिढाळु ।।९९।।
जया ऐक्याचिया उतारा । बोधाचा जोडला तारा ।
मग निवृत्तीचिया पैल तीरा । झेंपावले जे ।।१००।।
ते उपरतीचां वांवी सेलत । सोहंभावाचेनि थावें पेलत ।
मग निघाले अनकळित । निवृत्तितटीं ।।१०१।।
नाना अमृताचां सागरीं बुडिजे । मग तोंडा कां वज्रमिठी पाडिजे ।
आणि मनीं तरी आठविजे । थिल्लरोदकातें ।।१५२।।
हें ऐसें काइसेया करावें । जें अमृतींही रिगोनि मरावें ।
तें सुखें अमृत होऊनि कां नसावें । अमृतामाजीं ।।१५३।।
तंव इये शब्दकुपिकेतळीं । नोडवेचि अवधानाची अंजुळी ।
जे नावेक अर्जुन तये वेळीं । मागांचि होता ।।१८५।।
जेथ तद्ब्रह्मवाक्यफळें । जियें नानार्थरसें रसाळें ।
बहकाते आहाती परिमळें । भावाचेनि ।।१८६।।
सहज कृपामंदानिळें । कृष्णद्रुमाचीं वचनफळें ।
अर्जुन श्रवणाचिये खोळे । अवचित पडिलीं ।।१८७।।
तियें प्रमेयाचींच हो कां वळलीं । कीं ब्रह्मरसाचां सागरी चुबुकळिलीं ।
मग तैसींच का घोळिलीं । परमानंदे ।।१८८।।
तेणें बरवेपणें निर्मळें । अर्जुना उन्मेषाचे डोहळे ।
घेताति गळाळे । विस्मयामृताचे ।।१८९।।
तिया सुखसंपत्ति जोडलिया । मग स्वर्गा वाती वांकुलिया ।
हृदयाची जीवीं गुतकुलिया । होत आहाती ।।१९०।।
तिये अवधान द्यावें गोठी । बोलिजेल नीट मऱ्हाटी ।
जैसी कानाचे आधीं दृष्टी । उपेगा जाये ।।२०६।।



बुद्धिचिया जिभा । बोलीचा न चाखतां गाभा ।
अक्षरांचियाचि भांबा । इंद्रियें जिती ।।२०७।।
पहा पां मालतीचे कळे । घ्राणासि कीर वाटले परिमळें ।
परि वरचिली बरवा काइ डोळे । सुखिये नव्हती ।।२०८।।
तैसे देशियेचिया हवावा । इंद्रिये करिती राणिवा ।
मग प्रमेयाचिया गांवा । लेसा जाईजे ।।२०९।।

**अध्याय आठवा**

म्हणोनि सत्त्विक भावांचि नांदी । कृष्णाआंगी अर्जुनाआधीं ।
न समातसे परी बुद्धी । सांवरूनि देवें ।।५६।।
मग पिकलिया सुखाचा परिमळु । का निवालिया अमृताचा कल्लोळु ।
तैसा कोंवळा आणि सरळु । बोलु बोलिला ।।५७।।

**अध्याय नववा**

तरी अवधान एकवेळें दीजे । मग सर्वसुखासि पात्र होइजे ।
हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड ऐका ।।१।।
परी प्रौढी न बोलें हो जी । तुम्हा सर्वज्ञांचां समाजीं ।
देयावें अवधान हे माझी । विनवणी सलगीची ।।२।।
कां जे लळेयांचे लळे सरती । मनोरथांचे मनौरे पुरती ।
जरी माहेरें श्रीमंते होती । तुम्हांऐसीं ।।३।।
तुमचेया दिठिवेयाचिये वोले । सासिन्नले प्रसन्नतेचे मळे ।
ते साउली देखोनि लोळें । श्रांतु जी मी ।।४।।
प्रभू तुम्ही सुखामृताचे डोहो ।
म्हणोनि आम्ही आपुलिया स्वेच्छा बोलावों लाहों।
येथही जरी सलगी करूं बिहों । तरी निवों कें पां ।।५।।
नातरी बालक बोबडां बोलीं । कां वांकुडां विचुकां पाउलीं ।
तें चोज करूनि माउली । रिझे जेवीं ।।६।।
तेवीं तुम्हां संतांचा पढियावो । कैसेनि तरी आम्हांवरी हो ।
या बहुवा आकुळिया जी आहों । सलगी करित ।।७।।
वांचूनि माझिये बोलतिये योग्यते । सर्वज्ञ भवादृश श्रोते ।
काय धड्याावरी सारस्वतें । पढों सिकिजे ।।८।।
अवधारां आवडे तेसणा धुंधरू । परि महातेजीं न मिरवे काय करूं ।
अमृताचिया ताटीं वोगरूं। ऐसी रससोय कैंची ।।९।।

अहो हिमकरासी विंजणें । कीं नादापुढें आइकवणें ।
लेणियासी लेणें । हें कहीं आथी ।।१०।।
सांगां परिमळे काय तुरंबावें । सागरें कवणे ठायीं नाहावें ।
हें गगनचि आडे आघवें । ऐसा पवाडु कैचा ।।११।।
तैसें तुमचें अवधान धाये । आणि तुम्ही म्हणा हें होये।
ऐसें वक्तृत्व कवणा आहे । जेणें रिझा तुम्ही ।।१२।।
तरि विश्वप्रगटितया गभस्ती । हातिवेनि न कीजे आरती ।
कां चुळोदकें आपांपती । अर्घ्यु नेदिजे ।।१३।।
प्रभू तुम्ही महेशाचिया मूर्ती । आणि मी दुबळा अर्चितसें भक्ती ।
म्हणोनि बेल जऱ्ही गंगावती । तऱ्ही स्वीकाराल कीं ।।१४।।
बाळक बापाचिये ताटीं रिगे । रिगौनि बापातेंच जेवऊं लागे ।
कीं तो संतोषलेनि वेगें । मुखचि वोडवी ।।१५।।
तैसा मी जरी तुम्हांप्रती । चावटी करीतसें बाळमती ।
तरी तुम्हीं तोषिजे ऐसी जाती । प्रेमाची या ।।१६।।
आणि तेणें आपुलेपणाचेनि मोहें । तुम्ही संत घेतले असा बहुवे ।
म्हणोनि केलिये सलगीचा नोहे । आभारु तुम्हां ।।१७।।
अहो तान्हयाची लागे झटे । तरी अधिकचि पान्हा फुटे ।
रोषें प्रेम दुणवटे । पाढियंताचेनि ।।१८।।
म्हणऊनि मज लेंकुरवाचेनि बोलें । तुमचें कृपाळूपण निदैलें ।
तें चेइलें हें जी जाणवलें । यालागीं बोलिलों मी ।।१९।।
एऱ्हवीं चांदिणें पिकविजत आहे चेपणी । कीं वारया घापत आहे वाहणी।
हां हो गगनासि गवसणी । घालिजे केवीं ।।२०।।
आइकां पाणी वोथिजावें न लगे । नवनीतीं माथुला न रिगे ।
तेविं लाजिलें व्याख्यान न निगे । देखोनि जयांतें ।।२१।।
हें असो शब्दब्रह्म जिये बाजे । शब्द मावळलेया निवांतु निजे ।
तो गीतार्थ मऱ्हाटिया बोलिजे । हा पाडु काई ।।२२।।
परि ऐसियाही मज धिंवासा । तो पुढतियाचि येकी आशा ।
जे धिटींवा करूनि भवादृशां । पढियंतया होआवें ।।२३।।
परि आतां चंद्रापासोनि निववितें । जें अमृताहूनि जीववितें ।
तेणे अवधानें की जो वाढतें । मनोरथा माझिया ।।२४।।
कां जैं दिठिवा तुमचा वरुषे । तैं सकळार्थसिद्धि मती पिके ।
एऱ्हवीं कोंभेला उन्मेषु सुके । जरी उदास तुम्ही ।।२५।।
सहजें तरी अवधारा । वक्तृत्वा अवधानाचा होय चारा ।
तरी दोंदें पेलती अक्षरां । प्रमेयाचीं ।।२६।।
अर्थ बोलाची वाट पाहे । तेथ अभिप्रावो अभिप्रयातें विये ।
भावाचा फुलौरा होत जाये । मतिवरी ।।२७।।
म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे । तरी हृदयाकाश सारस्वतें वोळे ।
आणि श्रोता दुश्चिता तरि वितुळे । मांडला रसु ।।२८।।
अहो चंद्रकांतु द्रवता कीर होये । परि ते हातवटी चंद्रीं कीं आहे ।
म्हणऊनि वक्ता तो वक्ताचि नोहे । श्रोतेनविण ।।२९।।
परी आतां आमुतें गोड करावें । ऐसें हें तांदुळीं कासया विनवावें ।
साइखडियानें काई प्रार्थावें । सूत्रधारातें ।।३०।।
काय तो बाहुलियांचिया काजा नाचवी ।
कीं आपुलिये जाणिवेची कळा वाढवी ।
म्हणऊनि आम्हां या ठेवाठेवी । काय काज ।।३१।।
पैं ब्रह्मबीजा जाहला अंकुरु । घोषध्वनी – नादाकारु ।
तयांचें गा भुवन जो ॐ कारू । तोही मी गा ।।२७५।।
जया ॐ काराचिये कुशी । अक्षरें होती अउमकारेंस ।
जियें उपजत वेदेंसी । उठलीं तिन्हीं ।।२७६।।
म्हणोनि ऋग्यजुः सामु । हे तीन्ही म्हणे मी आत्मारामु ।
एवं मीचि कुलक्रमु । शब्दब्रह्माचा ।।२७७।।
परि बाप भाग्य माझें । जे वृत्तांतु सांगावयाचेनि व्याजें ।
कैसा रक्षिलों मुनिराजें । श्रीव्यासदेवें ।।५२५।।
येतुलें हें वाडें सायासें । जंव बोलत असे दृढें मानसें ।
तंव न धरवेचि आपुलिया ऐसें । सात्त्विकें केलें ।।५२६।।
चित्त चाकाटलें आटु घेत । वाचा पांगुळली जेथिंची तेथ ।
आपादकंचुकित । रोमांच आले ।।५२७।।
अर्धोन्मीलित डोळे । वर्षताति आनंदजळें ।
आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें । बाहेरि कांपे ।।५२८।।
पैं आघवांचि रोममुळीं । आली स्वेदकणिका निर्मळी ।
लेइला मोतियांची कडियाळीं । आवडे तैसा ।।५२९।।
ऐसा महासुखाचेनि अतिरसें । जेथ आटणी होईल जीवदशे ।

तेथ निरोविलें व्यासें । तें नेदीच हों ।।५३०।।
अहो अळुमाळ अवधान देयावें। येतुलेनि आनंदाचे राशीवरी बैसावें ।
बाप श्रवणेंद्रिया दैवें । घातली माळ ।।५३४।।

**अध्याय दहावा**

नमो विशदबोधविद्गदा । विद्यारविंदप्रबोधा ।
पराप्रमेयप्रमदा । विलासिया ।।१।।
नमो संसारतमसूर्या । अप्रितिम परमवीर्या ।
तरुणतरतूर्या - । लालनलीला ।।२।।
नमो जगदखिलपालना । मंगळमणिनिधाना ।
स्वजनवनचंदना । आराध्यालिंगा ।।३।।
नमो चतुरचित्तचकोरचंद्रा । आत्मानुभवनरेंद्रा ।
श्रुतिगुणसमुद्रा । मन्मथमन्मथा ।।४।।
नमो सुभावभजनभाजना । भवेभकुंभभंजना ।
विश्वोद्भवभुवना । श्रीगुरुराया ।।५।।
तुमचा अनुग्रहोगणेशु । जैं दे आपुला सौरसु ।
तैं सरस्वतीं प्रवेशु । बाळकाही आथी ।।६।।
दैविकी उदार वाचा । जैं उद्देशु दे नाभिकाराचा ।
तैं नवरसदीपांचा । थावो लाभे ।।७।।
जी आपुलिया स्नेहाची वागेश्वरी । जरी मुकेयातें अंगीकारी ।
तो वाचस्पतीशीं करी । प्रबंधुहोडा ।।८।।
हें असो दिठी जयावरी झळके । कीं हा पद्मकरु माथां पारुखे ।
तो जीवचि परि तुके । महेशेंशीं ।।९।।
एवढें जिये महिमेचें करणें । तें वाचाळपणें वानूं मी कवणें ।
का सूर्याचिया आंगा उटणें । लागत असे ।।१०।।
केउता कल्पतरूवरी फुलौरा । कायसेनि पाहुणेरु क्षीरसागरा ।
ऐसा कवणें वासी कापुरा । सुवासु देवों ।।११।।
चंदनातें कायसेनि चर्चावें । अमृतातें केउतें रांधावें ।
गगनावरी उभवावें । घडे केवीं ।।१२।।
तैसें श्रीगुरूचें महिमान । आकळितें के असे साधन ।
हे जाणोनि मियां नमन । निवांत केलें ।।१३।।
तरी प्रज्ञेचेनि आथिलेपणें । श्रीगुरु समर्था रूप म्हणे ।
तरि मोतियांसी भिंग देणे । तैसें होईल ।।१४।।
कां साडेपंधरया रजतवणी । तैशीं स्तुतीचीं बोलणीं ।
उगियाचि माथा ठेविजे चरणीं । हेंचि भलें ।।१५।।
मग म्हणितलें जी स्वामी । भलेनि ममत्वें देखिलें तुम्हीं ।
म्हणोनि कृष्णार्जुनसंगमीं । प्रयागवटु जाहलों ।।१६।।
तैसी ब्रह्मविद्यारावो । सकळ शास्त्रांचा विसंवता ठावो ।
ते भगवद्गीता वोविया गावों । ऐसें केलें ।।१९।।
जे बोलणियाचा रानीं हिंडतां । नायकिजे फळलिया अक्षरांची वार्ता ।
परि ते वाचाचि केली कल्पकता । विवेकाची ।।२०।।
होती देहबुद्धि एकसरी । ते आनंदभांडारा केली वोवरी ।
मन गीतार्थ सागरीं । जळशयन जालें ।।२१।।
तैसे एकैक देवांचें करणें । तें अपार बोलों केवीं मी जाणें ।
तही अनुवादलों धीटपणें । तें उपसाहिजो जी ।।२२।।
आता आपुलेनि कृपाप्रसादें । मियां भगवद्गीता वोवीप्रबंधे ।
पूर्वखंड विनोदें । वाखाणिलें ।।२३।।
देशियेचेनि नागरपणें । शांतु शृंगारातें जिणे ।
तरि ओंविया होती लेणें । साहित्यासी ।।४२।।
मूळग्रंथींचिया संस्कृता - । वरि मऱ्हाटी नीट पढतां ।
अभिप्राय मानलिया उचिता । कवण भूमी हें न चोजवे ।।४३।।
जैसें अंगाचेनि सुंदरपणें । लेणियासी आंगचि होय लेणें ।
अळंकारिलें कवण कवणें । हें निर्वचेना ।।४४।।
तैसी देशी आणि संस्कृत वाणी । एका भावार्थाचा सोकासनीं ।
शोभती आयणी । चोखट आइका ।।४५।।
उठावलिया भावा रूप । करितां रसवृत्तीचें लागे वडप ।
चातुर्य म्हणे पडप । जोडलें आम्हां ।।४६।।
तैसे देशियेचें लावण्य । हिरोनि आणिलें तारुण्य ।
मग रचिलें अगण्य गीतातत्त्व ।।४७।।
पाहें पां आरंभ बीज एकलें । मग तेंचि विरूढलिया बुड जाहालें ।
बुडी कोंभ निघाले । खांदियांचे ।।९८।।
खांदियांपासूनि अनेका । पररलिया शाखोपशाखा ।
शाखांस्तव देखा । पल्लव पानें ।।९९।।

पल्लवीं फूल फळ । एवं वृक्षत्व जाहालें सकळ ।
तें निर्धारितां केवळ । बीजचि तें ।।१००।।
ते आतां वाक्यसूर्यकर तुझे फाकले। आणि ऋषी मार्ग होते जे कथिले।
तयां आघवयांचेंचि फिटलें । अनोळखपण ।।१६३।।

**अध्याय अकरावा**

तीरें संस्कृताची गहनें । तोडोनिया मऱ्हाठिया शब्दसोपानें ।
रचिलीं धर्मनिधानें । निवृत्तिदेवें ।।९।।
जेथ शांताद्भुत रोकडे । आणि येरां रसां पडप जोडे ।
हें अल्पचि परी उघडें । कैवल्य जेथ ।।१२।।
एथ अर्जुनची काय म्हणो पातला ।
आजि आवडतयाही सुकाळु जाहला ।
जे गीतार्थ हा आला । मऱ्हाठीयें ।।१४।।
याचिलागीं माझें । विनविलें तें आइकिजे ।
तरी अवधान दीजे । सज्जनीं तुम्हीं ।।१५।।
अहो पुंसा आपणचि पढविजे । मग पढे तरी माथा तुकिजे ।
कां करविले चोजें न रिझे । बाळका माय ।।१७।।
तेवीं मी जें जें बोलें । तें प्रभु तुमचेंचि शिकविलें ।
म्हणोनि अवधारिजो आपुलें । आपण देवा ।।१८।।
हे सारस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड ।
तरी आतां अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजो ।।१९।।
मग हें रसभावफुली फुलेल । नानार्थ फळभारें फळा येईल ।
तुमचेनि धर्मे होईल । सुकाळ जगा ।।२०।।
का उदय न कीजे तेजाकारें । तंव गगनचि होऊनि असे आंधारें ।
मग उदैलियां एकसरें । प्रकाशु होय ।।६९३।।
तैसें माझां साक्षात्कारी । सरे अहंकाराची बारी ।
अहंकारलोपी अवधारीं । द्वैत जाय ।।६९४।।
मग मी तो हें आघवें । एक मीचि आथी स्वभावें ।
किंबहुना सामावे । समरसें तो ।।६९५।।

**अध्याय बारावा**

प्रत्यक्ज्योतिची वोवाळणी । करिसी मनपवनांचीं खेलणीं ।
आत्मसुखाचीं बाळलेणीं । लेवविसी ।।६।।
सतरवियेचें स्तन्य देसी । अनाहताचा हल्लरु गासी ।
समाधिबोधें निजविसी । बुझाऊनि ।।७।।
म्हणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझां पाउलीं ।
या कारणें मी साउली । न संडी तुझी ।।८।।
नवरसां भरवीं सागरु । करवीं उचित रत्नांचे आगरु ।
भावार्थाचे गिरिरु । निफजवीं माये ।।११।।
साहित्यसोनियाचिया खाणी । उघडवीं देशियेचिया आक्षोणी ।
विवेकवेलीची लावणी । हों देई सैंघ ।।१२।।
संवादफळनिधानें । प्रमेयाचीं उद्यानें ।
लावीं म्हणे गहनें । निरंतर ।।१३।।
पाखांडाचे दरकुटे । मोडीं वाग्वादअव्हांटे ।
कुतर्कांचीं दुष्टें । सावजें फेडीं ।।१४।।
श्रीकृष्णगुणीं मातें । सर्वत्र करीं वो सरतें ।
राणिवे बैसवी श्रोते । श्रवणाचिये ।।१५।।
मऱ्हाटियेचां नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं ।
घेणें देणें सुखचिवरी । हों देई या जगा ।।१६।।
म्हणोनि अभ्यासासि कांही । सर्वथा दुष्कर नाहीं ।
या लागीं माझां ठायीं । अभ्यासें मिळ ।।११३।।

**अध्याय तेरावा**

आत्मरूप गणेशु स्मरण । सकळ विद्यांचें अधिकरण ।
तेचि वंदूं श्रीचरण । श्रीगुरूचे ।।१।।
जयांचेनि आघवें । शब्दसृष्टी आंगवे ।
सारस्वत आठवें । जिव्हेसि ये ।।२।।
वक्तृत्व गोडपणें । अमृतातें पारु म्हणे ।
रस होती वोळगणें । अक्षरांसी ।।३।।
भावाचें अवतरण । अवतरविती खूण ।
हाता चढे संपूर्ण । तत्त्वभेदें ।।४।।
श्रीगुरुचे पाय । जैं हृदय गिंवसूनि ठाय ।
तैं येवढें भाग्य होय । उन्मेषासी ।।५।।
वाचस्पतीचेनि पाडें । सर्वज्ञता तरी जोडे ।
परि वेडिवेमाजीं दडे । महिमेभेणें ।।१९०।।

चातुर्य लपवी । महत्त्व हारवी ।
पिसेपर मिरवी । आवडोनि ।।१९१।।
किंबहुना स्वधर्मी थोरु । अवसरी उदारु ।
आत्मचर्चे चतुरु एऱ्हवीं वेडा ।।२११।।
तैसें ज्ञानामनाचिये भेटी । सरिसेंचि अहिंसेचे बिंब उठी ।
तेंचि ऐसें किरीटी । परिस आतां ।।२४४।।
ऐसिया जतना । चालणें जया अर्जुना ।
हें अनिर्वाच्य परिमाणा । पुरिजेना ।।२५०।।
जें बीज भुईं खोंविलें । तेंचि वरी रुख जाहलें ।
तैसें इंद्रियाद्वारीं फांकलें । अंतरचि ।।२९६।।
किंबहुना मज । तुमचिया काज ।
तियेलागीं व्याज । ग्रंथाचें केले ।।३३२।।
तरि तुम्हां रसिकांजोगें । व्याख्यान शोधावें लागे ।
म्हणूनि मतांगें । बोलों ठेला ।।३३३।।
श्रीगुरू वोंवाळिजती । कां भुवनीं जे उजळिती ।
तयां दीपांचिया दीप्ती । ठेवीन तेज ।।४३३।।
जरि ज्ञानाचेनि प्रकाशें । परतत्त्वी दिठी न पैसे ।
ते स्फूर्तीचि असे । अंध होउनी ।।६२७।।
म्हणोनि ज्ञान जेतुलें दावी । तेतुली ही वस्तुचि आघवी ।
ते देखे ऐसी व्हावी । बुद्धि चोख ।।६२८।।
रसु होआवा अतिमात्रु । हा घेतासि कविमंत्र ।
तरि अवंतूनि शत्रु । करतोसि कां गा ।।६३५।।
उपनिषदांकडे नावचे । योगशास्त्र न रुचे ।
अध्यात्मज्ञानी जयाचें । मनचि नाहीं ।।८२६।।
सुवायें मेघु सांवरे । जैसा चंद्रे सिंधु भरे ।
तैसा मातुला रसु आदरें । श्रोतयाचेनि ।।११५१।।
तो कृष्णार्जुनसंवादु । नागरीं बोलीं विशदु ।
सांगोनि दाऊं प्रबंधु । वोवियेचा ।।११५४।।
नुसधीचि शांतिकथा । आणिजेल कीर वाक्पथा ।
जे शृंगाराचां माथां । पाय ठेविती ।।११५५।।
दाऊं वेल्हाळे देशी नवी । जे साहित्यातें वोजावी ।
अमृतातें चुकी ठेवी । गोडिसेपणें ।।११५६।।
बोल वोल्हावतेनि गुणें । चंद्रासि घे उमाणे ।
रसरंगी भुलवणें । नादु लोपी ।।११५७ ।।
खेचराचियाही मना । आणी सात्त्विकाचा पान्हा ।
श्रवणासवें सुमना । समाधि जोडे ।।११५८।।
तैसा वाग्विलास विस्तारूं । गीतार्थे विश्व भरूं ।
आनंदाचें आवारुं । मांडूं जगा ।।११५९।।
फिटो विवेकाची वाणी । हो काना मनाची जिणी ।
देखो आवडे ते खाणी । ब्रह्मविद्येची ।।११६०।।
दिसो परतत्त्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा ।।
रिघो महाबोधसुकाळा -। माजी विश्व ।।११६१।।
हें निफजेल आतां आघवें । ऐसें बोलिजेल बरवें ।
जे अधिष्ठिला असें परमदेवें । निवृत्ती मी ।।११६२।।
म्हणोनि अक्षरीं सुभेदीं । उपमा श्लोक कोंदाकोंदी ।
झाडा देईन प्रतिपदी । ग्रंथार्थासी ।।११६३।।
हा ठावोवरी मातें । पुरतया सारस्वतें ।
केलें असें श्रीमंतें । श्रीगुरुरायें ।।११६४ ।।
तेणें जी कृपासावायें । मी बोलें तेतुलें सामाये ।
आणि तुमचिये सभे लाहें । गीता म्हणों ।।११६५।।
वरि तुम्हां संतांचे पाये । आजि मी पातला आहें ।
म्हणोनि जी नोहे । अटकु कांहीं ।।११६६।।
प्रभु काश्मिरी मुकें । नुपजे हे कौतुकें ।
नाही उणीं सामुद्रिकें । लक्ष्मीयेसी ।।११६७।।
तैसा तुम्हा संतांपासीं । अज्ञानाची गोठी कायसी ।
यालागीं नवरसीं । वरुषेन मी ।।११६८।।

**अध्याय चौदावा**

जयजय आचार्य । समस्तसुरवर्या ।
प्रज्ञाप्रभातसूर्या । सुखोदया ।।१।।
जयजय सर्व विसांवया सोहंभावसुहावया ।
नाना लोक हेलावया समुद्रा तूं ।।२।।
तरी तुज तैसिया । नमो जी श्री गुरुराया ।

मज ग्रंथोद्यमु फळावया । वेव्हारा होई ।।१६ ।।
आतां कृपाभांडवल सोडीं । भरीं मति माझी पोतडी ।
करीं ज्ञानपद्यजोडी । थोरा मातें ।।१७।।
मग मी संसरेन तेणें । करीन संतांसी कर्णभूषणें ।
लेववीन सुलक्षणें । विवेकाचीं ।।१८।।
हे वाक्सृष्टि एके वेळे । देखतु माझे बुद्धीचे डोळे ।
तैसा उदैजो जी निर्मळें । कारुण्यबिंबें ।।२०।।
माझी प्रज्ञावेली वेल्हाळ । काव्यें होय सुफळ ।
तो वसंतु होय स्नेहाळ – । शिरोमणी ।।२१।।
प्रमेयमहापुरें । हे मतिगंगा ये थोरे ।
तैसा वरिष उदारे । दिठीवेनी ।।२२।।
अगा विश्वैकधामा । तुझा प्रसादुचंद्रमा ।
करू मज पूर्णिमा । स्फुर्तीची जी ।।२३।।
जी अवलोकिलिया मातें । उन्मेषसागरीं भरितें ।
वोसंडेल स्फूर्तीतें । रसवृत्तीचे ।।२४।।
तरी आतां येणें प्रसादें । विन्यासें विदग्धें ।
मूळाशास्त्रपदें । वाखाणीन ।।२९।।
परी जीवा आंतुलीकडे । जैसी संदेहाची डोणी बुडे ।
ना श्रवणीं तरी चाडे । वाढु दिसे ।।३०।।
तैसी बोली साचारी । अवतरो माझी माधुरी ।
माले मागूनि घरीं । गुरुकृपेचां ।।३१।।
तो म्हणे गा अर्जुना । अवधानाची सर्व सेना ।
मळौनि इया ज्ञाना । झोंबावें हो ।।३९।।
मग म्हणे गा प्रज्ञाकांता । उजवली आणि वक्तृत्वता ।
जे बोलायेवढा श्रोता । जोडलासि ।।६३।।

**अध्याय पंधरावा**

इया गुरुचरणसेवा । हों पात्र तया दैवा ।
जें सकळार्थमेळावा । पाटू बांधे ।।९।।
ब्रह्मीचें विसवणेंवरी । उन्मेष लाहे उजरी ।
जें वाचेतें इये करी । सुधासिंधु ।।१०।।
पूर्णचंद्राचिया कोडी । वक्तृत्वा घापे कुरोंडी ।
तैसी आणी गोडी । अक्षरांतें ।।११।।
पैं मनादि साही इंद्रियें । श्रोत्रादि प्रकृतिकार्ये ।
तियें माझीं म्हणौनि होये । व्यापारारूढ ।।३५२।।
ऐसेनि देहेंद्रिया नायकें । धरूनि मन जवळिकें ।
भोगिजती शब्दादिकें । विषयभरणें ।।३६०।।
मग येथ अथवा स्वर्गी । जेथ जें देह आपंगी ।
तेथ तैसेंचि पुढती पांगी । मनादिक ।।३६८।।
पैं दोहीं वोठीं एक बोलणें । दोहीं चरणीं एक चालणें ।
तैसें पुसणें सांगणें । तुझें माझें ।।४५४।।
हें शब्दब्रह्माचें मथितें । व्यासप्रज्ञेचेनि हातें ।
मथूनि काढिलें आथितें । सार आम्ही ।।५७१।।
जया आत्मज्ञानाचां ठायीं । कर्म आपुलेया जीविता पाहीं ।
होऊनियां उतराई । लया जाय ।।५८५।।
तैसें घडतें प्रमेय घेइजे । उणें तें मज देइजे ।
जें नेणणें हेंचि सहजें । रूप कीं बाळा ।।५९५।।

**अध्याय सोळावा**

मावळवीत विश्वाभासु । नवल उदयला चंडांशु ।
अद्वयाब्जिनीविकाशु । वंदू आता ।।१।।
जो अविद्ये राती रुसोनियां । गिळी ज्ञानाज्ञानचांदणियां ।
जो सुदिनु करी ज्ञानियां । स्वबोधाचा ।।२।।
जेणें विवळतिये सवळे । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे ।
सांडिती देहाहंतेची अविसाळें । जीवपक्षी ।।३।।
म्हणौनि अद्वय बोधपाटणीं । तेथ महानंदाची दाटणी ।
मग सुखानुभूतीचीं घेणीं देणीं । मंदावों लागती ।।१२।।
मियां गीता येणें नांवें । तुझे पसायामृत सुहावें ।
वानूं लाधलों तें दुणेन थावें । दैवलें दैव ।।३१।।
माझिया सत्यवादाचें तप । वाचा केलें बहुत अल्प ।
तया फळाचें हें महाद्वीप । पातली प्रभु ।।३२।।
पुण्यें पोशिलीं असाधारणें । तियें तुझे गुण वानणें ।
देवूनि मज उत्तीर्णे । जालीं आजी ।।३३।।

**अध्याय सतरावा**

विश्वविकासित मुद्रा । जया सोडी तुझी योगनिद्रा ।
तया नमो जीवगणेंद्रा । सद्‌गुरु तुज ।।१।।
त्रिगुणत्रिपुरीं वेढिला । जीवत्वदुर्गीं आडिला ।
तो आत्मा शंभूनें सोडविला । तुझिया स्मृती ।।२।।
तैसा तुझिया प्रणती । मी पूर्णु जाहलों श्रीनिवृत्ति ।
आतां आणीन व्यक्ती । गीतार्थ तो ।।२०।।
जो प्रज्ञेचा प्रियोत्तमु । ब्रह्मविद्येचा विश्रामु ।
सहचरु मनोधर्मु । देवाचा जो ।।३३।।
तरी सत्त्वगुणाकडे । जैं दैवें भोक्ता पडे ।
तैं मधुरीं रसी वाढे । मेचु तया ।।१२५।।
एवं शारीर जें तप । तयाचें दाविले रूप ।
आतां आईक निष्पाप । वाङ्मय तें ।।२१५।।
होतों अज्ञानाचां आंधारां । वोसंतीत जन्मवाहरा ।
तो आत्मप्रकाशमंदिरा - । आंतुं आणिलें ।।४२९।।

**अध्याय अठरावा**

आतां गीतार्थाची मुक्तमुदी । लावीं माझिये वाग्वृद्धी ।
जें माने हे सभासदीं । सज्जनांचां ।।२७।।
वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व ।
रसिकत्वीं परतत्व । स्पर्शु जैसा ।।३४७।।
तरी शब्द स्पर्शु । रूप गंध रसु ।
हा पंचविध आभासु । ज्ञेयाचा जो ।।४७२।।
तैसे ज्ञेय तरी एकसरें । परी ज्ञान इंद्रियद्वारें ।
घे म्हणोनि प्रकारें । पांचे जालें ।।४७४।।
म्हणोनि ज्ञान ज्ञेय ज्ञाता । हे त्रिविध गा पंडुसुता ।
होयचि कर्मां समस्तां । प्रवृत्ति येथ ।।४८५।।
परी तेंचि ज्ञेय विपायें । जरी ज्ञातयातें प्रिय होये ।
तरी भोगावया न साहे । क्षणही विलंबु ।।४८६।।
तरी बुद्धि आणि मन । चित्त अहंकार हन ।
हे चतुर्विध चिन्ह । अंत:करणाचें ।।४९८।।
बाहिरित्वचा श्रवण । चंक्षु रसना घ्राण ।
हें पंचनिध जाण । इंद्रियें गा ।।४९९।।
तेथ आंतुले तंव करणें । कर्ता कर्तव्या घे उमाणें ।
मग तैं जरी जाणें । सुखा येते ।।५००।।
तरी बाहेरिलें तियेंही । चक्षुरादिकें दाहाही ।
उठौनि लवलाही । व्यापारा सूये ।।५०१।।
मग तो इंद्रियकदंबु । करविजे तंव राबु ।
जंव कर्तव्याचा लाभु । हातासि ये ।।५०२।।
म्हणोनि ज्ञाना कर्मा कर्तया । पातेजों नये धनंजया ।
जे दोनी बांधती सोडावया । एकचि प्रौढ ।।५१८।।
तें सात्त्विक ठाउवें होये । तो गुणभेदु सांगों पाहें ।
जो सांख्यशास्त्रीं आहे । उवाइला ।।५१९।।
तरी अर्जुना गा तें फुडें । सात्त्विक ज्ञान चोखडें ।
जयाचा उदयीं ज्ञेय बुडे । ज्ञातेनिसीं ।।५२९।।
जैसा सूर्य न देखे आंधारे । सरिता नेणिजती सागरें ।
कां कवळिलिया न धरे । आत्मछाया ।।५३०।।
तरी याचि शास्त्राचेनी । संप्रदायें पांघुरौनी ।
शास्त्रार्थुं हा निकेनी । अनुष्ठीं हो ।।१४८१।।
एऱ्हवीं अमृतमथना - । सारिखें होईल अर्जुना ।
जरी रिघसी अनुष्ठाना । संप्रदायेंवीण ।।१४८२।।
तैसा गुरु प्रसन्न होये । शिष्य विद्याही कीर लाहे ।
परी ते फळे संप्रदायें । उपासिलिया ।।१४८४।।
आणि तोचि हा मी आतां । व्यासाची पदें पाहतां पाहतां ।
आणिला श्रवणपथा मऱ्हाठिया ।।१७०८।।
परी गीता ईश्वरु भोळा । ले व्यासोक्तिकुसुममाळा ।
तरी माझीया दूर्वादळा । ना न म्हणे कीं ।।१७१०।।
आणि क्षीरसिंधूचिया तटा । पाणिया येती गजघटा ।
तेथ काय मुरकुटा । वारिजतसे ।।१७११।।
राजहंसाचें चालणें । भूतळी जालिया शाहाणें ।
आणिकें काय कोणें । चालावेंचिना ।।१७१३।।
म्हणोनि माझे नीच नवे । श्वासोच्छवासही प्रबंध होआवे ।
गुरुकृपा काय नोहे । ज्ञानदेवो म्हणे ।।१७३४।।

याकारणें मियां । गीतार्थ मऱ्हाठिया ।
केला लोकां यया । दिठीचा विषो ।।१७३५।।
परी मऱ्हाठे बोल रंगें । कवळितां पैं गीतांगें ।
तैं गातयाचेनि पांगे । येकाढता नोहे ।।१७३६।।
म्हणौनि गीता गावों म्हणे । तैं गाणिवें होती लेणें ।
ना मोकळे तरी उणें । गीताही आणित ।।१७३७।।
तैसा गाणिवेनें मिरवी । गीतेवीणही रंगु दावी ।
तो लाभाचा बंधु ओंवीं । केला मियां ।।१७४१।।
तेणें आबालेसुबोधें । वोवीयेचेनि बंधे ।
ब्रह्मरससुस्वादें । अक्षरें गुंथिलीं ।।१७४२।।
तैसा प्रबंधु हा श्रवणीं । लागतखेंवो समाधि आणी ।
ऐकिलियाही वाखाणी । काय व्यसन न लवी ।।१७४४।।
पाठ करितां व्याजें । पांडित्यें येती वेषजे ।
तैं अमृतातें नेणिजे । फावलिया ।।१७४५।।
तैसेनि आइतेपणें । कवित्व जालें हें उपेणें ।
मनन निदिध्यास श्रवणें । जिंतिलें आतां ।।१७४६।।
हे स्वानंदभोगाची सेल । भळतयासीच देईल ।
सर्वेंद्रियां पोषवीलं । श्रवणाकरवी ।।१७४७।।
तैसें श्रीनिवृत्तिनाथाचें । गौरव आहे जी साचें ।
ग्रंथु नोहे हें कृपेचें । वैभव तये ।।१७५०।।
ना आदिगुरू शंकरा – । लागोनि शिष्यपरंपरा ।
बोधाचा हा संसारा । जाला जो आमुतें ।।१७५८।।
शब्द कैसा घडिजे । प्रमेयीं कैसें पां चढिजे ।
अलंकारु म्हणिजे । काय तें नेणें ।।१७६७।।
सायिखडेयाचें बाहुलें । चालवित्या सूत्राचेनि चाले ।
तैसा मातें दावीत बोलें । स्वामी तो माझा ।।१७६८।।

**पसायदान**

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञे तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।१७९३।।
जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।१७९४।।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।१७९५।।
वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळीं । भेटतु भूतां ।।१७९६।।
चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।१७९७।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।१७९८ ।।
किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।१७९९।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकी इयें ।
दृष्टादृष्टविजये । होआवें जी ।।१८००।।
येथ म्हणे विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।१८०१।।